।। श्रीराम ।।

श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प क्र. ७६

# अक्षरे चैतन्याची भाग - २

श्रीज्ञानेश्वरमहाराज यांच्या वाङ्मयावरील
प.पू.श्रीदासराममहाराजकृत टीका व गद्य भावार्थ

ॐ

संपादक

दीपक चंद्रशेखर केळकर

आवृत्ती पहिली सांगली सन २०२०

श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प क्र. ७६

# *अक्षरे चैतन्याची भाग -२*

प्रकाशक :
श्री. माधव रामकृष्ण बर्वे
रामकृष्ण, प्लॉट नं.८, येलाज मळा,
बिगबझार जवळ, इचलकरंजी-सांगली रोड,
इचलकरंजी जि. कोल्हापूर पिन. ४१५ ११५

**संपादक :**
**श्री. दीपक चंद्रशेखर केळकर**
घ.नं.८२७, श्रीराम निकेतन,श्री.बापूरावजी केळकरवाडा,
सेनामंदिर रोड, गावभाग, सांगली ४१६४१६.
दूरध्वनी :०२३३-२३३१७४७ भ्रमणध्वनी : ९८२२००७५२८ / ९४२०५७४५७०

प्रथम आवृत्ती इ.स.२०२०

प्रकाशन दिन : माघ शु. ९ शके १९४१
सोमवार दि. ०३.०२.२०२०
प.पू.श्रीमामामहाराज केळकर पुण्यतिथी

**© सर्व हक्क संपादकाचे स्वाधीन**

अक्षर जुळणी :
पॉप्युलर एस.अ‍ॅण्ड टी. इन्स्टिट्यूट, सांगली
श्री.भालचंद्र विनायक सहस्रबुद्धे
मुद्रक :
श्रीकृष्ण मुद्रणालय, औद्योगिक वसाहत, सांगली

स्वागत मूल्य : रु.१००/-

**प्रत मिळणेचे ठिकाण :**
श्री. दीपक चंद्रशेखर केळकर
घ.नं.८२७, श्रीराम निकेतन,श्री.बापूरावजी केळकरवाडा,
सेनामंदिर रोड, गावभाग, सांगली ४१६४१६.
दूरध्वनी :०२३३-२३३१७४७ भ्रमणध्वनी : ९८२२००७५२८ / ९४२०५७४५७०

# संपादकीय

**जो जनामध्ये वागे । परि जनावेगळी गोष्टी सांगे ।**
**ज्याचे अंतरी ज्ञान जागे । तोचि साधु ।। दा.६.१.१८**

अक्षरे चैतन्याची भाग -२ हा ग्रंथ प्रकाशित करताना मला अत्यंत आनंद होत आहे. या ग्रंथात श्रीज्ञानेश्वरमहाराज लिखित विविध प्रकरणांचा समावेश केला आहे. यात प्रामुख्याने चांगदेव पासष्टी, ज्ञानदेव तेहेत्तिशी, ज्ञानदेव मुद्राप्रकाश, नमनस्तोत्र, दत्तस्तुती प्रणव, ज्ञानेश्वरमहाराजांची सनद, अमृतानुभव, ज्ञानदेव आज्ञापत्र, इत्यादींचा समावेश आहे. या सर्व प्रकरणांवर श्रीदासराममहाराजांनी समओवी टीका, समश्लोकी, भावार्थ इ. स्वरूपात विवेचन केले आहे. वर नमूद केलेली सर्व प्रकरणे ही यापूर्वी स्वतंत्रपणे प्रकाशित झालेली होती. परंतु त्याच्या छापील प्रती सध्या शिल्लक नाहीत. श्रीदासराममहाराजांच्या लेखनवह्यांचा अभ्यास करताना माझ्या असे मनात आले की ही सर्व प्रकरणे एकत्रित करून एक प्रकरण ग्रंथ म्हणून वेगहा छापावा. यास अनुसरून लेखन वह्यातील सर्व प्रकरणांची प्रेस कॉपी करणेस प्रारंभ केला. याला अंदाजे एक वर्ष गेले. हे प्रेस कॉपी करणेकामी मला श्री.रमेशराव लाळे यांचेही सहकार्य लाभले. हा सर्व खटाटोप करून हा अक्षरे चैतन्याची भाग -२ हा ग्रंथ साकार झाला आहे. या ग्रंथातील सर्व प्रकरणांवरील टीका, भावार्थ, समश्लोकी इ. लिखाण हे श्रीदादांनी, त्यांचे वयाचे २५ वर्षाचे आतच लिहून पूर्ण केले आहे. याबाबतची तारीखवार/तिथीवार नोंद त्यांनी प्रत्येक प्रकरणाचे शेवटी सहीसह नमूद केली आहे.

श्रीदादा कीर्तनात अक्षर या शब्दाचा अर्थ फार वेगळ्या पद्धतीने सांगायचे. अक्षर म्हणजे - क्षर म्हणजे नाश, अ म्हणजे नाही, ज्याला नाश नाही असे ते अक्षर. तसेच अक्षर कोणते तर - ॐ इति एकाक्षर ब्रह्म. पुढे जाऊन श्रीदादा याविषयावर ज्ञानेश्वरीतील, साचचि बोलाचे नव्हे हे शास्त्र । पै संसारू जिणते हे शस्त्र । आत्मा अवतरविते मंत्र । अक्षरे इये ।।१५.७६।।

ही ओवी उधृत करायचे. याचा अर्थ ते पुढीलप्रमाणे सांगायचे - ज्याच्या आधी आत्मा आहे ते अध्यात्म हे बोल घेवडे शास्त्र नाही. तर हे संसाराला नामोहरम करणारे दुधारी शस्त्र आहे. प्रत्येक अक्षरात आत्मा अवतीर्ण होतो असे हे अध्यात्म आहे. चैतन्य याचा शब्दरत्नाकर या ग्रंथात आत्मा / प्राण असा अर्थ दिला आहे. म्हणून या ग्रंथाला अक्षरे चैतन्याची हे नाव सार्थ आहे असे मला वाटते.

या ग्रंथातील प्रत्येक प्रकरणाच्या सुरुवातीस त्या प्रकरणाची थोडी पार्श्वभूमी लिहून हे प्रकरण सुरू केले आहे. कारण, या प्रकरणाची पार्श्वभूमी समजल्याशिवाय त्या प्रकरणाचा उकल होणे कठीण असते. यातील काही प्रकरणांना यापूर्वी प्रा.डॉ.के.वा.आपटे यांनी लिहिलेल्या अत्यंत अभ्यासपूर्ण व चिकित्सक अशा प्रस्तावना जोडल्या आहेत. उर्वरीत प्रकरणांना श्री. नारायणराव देशपांडे यांनी पार्श्वभूमी लिहिली आहे. याही पुस्तकाला आवश्यक असणारी सुरवातीची प्रस्तावना श्रीदासराममहाराजांचे कृपांकित श्री. नारायणराव देशपांडे यांनी लिहिली आहे. तसेच या ग्रंथातील प्रकरणांची क्रमवार सूची करणेचे कामही त्यांनी केले आहे. या सर्व कामी तसेच कच्ची मुद्रिते तपासणेचे काम श्री. रमेशराव लाळे यांनी केले आहे.

असा हा अक्षरे चैतन्याची भाग -२ हा ग्रंथ ज्ञानेश्वरमहाराजांच्या वाङ्मयावर अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांसाठी निश्चितच उपयोगी पडेल यात शंका नाही.

**श्रीअण्णांचा कृपाभिलाषी,**

**दीपक चंद्रशेखर केळकर**



# ✻ प्रस्तावना ✻

श्रीज्ञानेश्वरमहाराजांची ग्रंथसंपदा खालीलप्रमाणे आहे. १. भावार्थ दीपिका तथा ज्ञानेश्वरी, २. हरिपाठ, ३. अमृतानुभव, ४. चांगदेवपासष्टी, ५. श्रीज्ञानदेवांचे अभंग, ६. इतर प्रकरण ग्रंथ. श्रीज्ञानदेवांच्या वरील सर्वप्रकारच्या वाङ्मयावरती श्रीदासराममहाराज यांनी लेखन केलेले आहे. वरीलपैकी श्रीज्ञानेश्वरी व हरिपाठ यावरती श्रीदासराममहाराजांनी केलेल्या लेखन संबंधाने ''अक्षरे चैतन्याची भाग - १'' हा ग्रंथ प्रकाशित झालेला आहे. श्रीअनुभवामृत या ग्रंथावरती श्रीदासराममहाराजंनी केलेले लेखन असलेला 'अनुभवामृत-श्रीदासराममहाराजकृत समओवी टीकेसह' हा ग्रंथ यापूर्वी इ.स.२०१० मध्ये प्रकाशित झालेला आहे. त्यामुळे प्रस्तुत ग्रंथात अमृतानुभव या ग्रंथाचा समावेश केलेला नाही.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी भगवत्‌गीतेमधील तत्त्वज्ञानाचा विस्तार ज्ञानेश्वरीमध्ये नऊ हजार ओव्यांमधून केला आहे. त्यानंतर श्रीनिवृत्तीनाथांनी सुचविल्याप्रमाणे श्रीज्ञानदेवांनी 'अमृतानुभव' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथामध्ये श्रीज्ञानदेवांनी 'एकमेवाद्वितीय ब्रह्म' (एकच एक परब्रह्म) या श्रुतीसिद्धांताची अनेक प्रकरणातून विस्तारपूर्वक मांडणी केलेली आहे. ज्ञानमात्र चैतन्य परमात्म्यावर प्रकृती-पुरुष, शिव-शक्ती, द्रष्टा-दृश्य तसेच ज्ञाता-ज्ञेय या सर्व सापेक्ष कल्पना उद्भवतात. परब्रह्माच्या / परमात्म्याच्या केवळ ज्ञानस्फुरणातून / चैतन्य स्फुणरणातून ही सापेक्ष द्वंद्वे उदयास येतात, पुढे विश्वरूपाने विस्तार पावतात व अखेर परमात्म्यामध्येच नाहीशी होतात. अशाप्रकारच्या सर्व सापेक्ष द्वंद्वाच्या अतीत ते एकमेव, निरपेक्ष, चैतन्यरूप/ज्ञानरूप सच्चिदानंद ब्रह्म आहे. अखिल विश्व हे या चैतन्याचा विलास आहे. अशा चिद्‌विलासवादाचे प्रतिपादन येथे अनेक उदाहरणे देऊन केलेले आहे. जीव व जगत् हे परमात्म्यापासून भिन्न नाहीत असा श्रुतिसिद्धांतच अमृतानुभवाच्या आठशे

ओव्यांमधून सांगितला आहे. या ग्रंथाचा रचनाकाल शके १२१४, इ.स.१२९२ च्या जवळपास मानला जातो. या ग्रंथामध्ये शिव-शक्तीचे ऐक्य, ज्ञान-अज्ञानाचे खंडन, स्फुर्तीवाद/चिद्‌विलासवाद हे विषय विस्ताराने आलेले आहेत.

अध्यात्माचे शुद्ध रसायन असलेला हा ग्रंथ कठीण आहे. ज्ञानेश्वरी व अमृतानुभव यामध्ये परमात्मा / परब्रह्माविषयी प्रतिपादन केलेला सिद्धांत एकच आहे. दशोपनिषदांचे सार सामान्य लोकांना आकलन होत नाही. म्हणून ज्ञानेश्वरीच्या रुपाने सर्वांना परमार्थाचा हा अमूल्य ठेवा श्रीज्ञानदेवांनी दिला आहे. अमृतानुभव हा ज्ञानी लोकांसाठी उपयुक्त आहे, म्हणून येथे परमात्म विषयावर सिद्धांत व्यतिरेक पद्धतीने न करता, अन्वयाच्या पातळीवरून मांडला आहे. ज्ञानेश्वरीमधील अद्वैत सिद्धांतच अन्वयाच्या पातळीवरून अमृतानुभवामध्ये आलेला आहे.

श्रीदासराममहाराजांनी 'चांगदेवपासष्टी' या ग्रंथावर विविध प्रकाराचे लेखन केले आहे. पाच प्रकरणामध्ये विभागल्या गेलेल्या या प्रकरणांचा थोडक्यात परिचय पाहू :-

१. **चांगदेवपासष्टी :-** श्रीज्ञानदेवांनी अमृतानुभवामधील वरील अद्वैत सिद्धांताचे सारच अत्यंत सूत्रमय भाषेत ६५ ओव्यांमधून सांगितल आहे. ही एक प्रासंगिक रचना आहे. याची रचना शके १२१६ इ.स.१२९४ च्या आसपास झाली असावी. चांगदेवपासष्टी म्हणजे श्रीचांगदेवांच्या कोऱ्या पत्राला श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी ६५ ओव्यांमधून योगमार्गाला धरून केलेला बोध होय.

**चांगदेवपासष्टीमधील तत्त्वज्ञान :-** या ग्रंथात १. अनेक दृष्टांतांच्या सहाय्याने द्वैतवादाचे खंडन, २. त्रिपुटीचा निरास करून स्फुर्तीवादाचा / चिद्‌विलासवादाचा पुरस्कार, ३. चिद्‌विलासवादाच्या, अन्वयसिद्धांताच्या आधारे अद्वैतसिद्धी सांगितली आहे. श्रीज्ञानदेवांनी चांगदेवांना छांदोग्य



उपनिषदातील 'तत् त्वं असि' (ते ब्रह्म तूच आहेस) या बोधरूप महावाक्याचा उपदेश केला आहे. हे करताना त्यांनी आत्म्याचे स्वरूप, जीवाचे स्वरूप व विश्वाचे स्वरूप स्पष्ट करून, ह्या तीनही घटकांमधील परस्पर संबंधांची चर्चा केली आहे.

**(अ) परमात्मस्वरूप :-** सत् चिद् व आनंद (सत्य, ज्ञान व आनंद) हे तीन धर्म म्हणजे ब्रह्माचे स्वरूप लक्षण होय. स्वेच्छेने, स्फुरणरूपाने तो स्वयंसिद्ध परमात्मा जगत्‌रुपाने, दृश्यरूपाने प्रकट होतो. अशातऱ्हेने प्रकट होण्यापूर्वी अगर प्रकट झालेल्या स्वरूपाचा स्वेच्छेने पुन्हा स्वतःमध्ये लय केल्यानंतरही, तो परमात्मा आपल्या स्वतःच्या मूळ अशा निर्विकाररूपाने असतोच असतो. चांगदेवपासष्टीतील ३० ते ३६ ओवीपर्यंत परमात्म्याच्या या केवळ शुद्ध, निर्विकार स्वरूपाचे वर्णन आलेले आहे. आपल्या बुबुळास आपणच निराळेपणाने पाहू शकत नाही. जगताचे ज्ञानव्यवहार परमात्म्याच्या आश्रयाने चालतात. मात्र तो स्वतःच ज्ञानरूप/जाणीवरूप असल्याने तो परमात्मा स्वतःच स्वतःच्या ज्ञानाचा विषय होऊ शकत नाही. परंतु स्वतः स्वतःला जाणण्यामध्ये अशाप्रकारच्या त्रिपुटीची आवश्यकता नसते. शेवटच्या छत्तीसाव्या ओवीमध्ये सर्व ओव्यांचा निष्कर्ष सांगितला आहे, ''परब्रह्म वस्तु ही अस्तित्वरूपाने, स्वतःच्या केवळ असलेपणाने, सत्‌रुपाने आहे. ती परमात्मवस्तु स्वयंप्रकाशमान, पहाणेरूप व ज्ञानघन आहे. म्हणूनच ती चिद्‌रुप आहे. स्वतःच्या आनंदरूपाचा भोग स्वतःच भोगणारी ती पूर्ण सुखरूप वस्तु आहे. त्यामुळे मौन धारण करणे हे त्या परमात्म्याचे खरे वर्णन आहे.''

**(ब) विश्वरूप :-** चांगदेवपासष्टीच्या पहिल्या तीन ओव्यांमधून परमात्म्याच्या विश्वरूपाने होणाऱ्या आविष्काराचे वर्णन आले आहे. विश्वाची उत्पत्ती, स्थिती व लय म्हणजे परमात्म्याचा प्रकटपणाचा व अप्रकटपणाचा आविष्कार होय. परंतु त्याच्या विश्वरूपाने प्रकटण्याचा अगर अप्रकटण्याचा त्या परमात्म्याच्या नित्य व निर्विकार स्थितीमध्ये काहीही फरक पडत नाही. सर्व स्थितीमध्ये तो परिपूर्णच असतो. हेच त्याचे तटस्थ लक्षण आहे. पुढील

चार ते छत्तीसाव्या ओवीपर्यंत परमात्म्याचे स्वरूपलक्षण सांगितले आहे. परमात्मा व अनेकत्वाने भरलेले हे जगत् यामध्ये भिन्नत्व नाही. सत्, चिद् व आनंदरूपाने तो सर्वव्याप्त आहे. त्यासाठी उदक-कल्लोळ, सोने-लेणे या दृष्टांतामधून केवळ नामरूपाचे वेगळेपण दिसून येते. परमात्माच द्रष्टा व दृश्यरूपाने म्हणजेच पहाणेरूपाने आहे. सर्वत्र एकच एक ज्ञानप्रकाश / चिद्प्रकाश भरूप राहिला आहे. परमात्म्याचे मूळ ज्ञानस्फुरण/ जाणीवेचे स्फुरण हेच विश्वाचे स्फुरण आहे. स्वेच्छेने तो परमात्माच विश्वाच्या स्फुरणातून तो स्वतःच प्रकट होत असतो. स्फुरणरूप ज्ञानघन जाणीवशक्तीच द्रष्टेपणाला येते. अशातऱ्हेने आत्मवस्तुच्या त्रिपुटीच्या तीनही प्रकारात केवळ चैतन्यच असते. लय स्थितीमध्ये द्रष्टा व दर्शन यांचा निरास होतो व केवळ ज्ञानघन परमात्मा तेवढा शिल्लक राहतो.

**(क) जीवाचे स्वरूप :-** त्वं पद म्हणजे जीवपणा. जीव हा आत्मस्वरूप आहे. जीवाने 'मी'पणाच्या उपाधीचा त्याग करुन स्वतःच्या स्वरूपज्ञानाची ओळख करून घ्यावी. मी केवळ देह नसून सच्चिदानंद परब्रह्मच आहे, असा जीवाच्या ठायी निश्चय होताच, त्याचा जीवपणा नाहीसा होऊन तो द्वैतभावाच्या पलीकडे जातो. अशातऱ्हेने सच्चिदानंदपदाच्या अभेद स्थितीमध्ये जीव येतो.

**चांगदेवपासष्टीवरती श्रीदासराममहाराजांचे विवरण : चांगदेवपासष्टी - एक नामकळा**

**अ)** आत्मस्वरूप :- श्रीदासराममहाराजांनी या पासष्ट ओव्यांवरती ५७८ ओव्यांची विस्तारपूर्वक अध्यात्मिक टीका लिहिलेली आहे. परमात्म्याच्या मूळ स्वरूपाचे वर्णन करताना, श्रीदासराममहाराज, तो परमात्मा केवळ 'असणेपणाने' नित्यसिद्ध आहे. तो प्रयोगी असून त्याने या विश्वाचा प्रायोग केला आहे असे सांगतात. त्याचे ठिकाणी 'पहाणेपण' हे स्वयंसिद्ध असून, त्रिपुटीवाचून तो स्वतःशीच असणेपणाने असतो. परमात्मा हा नित्य असणेपणाने, सत्रूपाने, ज्ञानघन, चिद्रुप पहाणेपणाने सच्चिदानंदरूप आहे.



असा हा हंसरूप परमात्मा सहस्रदळी चिदाकाशामध्ये सोहं आत्मरूपाने/ शिवात्मरूपाने स्थित असतो. येथून निघालेल्या मूळ सोहंगतीपासून चैतन्य लहरी प्रवाहित होतात. तोच प्राण होय. येथूनच पुढे भूताकाश व सर्व विश्वाचा आभास निर्माण होतो असे दासराममहाराज सांगतात.

**ब)** विश्वाचे स्वरूप :- श्रीदासराममहाराज सांगतात की, हे विश्व म्हणजे चैतन्याचा विलास आहे. विश्वाचे चैतन्यपूर्ण अस्तित्व म्हणजेच जाणीवेचे / ज्ञानरूपाचे स्फुरण होय. श्रीदासराममहाराजांची अनुभवसृष्टी ही चिद्‌विलासवादाची आहे. श्रीदादांनी येथे चैतन्याच्या सामर्थ्याचे नेमके महत्व लक्षात आणून दिले आहे. सत्‌ब्रह्म हे सर्वश्रेष्ठ आहे. सत् म्हणजे अस्तित्व. जीवाचा 'स्वप्न' हा जसा विलास आहे, त्याप्रमाणे सत्‌चा विलास चिद् आहे. नामरूपाने नटलेल्या विश्वामध्ये केवळ चैतन्यच संचारून आहे हे सांगताना श्रीदासराममहाराजांनी सोने व त्याचा दागिना यांचे उदाहरण दिले आहे. सोन्यामध्ये लेणे हे अव्यक्तरूपाने असतेच. म्हणूनच ते दागिन्याच्या रूपाने व्यक्तपणाला येऊ शकते. याचप्रमाणे सत्‌परमात्म्यात चिद् (चैतन्य) असतेच. याच चिद्‌लहरी / अस्तित्वलहरी विश्वरूपाने साकारतात. थोडक्यात म्हणजे विश्व म्हणजे चैतन्याच्या वाऱ्याचा विलास आहे.

**क)** जीवाचे स्वरूप :- 'चिद्‌विलासवाद' हा श्रीज्ञानदेवांचा मौलिक सिद्धांत आहे. या तत्त्वज्ञानाचे मूळ स्त्रोत नाथपंथात आहे. शिव व शक्ती यामध्ये अंतर नाही. शक्तीपासून हे जगत् झाले. त्यामुळे आपोआपच अद्वैत सिद्ध होते. त्यासाठी दुसऱ्या वस्तुचा (जगताचा) निरास करण्याची आवश्यकता भासत नाही. श्रीदासराममहाराज हे श्रीज्ञानदेवांच्या तत्त्वपरंपरेतील आधुनिक काळातील थोर संत आहेत. श्रीदासराममहाराजांनी या चिद्‌विलासवादाची प्रतिष्ठापना आपल्या तत्त्वज्ञानाच्या मांडणीतून केली आहे. हा धागा त्यांना परंपरागत सिद्ध/नाथ संप्रदायातून प्राप्त झाला आहे. त्यांच्या मते जगत् मिथ्या नसून, ते चैतन्याचा विलास आहे. हा जीव देखील विश्वाचाच एक भाग असल्याने तोही चैतन्यरूपच आहे. चिद्‌प्रकाशयुक्त अस्तित्व ही या

जीवाची मूळ स्थिती आहे. ही जीवदशा / जीवभाव चिदाकाशामध्ये व्यक्तपणास येतो असे श्रीदासराममहाराज सांगतात.

**ड)** साधनमार्ग :- श्रीदासराममहाराजांनी जीवाने आत्मस्वरूप प्राप्त करून घेण्यासाठी करावयाचा 'वायूसाधनमार्ग' सांगितला आहे. साधन अभ्यासाने जीवनाच्या गतीवरती चित्ताचे केंद्रिकरण केले असता, ज्ञानेंद्रियांचा निरोध होतो. श्वासोच्छ्वासाची गती सूक्ष्मतर- सूक्ष्मतम् होऊन केवलकुंभकाची अवस्था प्राप्त होते. तेथील केवळ आकाशरूप जीवनाची प्राणगती ऊर्ध्वगामी होते. ही प्राणगती भ्रूमध्यस्थानी सहस्रदळातून आलेल्या प्राणगतीशी मिळते. भ्रूमध्यस्थानी ही एकत्र झालेली प्राणगती ऊर्ध्वगामी होते. त्या प्राणगतीचेच डोळे बनतात. ही प्राणगती चिद्वायुस्वरूपी असते. ही ऊर्ध्वगामी झालेली दृष्टी सहस्रदळातील चिदाकाशामध्ये स्थित सोहंदीपाशी मिठी घालते. तेथे सोहंधारणेमध्ये सोहंज्योतीचे दर्शन होते. तेथे जीव-शिव ऐक्याचा अनुभव येतो. सोहंधारणेमध्ये सोहंनादाशी जीव तदाकार होतो, तेव्हा चैतन्याचे वारे म्हणजेच सोहंज्योती नयनामध्ये प्रगट होते व सर्वविश्व हे 'सोहंविश्व' असल्याचा चैतन्यमय अनुभव येतो. हाच 'चिद्विलासवाद' होय. अशा चिद्विलासवादाचा अनुभव हीच सहजसमाधीची अवस्था होय. हीच परमात्म्याच्या शांतरसाची परिपूर्ण अवस्था होय.

**२) चांगदेवपासष्टी ओवीबद्ध टीका व भावार्थ :-**

या प्रकरणामध्ये दासराममहाराजंनी चांगदेवपासष्टीमधील पासष्ट ओव्यांवरती समओवी टीका लिहून त्याचा भावार्थ लिहिला आहे. यामध्ये समारोपाच्या ओवीसह एकूण ६६ ओव्या आहेत. समओवीस गद्यार्थ दिलयाने ग्रंथातील विषयाचे आकलन सुलभतेने होणार आहे.

जीव व ब्रह्म यांच्या ऐक्याचे तसेच ब्रह्म व जगत् यांच्या ऐक्याचे प्रतिपादन करून अद्वैताच्या सिद्धीचे निरूपण येथे केलेले आहे. देहाचा संग घडल्याने जीवाला जागृती व निद्राप यांचा अनुभव येत असतो. क्रमाने येणाऱ्या निद्रा व जागृती यांच्या चक्रामध्ये जीव अडकलेला आहे. या देहाला



चिकटलेल्या निद्रा व जागृती या दोहांचा ग्रास झाला असता जीवाला खरी आत्मजागृती येते. या आत्मजागृतीच्या प्रक्रियेचे वर्णन या ओव्यांमधून आलेले आहे. म्हणूनच ६५ व्या ज्ञानदेवांच्या ओवीवरती टीका लिहिताना श्रीदासराममहाराज म्हणतात,

**निद्रेचिया निद्रा । जागृती गिळोनी पुरा ।**

**अनुसंधानी खरा । ज्ञानदेवो म्हणे ।।६५।।**

या पासष्ट ओव्यांवरती लिहिलेल्या समओवी टीका व गद्यार्थानंतर श्रीदासरामांनी समारोपाची ओवी लिहिली आहे

**भगवान गुरुलिंगजंगम । साधुराम हनुमंत परम ।**

**मनी गोविंदसुत राम । अर्पितसे ।।६६।।**

श्रीदासराममहाराज म्हणतात, 'भगवान गुरुलिंगजंगममहाराज, रघुनाथप्रिय साधुमहाराज, चिमडचे महाराज व परमसद्गुरू श्रीहनुमंतराय कोटणीसमहाराज यांचे चरणासी ही शब्दपुजा हा गाविंदसुत राम मनोमनी अर्पण करीत आहे.'

**३) अभंगरूप चांगदेवपासष्टी (पासष्टीचरणी) :-**

या प्रकरणामध्ये श्रीदासराममहाराजांनी चांगदेवपासष्टीतील ओव्यांवरती प्रत्येकी दोन चरणांचा एक अभंग लिहिले आहे. हे अभंग सोप्या भाषेत असल्यामुळे ज्ञानदेवांच्या चांगदेवपासष्टीचा अर्थ समजणे सुलभ झाले आहे. श्रीदासराममहाराज या सर्वाचे वर्म सांगताना म्हणतात,

**आपुली तू भेटी होई आत्मठायी । सुखे सुखी होई काय सांगो।।५७।।**

आत्म्याच्या ठिकाणी जीवाची एकरूपता अनुभवणे म्हणजे स्वतःची स्वतःशी भेट होणे होय. अशा भेटीचा आनंद अवर्णनीय आहे. आत्मा हा आनंदरूप/ सुखरूप आहे. त्यामुळे आत्म्याशी एकरूपता झाली असता आत्मसुख आपोआप प्राप्त होते. परंतु आत्म्याशी एकरूपता साधण्यासाठी -

सद्गुरुंची गाठ पडणे आवश्यक आहे.  साधन केल्यानंतर सद्गुरुंची कृपादृष्टी प्राप्त होते.  सद्गुरूकृपेने साधकाला आत्म्याला पाहण्याची 'ज्ञानदृष्टी' लाभते व त्याला आत्मज्ञान बोध होतो.  अशा तऱ्हेने त्याला स्वात्मसुखाची म्हणजेच ब्रह्मानंदाची प्राप्ती होते.

**ज्ञानाईकृपेने पासष्टीचरणी । गोविंदचरणी स्फुरे जे का ।।६६।।**

**गुरुलिंग साधुराम हनुमंत । पदी गोविंदसुत अर्पीतसे ।।६७।।**

श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या विषयी श्रीदासराममहाराजांच्या अंतःकरणात नितांत प्रेम होते.  ज्ञानदेवांच्याविषयी वाटणारे हे प्रेम म्हणजे ''चैतन्याचा जिव्हाळा'' होता.  म्हणूनच हे चैतन्यप्रेम श्रीदासराममहाराजांनी ज्ञानदेवांच्या वाङ्मयावरती त्यांनी केलेल्या विविध प्रकारच्या लेखनातून स्पष्ट होते. श्रीदासराममहाराजांच्या लेखनातील बहुसंख्य भाग हा ज्ञानदेव व ज्ञानदेवांचे वाङ्मय यांचेशी संबंधित आहे.  श्रीदासराममहाराजांच्या मनात आपले पितृदेव श्रीगोविंदराय म्हणजे श्रीमामामहाराज यांचेविषयीसुद्धा नितांत प्रेमादर होता. म्हणूनच ही पासष्ट अभंगांची चरणी, ज्ञानाईच्या कृपेने, मामामहाराजांच्या चरणापाशी स्फुरल्याचे श्रीदासराममहाराज म्हणतात.  अखेरीस ही शब्दसेवा, श्रीगुरुलिंगजंगममहाराज, रघुनाथप्रिय साधुमहाराज व श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणी यांच्या पदी अर्पित असल्याचे ते सांगतात.

### ४) चांगदेवपासष्टी लहरी :-

श्रीज्ञानदेवांच्या चांगदेवपासष्टीवरती श्रीदासराममहाराजांनी ६५ ओव्यांची रचना केली आहे.  त्यातील, निद्रा आणि जागृती ह्या दोन्ही मिळून येणाऱ्या चैतन्यभानाविषयी, ६५ वी ओवी तीन प्रकाराने लिहिली आहे. चिदाकाशामध्ये सोहंस्पंदातून उत्पन्न होणाऱ्या चैतन्यलहरी अखंडपणाने उसळत असतात.  या चैतन्यलहरींना जेव्हा अक्षराचे स्वरूप प्राप्त होते, तेव्हा ती अक्षरबद्ध रचना श्रीदासराममहाराजांचेकडून ओवीरूपात प्रगट होते.  म्हणूनच या प्रकरणाला चांगदेवपासष्टी लहरी असे यथार्थ शीर्षक दिलेले आहे.



ज्ञानदेवांच्या मूळ ६५ ओव्यांपेक्षा ह्या ओव्या सोप्या भाषेमध्ये लिहिलेल्या आहेत.

ह्या ६५ ओव्यांमधून परमात्म्याचे स्वरूप, जीवाचे स्वरूप व ह्या दोहांची ऐक्यता हा विषय विस्तृतपणाने आलेला आहे.  दोन जीव जेव्हा परमात्मस्वूर होतात, तेव्हा त्या दोहांमधील ज्ञानव्यवहार कशा तऱ्हेने असतात याचे वर्णनही येथे आले आहे.  परमात्मस्वरूप दोन जीवांच्या ज्ञानव्यवहाराचे वर्णन करणारी ज्ञानदेवांची ही लेखनरचना ही अध्यात्मिक तत्त्वज्ञानामधील उत्तुंग झेप होय.

**तू कोण ऐसे शोधिता । आत्मैक्य स्फुरे अखंडता ।।**

**मी तूपण लुप्त होता । आत्मत्व राही एकले ।।५०।।**

**तैसी तुझी माझी । अखंड भेटी सहजी ।**

**मी तू रहित स्वयंतेजी । स्वयंसिद्ध ।।५२।।**

तुला जाणत असता, तुझ्यासकट 'मी'पणाचा ग्रास होऊन आत्म्यची सिद्धभेटच राहते (५०), त्याचप्रमाणे मी तूपणावाचून अभेद दृष्टीने, तुझ्या-माझ्या भेटीची गोष्ट ही सिद्धच आहे. (५२).

**ऐसी हे पासष्ट लहरी । श्रीज्ञानेशकृपे आली अक्षरी ।**

**हनुमत् गोविंद पदी अंतरी । उमटली दासरामी ।।६६।।**

अखंरच्या समारोपाच्या या सहास्टाव्या ओवीमध्ये श्रीदासराममहाराज सांगतात की, 'ज्ञानेशकृपेने ह्या पासष्ट ओव्यांच्या लहरी अक्षरबद्ध झालेल्या आहेत.  या अक्षरलहरी दासरामाच्या अंतरी असलेल्या श्रीहनुमंतराय कोटणीसमहाराज व श्रीमामामहाराज यांचे चरणी उमटलेल्या आहेत.'

### ५) चांगदेवपासष्टी : पहिल्या नऊ ओव्यांचे स्पष्टीकरण :-

श्रीदासराममहाराजांनी लिहिलेल्या चांगदेवपासष्टीतील पहिल्या नऊ

ओव्यांचे स्पष्टीकरण प्रस्तुत प्रकरणात दिले आहे. उर्वरीत ओव्यांचे स्पष्टीकरण उपलब्ध नाही. म्हणून येथे पहिल्या नऊ ओव्यांवरती श्रीदासराममहाराजांनी केलेल्या स्पष्टीकरणाचा थोडक्यात सारांश आता पाहू :-

अ) पहिली ओवी :- दृश्याची उत्पत्ती आत्मत्वाचा विसर होण्यात आहे. आत्मत्व प्रकट झाले की दृश्याचा ग्रास होतो व ज्या अधिष्ठानावर हा दृश्याचा आभास निर्माण होतो ते 'आत्मतत्त्वच' केवळ उरते. द्वैतावाचून सुख भोगता येत नाही म्हणून आपल्याच चैतन्यापासून वेगळे होऊन आनंद भोगण्यासाठी ते आत्मत्त्व ''द्रष्टा'' झाले.

ब) दुसरी ओवी :- प्रगट होणे अगर गुप्त होणे या दोन्हीस्थिती आत्म्याच्या ठिकाणी नाहीत, कारण ती मुळची वस्तु आहेच आहे. आत्म्याचे प्रगट होणे म्हणजे आपण आत्म्यात जाणे, आत्मरूप होणे होय.

क) तिसरी ओवी :- दृष्टीचे अपूर्णत्व हेच बहुविध दृश्याचे कारण आहे. जीवभावावर असलेल्या जीवाची दृष्टी अपूर्ण असते. आत्म्याची दृष्टी मात्र पूर्ण असते.

ड) चौथी ओवी :- सोन्याचे सोनेपणा कमी न होता त्यावर जसा अलंकारपणा येतो तसे परमात्म्याचा नाश न होता तो आपणच जग बनतो. परमात्म्यावाचून जगाची धारण नाही.

इ) पाचवी ओवी :- पाण्यावाचून तरंग नाही, दोन्ही ठिकाणी केवळ पाणीच आहे. तसे जगाचे ठिकाणी व जगाच्या धारणेत अंतर्बाह्य तोच असतो.

ई) सहावी आवी :- अनंत कोटी परमाणू हे पृथ्वीचे रूप आहे. तसेच परमात्मा व त्याची स्फुर्ती, त्याचे विश्वरूप स्फुरण निराळे नाही.

उ) सातवी ओवी :- दीपत्वाला प्राप्त झाल्याने अग्नि हा दीपापासून निराळा रहात नाही. चंद्राच्या कलेने चंद्र झाकला जात नाही, त्याचप्रमाणे परमात्मा आणि त्याचे विश्वरूपाने होणारे स्फुरण हे परस्परांपासून



वेगळे नाहीत. विश्वस्फुर्तीपेक्षा परमात्मा निराळा रहात नाही.

ऊ) आठवी ओवी :- वस्तुतः सर्व काही ब्रह्मरूप आहे. पण अविद्येमुळे आत्मरूपाचा विसर पडल्याने जीवाला दृश्य - दृष्टत्वाचा अनुभव येतो. पण परमात्म्याच्या ठिकाणी त्याचा सुगावाही नाही.

ए) नववी ओवी :- लुगडे म्हटले तरी त्यात सूतच असते. मातीच्या भांड्यामध्ये केवळ मातीच असते. तसेच द्रष्टा व दृष्य व्यवहारात केवळ सच्चिदानंद परमात्माच असतो. याचाच विस्तार पुढील पंधराव्या ओवीपर्यंत अनेक दृष्टांतानी केला आहे.

श्रीज्ञानेश्वरी, अमृतानुभव व चांगदेवपासष्टी या प्रसिद्ध ग्रंथांखेरीज ज्ञानदेवांच्या नावावर अनेक ग्रंथ आहेत. प्रस्तुत ग्रंथाच्या दुसऱ्या भागामध्ये ज्ञानदेवांनी लिहिलेल्या विविध प्रकरणग्रंथांचा समावेश आहे. या प्रकरणग्रंथांमध्ये सर्वात महत्वाचा प्रकरणग्रंथ म्हणजे 'ज्ञानदेव तेहत्तिशी' होय.

१. **ज्ञानदेवतेहत्तिशी** : या ग्रंथात ३३ ओव्या आहेत. हा एक योगमार्गावरील अपूर्व आणि रहस्यपूर्ण ग्रंथ आहे. यामध्ये प्रामुख्याने योगातील पश्चिममार्गाचे वर्णन आलेले आहे. येथे त्रिकुट, श्रीहाट, गोल्हाट, औटपीट, महाकारणदेह, चिदाकाश व उन्मनीतील स्वरूपस्थिती यासारखे अनेक विषय आलेले आहेत. पश्चिममार्गातील षड्चक्रांता अवघड घाट ओलांडून चिदाकाशामध्ये जीव प्रवेश करतो तेव्हा तेथे त्याला 'खेचरी मुद्रा' लागते. तसेच अलक्ष्य मुद्रेच्या सहाय्याने तो योगी उन्मनीतील आत्मस्वरूपाशी कसा एकरूप होतो याचे वर्णन येथे आलेले आहे. देहातील प्राणशक्तीच्या सहाय्याने देहामधीलच पंचतत्वांचा नाश करणे यालाच 'पिंडे पिंडाचा ग्रासु' म्हणतात. ही प्रक्रिया साधणे हे नाथसंप्रदायातील सिद्धांताचे वर्म आहे. देह जिवंत असतानाच देहाच्या सहाय्याने योगमार्गाने जाऊन, देहातील पंचमहाभूतांची देहातच आटणी केली असता, देहभाव आपोआपच नष्ट होऊन ब्रह्मरूपता

प्राप्त होते. योगमार्गाची रूपरेषा सांगणारा हा छोटेखानी पण अत्यंत महत्वाचा ग्रंथ आहे.

श्रीदासराममहाराजांचे टीका-विवरण : ज्ञानदेव तेहत्तिशी- सानंद टीका

श्रीज्ञानदेव तेहत्तिशीमधील तेहेत्तीस ओव्यांवरती श्रीदासराममहाराजांनी सुमारे ४५० ओव्या लिहिल्या आहेत. या पद्यात्मक टीकेला त्यांनी 'सानंद टीका' असे नाव दिले आहे. चिमड संप्रदाय हा स्वरूप संप्रदाय आहे. तेथे स्वरूपाचा रोकडा साक्षात्कार होण्याला महत्व आहे. आपण ब्रह्म आहोत असा केवळ बुद्धिचा निश्चय उपयोगाचा नाही. प्रत्यक्ष ब्रह्मस्थितीत प्रवेश करणे महत्वाचे आहे. स्वरुपाचा / अद्वैताचा प्रत्यक्ष अनुभवाचा मार्ग दाखविणारा हा चिमड संप्रदाय आहे. श्रीदासरामांचा प्रत्यक्ष प्रचितीवर भर आहे. आत्मप्रचिती ही सर्वश्रेष्ठ आहे. याचे कारण प्रत्यक्ष अनुभवामध्ये तात्विक भेद, विसंगती हे सर्व विरघळून जातात. ज्ञानदेव तेहत्तिशीमध्ये याच साधनमार्गाचे वर्णन आहे. आशयाचा मूळ गाभा कायम ठेवून संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाला अनुरूप असे भाष्य श्रीदादांनी येथे केलेले आहे. श्रीदादांच्या सानंद टीकेचे वैशिष्ट्य म्हणजे, त्यातील अनेक ओव्यांमधून सोहंस्वरूपाचा अनेकांगाने केलेला उहापोह होय. सोहं अजपाच्या साधनाने सुषुम्नेतील प्राणाची शिवाशी / सोहंहंसाशी समरसता पावून सहजसमाधी प्राप्त होते. ही अजपागायत्री होय. सोहं अजपाजपाच्या साधनेने योगातील कठीण असा षड्चक्राचा मार्ग योगी कसा ओलांडतो व अखेर त्याला 'सोहंसिद्धी' कशी प्राप्त होते याचा जणू आलेखच श्रीदासराममहाराजांनी आपल्या सानंद टीकेमध्ये प्रस्तुत केला आहे. येथील दुसरे वैशिष्ट्य म्हणजे श्रीदासराममहाराजांना श्रीज्ञानदेवांच्याप्रती असलेला अतीव प्रेमभाव. श्रीज्ञानदेव माऊली व सद्गुरु श्रीहनुमंतराय कोटणीसमहाराज यांचेमुळे हे ग्रंथलेखन शब्दबद्ध झाल्याचे सांगून सर्व श्रेय त्यांनी सद्गुरूंना अर्पण केले आहे.

**२. साधनमुद्रा हृदय (श्रीदासराममहाराजकृत) :-**

मुद्राक्रम (मुद्राप्रकाश) या ज्ञानेश्वरांच्या २६ ओव्यांच्या ग्रंथावर



श्रीदासराममहाराजांनी एकूण २३३ ओव्यांची टीका लिहिली आहे. या ओवीबद्ध टीकेची पार्श्वभूमी कळण्यासाठी म्हणून श्रीदासराममहाराजांनी 'श्रीसाधनमुद्रा हृदय' या शीर्षकाखाली आपले हृदगत ५२ ओव्यांमधून मांडले आहे. प्रा. डॉ. श्री.के.वा. आपटे यांच्यामुळे ज्ञानदेव मुद्राप्रकाश या ग्रंथावरती ओवीबद्ध टीका लिहिली गेली व अशाप्रकारे ही ग्रंथसेवा घडली असा उल्लेख श्रीदासराममहाराजांनी केला आहे. **''तोचि हा मुद्राक्रम । परमार्थाचे गुह्य परम । कथिले जे अनुपम । अंतरीचे ।।४१।।''** मुद्रादर्शन हे साधन अवघड आहे, म्हणून काहीजण त्याची उपेक्षा करतात. काहीजण तो आपला विषय नाही असे समजून त्याकडे पाठ फिरवितात. दासराममहाराज सांगतात की, वास्तविक परमार्थाचे अनुपम असे परमगुह्य कथन करणारा हा विषय आहे. आपणास निर्विषय करणाऱ्या या विषयाची उपेक्षा केल्याने आत्मसुखाची प्राप्ती मात्र होत नाही. **''उपाधीपासून । आपण बाजूसी होऊन । कैचे साधे आत्मज्ञान । आत्मचक्षी ।।५१।।''** उपाधीपासून दूर होऊन सद्गुरूबोध झाल्यानंतर आत्मचक्षु कसा प्राप्त होतो याचे सविस्तर वर्णन म्हणजे मुद्राक्र / मुद्राप्रकरण हा ग्रंथ होय. असा हा परमार्थातील परमगुह्य सांगणारा अनुपम ग्रंथ आहे. अशाप्रकारे या ग्रंथाचा गौरव श्रीदासराममहाराजांनी केला आहे.

**३) श्रीदासराममहाराजकृत टीकेसह श्रीज्ञानदेव मुद्राप्रकाश :**

श्रीज्ञानदेवांनी आपली लाडकी बहीण मुक्ताबाई करिता २६ ओव्यांचे मुद्राप्रकरण लिहिले. यामध्ये आत्मसाक्षात्कारासाठी 'मुद्रा' कशा साधाव्यात याचे संपूर्ण विवेचन आहे. त्यामुळे मुक्ताबाईंना पूर्ण समाधान झाले असे श्रीदासराममहाराज सांगतात. यातील प्रारंभीच्या पहिल्या ओवीवरती श्रीदासराममहाराजांनी २० ओव्यांची टीका लिहिली आहे. यामध्ये पुढील ओव्यांमधून 'पंचमुद्रा' या विषयाचा जो विस्तार केलेला आहे, त्याचे महत्व सांगितले आहे.

१. चाचरीमुद्रा : ज्ञानदेवांनी या विषयावरती पाच ओव्या लिहिल्या

असून दासराममहाराजांनी यावर २६ ओव्यांची टीका लिहिली आहे. ''दोनी नेत्रपाती लाऊन । दृष्टीचे करोनि आकुंचन । मनःचक्षू करोनि विलीन । अंतराळी अंतरा पहावे ।।'' चाचरी मुद्रा कशी लावावी हे सांगताना श्रीदासराममहाराज म्हणतात की, वरीलप्रमाणे चाचरी मुद्रेचा अभ्यास केला असता, तेजोरूप चिदाकाशाचा अनुभव येतो.

२. भूचरी मुद्रा :- भूचरी मुद्रा संबंधाने श्रीज्ञानदेवांच्या चार ओव्या असून त्यावरती २३ ओव्यांची टीका श्रीदासराममहाराजांनी लिहिली आहे. ''तया नासाग्री जे दृष्टी । जेणे आत्मयाची भेटी । तेचि भूचरीची गोठी । आत्मस्वरूप प्रकाश ।।'' नासाग्री दृष्टी स्थिर करून ही मुद्रा साधली असता, आत्मस्वरूपाच्या प्रकाशाचा अनुभव येतो. गुरुकृपेने संपन्न असलेल्या गुरुपुत्रालाच या मुद्रेचा वेध लागतो, असे श्रीदासराममहाराज सांगतात. ''भूचरी मुद्रेचे हे मोहन । ज्याचे ऐसे आकर्षण । गुरुकृपेचिया संपन्न । गुरुपुत्र ।।''

३. अगोचरी मुद्रा :- अगोचरी मुद्रेवर श्रीज्ञानदेवांच्या पाच ओव्या असून त्यावर श्रीदासराममहाराजांनी ३८ ओव्यांची टीका लिहिली आहे. ''जे दृष्टी अभ्यंतरी । मिळोनी राहिली निराकारी । मौनेचि जिव्हा आवरी । अगोचरी ते।।'' एकत्वात येऊन निराकारी चिदाकाशामध्ये दृष्टी खिळून राहिली असता ही मुद्रा साधते असे श्रीदासराममहाराज सांगतात. ''उपाधीचे निरसन । होता आकाशाचे ज्ञान । उपाधीभूत जीवन । आटलिया आत्मा ।।'' श्रीदासराममहाराज सांगतात की, अशी मुद्रा साधल्याने सर्वप्रकारच्या उपाधींचा निरास होऊन चिदाकाशाचे ज्ञान होते व आत्मा प्रगटतो.

४. खेचरी मुद्रा :- खेचरी मुद्रेवरती सहा ओव्या असून त्यावर ४७ ओव्यांची टीका आहे. ''मुद्रा चौथी जे खेचरी । ते दृष्टी पहावी अंतरी । भ्रमरगुंफाचिया माझारी । दृष्टीचेनि ।।'' इडा व पिंगला सुषुम्नाकार होऊन प्राप्त झालेली उर्ध्वदृष्टी भ्रमरगुंफेच्या अंतरी लागली असता, 'खेचरी मुद्रा' प्राप्त होते. ''शब्दग्रासे पहाणे जरी । पहाता पहाता लागे खेचरी । नवल आत्मयाची कुसरी । सहज ते ।।''. दृश्यांचा अंत होऊन पहात्याला पहाते



झाले असता, खेचरी मुद्रा लागून चिदाकाशातील आत्म्याची कलाकुसर दृष्टीस पडते असे श्रीदासराममहाराज सांगतात.

५. अलक्ष्यमुद्रा :- श्रीज्ञानदेवांच्या अलक्ष्यमुद्रेवर पाच ओव्या असून, त्यावर सर्वाधिक ७९ ओव्यांची टीका श्रीदासराममहाराजांनी केली आहे. ''ऐसे जे अलक्ष्य । तेचि जाले जेथ लक्ष्य । ते अलक्ष्यमुद्रा प्रत्यक्ष । चारी पैल पाचवी ।।'' श्रीदासराममहाराज म्हणतात, जेथे अलक्ष्य परमात्मा लक्ष्य होतो, अशी ही चारी मुद्रेपलीकडील पाचवी अलक्ष्य मुद्रा आहे. श्रीज्ञानदेवांच्या पहिल्या २६ ओव्यांनंतर पुढे यातील विवेचनाची अशी आणखी एक ओवी आढळते. ''चाचरी श्वेत । भूचरी नील । अगोचरी पीत । खेचरी लाल । अलेखा रुप न लेखा ।।'' संतसज्जनांनी या पाचव्या मुद्रेचा प्रत्यक्ष अनुभव घेतला असून, या पाचही मुद्रांची लक्षणे वर निर्देश केलेल्या ओवीमध्ये दिलेली आहेत. ''चाचरीने शुभ्र तेजाची, भूचरीने नीलवर्ण तेजाची, अगोचरीने पीतवर्ण तेजाची, खेचरीने लाल रंगाच्या तेजाची अनुभूती येते, मात्र अलक्ष्यमुद्रेने ज्याला विशिष्ट रूप व आकार नाही अशा निर्गुण अलक्ष्य परमात्म्याची अनुभूती येते.''

### ४) श्रीदासराममहाराजकृत नमनहृदय व भावार्थ नमन स्तोत्र :-

श्रीज्ञानदेवकृत १०८ ओव्यांच्या नमन स्तोत्रावरती श्रीदासराममहाराजांनी १०८ ओव्यांची पद्य टीका लिहिली आहे. शेवटी उपसंहाराच्या ७ ओव्या लिहिल्या आहेत. याला भावार्थ नमन स्तोत्र असे शीर्षक दिले आहे. या भावार्थनमन स्तोत्राची पार्श्वभूमी म्हणून श्रीदासराममहाराजांनी ३४ ओव्यांचा उपोद्धात लिहिला असून त्याला 'भावार्थ नमन हृदय' असे नाव दिले आहे.

'भावार्थ नमन हृदय' या उपोद्घात या प्रकरणामध्ये आपले पितृदेव श्रीमामामहाराज केळकर आणि श्रीज्ञानदेव या दोघांमध्ये असलेल्या जिव्हाळ्याच्या नात्याचे वर्णन आले आहे. श्रीमामामहाराजांना श्रीज्ञानदेवांनी प्रत्यक्ष दर्शन दिले आणि गुरूकृपेने प्रपंच व परमार्थ दोन्हीही पूर्णत्वास जाईल

असे आशीर्वचन दिले, याचा उल्लेख देखील त्यामध्ये आलेला आहे.

''हे घडो ही विनंती । श्री माऊलींचे चरणाप्रती ।।
भावार्थ नमन चित्ती ।ी ठसावे जी ।।२९।।''

या उपोद्घाताच्या शेवटी श्रीदासराममहराज 'भावार्थ नमन' या नावाची ओवीबद्ध टीका दासराममहाराजांनी लिहिली आहे. यामध्ये श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी भगवंताची मुक्तकंठाने स्तुती केली आहे. याचबरोबर भगवंताचे स्वरूपवर्णन, त्याचे श्रेष्ठत्व व थोरवी याचेही वर्णन आले आहे. ज्ञानदेवांच्या ४८ व्या ओवीवरती टीका लिहिताना श्रीदासराममहाराज म्हणतात, परमश्रेष्ठ सोहंब्रह्मा । आरंभीचिचा श्रीरामा । भवनासी तू सगुणोत्तमा । तुज नमो ।।४८।। , श्रीदासराममहराजा म्हणतात, भगवंत हा निर्गुण रूपाने परमश्रेष्ठ सोहंब्रह्म आहे. तसेच तो भक्तांसाठी सगुणरूपाने आरंभिचा 'श्रीराम' ही आहे. अशा सगुण निर्गुण अशा दोन्ही रूपाने असलेल्या भगवंताला नमन असो. भगवंताच्या स्तुतीबरोबरच नमनाचा पारमार्थिक अर्थही येथे सांगितला आहे. ''नमो नमो ऐसे करिता । प्राप्त होय नमनावस्था । मन येई उन्मनी प्रांता। समाधिसुखा ।।९८।।'' अशाप्रकारे भगवंताला नमन करता करता मनाचे 'मनत्व' नाहिसे होऊन ते उन्मनीअवस्थेप्रत येते व त्यामुळे समाधिसुखाची प्राप्ती होते. अखेरच्या उपसंहाराच्या ओवीमध्ये श्रीदासराममहराज म्हणतात, ''श्रीहनुमत्कृपा लाघव । अंतरी उमटला भाव। ते भावार्थ नमन ठेव । श्रीगोविंदपदी दासरामी ।।११४।।'' ''श्रीहनुमंतराय कोटणीसमहाराज यांचे कृपेने, ज्ञानदेवांच्या नमनाचा भावार्थ अंतरी उमटला असून हा भावार्थ नमनठेवा श्रीगोविंदराय (श्रीमामामहाराज) यांचे चरणी अर्पण करीत आहे.''

**५) श्रीज्ञानेश्वरांचा प्रणव (श्रीदासराममहाराजकृत भावार्थासह) :-**

सर्व संतांनी प्रणवाचा महिमा वर्णिलेला आहे. श्रीज्ञानदेवांचा ''प्रणव (ॐकार अक्षर)'' या नावाचा प्रदीर्घ म्हणजे १२६ चरणांचा अभंग आहे. हा अभंग गूढ आणि कळण्यास कठीण आहे. त्यातील गूढार्थ स्पष्ट करण्यासाठी



श्रीदासराममहाराजांनी त्याचा गद्य भावार्थ लिहिला असून त्याला 'सार्थ प्रणव' असे शीर्षक दिले आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या ज्ञानेश्वरीमधील ''ॐ नमोजी आद्या ।'' या ओवीच्या अर्थाचा अधिक विस्तार म्हणजे हा प्रदीर्घ अभंग होय. या अभंगाचा पहिला चरण पुढीलप्रमाणे आहे :- ''ॐकार अक्षर बीज रे । अमित्य भुवनी प्रकाशुनि गेले रे । ते 'म' काराचे पाटी आहे रे ।।१।।'' या चरणाचा भावार्थ लिहिताना श्रीदासराममहाराज, ते अक्षर म्हणजे अविनाशी 'अक्षरबीज' आहे असे म्हणतात. ते प्रकाशमान अक्षरबीज, ॐकाराची तिसरी मात्रा जी 'म' त्याच्या पोटात असून ते चिदाकाशापेक्षाही सूक्ष्म स्वरूपाचे आहे.

पुढील काही चरणांमधून या प्रणव अक्षराचे वर्णन नेति नेति प्रमाणे केलेले आहे. उदा. 'ते पृथ्वी आप तेज वायू व आकाश तसेच इंद्र व चंद्र हे काही नाही (चरण ७) ते नित्यही नाही, अनित्यही नाही. तसेच ते शून्यावस्थेतही दिसणारे नाही (चरण ३१) अशाप्रकारे ते कोणत्याही प्रमाणांनी दाखविता येणार नाही.'

पुढील काही चरणांमध्ये ते प्रणवबीज कसे व कोठे आहे हे सांगितले आहे. ते निराक्षर असून 'अ'कार, 'उ' कार व 'म'कार रुपाने मातृभावाने अर्जुनाचे ठायी वळले (चरण २७). सर्वांचा आधार असलेले हे प्रणव अक्षर निरंजन, निःशब्द व निरपेक्ष आहे (चरण ३४). हे प्रणवबीज कोठे व कसे आहे याचे वर्मच या अभंगाच्या १२० व्या चरणात सांगितले आहे. तो चरण असा आहे - ''आता एक गुह्य परम गुह्य रे । अक्षराशेवटी दाही दिशे नाही । ते सहस्रलक्षी गुणी ते आहे रे ।।१२०।।'' आता गौप्यातले श्रेष्ठ गौप्य असे आहे, ''त्या अक्षराचे शेवटी दाही दिशा नाहीत. दिक्, काल आणि आकाश यांचेही ते अतीत आहे. सहस्रदळाचे ठिकाणी लक्ष व्हावे अशा गुणात ते आहे आणि त्याचे गुणही अनंत आहेत.''

हे प्रणवबीज प्राप्त होण्याकरिता कोणते साधन करावे व ते कसे करावे याचाही उहापोह येथे केला आहे. जीवनाच्या मध्यधारेतून ऊर्ध्वमुख

होऊन सोहं साधन साधावे लागते. असे सोहं साधन साधले असता जीव सहस्रदळी येतो. तेथील 'सोहं'मधील 'म' काराच्या ध्वनीयुक्त मात्रेचे श्रवण घडते. या नादश्रवणाने संकल्पविकल्पात्मक मन, पंचप्राणासह पंचमातृकाशी तादात्म्य पावते. अर्थात अशावेळी तेथे जीवनसूत्राचा लय होतो (चरण ४४ ते ४७). साधनेच्या अखेरच्या टप्प्यात, साधक ते बीज कसे प्राप्त करतो हे सांगितले आहे. ''सत्य व्योमा शून्य देई रे । चौदावे बुडवुनि घालूनि पाहे । मा पुढे वेद बीज सांगेन रे ।।६३।।'' असे साधन करून येणारी ही शून्यरूप गाढ अवस्था, व्योमरूप ब्रह्माच्या ठिकाणी विलीन होऊन, १४ चक्रांच्या पलीकडील ते वेदबीज (प्रणव) प्राप्त होते, असे श्रीदासराममहाराज सांगतात.

सारांशाने सांगावयाचे झाल्यास, पंचप्राण मावळल्यावर व चत्वारदेहासह मन विलीन झाले असता, ते ब्रह्मबीज (प्रणव) आपण होऊनच स्वस्वरूपाची प्रचिती देते याबद्दल मुळीच शंका नाही असे श्रीज्ञानेश्वरमहाराज येथे ग्वाही देत आहेत.

## ६) दत्तस्तुती व श्रीदासराममहाराजकृत दत्तस्तुतीप्रसाद :-

श्रीदत्ताचे वर्णन करणारा श्रीज्ञानेश्वमहाराजांचा चार चरणांचा एक अभंग आहे. या अभंगास श्रीदासराममहाराजांनी 'श्रीज्ञानकृत श्रीदत्तस्तुती' असे नामाभिधान दिले आहे. ज्ञानदेवांच्या या एका अभंगाच्या स्पष्टीकरणासाठी श्रीदासराममहाराजांनी ६५ ओव्यांची टीका लिहिली आहे.

त्रिकुट, श्रीहाट, गोल्हाट, औटपीठ, भ्रमरगुंफा व ब्रह्मरंध्र या स्थानाला योगातील पश्चिममार्ग म्हटले जाते. योगमार्गाला धरून लिहिलेल्या या टीकेला श्रीदासराममहाराजांनी 'श्रीदत्तस्तुतीप्रसाद' असे शीर्षक दिले आहे. या टीकेती पहिल्या भागामध्ये पश्चिममार्गातील ह्या स्थानांचे वर्णन आलेले आहे. ''जीवपणाचा वियोग । तोचि स्वरूपाचा योग । जीवनाचा योग । तरी काय ।।३०।।'' साधनमार्गाने पश्चिममार्गातील वरील षड्चक्रांचे उल्लंघन झाले असता, जीवपणा लयास जाऊन तो योगी स्वरूपाशी तादात्म्य पावतो व हाच खरा जीवनयोग आहे. या टीकेच्या ३३ व्या ओवीपासून खेचरी मुद्रेचे



वर्णन आले आहे. ३४ व्या ओवीमध्ये श्रीदासराममहाराजांनी खेचरी मुद्रेची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे - ''आकाशमार्गी गमन करी । ऊर्ध्वगामी लक्ष तरी । केंद्रित स्थिरबिंदू वरी । खेचरी ते ।।३४।।'' त्रिकुटापासून वरच्या दिशेला आकाशाचा मार्ग सुरू होतो. आकाशमार्गीच्या या ऊर्ध्वगामी प्रवासात योगी आपली ऊर्ध्वदृष्टी चिदाकाशाच्या बिंदूवर स्थिर करतो, हीच खेचरी मुद्रा होय. ''पाहता पाहता लागली खेचरी । योगी झाला साक्षात्कारी । सेवुनि राहे निरंतरी । सत्रावीसी ।।४१।।'' अशी खेचरी मुद्रा लागली असता, साक्षात्कार होऊन तो योगी निरंतर सत्राव्या जीवनकळेचे सेवन करीत रहातो. ''सर्वा देती म्हणूनी दत्त । जे का आले सर्वस्व देत । म्हणोनि दत्तगुरु होत । जगद्‌गुरु ।।६०।।'' जे आपले सारसर्वस्व देतात, त्यांना दत्त म्हणतात. म्हणून दत्तगुरुंना जगद्‌गुरु म्हणतात. योगमार्गामध्ये दत्तगुरूंचे स्थान सर्वश्रेष्ठ स्वरूपाचे आहे. असे हे योगीदार दत्तगुरू योगाग्रणी ज्ञानेश्वरमहाराजांच्या अंतरी विराजमान आहेत. म्हणून नाथसंप्रदायाचा कळस असलेल्या श्रीज्ञानदेवांनी केलेली ही 'दत्तस्तुती' हा त्यांचा प्रत्यक्ष अंतरीचा अनुभव आहे.

या टीकेच्या अखेरीस श्रीदासराममहाराज म्हणतात की, ''कृपामूर्ती ज्ञानाईच्या कृपाप्रसादाने, कैवल्यवैभव प्राप्त करून देणारी ही 'दत्तस्तुती' चित्तामध्ये ठसावली असून त्यामुळे दासरामाला पूर्ण समाधान प्राप्त झाले आहे.''

## ७. श्रीदासराममहाराजकृत गद्य भावार्थासह श्रीज्ञानेश्वरमहाराजांची सनद :-

श्रीमुक्ताबाई व श्रीज्ञानेश्वरमहाराज या भावंडांचा सुखसंवाद, जो परम अधिकारवाणीने घडला व जे गुह्य मुक्ताबाईंना प्राप्त झाले, त्याचे नांव श्रीज्ञानेश्वरमहाराजांची सनद. ही अठरा ओव्यांची अभंग रचना आहे. या अभंगांचा गद्य भावार्थ श्रीदासराममहाराजांनी लिहिला आहे.

या सुखसंवादामध्ये मुक्ताबाईंनी ज्ञानदेवांना तीन अध्यात्मिकदृष्ट्या अत्यंत महत्वाचे प्रश्न विचारले असून, त्यांची उत्तरे श्रीज्ञानदेवांनी दिलेली आहेत.

१. सगुण-निर्गुण म्हणजे काय ?

''विटेवरी मूर्ती दिसते सगुण । सगुण का निर्गुण म्हणू दादा ।।''

यामधील चौथ्या अभंगामध्ये मुक्ताबाई विचारतात की, विटेवरती दिसणारी मूर्ती आपल्याला सगुण दिसते, परंतु वास्तविक यथार्थपणाने पाहता त्याचे स्वरूप निर्गुण आहे की सगुण हे मला सांगावे.

यातील पाचव्या अभंगामध्ये श्रीज्ञानदेवांनी त्याचे उत्तर दिले आहे. निर्गुणाचा बिंदू 'सकाराचे' गुणात उतरला असता, तोच सगुणरूपाने प्रगट होतो. त्यायोगे हा सगुणाच्या सारतत्त्वाचा गोळाच होतो. सगुणाला अखेर निर्गुण तत्त्वाचाच आधार आहे.

२. मायेची उत्पत्ती कशी झाली? मायेला आधार काय?

'माया ही उत्पत्ती कैशी झाली ।'- सहाव्या अभंगामध्ये विचारलेल्या या प्रश्नाचे उत्तर श्रीज्ञानदेवांनी सातव्या अभंगात दिले आहे. अक्षररूप रेणू हा निरंजन परमात्मा असून, क्षररूप अणू ही माया आहे. परमात्मा निःशब्द असून, माया ही शब्दरूप म्हणजे दृश्यरूप आहे. देहही दृश्यात मोडतो. सर्व दृश्यामध्ये व्यापून असणारा परमात्मा मात्र या सर्वाहून वेगळा आहे. दृश्य चंचळ आहे, पण परमात्मा मात्र अचळ, स्थिर व निश्चळत्वाने आहे.

३. सर्वाहून वेगळा असणारा परमात्मा हाती कसा येईल? संकल्परूप मायेचा निरास कसा होईल?

''सर्वातोनि वेगळा हाती कैसा येई । म्हणे मुक्ताबाई सांगा दादा।।''

श्रीज्ञानदेव याचे उत्तर सांगतात की, साधनाचा अभ्यास केला असता, गुरुकृपेने संकल्परूप मायेला ओळखले जाते. तिला ओळखताच जीव देहातून



अलिप्त होऊन, देहभावातून मुक्त होतो. तेराव्या अभंगात 'ॐ तोचि गुरु । सोहं तोचि शिव ।।' असे म्हटले आहे. सद्गुरूंच्या चैतन्यस्वरूपाचे ध्यान करावे. असे केले असता, शिवस्वरूप सोहंशी जीवाचे ऐक्य होते. ॐकाररूप गुरु व सोहंरूप शिवाचे ऐक्य होणे महत्वाचे आहे. सद्गुरूकृपेने असे झाले असता, जीव-शिवाचे ऐक्य होऊन अखेरीस परमात्म्याची प्राप्ती होते.

या अठरा अभंगांची सनद / अधिकारपत्र म्हणजे गौप्य ठेवा आहे. अठराव्या अखेरच्या अभंगात ज्ञानदेवांनी हा गौप्यठेवा मुक्ताबाईंना प्रदान करून हा गौप्य ठेवा आपल्या जवळ गुप्त ठेवावा असे म्हटले आहे.

## ८. श्रीदासराममहाराजकृत 'ज्ञानेश्वरस्तोत्र'

श्रीदासराममहाराजांनी श्रीज्ञानदेवांच्या स्तुतीपर ४६ ओव्यांची रचना केली असून, त्याला त्यांनी 'श्रीज्ञानेश्वरस्तोत्र' असे शीर्षक दिले आहे. यामध्ये श्रीज्ञानदेवांची महती गायली असून त्यांचा मोठेपणा अधोरेखित केलेला आहे. ''ॐ नमो श्रीज्ञानेश्वरा । करुणाकरा उदारा ।।'' करूणाकर व उदार अशा ज्ञानदेवांना वंदन करून श्रीदासराममहाराजांनी या ज्ञानेश्वरीस्तोत्रास प्रारंभ केला आहे. श्रीज्ञानेश्वरांचे श्रेष्ठत्व सांगताना श्रीदासराममहाराज म्हणतात, ''कळस नाथपंथाचा । पाया भागवत धर्माचा । मुकुट शिवपीठाचा । अनादि जो ।।५।।'' या ओवीमध्ये ज्ञानदेवांची तीन अत्यंत महत्वाची वैशिष्ट्य सांगितली आहेत. ज्ञानदेव कसे आहेत हे सांगताना श्रीदासराममहाराज म्हणतात, 'अनादि शिवपीठाचा मुगुट असलेले व ज्यांनी भागवतधर्माचा पाया घातला असे श्रीज्ञानदेव नाथपंथाचा कळस होऊन राहिले आहेत.' ''आत्मा श्रीविठ्ठलाचा । देह विठ्ठल जयाचा । प्राणसखा ब्रह्माचा । गौरवु हा।।१४।।'' श्रीदासराममहाराज म्हणतात की, ज्याचा देह विठ्ठलमय आहे, जो विठ्ठलाचा आत्मा आहे व ब्रह्माचा प्राणसखा आहे, असे हे ज्ञानदेव चैतन्याचा जिव्हाळा आहेत. अशा शब्दामध्ये श्रीदासराममहाराज त्यांचा गौरव करतात.

ईश्वरीय ज्ञान प्रगट करणारी भावार्थदीपिका म्हणजेच श्रीज्ञानेश्वरी ज्यांनी लिहिली, अशा श्रीज्ञानदेवांचा गौरव नामदेव, एकनाथमहाराज, तुकाराममहाराज अशा सर्व संतांनी अत्यंत प्रेमाने केलेला आहे.

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणजे प्रत्यक्ष महाविष्णुचा अवतार आहेत. त्यामुळे श्रीज्ञानेश्वरमहाराजांची स्तुती म्हणजे प्रत्यक्ष विष्णुची स्तुती आहे. अशा या ज्ञानेश्वरस्तोत्राचे फळ श्रीदासराममहाराज या प्रकरणाच्या चौतिसाव्या ओवीमध्ये पुढीलप्रमाणे सांगतात, ''ऐसे श्रीज्ञानेश्वरस्तोत्र । जो नित्य वाची तो पवित्र । आणि इह परत्र । सुख पावे ।।३४।।'' प्रत्यक्ष पांडुरंगाचा अवतार असलेले व कैवल्यसुखाची रास असलेले श्रीज्ञानदेवांचे हे पवित्र 'ज्ञानेश्वरस्तोत्र' जो कोणी नित्य पठण करील त्याला इहलोकी व परलोकी सुख प्राप्त होईल, अशी ग्वाही श्रीदासराममहाराजांनी दिली आहे.

## ९. श्रीदासराममहाराजकृत श्रीसद्गुरुस्तवन :-

श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या 'अनुभवामृत' ग्रंथामध्ये ८० ओव्यांचे ''श्रीसद्गुरुस्तवन कथन'' या नावाचे दुसरे प्रकरण आहे. यातील निवडक १५ ओव्यांवरती श्रीदासराममहाराजांनी समओवी टीका लिहिली आहे. या समओवी टीकेला त्यांनी 'श्रीसद्गुरुस्तवन' असे शीर्षक दिले आहे. या १५ ओव्यांमधून प्रामुख्याने श्रीसद्गुरुंचे अध्यात्मिक स्वरूप व त्यांचे वर्णनातीत श्रेष्ठत्व याचे वर्णन आले आहे.

अनुभावामृताच्या दुसऱ्या प्रकरणाच्या प्रारंभीच श्रीज्ञानदेव म्हणतात, ''आता उपाय वन वसंतु । जो आज्ञेचा आहेव तंतु ।।'' या ओवीवरती टीका लिहिताना श्रीदासराममहाराजांनी सद्गुरूंच्या अध्यात्मिक स्वरूपाचे वर्णन केले आहे. ''आत्मवनी वसंतु । ब्रह्मविद्ये शोभिवंतु । निराकार करूणे होतु । सगुण जो ।।१।।'' आत्मरूपी वनाचा जणू वसंतऋतू असलेले, ब्रह्मविद्येने शोभिवंत अशा सद्गुरुंचे खरे स्वरूप 'निर्गुण-निराकार' असे आहे. परंतु मानवजातीच्या करूणेपोटी ते सगुण देहरुपाने अवतीर्ण होतात.



ओवी क्रमांक ४ ते ९ पर्यंत श्रीदासराममहाराजांनी आपल्या टीकेमधून गुरुदर्शन व गुरुकृपा यांचे वर्णन केलेले आहे. गुरुदर्शनाने अंतरंगामध्ये साधन स्थिर होते, त्यासाठी कोणताही उपाय करावा लागत नाही. अंतरंगात साधन स्थिर होताच, गुरुकृपा होते व जीव शुद्ध होऊन शिवत्वास प्राप्त होतो. अशा या सद्गुरुंची स्तुती कोणत्या शब्दात करावयाची याचा प्रश्न पडतो. यासंदर्भात ११ व्या ओवीमध्ये श्रीदासराममहाराज म्हणतात, ''शब्दाचा विषय। न होती गुरुराय । तेथे अनुमान काय । सांगा मज ।।११।।'' सद्गुरुंची स्तुती करताना शब्द मावळतात. सद्गुरू हा शब्दाचा अगर अनुमानाचा विषय नाही. 'मौन' हीच सद्गुरुंची खरी स्तुती होय.

## १०. ज्ञानदेव आज्ञापत्र व दासराममहाराजकृत आज्ञापत्र भावार्थ :

श्रीज्ञानदेवांनी श्रीसच्चिदानंदबाबांना पुनर्जीवित केले. त्यानंतर श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी आपली भावार्थदीपिका म्हणजेच श्रीज्ञानेश्वरी हा ग्रंथ सुवाच्च अक्षरात लिहिणेबद्दल श्रीसच्चिदानंदबाबांना आज्ञा केली. तेच हे 'श्रीज्ञानदेव आज्ञापत्र' होय. या ज्ञानदेव आज्ञापत्राचा भावार्थ सोप्या भाषेत श्रीदासराममहाराजांनी प्रकट केला आहे. १६ ओव्यांचा हा भावार्थ वाचून प्रत्यक्ष श्रीज्ञानेश्वरमहाराज डोळ्यासमोर यावेत इतके हे महत्वाचे आहे, असे श्रीदासराममहाराज सांगतात. आज्ञापत्राच्या भावार्थाच्या ओवीमध्ये परमात्म्याचे स्वरूप सांगितले आहे. ''अस्तित्व चंचळ आनंद । ही तीन पदे प्रसिद्ध । ऐसा परमात्मा अभेद । आहेच जो ।।१।।'' परमात्मा हा अस्तित्व, चंचळ व आनंद म्हणजेच सच्चिदानंदरूपाने तसेच या तीन पदांच्या अभेदत्वाने आहेच आहे. सच्चिदानंद हे परमात्म्याचे विशेषण अगर लक्षण नसून, परमात्मा हा सच्चिदानंद आहे. देहामध्ये हाच परमात्मा आत्मरूपाने आहे. देहामध्ये चैतन्य आत्मा व जड शरीर अशी जडाजडाची गाठ पडली आहे. ही गाठ सोडविणे म्हणजेच साधन. ''तया स्फुरद्रुप नादासी । जीव मिळोनी जाय परियेसी । जीवभावे शिवासी । देह विसरे गाठी ते ।।७।।'' जड देहाचा विसर पडला असता, चिदाचिदाची गाठ सुटते. हे साधण्यासाठी श्रीदासराममहाराज

'सहजसाधन' सांगतात. आत्मा हा स्फुरणरुप आहे. हे स्फुरण नादप्रकाशयुक्त असते. त्यामुळे स्फुरणरूप नादाशी जर जीवाचे तादात्म्य होईल, तर देहाचा विसर पडेल व जीव हा शिवरूप होईल. शिवात्मा हा आपल्याच ठिकाणी सोहंरुपाने स्फुरत असतो. अशा सोहंस्फुरणातून श्रीज्ञानेश्वरी प्रगट झाली आहे. ''स्फुरद्रुप सोहंकार । तेचि भावार्थदीपिका सुंदर ।।'' अशी ही चैतन्याची अक्षरे असलेल्या भावार्थदीपिकेची सुवाच्च प्रत तयार करण्यास सांगितले व त्यानुसार सच्चिदानंदबाबांनी त्याची आवृत्ती तयार केली. ''पहाताचि सुंदर लेखन । संतोषले श्रीज्ञानराज ।।'' सच्चिदानंदबाबांचे सुंदर लेखन पाहून श्रीज्ञानराज मनोमनी संतोषले असा या भावार्थाचा समारोप श्रीदासराममहाराज करतात.

### ११. श्रीदासराममहाराजकृत भावार्थासह मुक्ताबाईकृत ताटीचे अभंगः

जनपीडेने उद्विग्न झालेल्या ज्ञानदेवांना उद्देशून श्रीमुक्ताबाईंनी अकरा अभंगांची रचना केली आहे. ही रचना 'ताटीचे अभंग' म्हणून प्रसिद्ध आहे. या अकरा अभंगांचा गद्य भावार्थ श्रीदासराममहाराजांनी लिहिला आहे. प्रासंगिक स्वरूपाने लिहिलेल्या या अकरा अभंगांमधून परमार्थातील अनेक विषय आलेले आहेत. श्रीज्ञानेश्वरमहाराज हे योगीराज आहेत. या अभंगांच्या निमित्ताने मुक्ताबाईंनी योग्यांची काही लक्षणे सांगितली आहेत. दुर्जनांच्या शब्दशस्त्राने व्यथीत झालेल्या ज्ञानदेवांच्याजवळ मुक्ताबाईंनी या अभंगांद्वारा आपले अंतरंग प्रगट केले आहेत.

योगी हा जगातील दंभ, वाद अशा सर्व गोष्टी बाजूस सारून शांती धारण करतो. 'वेल क्रोधाचा उगवला । अवघा योग फोल झाला ।।' क्रोधामुळे अवघा योग फोल ठरतो. म्हणून योगी सर्वप्रकारच्या चिंता आणि क्रोध यांनी युक्त असलेल्या जगास बाजूस सारतो. म्हणजेच तो अशा जगाबद्दल चांगले अगर वाईट अशी कोणतीच कल्पना करीत नाही. 'क्रोध' या विकाराविषयी श्रीमुक्ताबाई म्हणतात, ''क्रोध यावा कोठे । अवघे ब्रह्मचि निघोट ।। ऐसे



कळले उत्तम । जनी तोचि जनार्दन ।।'' (अभंग ८). सर्व विश्वच जर शुद्ध ब्रह्म आहे, तर रागावणार तरी कुणावर? क्रोध यावा असे विश्वात स्थान तरी कोठे आहे? सर्व जगामध्ये तो जनार्दनच भरून राहिला आहे, असे ज्ञान होणे ही अध्यात्मातील उत्तम स्थिती होय. 'विश्व परब्रह्म दोरा ।' हे विश्वरूपी वस्त्र चैतन्यब्रह्माच्या दोऱ्याने विणलेले आहे. जे आहे ते सर्व चैतन्यरूप आहे. ''जीभ दातानी चाविली । कोणी बत्तीशी पाडिली ।।'' (अभंग ६). आपल्या दातांनी आपलीच जीभ जर चावली गेली, तर कोणी आपली बत्तीशी पाडेल काय? त्याप्रमाणे सर्व विश्वामध्ये आपणच जनार्दनरुपाने भरून राहिलो असता, रागवावे तर कोणावर? अशी स्थिती होते.

अखेर अकराव्या अभंगात श्रीमुक्ताबाई म्हणतात, ''लडिवाळ मुक्ताबाई। बीज मुद्दल ठायी ठायी ।। तुम्ही तरोनि विश्व तारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।'' मुक्ताबाई म्हणतात, 'सद्गुरु ज्ञानदेवांनीच ही अशी अवस्था मला प्राप्त करून दिली आहे. तेव्हा कोणी कोणाला सांगावे बरे? ही मुक्ताबाई तुमची लाडकी असून, ब्रह्मबीज हे तिचे भांडवल आहे. तेव्हा आपल्यासह सर्व जगाला तारा व ताटी उघडा', अशी प्रार्थना मुक्ताबाई श्रीज्ञानदेवांना करतात.

### १२. अमृतानुभव - मंगलाचरणातील सहाव्या श्लोकावरील श्रीदासराममहाराजकृत पद्य टीका :-

श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या अमृतानुभव या ग्रंथातील प्रारंभीच्या मंगलाचरणामध्ये सहा श्लोक आहेत. त्यातील सहावा श्लोक पुढीलप्रमाणे आहे :- ''दिवी भूमौ तथाकाशे बहिरनाश्रमे विभुः । या विभात्यव्य भासात्मा तस्मै भावात्मने नमः ।।'' या श्लोकावरती श्रीदासराममहाराजांनी ३६ ओव्यांची पद्य टीका लिहिली आहे. 'प्रकाश तो आत्मा ।' आत्मा हा प्रकाशरूप आहे व त्यामुळे साधनेद्वारे होणारा प्रकाशाचा साक्षात्कार हा आत्म्याचाच साक्षात्कार आहे. याचेच वर्णन या ३६ ओव्यांच्या पद्य टीकेतून आलेले आहे. ''जव या वायूचा प्रकाशु । तव या भांडियाचा विश्वासु । तयावीण उदासू । ज्ञानाई

म्हणे॥२१॥'' जोपर्यंत देहामध्ये चिद्वायुचा म्हणजेच चैतन्याचा प्रकाश आहे, तोपर्यंत हा देह जिवंत रहातो. त्या देहामध्ये काही रया असते. परंतु हा चिद्प्रकाश निघून जातो, तेव्हा हा देह निर्जिव होतो, भकास होतो. इतका त्या चैतन्यप्रकाशाचा आणि आपल्या जीवंत असण्याचा संबंध आहे.

या प्रकाशरूप आत्म्याचा साक्षात्कार होण्यासाठी करावयाचे साधन श्रीदासराममहाराज पुढीलप्रमाणे सांगतात - साधनप्रक्रियेने इडा व पिंगला जेव्हा सुषुम्नाकार होतील तेव्हा गुरुकृपेने सुषुम्नेमधील प्राणाचा लोंढा ऊर्ध्वगामी होतो. ''इडा पिंगला ओघ सैरा । वरी आत्मप्रकाश उबारा । हा अध्यात्म गाभारा । तेजोरूप ॥१७॥'' सुषुम्नेतील प्राण जेव्हा अध्यात्म्याच्या तेजोरूप गाभाऱ्यामध्ये म्हणजेच सहस्रदळामध्ये जाऊन मिसळेल, तेव्हा तेथील आत्मप्रकाशाचा साक्षात्कार होतो. ''भूमीपासोनि आकाशावरी । अंतर्बाह्य प्रकाश भारी । आत्मा भासे प्रकाश लहरी । सूक्ष्मरूप ॥१॥'' देहात चिदाकाशामध्ये नाद प्रकाशाचा साक्षात्कार होतो. देहामध्ये झालेला हा साक्षात्कार बाहेरील विश्वामध्येही होऊ लागतो. विश्वामध्ये भूमीपासून आकाशापर्यंत सर्वत्र तो आत्मा सूक्ष्म प्रकाशलहरींच्या रूपाने अनुभवास येऊ लागतो. निश्चळ परमात्म्याच्या अंगावरती उठणाऱ्या चैतन्याच्या लहरी म्हणजेच ह्या सूक्ष्म नादप्रकाश लहरी होत. अखिल विश्व हे चैतन्याच्या नादप्रकाश लहरींनी भरून राहिल्याचा अनुभव म्हणजे चिद्विलासवादाचा अनुभव होय. हेच चिद्विलासवादाचे वर्म आहे. अखेरीस दासराममहाराजांनी ही आपली 'नमनप्रसाद'रूपी अल्पशी शब्दसेवा श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या चरणी अर्पण केली आहे.

## १३. श्रीदासराममहाराजकृत अभंग अमृतानुभव :-

श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या 'अमृतानुभव' या ग्रंथामध्ये, 'शिव-शक्ती - समावेशन मूळ' या नावाचे पहिले प्रकरण आहे. या पहिल्या प्रकरणामध्ये ६४ ओव्या आहेत. या पहिल्या प्रकरणातील पहिल्या दोन ओव्या पुढीलप्रमाणे



आहेत :- ''ऐशी ही निरुपाधिके । जगाची जिये जनके । तिये वंदिली मियां मुळिके । देवो देवी ॥१॥ जो प्रियुचि प्राणेश्वरी । उलथे आवडिचिये सरोभरी। चारूस्थळी एक हारी । एका अंगाची ॥२॥'' या दोन ओव्यांवरती श्रीदासराममहाराजांनी प्रत्येकी चार चरणांचे दोन अभंग लिहिले आहेत. या दोन अभंगांमधून शिव व शक्ती यांचे स्वरूप व त्या दोहोंमधील परस्पर संबंध यांचा उहापोह केलेला आहे. श्रीज्ञानदेवांच्या या दोन ओव्यांमध्ये प्रतिपादन केलेले तत्त्वज्ञान हे अमृतानुभव ग्रंथाचे सार आहे. या दोन्हीमधील प्रतिपादन केलेल्या सिद्धांताचा विस्तार म्हणजेच पुढील 'अमृतानुभव' हा ग्रंथ होय.

१. ऐसी ही निरुपाधिके - या ओवीवरील अभंगामध्ये श्रीदासराममहाराज म्हणतात, 'तेचि शिव शक्ती जो का मुळारंभ । अनादि स्वयंभ परमात्मा ॥' अनादि, स्वयंभ, मूळरूप परमात्म्यापासून शिवशक्तीरुपाने विश्व प्रगट होण्यास सुरवात झाली. हाच जगताचा मुळारंभ होय. मूळ परमात्म्यापासून उत्पन्न झालेले प्रणवाचे म्हणजेच ॐकाराचे स्फुरण हे शिवशक्तीरूपाने असते. यातील 'शिव' हा अव्यक्त असून, 'शक्ती' ही अनंत आकाशरूपाने व्यक्तत्वास आली आहे.

२. जो प्रियुचि प्राणेश्वरी - या ओवीवरील अभंगामध्ये श्रीदासराममहाराज म्हणतात, 'एकपणे दोघे एकांगे वर्तती । दासरामी आर्ती अद्वैताची ॥' शिवशक्तीमध्ये प्राण हा शिव तर शक्ती ही प्राणेश्वरी आहे. शिव व शक्ती हे दोघे द्वैतभावाने भासत असले तरी, ते एकमेकापासून वेगळे नाहीत. ॐकारातील मातृकाप्रमाणे शिवशक्ती एकरूप असून तयांचे एकत्व अबाधितरूपाने असते.

## १४. प्रस्तुत ग्रंथाचा स्थूल आराखडा :-

'अक्षरे चैतन्याची भाग -२' या प्रस्तुत ग्रंथामध्ये दोन विभाग केलेले आहेत. श्रीदासराममहाराजांचा 'चांगदेवपासष्टी' हा जिव्हाळ्याचा विषय होता. त्यामुळे त्यांनी चांगदेवपासष्टी या ग्रंथावरती विविधप्रकारचे लेखन केलेले आहे. त्यामुळे प्रस्तुत ग्रंथाच्या पहिल्या विभागामध्ये

श्रीदासराममहाराजांनी चांगदेवपासष्टी संदर्भात केलेल्या विविध प्रकारच्या लेखनाचा समावेश केलेला आहे. या ग्रंथाचा दुसरा विभाग हा श्रीज्ञानदेवांच्या 'इतर प्रकरण ग्रंथांचा' आहे. श्रीज्ञानेश्वरी, हरीपाठ वगैरे प्रसिद्ध ग्रंथाव्यतिरिक्त श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या नावावर अनेक प्रकरणग्रंथ आहेत. हे प्रकरणग्रंथ लहान-मोठ्या स्वरूपाचे आहेत. याव्यतिरिक्त श्रीदासराममहाराजांनी वेळोवेळा श्रीज्ञानेश्वरमहाराज व त्यांच्या वाङ्मयासंदर्भात केलेल्या स्फुट लेखनाचाही यामध्ये सामवेश केलेला आहे. श्रीमुक्ताबाई यांचे 'ताटीचे अभंग' हे श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या संबंधित असल्याने त्यांचाही समावेश येथे केलेला आहे. अशातऱ्हेने 'चांगदेवपासष्टी' संबंधी पहिल्या विभागामध्ये ५ प्रकरणे असून 'इतर प्रकरणग्रंथ' या नावाच्या दुसऱ्या विभागामध्ये एकूण १३ प्रकरणे आहेत.

वरील दोन्ही विभागातील प्रत्येक प्रकरणाचा विषयानुबंध स्पष्ट होण्याच्यादृष्टीने, प्रत्येक प्रकरणामध्ये त्या त्या प्रकरणाचा थोडक्यात संक्षिप्तरूपाने परिचय देण्यात आलेला आहे. वरीलपैकी खालील प्रकरणांचा संक्षिप्त परिचय प्रा. डॉ. श्री.के.वा.आपटे यांनी लिहिलेला आहे.

१. श्रीज्ञानदेव मुद्राप्रकाश (श्रीदासराममहाराजकृत साधनमुद्रा टीकेसह). २. श्रीज्ञानदेवकृत प्रणव (श्रीदासराममहाराजकृत गद्य भावार्थासह). ३. दत्तस्तुती व दासराममहाराजकृत दत्तस्तुती प्रसाद, ४. श्रीज्ञानदेवकृत नमन स्तोत्र (भावार्थ नमनासह), ५. श्रीज्ञानेश्वरी सार, ६. श्रीज्ञानदेव आज्ञापत्र, ७. श्रीदासरामकृत श्रीज्ञानेश्वर स्तोत्र, ८. अमृतानुभव - मंगलाचरणातील ६ व्या श्लोकावरील पद्य टीका.

या व्यतिरिक्त उर्वरीत सर्व विभागातील प्रकरणांचा संक्षिप्त परिचय श्री. नारायण देशपांडे यांनी लिहिला आहे.

सारांशाने सांगावयाचे झाल्यास, पहिल्या विभागातील श्रीचांगदेवपासष्टी या ग्रंथाच्या संदर्भाने श्रीदासराममहाराजांनी केलेल्या



लेखनामधून उपनिषदामधील 'तत्त्वमसि' या महावाक्यातील तत् - त्वम् व असी या तिन्ही पदांचे सविस्तर वर्णन आलेले आहे. तसेच त्यामध्ये प्रामुख्याने 'अद्वैत' सिद्धांताचे प्रतिपादन केले आहे. इतर प्रकरण ग्रंथ या दुसऱ्या विभागातील निरनिराळ्या प्रकरणामधून योगमार्गाचे तत्त्वज्ञान, साधन आणि साक्षात्कार ह्या विषयांचा सविस्तरपणे उहापोह केलेला आहे. योगमार्गाचे साधन साधले असता, अद्वैतसिद्धी कशी प्राप्त होते याची रुपरेषा या ग्रंथाच्या वाचन अभ्यासाने आपल्यासमोर प्रस्तुत होते. त्यामुळे हा ग्रंथ साधक जनांसाठी त्यांच्या अध्यात्मिक प्रवासात उपयोगी पडेल, यात शंका नाही.

वास्तविक पाहता, या ग्रंथातील विषय हा केवळ तर्कबुद्धीचा अगर कल्पनाविलासाचा नसून, तो प्रत्यक्ष 'अनुभवाचा विषय' आहे. त्यामुळे देहबुद्धीतील विचार करणारा मी, योगमार्गातील प्रस्तुत ग्रंथातील मूळ अध्यात्मिक वाङ्मयावर प्रस्तावना लिहिण्यास अपात्र आहे. परंतु माझे सद्गुरु श्रीदासराममहाराजांनी हे मजकडून लिहून घेतले आहे. सद्गुरुमहिमा अगाध आहे हेच खरे!

अखेरीस श्रीज्ञानेश्वरमाऊली, भगवान सद्गुरु श्रीगुरुलिंगजंगममहाराज, भगवान सद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, सद्गुरु प.पू.श्रीमामामहाराज, व माझे सद्गुरु प.पू.श्रीदासराममहाराज या सर्वांच्या चरणी अनेक अनेक दंडवत घालून येथेच थांबतो.

**श्रीदादांचा चरणरज,**

**नारायण देशपांडे**

## ✽ प्रकाशकाचे चार शब्द ✽

माझे परमश्रेष्ठ सद्गुरु प.पू.श्रीदासराममहाराज केळकर यांनी आपल्या अवतारात वयाच्या अवघ्या ७ व्या वर्षापासून प्रासादिक अध्यात्मिक लेखन केले. या लेखनाची व्याप्ती फारच प्रचंड आहे. या लेखनाचे प्रकाशन ७५ ग्रंथ प्रकाशित होऊनसुद्धा अजूनही पूर्ण झालेले नाही, यावरूनच याचा अंदाज येईल.

प.पू.श्रीदासराममहाराज हे महान योगीपुरुष होते; हे त्यांच्या अवतारात घडलेल्या अनेक घटनांवरून तसेच अनेक अध्वर्युंच्या उत्स्फूर्त उद्‌गारांवरून स्पष्ट होते. सर्वांचा येथे उल्लेख करणे शक्य नाही. त्यांचे चरित्र वाचल्यावर हे आपल्या लक्षात येईल. योगीपुरूष असल्यामुळेच श्रीदासराममहाराज यांनी श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या योगमार्गास धरून असणाऱ्या अनेक प्रकरणांवर समओवी टीका, विस्तृत टीका, भावार्थ या स्वरूपात ओघवते व अनुभवजन्य असे लेखन केले आहे. हे लेखन नसून अनुभवाचे प्रकटीकरण आहे, हे वाचल्यावर आपल्या लक्षात येईल. हे समग्र वाङ्‌मय **'अक्षरे चैतन्याची भाग-१'** व **'अक्षरे चैतन्याची भाग - २'** या दोन ग्रंथांद्वारे प्रकाशित होत आहेत. ही अनेक साधकांना एक पर्वणी ठरेल यात शंका नाही.

**'अक्षरे चैतन्याची भाग-२'** या ग्रंथाची प्रकाशन सेवा माझे हातून घडत आहे, ही माझ्या भाग्याची गोष्ट आहे. यासाठी माझ्या आई-वडिलांची पुण्याई कारणीभूत आहे. यावेळी त्यांचे स्मरण झाल्याशिवाय रहात नाही.

या ग्रंथाच्या प्रुफ तपासणीचे कामी आदरणीय श्री. दीपक चंद्रशेखर केळकर (नाना), श्री.नारायणराव देशपांडे, श्री.रमेश लाळे यांनी फारच परिश्रम घेतले आहेत. तसेच याचे टाईप सेटींगचे काम श्री. भालचंद्र सहस्रबुद्धे यांनी केले आहे. ग्रंथ छपाई श्रीकृष्ण मुद्रणालय, सांगली यांनी उत्कृष्ट केली आहे. या सर्वांचा मी ऋणी आहे. शेवटी अखिल सद्गुरुपरंपरेस शतशः दंडवत घालून येथेच थांबतो.

आपला,

**माधव रामकृष्ण बर्वे**



## ✽ साधकाचे मस्तकी कृपाहस्त ✽

आद्य गुरुपीठ प.पू.सद्गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज यांच्या परंपरेतील चिमडसंप्रदायातील थोर संत-सत्पुरुष श्रीदासराममहाराज केळकर यांच्या जन्मशताब्दी निमित्त एक मोठा भक्तिसोहळा त्यांच्या आश्रमात सांगली येथे संपन्न होत असून, त्यांनी जे विपुल लेखन केले आहे ते ग्रंथस्वरूपात प्रसिद्ध केले जात असून, ते संप्रदायातील साधक आणि सर्व परमार्थप्रेमी यांना उपलब्ध होत आहे. श्रीदासराममहाराज यांचे चिरंजीव व सध्या गुरूपीठावर आसनस्थ झालेले प.पू.श्रीचंद्रशेखरमहाराज यांनी श्रीदासराममहाराजांची 'अक्षरे चैतन्याची भाग-१ व भाग - २' ही पुस्तकेही ग्रंथस्वरूपात प्रकाशित केली असून त्यास मी काही 'चिंतन' लिहावे अशी विनंती प.पू.श्रीचंद्रशेखरमहाराज यांनी केली असली तरी मी ती 'आज्ञा' मानूनच विनम्रपणाने स्वीकारून त्यांच्या 'दुसरा भाग' असलेल्या अक्षरे चैतन्याची या ग्रंथावर श्रीज्ञानदेवांच्या ज्ञानेश्वरीतील 'अध्याय बारावा' च्या संदर्भाने काही ओव्या घेऊन त्याद्वारे 'भक्तियोग' मध्ये उपासना करून जो गुरुपदवीपर्यंत पोहोचतो अशा श्रेष्ठस्वरूपातील आपल्या भक्तावर म्हणा वा शिष्यावर म्हणा, तो 'आपला कृपाहस्तस्वरूपी मुकुट त्याच्या मस्तकी ठेवतो' त्या संदर्भातील त्याची प्रगतीपथावरील आदर्श वाटचाल कशी होत असते, याबद्दल जी अनुभूती येते, त्याचा विचार येथे अत्यंत विनम्रपणाने प्रकट केला आहे. भाग-१ मध्ये नवव्या अध्यायातील तातडीने भक्तिप्रवृत्त होणेविषयी जो उपदेश केला आहे, त्यावर 'चिंतन' केले आहे. येथे बाराव्या अध्यायातील ''तयावरी माथा मुकुट करी ।'' अशी जी ओवी श्रीज्ञानदेवमहाराज यांनी लिहिली आहे, त्याविषयीचे 'चिंतन' येथे मांडले आहे. या दोन्ही अध्यायांचे श्रीज्ञानेश्वरीग्रंथात विशेष महत्व आहे.

### भक्तिमार्गाने मजकडे ये :

निर्गुण उपासनेचा मार्ग कठीण आहे. त्याऐवजी सगुणभक्तिचा मार्ग सुलभ आणि सुखकारक आहे. त्या भक्तिमार्गाने माझ्याकडे ये असे भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला निमित्त करून, तुम्हा-आम्हालाच उपदेशिले आहे. मी तुम्हाला संसारसागरातून तारून नेतो आहे असेही त्याचे सर्वांनाच अभिवचन आहे. मी कसा तारतो? तर ''नामाचिया सहस्रावरी । नावा इया अवधारी ।। सजूनिया संसारी । तारू जाहलो।।''

(अध्याय १२ ओवी ९०). इथे श्रीज्ञानदेवांनी नाव म्हणजे नौका आणि नाव म्हणजे नाम असे सांगितले आहे. सद्गुरुप्रदत्त एकाच नामाने मी भक्ताला तारून नेतो, कारण तीच नौकाही आहे. नौका पुढे सरकण्यासाठी तिला वल्हविले तरी पाहिजे. मग हे वल्हे तरी कोणते आहे? तर ते म्हणजे नामाचे स्मरण होय. हाच नामस्मरणात्मक-भक्तियोग होय. ही नौक वल्हवणे म्हणजेच स्मरणोपासना करणे होय. त्यालाच श्रीज्ञानदेव 'अभ्यास' करणे असे म्हणतात. अभ्यासाचे दोन अर्थ आहेत. १. भक्तिज्ञान कळून घेण्यासाठी ग्रंथोक्त तत्त्वज्ञानाचे वाचन करणे, २. अभ्यास म्हणजे साधन करणे होय. ते साधन करणे म्हणजेच नामस्मरण करणे होय. त्यायोगेच भक्ताला माझ्याविषयी प्रेम वाटू लागेल. हे प्रेम म्हणजेच माझ्याविषयी आस्था निर्माण होणे होय. माझे साधन तरी कसे करायचे? तर श्रीज्ञानदेव सांगतात की, ''तरी गा ऐसे करी । इया आठा प्रहरा माझारी । मोटके निमिषभरी । देतु जाय ।।'' (ओवी १०५). इथे श्रीज्ञानदेव सांगतात की, २४ तासांपैकी क्षणभर का होईना तू माझे एकाग्रमनाने, उत्कट भावाने, शुद्ध विचारासहित स्मरण कर. साधनेत सातत्य हवे. उपासनेची आपली वेळ आपणच निश्चित करायची आहे. साधन कशाप्रकारे करायचे? तर १. माळेवर जप करावा, २. सदैव आणि सर्वत्र जप करावा. ३. ठराविक वेळ निवडून निश्चयपूर्वक साधन करावे. त्यालाच या संप्रदायात नेम करणे असे म्हटले जाते. ४. मन, बुद्धि, शरीर एकवटून ध्यान करावे. ५. ईश्वरदर्शन होत असताना त्याचेविषयी ध्यान करावे. अशा पाच प्रकारे साधन करता येते.

## हळुहळू मत्स्वरूपी होशील! :

पुढे श्रीज्ञानदेवांनी सांगितले आहे की, साधक संतस्वरूपी, सत्पुरुषस्वरूपी केव्हा होतो? तर ''तैसे भोगाआतुनि निगता । चित्त मजमाजी रिगता । हळुहळू पंडुसुता । मीचि होईल ।।'' (ओवी १०९). साधन वाढून भक्तिप्रेम दृढ झाले की, विषयवासना यांच्या उपभोगातून मन-बुद्धी-शरीर बाजूला होते. साधकाला त्यात रुचि वाटत नाही. अधिकाधिकपणाने साधक 'अहर्निश परमार्थ' करू लागतो. मग तो साधक हळुहळू ईश्वरस्वरूप होऊन रहातो. सगुण वा निर्गुण देवाची ओळख होऊन तो सद्गुणी होतो. गुणसमुच्चयी असणे हेच ईश्वराचे स्वरूप आहे. मग आपोआपच दुर्गुणांचा



ऱ्हास होऊ लागतो. तेही स्वभावतःच सहज आणि सुलभपणे होऊ लागते. चित्त ईश्वरदर्शनासाठी उत्सुक होते. सतत नामसंकीर्तन होऊ लागते. इथे एक जणु शुद्धिकरण प्रक्रियाच होते, असेच म्हणता येईल. कसे म्हणाल? तर आपल्या शरीरात असंख्य पेशी असतात. शुद्ध आणि अशुद्धही!! पण जेव्हा सद्गुरुंकडून अनुग्रह प्राप्त होतो, तेव्हा साधकाची एक पेशी शुद्ध झालेली असते. ''जेचि क्षणी अनुग्रह झाला । तेचि क्षणी मुक्त झाला ।।'' असे श्रीसमर्थ रामदास यांनी दासबोधात म्हटले आहे. त्यावर प.पू.श्रीकाकासाहेब तुळपुळे आणि प.पू.श्रीरामण्णा कुलकर्णी आपल्या प्रवचनात असे सांगतात की, 'मुक्त' झाला म्हणजे काय? तर अनुग्रहानंतर मुक्त होण्याची प्रक्रिया सुरू झाली. साधन जसे जसे वाढेल, तसे तसे साधकच देवस्वरूप होऊ लागतो. यालाच देही देव प्रगटला असे म्हटले गेले आहे. जगद्गुरु श्रीतुकाराममहाराज यांनी तर माझ्या देहात देवाने येऊन रहावे असे मागणेच केले आहे. अभंगात ते म्हणतात की, ''सदा माझे डोळा जडो तुझी मूर्ती । रखुमाईच्या पती सोयरिया ।।१।। गोड तुझे नाम गोड तुझे रूप । देई मज प्रेम सर्वकाळ ।।२।। विठोमाऊलीये हाचि वर देई । संचरोनि राही हृदयामाजी ।।३।। तुका म्हणे काही न मागे आणिक । तुझे पायी सुख सर्व आहे ।।४।।'' (गाथा - बंडातात्या कराडकर/अभंग क्र.१०६५).

## तयाचे मस्तकी वरदहस्त :

श्रीकृष्णाने अर्जुनास ज्ञानीभक्तांची लक्षणे सांगून तेच माझे प्रिय भक्त आहेत असेही सांगितले. जो आयुष्यभर देवाचे भजन - चिंतन- स्मरण करतो, म्हणजेच माझी भक्ति करतो, त्याचेसाठी देव काय करतो? तर श्रीज्ञानेश्वरांनी भक्तास अभिवचन दिले आहे, कोणते म्हणाल? ते सांगतात की, ''याहीवरी पार्था । माझ्या भजनी आस्था । तयाते मी माथा । मुकुट करी।।''(ओवी २१४). माझ्या भजनात जो सदैव तल्लीन होऊन रहातो, त्याला मी आपल्या मस्तकावर मुकुटाप्रमाणे धारण करतो, हे देवाचे अभिवचन आहे. कारण सदासर्वदा भजनशील असलेला भक्त पूर्णत्वास पोहोचलेला

असतो. असा भक्त म्हणजे जणु भगवंताची कीर्तीच असते. भक्तिची ती ध्वजा असते. म्हणून मस्तकावरचा मुकुट जसा श्रेष्ठ, तसा हा भक्त ईश्वराच्या भक्तीने देवाइतका श्रेष्ठ होतो. त्याला मुकुटाच्या योग्यतेची श्रेष्ठता प्राप्त झालेली असते. श्रेष्ठ- उत्तम - ज्ञानी अशा भक्तापुढे देवही विनम्र होतो. अशा भक्तांना देव स्वतःच्या मस्तकी धारण करतो. इतकी श्रेष्ठता भक्ताला भक्तीने प्राप्त होते. 'हे सर्व सद्गुरुकृपेने घडून येते' असे थोर तत्त्वज्ञ व साक्षात्कारी संत डॉ. रा. द. तथा श्रीगुरुदेव रानडे यांनी म्हटले आहे. याच वचनाचा आधार घेऊन मी येथे असे विनम्रपणे नमूद करीत आहे की, देव अशा भक्ताला मस्तकी मुकुटाप्रमाणे ठेवतो. याचाच आणखी एक संकेतार्थ असा सांगता येईल, भक्ताच्या मस्तकावरील मुकुट म्हणजे देवाने/सद्गुरुंनी त्या भक्ताचे मस्तकी आपल्या 'कृपेचा वरदहस्त' ठेवलेला असतो. सद्गुरुंची कृपा झाली तर त्याइतकी आणखी कोणतीही श्रेष्ठतेची खूण उरत नाही. कृपा ही सर्वात 'बहु थोर' आहे. खरे तर गुरुभेट होऊन, गुरुमंत्राची प्राप्ती होऊन, साधन व नीति आचरण यायोगे ईश्वरदर्शनाचा अनमोल ठेवा प्राप्त करून घेत असल्याने तो देवाच्या अंतःकरणात सदैव रहातो. अशारितीने देव आणि भक्त एकरूप होऊन जातात. अशी ही भक्तीपथावरची 'वाटचाल' आहे. धन्य धन्य ते सद्गुरु नि धन्य धन्य त्यांचा भक्त!!

**प्रा.डॉ.नरेंद्र कुंटे**

# अक्षरे चैतन्याची भाग - २

## ✻ अनुक्रमणिका ✻

### विभाग - १


| अ.क्र. | प्रकरणाचे नांव | पान क्र. |
|---|---|---|
| ✻ | संपादकीय ... ... ... ... | एक |
| ✻ | प्रस्तावना ... ... ... ... | तीन |
| ✻ | प्रकाशकाचे मनोगत ... ... ... ... | बत्तीस |
| ✻ | अभिप्राय - प्रा.डॉ.नरेंद्र कुंटे ... ... ... | तेहेत्तीस |
| १. | श्रीदासराममहाराजकृत विस्तृत टीकेसह चांगदेव पासष्टी (एक नामकळा) | १ |
| २. | श्रीदासराममहाराजकृत समओवी टीका व भावार्थासह चांगदेव पासष्टी | ५० |
| ३. | श्रीदासराममहाराजकृत अभंगरूप चांगदेव पासष्टी | ६७ |
| ४. | श्रीदासराममहाराजकृत चांगदेव पासष्टी लहरी | ७० |
| ५. | श्रीदासराममहाराजकृत चांगदेव पासष्टीतील पहिल्या नऊ ओव्यांचे गद्य स्पष्टीकरण | ७६ |


### विभाग - २


| अ.क्र. | प्रकरणाचे नांव | पान क्र. |
|---|---|---|
| १. | श्रीदासराममहाराजकृत सानंद टीकेसह श्रीज्ञानदेव तेहेत्तिशी | ८१ |

२. श्रीदासराममहाराजकृत साधनमुद्रा हृदय ११०

३. श्रीदासराममहाराजकृत समओवी टीकेसह श्रीज्ञानदेव मुद्राप्रकाश ११४

४. श्रीदासराममहाराजकृत भावार्थ नमन हृदय व
समओवी टीकेसह नमन स्तोत्र १३४

५. श्रीदासराममहाराजकृत भावार्थासह प्रणव (ॐकार अक्षर) १५९

६. श्रीदासराममहाराजकृत पद्य टीकेसह दत्तस्तुती
व दत्तस्तुतीप्रसाद १८५

७. श्रीदासराममहाराजकृत गद्य भावार्थासह
श्रीज्ञानेश्वरमहाराजांची सनद १८९

८. श्रीदासराममहाराजकृत श्रीज्ञानेश्वर स्तोत्र २००

९. श्रीदासराममहाराजकृत समओवी टीकेसह श्रीसद्गुरु स्तवन २०३

१०. श्रीदासराममहाराजकृत भावार्थासह श्रीज्ञानदेव आज्ञापत्र २०६

११. श्रीदासराममहाराजकृत भावार्थासह श्रीमुक्ताबाईंचे ताटीचे अभंग २०९

१२. श्रीज्ञानेश्वरमहाराजकृत अमृतानुभव या ग्रंथातील ६व्या
संस्कृत श्लोकावरील श्रीदासराममहाराजकृत पद्य टीका २१६

१३. श्रीदासराममहाराजकृत अभंग अमृतानुभव २२०


***

|| श्रीराम ||

# अक्षरे चैतन्याची भाग - २

# विभाग - १

# प्रकरण - १

श्रीदासराममहाराजकृत विस्तृत टीकेसह

## चांगदेव पासष्टी (एक नामकळा)

**प्रस्तावना :**

श्रीदासराम लेखन वही क्र.२७० मध्ये प.पू.मामामहाराज केळकर यांनी श्रावण शके १८८३ इ.स. १९६१, पासून माघ शु.९ शके १८८४ इ.स.१९६२ पर्यंतच्या कीर्तनाची टिपणे स्वहस्ते लिहिली आहेत. यापुढे श्रीदासराममहाराजांनी चांगदेव पासष्टीवर विस्तृत ओवीबद्ध टीका लिहिली आहे. श्रीदासराम लेखन वही क्र. २७० पा.क्र.६१३ ते ६७४.

चांगदेव पासष्टीमधील शेवटच्या ६५व्या ओवीवरती ३५ ओव्यांची टीका लिहिली आहे. त्यातील ३४ व्या ओवीमध्ये स्वानंदसुखनिवासी श्रीविष्णुबुवा जोगमहाराज यांच्या जन्मशताब्दी वर्षाला हे लेखन झाल्याचा उल्लेख आहे. यामधील ओवीमध्ये श्रीदासराममहाराज, 'भगवान सद्गुरू श्रीहनुमंतराय कोटणीसमहाराज यांच्या कृपेने, चांगदेव पासष्टीमधील 'नामकळा' प्रकट झाली असून, ती सर्व ज्ञानराजमाऊलींची लीला आहे' असे म्हटले आहे.

यातील अखेरच्या ३५ व्या ओवीमध्ये भाद्रपद व.६ शके १८८८ मध्ये हा ग्रंथ लिहून पूर्ण झाल्याचा उल्लेख आहे. श्रीज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानाचा गाभा असलेल्या चिद्‌विलासवादाची ठळकपणाने प्रचिती श्रीदासराममहाराज यांच्या या विस्तृत टीकेमधून आल्यावाचून रहात नाही.

**स्वस्ती श्रीवटेशू । जो लपोनी जगदाभासू ।**
**दावी मग ग्रासू । प्रगटला करी ॥ १ ॥ (मूळ)**

स्वस्ती श्रीवटपत्रीचा ईश । हंसरुप लपोनी जगदाभास ।
जो प्रगटल्या लय विश्वास । सहजचि आहे ॥ १ ॥
द्वासुपर्णा ऐसी श्रुती । अंगुष्ठप्रमाण जे निगुती ।

जेथ प्राण गुप्तस्थिती । प्राणैव आत्मा बोलती ज्या ।। २ ।।
जेथ एकची पाहते दिसे दोन । पहाता अती सूक्ष्मपण ।
म्हणोनी आले स्पंदन । प्राणाचे जेथ ।। ३ ।।
प्रलयकाळीचे वाहे जीवन । तेथ प्राणाच्या गती दोन ।
संघर्ष करिती ऊनदिन । आकर्षे प्रकर्षेची ।। ४ ।।
जे कल्पातांचे बीज । तेथ कल्पना मुराली सहज ।
सकार हकार अयोनीज । आत्मगती ।। ५ ।।
जे अखिल विश्वाची गती । जया नाम सोहं स्थिती ।
ऋषीमुनी संत वदती । हंस ज्याते ।। ६ ।।
सोहं हंसः मूळगती । तेचि तेथे अनुवृत्ती ।
ज्यावरी प्राणवृत्ती विचरती । योगस्थिती योगियाची ।। ७ ।।
जो नव्हे योगायोग । जो नव्हे वियोग ।
ऐसा जो सहजयोग । सहजची असे ।। ८ ।।
जेथ सहजी स्वस्ति क्षेम । जया नांव योगमेक्ष ।
प्राणापानधारणोद्गम । जयावरी ।। ९ ।।
जीवनाची स्थैर्य क्षेम । जेणेची जीवनासी आराम ।
जो का आयुष्याचा पूर्णविराम । निश्चियेसी ।। १० ।।
प्राणाचा आकाशावरी संघात । तेथ आकार विकार समस्त ।
प्राणस्पंदनी अवकाश रहात । तेथ विश्वाभास होतु पै ।। ११ ।।
आकाशवायूची पडता गाठी । आत्मा सामावला हृदयसंपूटी ।
दृश्य द्रष्टा दर्शन त्रिपूटी । जेथुनी गमे ।। १२ ।।
म्हणोनी आत्मा लपता जगदाभास । गती अदृष्य प्रवाह दृष्य ।
उपाधिमाजी सौरस । प्राणापान वहाती ते ।। १३ ।।
प्राणापानाचा धक्का निराळी । जई बैसे सहस्त्रदळी ।
तव आयुष्याची वाटचाली । श्वासोश्वासी दृश्यमान ।। १४ ।।
तरी हे अवस्थात्मक दृश्य । अवस्थांतरे होय निरास ।
जई आत्मगती होय प्रवेश । तरी तो प्रगटे निघोटनि ।। १५ ।।



तरी सर्व हे सहजची लोपे । नुरती संकल्प विकल्पे ।
प्रलय विश्वाचा अपापे । हे अनुभूती श्रीज्ञानेश्वरांची ।। १६ ।।
म्हणोनी श्रीचांगदेवाप्रती । दाविली जीवनाची मूळस्थिती ।
जो का संभ्रम उपाधिभूती । सहज दवडिला चैतन्यी ।। १७ ।।
**प्रगटे जव तव न दिसे । लपे तव तव आभासे ।**
**प्रगट ना लपाला असे । ने खोमता जो ।। २ ।। (मूळ)**
तो प्रगटता दृश्य नासे । तो लपता दृश्य आभासे ।
उदयास्तावीण सूर्यासरिसे । प्रगट ना गुप्त साक्षात्चि ।। १ ।।
तारमंद्र घोर । जाणे तीन भेद स्वर ।
आत्मा घोररुपे बिनघोर । करी जीवासी सुषुप्तीया ।। २ ।।
घोरासुराचे लागले आख्यान । तो उडाले देहाचे देहभान ।
मी जीव हे जीवाचे ज्ञान । उडाले जेऊती ।। ३ ।।
आत्मा घोररुपाने प्रगट । होता नित्य प्रलय चोखट ।
अवस्थांतरे अवचट । भान गेले तो ज्ञान कै ।। ४ ।।
जे पिंडी ते ब्रम्हांडी । जे ब्रम्हांडी ते पिंडी ।
ऐसी प्रचिती रोकडी । भाताची परिक्षा शितावरी ।। ५ ।।
आत्मरुप जै लपाले । तो घोररुप आकसले ।
अवस्थांतरे आले । देहभान ।। ६ ।।
मी जीव हे होता ज्ञान । भान जैसे ज्ञानाज्ञान ।
आले दृश्याचे दृश्यपण । सिद्धलहरी दृश्य जे ।। ७ ।।
चैतन्याचा विलास । तया नांव अखिल दृश्य ।
अस्थिरत्वे सावकाश । पालटे पै ।। ८ ।।
कशाची नाही शाश्वती । कशाची नाही निश्चिती ।
स्थिर नव्हे स्थिर नव्हे म्हणोनि भ्रांती । या नांव आभास ।। ९ ।।
अवस्थात्मक जै सौरस । म्हणोनी भास आणि निरास ।
गुप्त प्रगटता सापेक्ष । लहरीचेनी ।। १० ।।
या लहरींचे माध्यम । पहिले ते खं ब्रम्ह ।

जेथोनि संभ्रम आणि भ्रम । आवर्त प्रत्यावर्त जीवनी ।। ११ ।।
जयापैल निरपेक्ष । आत्मा स्वसंवेदा प्रत्यक्ष ।
अरुप अनाम अलक्ष । विश्वसाक्ष साक्षत्‌ची ।। १२ ।।
सूर्य आत्मा बोलती वेद । उदयास्तावीण प्रसिध्द ।
पिंडी ते ब्रह्मांडी सिध्द । आत्मसूर्य हा निश्चयो ।। १३ ।।
जो प्रगट ना गुप्त । पहाता दिसे साक्षात्‌ ।
जया लक्षिता प्रचीत । वेडावली ।। १४ ।।
प्राणस्पंदनी अवकाश । जया बोलती आकाश ।
पहाता कळे सावकाश । जे गावीही नसे आत्म्याच्या ।। १५ ।।
सूर्य या विश्वी थोर । ज्याचे अनंत चमत्कार ।
परी जेथे प्रत्यक्षा साक्षात्कार । तेथे काय चमत्कृती ।। १६ ।।
आकाशाते ही गिळोन । जो स्वसंवैद्य आपण ।
तेथे काय ज्ञानाज्ञान । जीवनी दिसे ।। १७ ।।
जे सर्वदा आहेच आहे । तेचि गुरुकृपे लाहे ।
सदा आनंदरुप राहे । स्वानंदी या ।। १८ ।।
नाही गुप्त प्रकटता । जेथ नसे किंचितही न्यूनता ।
म्हणोनि बोलिले न खोभता । श्री ज्ञानेश्वर महाराज ।। १९ ।।
**बहू जंव जंव होये । तंव तंव कांहीच न होये ।**
**काहीं न होनी आहे । अवघाचि जो ।। ३ ।। (मूळ)**
काही नाही तेची होये । जव बिंदू बिंदूने दृश्यत्व ये ।
बिंदू अदृश्य आत्मा पाहे । रेषा माया आघवी ।। १ ।।
नव्हे तेचि कैसे जाहले । जे नाहीपणे प्रत्यया आले ।
परिणामी नाही ऐसे गमले । म्हणोनी कांही नव्हेचि ।। २ ।।
शून्यांत काही मिळविले । काही उणे केले आणि गुणीले ।
नव्हे नव्हे भागिले । तरी हाती शून्यची ।। ३ ।।
शून्यांत दृश्याचा पसारा । तया लागी शून्याचा भारा ।
शून्यची पार अपारा । मग त्या काय म्हणावे ।। ४ ।।



मग आत्मा काय झाला । नव्हताचि ऐसा ठेला ।
मग कां तयाला । नाही म्हणावे ।। ५ ।।
आहे आहे म्हणता । हातीच निघोन जाय तत्वता ।
असा तो नव्हे निरुता । असा तो आहे असाची ।। ६ ।।
बिंदू बिंदूने ये दृश्यत्व । तैसाचि दृक्‌प्रत्यय भाव ।
माया रेषा लाघव । आरंभ कोठे शेवट ।। ७ ।।
परी आत्मबिंदू परिपूर्ण । जो अदृश्य गहन ।
जेथे नुरे भान । दृश्य देहाचे ।। ८ ।।
म्हणोनि कांही न होनी आहे । बहू होता कांही न होये ।
स्वप्नी जे का प्रत्यया ये । तेवीच जे ।। ९ ।।
**सोने सोनेपण उणे । न येताचि झाले लेणे ।**
**तेवी न वेचता जग होणे । अंगे जया ।। ४ ।। (मूळ)**
सोन्यामाजी आहे लेणे । म्हणोनी त्याचे होत दागिने ।
चैतन्याचे प्रवाहीपणे । अस्ति ठायी घडे जे ।। १ ।।
सर्व ब्रह्म ते निःशब्द । भेदाभेद चिदानंद ।
शब्द वेगळे वस्तू सिद्ध । स्वयमेव ।। २ ।।
अस्तिभाती प्रिय । हेचि आत्मरुप अव्यय ।
निखळ परी खेळ होय । अनंत लहरी ।। ३ ।।
वारिया पोटी गगन । सगुणा दावी निर्गुण ।
निर्गुणी तुषारु सगुण । विश्वरुप ।। ४ ।।
ताटीचे वाटी वाटीचे ताटी । तरी का तेथे भिन्नता ऊठी ।
जैसी दृष्टी तैसी सृष्टी । एकचि शेखी ।। ५ ।।
सुवर्ण हेचि सोने । नटले आत्मरुपात्मक गुणे ।
परी शेखी आत्मपणे । संचरे सर्वी ।। ६ ।।
वायू हलका वायु जड । वायू अदृश्य स्पर्शे उघड ।
गरम शीतल प्रचंड । अनंतरुप ।। ७ ।।
वायूचेनि प्रकाश । प्रकाशेचेनि दृश्य ।

वायू लहरीने श्रवणास । श्रवण घडे ।। ८ ।।
खरखरीत गुळगुळीत । जाणीव वायूने होत ।
श्रवणी जे नाद उमटत । वायूमुळे ।। ९ ।।
कानांत वारे शिरले । अंगावरुन वारे गेले ।
अंगीचे वारे लोपले । हे काव्य ।। १० ।।
वाऱ्याने झपाटले । अंगी वारे संचरले ।
जन्म जाला तो वायूमुळे । मरण तरी कशाने ।। ११ ।।
वायू घन वायू पोकळ । वायू चंचळ वायू निश्चळ ।
आकाश संघात दिक्काल । वायुमूळे ।। १२ ।।
तरी कमी अधिक काय झाले । आपुले आपण पाहिजे पाहिले ।
श्रीज्ञानेशकृपे वहिले । आकळे कळे ।। १३ ।।
**कल्लोळ कंचुक । न फेडिता उघडे उदक ।**
**तेवी जगेसी सम्यक । स्वरुप जो ।। ५ ।। (मूळ)**
अस्तित्व लहरी । गती प्रकाश चिदंबरी ।
तया लहरीचे अंतरी । सम्यक रुप ।। १ ।।
नासिकेशी लागले सूत । परी जीवाचे अस्तित्व तेथ ।
अनुकंपनही नसे जेथ । अस्ति लहरी सूक्ष्मतम ।। २ ।।
धूम तेथे वन्ही । परी कां धूर होय अग्नि ।
एका ठायी दिसती वन्ही । परी ते भिन्न ।। ३ ।।
जया वरोनी ओळखिले अस्तित्व । ते कां तयाचे अस्तित्व ।
सूक्ष्मतम अस्तिभाव । अतर्क्यचि ।। ४ ।।
बुद्धीचीया दिठी । नुमगे जे गोठी ।
सूक्ष्मतम लहर संपूटी । अस्तित्वाची ।। ५ ।।
जीव म्हणजे का जीवभाव । जीवभाव तो कां जीव ।
गतीप्रकाशयुक्त अस्तित्व । शून्य लहरी ।। ६ ।।
सोहंमाजी जे अवकाश । ते बोलती चिदाकाश ।
आत्मगती प्रकाश । ते सम्यक रुप ।। ७ ।।



तेथ ज्या अनंत लहरी । ते चैतन्य कुसरी ।
तेचि आपुले जीवन तरी । अनोळख ।। ८ ।।
वायुचिया सांदोसांधी । उघड जाहली उपाधी ।
जीवन सूत्री लागता समाधी । वायुचि उरे ।। ९ ।।
मग दृष्टी उपाधीवरी । तरी चिद्प्रकाश लहरी ।
अेकचि जीवन आंतवरी । काय पाहो ।। १० ।।
**परमाणूंचीया मांदीया । पृथ्वीपणे नवचेची वाया ।**
**तेवी विश्वस्फूर्ती इया । झाकवेना जो ।। ६ ।। (मूळ)**
नभापरता अणुचा गाभारा । जेणे स्फुर्तीये विश्वशोभा ।
नभा परतया स्वयंभा । झाकवेना ।। १ ।।
निरंजन रेणू माया अणू । शून्यामाजी सूक्ष्म पवनू ।
पवनाचिये परिमाणु । प्रमाण सिध्द ।। २ ।।
प्रंचप्राण पंचउपप्राण । यांचे होय जेथ मिलन ।
तो जिव्हाळा जीवांचे जीवन । सर्वी निराळा नि अचळ ।। ३ ।।
पिंडातोनि ब्रह्मांडी । आकलेनी जीवन ओढी ।
सुषुम्ना आकर्षिता गोडी । ज्या रेणूची ।। ४ ।।
जो रेणू ब्रम्हांडी सदा । सोऽहं तत्व जेथ बोधा ।
येई जाई सांधोनी सांधा । निश्चळत्वे ।। ५ ।।
रेणू खेळतो खेळ । अकळ परी त्याची कळ ।
देहबुध्दी जरी विफळ । सोऽहं तत्त्वी ।। ६ ।।
ॐकार गुरु सोऽहं शिव । याचे जेथे लाघव ।
सोऽहं ध्याने कळे माव । ज्या रेणुची ।। ७ ।।
तेथ जो फिरे अणू । जेथ व्यापिले जगत्रय जीवनू ।
तेथ प्रस्फूट गगनी गगनू । विश्वशोभा ।। ८ ।।
लहरी लहरीने विस्तार । परी ते आत्म्याची येरझार ।
आत्मस्थानी होता स्थिर । संभ्रम कोठे ।। ९ ।।
हे अखिल वायूची स्फूर्ती । तेथ उजळे वायुची दिप्ती ।

देह दृश्यभान चित्ती । कोणामुळे ।। १० ।।
हे नादानुसंधानी पाहता । देहभावे कोण फुकट जाता ।
देहभाव विरोनी मागुता । आत्माची उरे ।। ११ ।।
मग तो कैसा झाकोळे । बुध्दी ही अतर्कित प्रभावे ।
श्री ज्ञानेश्वरमहाराजा स्वभावे । जे बोधिती मुक्ताईसी ।। १२ ।।
तोचि अभिप्रायो येथिचा । जेथ मुक्यासी ही फुटे वाचा ।
वाचाळ तरी वाचा । गिळोनी उरे ।। १३ ।।
**कळांचेनी पांघुरणे । चंद्रमा हरपो नेणे ।**
**का वन्ही दीपपणे । आन नोहे ।। ७ ।। (मूळ)**
चंद्रनाडी जयाचेनी । न हरपे कळांचेनी ।
सोऽहं दीप वैश्वानर वन्ही । आन कैचा ।। १ ।।
कळे कळे चंद्र वाढे । तया पूर्णताही जोडे ।
आवरण काढीता तो कडे । चंद्ररुप ।। २ ।।
चंद्र येता रवीच्या घराला । वाटे त्याचा अस्त झाला ।
परी तो आला पूर्णतेला । एकसूत्री ।। ३ ।।
काय केले तरी हरी । गवसे जीवा कवणे परी ।
चंद्रसूर्य एकसूत्री । आवसे जरी ।। ४ ।।
हे वर्म श्री निवृत्तीनाथ । श्री ज्ञानराजांचे सद्‌गुरुनाथ ।
मंथोनी देती नवनीत । साधकासी ।। ५ ।।
कळांचेनी पांघुरले । अथवा केले मोकळे ।
उभय पक्षी उभय वेळे । चंद्र न हरपे ।। ६ ।।
पौर्णिमेचा चंद्र । तोचि परीपूर्ण आनंद ।
भोगिता तुकाराम प्रसिध्द । मिळाले जे सत्पदी ।। ७ ।।
पंधरा कळांनी पांघुरला । तो चंद्रास्तची झाला ।
जो का आला पूर्णतेला । म्हणोनी अस्त ।। ८ ।।
जयाची करावी पराकाष्ठा । त्याची तेथ ना प्रतिष्ठा ।
परी त्याची प्राणप्रतिष्ठा । पूर्णतेची ।। ९ ।।



गुण दोष जेथे नुरे । पूर्ण आनंदची संचरे ।
तेथे चंद्रकला नुरे । परीपूर्ण चंद्र ।। १० ।।
तयाची सोळावी कला । भगवान शंकर वाहती भाळा ।
तो तो अनुपम सोहळा । जेथे वेडावती संतजन ।। ११ ।।
रात्री सूर्य वाहे । दिनू चंद्र जाये ।
विपरित गे माये । देखियले ।। १२ ।।
तो चंद्रमा कैचा हरपे । म्हणती श्री ज्ञानराज आपण पै ।
जेथ सूर्यनाडी ही अपापे । आकर्षिली ।। १३ ।।
उदय ना अस्त । मित्रगुण जई प्रगटत ।
चंद्रसूर्य जै एक होत । तै अग्नि प्रगटे ।। १४ ।।
सूर्य हरपे आणि चंद्र न हरपे । प्रकाश सूर्याचा शीतळ तळपे ।
अग्निमाजी दोनी प्रलोपे । एकत्वेसी ।। १५ ।।
तेथ होय आपणचि दर्पण । आपणासी आपुले ठायी ज्ञान ।
प्रत्ययाचे समाधान । प्रत्ययेसी ।। १६ ।।
इडापिंगला ओघ सैरा । त्यावरी आत्मतेजाचा पसारा ।
प्रकाश पसरे गाभारा । मध्य धारे ।। १७ ।।
तोचि सोऽहंदीप वैश्वानर । एकत्वेची दिसे सार ।
तेथ भिन्नत्व प्रकार । उरले कायी ।। १८ ।।
गुणनिर्गुण आटले । तेथ सोऽहंदिप उजळे ।
जयावरी जीवाचे जीवन उसळे । तेजोमय धारणेसी ।। १९ ।।
दीपोतोनी तेज निघाले । ते शुन्यकलिकेने ग्रासिले ।
जेथ प्रभेवीण ठेले । उदयास्त ।। २० ।।
जीवनाचे सौम्य ज्वलन । जेणे होय देह धारण ।
एतुलिया प्रकाशाचे मीलन । जया वन्हीचेनी ।। २१ ।।
हा वन्ही तयासी पोषक । राखी प्राणापान सम्यक ।
जो कां अन्नासी पाचक । गुप्तपणे ।। २२ ।।
पहता इया चार खाणी । भट्टी चालिली अजुनी ।

तरी दिप आणि वन्ही । एकचि की ।। २३ ।।
दुरित कानन दहन करा । पुण्यरुप वैश्वानरा ।
श्रीचिमडमहाराज श्रीनिंबरगीश्वरा । याची लागुनि प्रार्थिती ।। २४ ।।
जो नुरवी पुण्यपाप । ऐसा वैश्वानर वन्ही दीप ।
प्रकाशी आम्हा ज्ञानप्रदीप । श्री हनुमंत गोविंद कृपे ।। २५ ।।
श्री ज्ञानाईचे अवतार । चिमडमहाराज श्रीरामचंद्र ।
तेथोनि एकचि हे सूत्र । एथवरी ।। २६ ।।
**म्हणोनि अविद्या निमित्ते । दृष्य दृष्ट्रत्व वर्ते ।**
**ते मी नेणे आईते । ऐसेचि असे ।। ८ ।। (मूळ)**
सूर्य नेणे अंधार । तैसा मी नेणे चराचर ।
अविद्येचा जो फेर । जीव भ्रमले ।। १ ।।
हे बोले श्रीज्ञानश्वरमाऊली । जी का सकळासी कृपासाऊली ।
साकार ब्रह्माची बोली । परी हे बोली काय पा ।। २ ।।
हे भाषाची निराळी । जे जीवासी नेई निराळी ।
पृथ्वीपासोनि अंतराळी । वेगळी दहा ।। ३ ।।
समुद्राचे पातळी । जरि का दृष्टी आली ।
तरी त्रिपुटी सरली । हे सत्यचि की ।। ४ ।।
परी एक लाट उठली । ते दृश्यत्वासी आली ।
तेथ त्रिपुटी उदेली । साक्षीपणे ।। ५ ।।
जे जे मर्यादित असे । ते ते दृष्टीलागी दिसे ।
ते मर्यादा गवसे । दृष्टी अभावे ।। ६ ।।
दृष्टी अभावे दृष्य जाले । ते ते परौते दृष्टी कोंदले ।
ते ते दृष्यमान जाले । हे त्रिपुटी ।। ७ ।।
परीपूर्ण दृष्टी । पहाता दृश्यची हे नुठी ।
मग द्रष्ट्याची गोठी । केऊती आहे ।। ८ ।।
बारा सोळा नेणती श्रीहरी । म्हणोनी फिरती अहोरात्री ।
ज्याचे भान देहावरी । अविद्या हे ।। ९ ।।



चैतन्यापासोनि जे फेकले । गतीने उपाधिमान झाले ।
उपाधित सापडले । उपाधी योगी ।। १० ।।
कल्पना विस्तार । तेणे झाला संसार ।
सदा चाले येर झार । परी स्थिरता नाही ।। ११ ।।
संसरण हा संसार । तेथ लहरी उठती निरंतर ।
सदा घडे फेर फेर । जीव भ्रमले तेथेचि ।। १२ ।।
मुळी जाहला संभ्रम । म्हणोनी उठला भ्रम ।
त्रिपुटीचेनि योगे कर्म । जीवापाठी ।। १३ ।।
जरी न घडे परिभ्रमण । जीवासी सापडे ठिकाण ।
चत्वार देहाचे निरसन । तरी स्थैर्य ।। १४ ।।
धैर्याने उजेडे ज्ञान । ओसरे ते अज्ञान ।
आठव तो ब्रम्हपूर्ण । अखंडीत ।। १५ ।।
सोऽहं होते ते कोऽहं झाले । तेथेचि निज विसरले ।
म्हणोनि जीव हे जाले । बहिर्मुख ।। १६ ।।
विसरेची मार्ग चुकला । वरपडा विषय चोरा झाला ।
परी प्रणवाभ्यासे आकळिला । हा मार्ग संती ।। १७ ।।
प्रणव तो अनुहत । संघातेविण ध्वनी होत ।
जीवनाचा ओघ जेथ । ऊर्ध्वगामी ।। १८ ।।
परिभ्रमणे ज्ञानाज्ञान । जया अविद्याची कारण ।
स्थीर ते अनुभवप्रमाण । सत्यचि ऊरे ।। १९ ।।
अवस्थांतर रुपांतर । जेथ नसेचि स्थित्यंतर ।
तरी कैसे चराचर । आणि त्रिपुटी ।। २० ।।
**जेवी नाममात्र लुगडे । येरव्ही सूतचि ते उघडे ।**
**कां माती मृद्भांडे । जयापरी ।। ९ ।। (मूळ)**
जेवि सूतचि लुगड्यांत । की मृत्तिका घटात ।
तेवी या विश्वात । अस्तित्वची असे ।। १ ।।
आत्मा दिक्कालातीत । जीवनाचे जे का सूत ।

परी दिवसरात्रीने वस्त्र विणत । जाला व्यक्त अवकाशी ।। २ ।।
ते सूतचि आले दिवसराती । गुप्तपणे आत्मगभस्ती ।
देहावरी जरी वृत्ती । तरी ते दृश्यमान ।। ३ ।।
मृद्‌भांडे बनली माती । म्हणूनी ज्याची होय माती ।
अणूंची एकवट प्रकृती । जे रेणुशी संलग्न ।। ४ ।।
तेथ काय वेगळाले । जरी नामरुपे आकारिले ।
अस्तित्वची उघड एकले । विश्वामाजी ।। ५ ।।
**तेवी द्रष्टा दृश्य दशे । अतीत दृङ्मात्र जे असे ।**
**तेचि द्रष्टा दृश्यमिसे । केवळ होय ।। १० ।। (मूळ)**
दृष्टाचि होवोनि दृश्य । नांदे दावी त्रिपुटीस ।
तया अतीत सौरस । आत्मा दृङ्मात्र ।। १ ।।
आत्मया ठायी जे पहाणे । तेचि आले पहाणेपणे ।
तयासी जे देखणे । दर्शन ते ।। २ ।।
तेथ आत्मत्त्वे आपणया भेटी । जे अलक्ष उठाउठी ।
दिसे द्वैत परी एकचि गोठी । प्रचिती ऐक्य ।। ३ ।।
आत्मयाची दृष्टी ज्या बिंदुवरी । तेथ उठती लहरी ।
तेथ शून्य जाले कुसरी । पहाणीया तू ।। ४ ।।
तेथ प्रस्फुट गगन । जेथ लहरी शीतऊष्ण ।
तये ठायी पोकळपणा । ते आकाश गा ।। ५ ।।
पहाणे आले पहाणेपणास । जेथ माध्यम अवकाश ।
अलक्षचि लक्ष । होऊनी ठेले ।। ६ ।।
लक्षामाजी जे अलक्ष । ते अलक्षचि होय लक्ष ।
अलक्षामाजी अलक्ष । तै दृश्य लक्ष ।। ७ ।।
बनून राहिले ते पहाणे । हे व्यवहाराचे वागणे ।
जयाचे बनले ते पहाणे । वस्तू दृङ्मात्र ।। ८ ।।
डोळा मिळालिया डोळा । तेथे कोण रे पाहिला ।
अलक्ष अनाम आकारिला । सद्‌चिदानंद ।। ९ ।।



चक्षु मिळता चक्षुस । पहाणे आपआपणास ।
जेथ जीवन समरस । निरुपाधी ।। १० ।।
जे का दृष्टीमाजी चमकते । ते चैतन्यचि निरुते ।
जे दृश्य द्रष्टा नव्हेचि आरते । स्वयंतेज ।। ११ ।।
जो आत्म्याचा प्रकाश । तो जीवनाचा उल्हास ।
साम्यदशे प्रत्ययास । वैषम्यी नये ।। १२ ।।
**अलंकार येणे नामे । असिजे निखिल हेमे ।**
**नाना अवयव संभ्रमे । अवयवीया जेवी ।। ११ ।। (मूळ)**
नाना संभ्रमे सुवर्णाचे । अलंकार नामारुपाचे ।
जैसे अवयव देहाचे । एकी एक प्रचिती ।। १ ।।
देवाची नामे देवाच्या शिरी । समर्पी जो अलंकारी ।
अद्वैत नामाची कुसरी । जाणोनिया ।। २ ।।
एक नाम एक प्रचिती । द्वैत नाम द्वैत चित्ती ।
व्यष्टी समष्टी भाव होती । म्हणोनिया ।। ३ ।।
एकदेशीयत्व जे गेले । सर्व देशीयत्व आले ।
अहंकार त्यागे झाले । सर्व सुख ।। ४ ।।
सर्व सुख अलंकारी । जो स्वयेचि अंगिकारी ।
अधिष्ठानी असीजे तरी । काय दोन ।। ५ ।।
**तेवी शिवोनी पृथ्वीवरी । भासती पदार्थाचिया परी ।**
**प्रकाशे ते एकसरी । संवित्ति हे ।। १२ ।। (मूळ)**
शब्दरूपातीत शिवापासून । तो देह दृश्याचे जेथ भान ।
संवीद आत्म होऊन । प्रकाशे ज्ञान एकसरी ।। १ ।।
चैतन्य क्षरत्वासी आले । तया नाम जीव बोलिले ।
जे का अक्षर वहिले । शिवरुप ।। २ ।।
जीवाचे ठायी जाणीव । शिवाचे ठायी नेणीव ।
नसेचि ज्ञानाची शहाणीव । म्हणोनिया ।। ३ ।।
या दोनी पैल परमात्मा । जो का असे निरुपमा ।

आकळ आगम निगमा । संवित्ती ते ।। ४ ।।
संवित्तीने प्रकाशती । ऐसे आगम निगम ख्यात जगती ।
प्रकाशे ज्ञानाज्ञान भ्रांती । परावर्तती संवित्ती ये ।। ५ ।।
पडद्यावरची साऊली । तेथ आत्मताचि प्रगटली ।
परी ते नोळखिली । म्हणोनिया ।।६।।
म्हणुनि तेचि सरीसी । आत्मते आली ।
जे सोपान देवे दाविली । खूण जगा ।। ७ ।।
अभाचि साऊली धरोनि हाती । निघे सोपानदेव एकांती ।
हा सोपान निश्चिती । अध्यात्माचा ।। ८ ।।
जयाचे ज्ञान आणि अज्ञान । त्याचे ज्ञान खरे ज्ञान ।
त्याचे अज्ञान ते अज्ञान । वर्म ऐसे ।। ९ ।।
आत्म्याचा विषय ज्ञानाज्ञान । ज्ञानाज्ञानाचा विषय न होन ।
सहज स्फुरद्रूप स्फुरण । जेथ घडे ।। १० ।।
तेथ सहज जे दृश्या आले । ते दृश्य काय कळविले ।
बाजारी पदार्थ जाती मोले । न गिऱ्हाईक ।। ११ ।।
एथ एकचि समाधान । समाधानाचि देवाण घेवाण ।
व्यवहार परमार्थ पूर्ण । अद्वयत्वे ।। १२ ।।
नाही आकाश घडणी । तेथ स्वरुपाची खाणी ।
तया पैल शिवरुप झणी । प्रत्यया ये ।। १३ ।।
आकाशी प्राणांचा संघर्ष । तेथ पदार्थविज्ञान उत्कर्ष ।
प्रवासी जीवा होय हर्ष । ज्ञानचातुर्ये समाधान ।। १४ ।।
स्वता सुखरुप असता । जो फिरे पदार्थामागुता ।
पदार्थ तरी बदलता । स्थिर सौख्य कैचे तयी ।। १५ ।।
म्हणोनि आत्मसमाधान । तयासी आत्मत्वची कारण ।
पदार्थ विज्ञान साधारण । अध्यात्मी इये ।। १६ ।।
**नाही ते चित्र दाविती । परी असे केवळ भिंती ।**
**प्रकाशे ते संविति । जगदाकारे ।। १३ ।। (मूळ)**



आहे म्हणता नाही होय । असा नाही असा होय ।
नाही ते जरि दृश्य होय । तरी आहे ते आहेचि ।। १ ।।
पडद्यावरील साऊली । प्रकाशे साच वाटुली ।
तरी कां ते भली । साच रुप ।। २ ।।
जे नाही ते प्रकाशमान । यास संवित्तीच कारण ।
म्हणोनि जितुके दृश्यमान । ते भासरूप ।। ३ ।।
अणूमाजी जे कोंदले । ते अनंतचि झाले ।
अनंत विश्व उमटले । ठशापरी ।। ४ ।।
अनंत विश्वे येती जाती । परी याची कोठे समाप्ती ।
धावे सतत कालगती । वाटे सत्य ।। ५ ।।
शेखी असे ते न दिसे । परी जे नसे ते आभासे ।
झाकोळला असे । आत्मनाथ ।। ६ ।।
म्हणोनि हा जगदाकार । जे का सगुणे सविकार ।
निराकार निर्विकार । निर्गुण आत्मा ।। ७ ।।
**बांधियाचिया मोडी । बांधा न होनि गुळाची गोडी ।**
**तयापरी जगपरवडी । संवित्ती जाण ।। १४ ।। (मूळ)**
प्रवाही जाली उपाधि । संविद आत्माची आधी ।
साक्षात् जो आदी । भरला गूळ गोडीपरी ।। १ ।।
गूळ सांडोनी गोडी घ्यावी । मीठ सांडूनी चवी चाखावी ।
प्रपंच सांडोनि अनुभवावी । निखळ वस्तू ।। २ ।।
ऐसेचि श्रीतुकोबा समर्थ । वर्म बोधिती अभंगात ।
जीवासी हे उचित । प्रक्रियेची ।। ३ ।।
तरी तो कृतार्थ झाला । कृतार्थता आली त्या कृतीला ।
ऐसीया बोला । जीव धावे आवडी ।। ४ ।।
चंचळ ते उपाधी । निश्चल तो आत्मा आधी ।
चंचळे चंचळ निरसोनी बुधी । साधिला आत्मा ।। ५ ।।
काट्याने काढावा काटा । फेकोनि द्यावा तो तेथेचि वाटा ।

मार्ग पुढचा चोखटा । सुधारावा ।। ६ ।।
गूळ घ्या आणि गोडी द्या । गोडी घ्या आणि गूळ द्या ।
ऐसे कोण बोले भेद्या । सांगोनि द्यावे ।। ७ ।।
ऐसे आमुचे पितृदेव मामा । कीर्तनी या बोलती वर्मा ।
तो सांगता नये महिमा । ज्यांनी भोगिला ते धन्य ।। ८ ।।
गुळावीण गोडी नाही । गोडीवीण गूळ कै पाही ।
परी अनुभवावी ऐसी पाही । तेथ गोडीच असे ।। ९ ।।
जड चैतन्य तये परी । जाणोनि घेणे कुसरी ।
अनुभवा नाही सरी । चैतन्याचिया ।। १० ।।
चैतन्याविण जड नाही । जडावीण चैतन्य नाही ।
परी त्याचे माध्यम कायी । गुरुकृपे उमगोनी ।। ११ ।।
जीवनसूत्री चैतन्य । ज्यानी अनुभवले ते धन्य ।
मग काय उरले अन्य । दावावे म्हणती श्रीज्ञानेश्वर ।। १२ ।।
**घडियचेनी आकारे । प्रकाशिजे जेवी अंबरे ।**
**तेवि विश्वस्फूर्ती स्फुरे । स्फूर्तिचि हे ।। १५ ।। (मूळ)**
शून्य लहरीचेनी आकारे । प्रकाशे जई अंबरे ।
तई विश्वस्फुर्ती उरे । स्फुरद्ररुपी ।। १ ।।
म्हणोनि वाराचि अमुचा देव । तेथ वाराचि भक्त सावेव ।
जेणे ढवळिले हे विश्व । डहुळपणे ।। २ ।।
वाराचि आमुचा मायबाप । जो कां हरवी त्रिविधताप ।
अखिल विश्वाचा संकल्प । येणेचि केला ।। ३ ।।
एकोऽहं बहुस्याम् । हे श्रुतिवचनाचे वर्म ।
ध्यानी आलिया मर्म । उकल होय विश्वाचा ।। ४ ।।
हा चैतन्यरुप वारा । दावी दृश्याचा पसारा ।
स्फुरद्रूप स्फुरणे आकारा । सहजचि आले ।। ५ ।।
**न लिंपता सुख दुःख । येणे आकारे क्षोभिनि नावेक ।**
**होय आपणिया सन्मुख । आपणचि जो ।। १६ ।। (मूळ)**



अस्तित्व प्रवाही आकारिले । तेथे विकारी सुखदुःख झाले ।
आपणया सन्मुख वाहिले । सुखदुःखातीत अलिप्त ।। १ ।।
प्रकृतीवाचोनी कैची विकृती । अधिष्ठानावाचोन कैची प्रकृती ।
सोडविता ही गुंतागुंती । निर्भ्रम चित्ती होतसे ।। २ ।।
येथ जीवन संभ्रम प्रकृती । व्यवहारी आलिया विकृती ।
अव्यय ज्याची कृती । या कर्मकांडी सुखदुःख ।। ३ ।।
मरण ते प्रकृती । जीवाचे जीवित विकृती ।
सूक्ष्मतम लहरी मरण स्थिती । प्रकर्षिल्या जीवीत ।। ४ ।।
जन्मापासून । जो होय निरसन ।
विकार उठले ऐसे जीवन । प्रकर्षात्मक ।। ५ ।।
जे ठायी हे घडले । ते ठायीच पाहिजे गेले ।
तरीच सुखदुःखातीत भले । होता येई ।। ६ ।।
जीवनाचे अनुकंपन । हे संभ्रमाचे चिन्ह ।
व्यष्टी भावे स्वार्थ परायण । ते तो प्रकर्षे चाळवले ।। ७ ।।
वारिया भिनलिया वारा । आप आपणिया भारा ।
दृश्य दिठी देखिलिया चतुरा । दृष्ट्यासी भेटी ।। ८ ।।
आपुले आपण सौख्य घोटी । ते तो दुणावे न मावे पोटी ।
सुखदुःखाची गोठी । मागुती काई ।। ९ ।।
दृष्ट्यासी भेटता । नुरे कर्माकर्माची वार्ता ।
सुखदुःखाचिये कथा । केवी उरे ।। १० ।।
**तया नांव दृश्याचे होणे । संवित्ति द्रष्टत्वा आणिजे तेणे ।**
**बिंब बिंबत्व जालेपणे । प्रतिबिंबाचेनि ।। १७ ।। (मूळ)**
प्रतिबिंबे बिंब बिंबपण । तये परी द्रष्टा दृश्यपण ।
सुप्त अस्तित्व क्षण । तेचि दृश्य ।। १ ।।
हे तो असे सापेक्ष । म्हणोनि म्हणती द्रष्टा दृश्य ।
जीवनाचे आकर्ष प्रकर्ष । अनस्यूत होती पै ।। २ ।।
अंतर्बाह्य एकचि हरी । बिंबे बिंबला एकसूत्री ।

झिलमिल झिलमिल चमकती लहरी । मोतीया परी ।। ३ ।।
जै घडे आकर्षण । तै होईजे दर्शन ।
दर्शनेचि समाधान । निश्चयेसी ।। ४ ।।
आत्माराम सर्वाघटी । देहादेही एकचि दिठी ।
सूर्यकला प्रकाशक हे गोठी । श्री ज्ञानेशांची ।। ५ ।।
प्रकृतात्मा जन्मे मरे । भासे विस्मरणाचे वारे ।
भ्रुमध्येतुनी किरण पसरे । आत्मसूर्याचा जेथही ।। ६ ।।
वाफ होता जीवनाची । साथ येई ऐक्यतेची ।
एरव्ही तरी व्यवहाराची । सोय आहे ।। ७ ।।
विस्मरणाचे वारे तरी । देही पसरे तैसेची बाहेरी।
स्थिर होवोनी ऊर्ध्वी अंतरी । जरी ते फाको लागे ।। ८ ।।
तरी कंठस्थानी ॐ कार वन्ही । चेतलिया उरे आवश्यक गुणी ।
अनावश्यक गुण झणी । आटोनि जाती ।। ९ ।।
आकाशरुप होता जीवन । ते करी उर्ध्व गमन ।
तेथ आत्मसूर्याचा किरण । जरी भिनला ।। १० ।।
तरी तो होय स्मरणरुप । निरसोनी संकल्प विकल्प ।
आप-आपणा पहाता अपाप । दिठीच मिठी ।। ११ ।।
**तेवी आपणचि आपुला पोटी । आपणय दृश्य दावित उठी ।**
**द्रष्टा दृश्य दर्शन त्रिपुटी । मांडे ते हे ।। १८ ।। (मूळ)**
आपणया ठायी आपण । द्रष्टा दृश्य दर्शन ।
त्रिपुटी योगेकरुन । मांडणी करी ।। १ ।।
आत्मत्वाचे आकुंचन । हे दृश्याचे प्रसरण ।
कां तेथे झाले स्फुरण  म्हणोनिया ।। २ ।।
स्फुरणेची उठली लहर । तेची जाले चराचर ।
परी त्याचे त्रिकुटी सार । जेथ त्रिकुटी नाही ।। ३ ।।
ओळखिले नाही त्रिकुटी । तव दृश्य देहाचे मेतकुट ।
जया पोटी कालकुट । जाणती जीव ।। ४ ।।



तेचि दृष्ट्याचे कारण । जेथ पहाले पहाणेपण ।
जेणे लपाले आपण । आत्मरुप ।। ५ ।।
एक लपाले एक विस्तारले । तेणे द्रष्टा दृश्य दर्शनी आले ।
त्रिपुटी नाम ते पावले । आपुले आपण जाणावया ।। ६ ।।
परी तेथे उपाधि भरे । हा आपणाते विसरे ।
परतल्या त्रिकुटी ओसरे । त्रिपुटी हे ।। ७ ।।
दृष्टी उपाधि जरी न भरे । तरी विश्वीही आनंद संचरे ।
स्मरण वारियाचेनि पुरे । द्वैतीही अद्वैत प्रचिती ।। ८ ।।
**सुताचिये गुंजे । आंत बाहेर नाही पुजे ।**
**तेवि तिनपणेविण जाणिजे । त्रिपुटी हे ।। १९ ।। (मूळ)**
जीवनसूत्राचिया गुंजे । आंत बाहेर एकचि जे ।
तेथ तिनी वाचोनीया जे । त्रिपुटी निरास ।। १ ।।
जया बोलती अभेद त्रिपुटी । त्रिपुटी परी भेद न दिठी ।
जेथ आपआपणा भेटी । सहजेचि ।। २ ।।
जे का असे सूत्रधारी । जे अखिल विश्वसूत्री ।
स्वसत्ते परोपरी । चाळवी विश्व ।। ३ ।।
म्हणोनि हे अवघे खेचले । खेचोनि गतीमान झाले ।
गतीमान होवोनि न कोसळे । एकमेकी ।। ४ ।।
प्रवाहाने जाले दृश्य । आणि आले व्यवहारास ।
परी तेथही अनुभव सौरस । अंतरीचा ।। ५ ।।
दृश्य प्रगट होये । अनुभव प्रगट न होये ।
जरी तो शब्द ओतिला लवलाहे । तरी तो अनुभवावीण अकळ ।। ६ ।।
**नुसधे मुख जैसे । दखिजतसे दर्पण मिसे ।**
**वायाचि देखणे ऐसे । गमो लागे ।। २० ।। (मूळ)**
दृष्टीचिया दर्पण मिसे । स्वरुप जै विलोकितसे ।
पहाणे वायाचि ऐसे । वाटो लागे ।। १ ।।
एकत्वी सुख घेता नये । अनेकत्वी प्रत्यया ये ।

म्हणोनिया अनेकत्व हे । एकत्वाकारणे ।। २ ।।
होवोनिया नरनारी । आत्मा आत्मत्वे क्रीडा करी ।
हेचि सत्य परोपरी । पहाता दिसे ।। ३ ।।
दृष्टी दर्पणी जग पहाता । भेटे आपआपणा स्वता ।
जई आनंद निरुता । सहज होय ।। ४ ।।
गुरुकृपा आत्मदृष्टी । आत्मयाचि पडे गाठी ।
नातरी हे गोठी । केवि घडे ।। ५ ।।
आपुला चेहराही आपणास । पहाता नये ही साक्ष ।
म्हणोनिया दर्पणाचे मिष । घ्यावे लागे ।। ६ ।।
पहाणे आपणासि आपण । तरी त्याचे काय प्रयोजन ।
आपणाठायी आपण । आहोच की ।। ७ ।।
**तैसे न वचता भेदा । संवित्ति गमे त्रिधा ।**
**हेचि जाणे प्रसिध्दा । उपपत्ती इया ।। २१ ।। (मूळ)**
चैतन्ये न मोडतया भेदा । संवित्ति गमली त्रिधा ।
त्रिपुटी उपपत्ती प्रसिध्दा । ऐसीच असे ।। १ ।।
इडा पिंगला सुषुम्ना । एकत्वी पहाणे आपणा ।
जरी तेथ वेगळेपणा । व्यवहार चोख ।। २ ।।
तीनी माजी एकपण । तेचि त्याचे साचपण ।
जरी ते होय तीनपण । ग्रंथ आटपला वाढता ।। ३ ।।
येणे कफ वात पित्त चावळे । तै प्राण गोळा हाती एकवेळे ।
जीव तोहि कळवळे । आत्मसुख केऊती ।। ४ ।।
परी तीन नाड्या एक होता । प्राणापान सरता ।
जाय त्रिकुटावरुता । त्रिधा गुणदोष नुरती ते ।। ५ ।।
जरी उपजता करंटा । सुषुम्नीची ये वरी वाटा ।
रामकृष्णी होता पैठा । आतुडे हरी ।। ६ ।।
**दृश्याचा जो उभारा । तेच द्रष्ट्रत्व होय संसारा ।**
**या दोहीमाजिला अंतरा । दृष्टि पंगु होय ।। २२ ।। (मूळ)**



द्रष्टत्व संसरण संसारा । जै दृश्याचा पसारा ।
शोधिता निरंतर अंतरा । आंधळा होय ।। १ ।।
जै आत्मत्व विसरे । तै दृश्य उभारे ।
तेणे उपाधि संचरे । संसरण ।। २ ।।
तया संसरणी जे चैतन्य । तेथे आले द्रष्टेपण ।
द्रष्ट्या दृश्यातील पहाणे । जे अंतर ।। ३ ।।
तया बोलती अवकाश । पहाणे देखणे शब्द त्यास ।
तेथे हा पहाणेपणास । अंधत्वे मुकला ।। ४ ।।
म्हणोनी अंतर न दिसे । तै पहाणेपणा दृश्य गिवसे ।
वस्तूवरी लहरी प्रकाशे । दृष्टी लहरी मनमिळणी ।। ५ ।।
प्रकाशलहरी दृष्टीलहरी । उपरी मनाचिया लहरी ।
एकवटलिया कुसरी । तो विषय होय ज्ञानाचा ।। ६ ।।
मग ते दृश्याचे पहाणे । परी अंतर पहाणे शून्य नेणणे ।
जरी कांत ते जहाले पहाणे । तरी अंध जगा ।। ७ ।।
मग ते तेथिचे दृश्य लोपे । दृष्टी आली पहाणे पे ।
पहाणिया पहाणे अपापे । त्या लहरी भिनल्या द्रष्ट्यासी ।। ८ ।।
मग ते घडे आत्मदर्शन । जेथे नुरे संसरण ।
जीवनगतीचे डोळे होऊन । आदळी ज्या बिंदूवरी ।। ९ ।।
तयाचा होवोनी डोळा । तो आत्मया भिनला ।
द्रष्टा दृश्य आघवा बनला । आत्माचि तो ।। १० ।।
आत्मया आत्मत्वे आत्म देखणे । ते त्रिपुटी म्हणावी कोणे ।
बोलणे तो शाब्दिक बोलणे । अभेद त्रिपुटी ।। ११ ।।
पहाणे पहाणेचि दर्शन । जे का असे ईश्वरी ज्ञान ।
तोचि अवतार सगुण । श्रीज्ञानेश्वर ।। १२ ।।
जे कां सुखाचे सागर । जे ज्ञानाचे आगर ।
जे दयेचे पाझर । आत्मगुणे ।। १३ ।।

**दृश्य जेधवा नाही । तेधवा दृष्टी घेऊनी असे काई ।**
**आणि दृश्येवीण कांही । द्रष्टत्व असे ? ।। २३ ।। (मूळ)**
द्रष्टा कैचा दृश्याविण । दृष्टीचे काय पहाणेपण ।
पूर्ण दृष्टी म्हणोन । एक द्रष्टा ।। १ ।।
लहरीने उठे दृश्य । तो मर्यादा आली दृश्यास ।
मर्यादा आली दृष्टीस । पूर्ण दृष्टीच्या अभावे ।। २ ।।
पूर्ण दृष्टी पूर्ण लहरी । अपूर्ण दृष्टी अपूर्ण लहरी ।
परी त्याही उठवी वर्तुळाकारी । पूर्णता काही दावावया ।। ३ ।।
पूर्णातोनि अपूर्णांत येणे । अपूर्णांतुनि पूर्णते जाणे ।
या नांव दृश्य द्रष्टत्व फावणे । दृष्टी मिसे ।। ४ ।।
**म्हणोनि दृश्याचे जालेपणे । दृष्टि द्रष्टुत्व होणे ।**
**पुढती ते गेलिया जाणे । तैसेचि दोन्ही ।। २४ ।। (मूळ)**
चैतन्ये लहरीचेनि शून्ये । आत्मदृष्टी अभावपणे ।
दृष्टी द्रष्टत्व होणे । तया अभावे एकचि ।। १ ।।
एकापासूनी जाले दोन । दोनीपासुनी झाले तीन ।
तीनीमाजी एकपण । असतचि असे ।। २ ।।
हेचि या श्रीचांगदेव पासष्टी । श्रीज्ञानराज सांगती गोठी ।
हजार वळसे एक गाठी । तयापरी ।। ३ ।।
द्रष्टा जरी उपाधिभूत । तरी द्रष्टुत्वासी अर्थ ।
दृश्यही गमे सार्थ । विचार पाहता ।। ४ ।।
परी तो द्रष्टा सांडी देह दृश्यता । तरी ते असोनि काय अर्था ।
जेथ त्रिपुटीची वार्ता । असोनि काई ।। ५ ।।
दृष्टी द्रष्टुत्व तैसेचि राहिले । दृष्टा दृष्ट यासीच मिळे ।
ब्रह्म ब्रह्ममाजी खेळे । अभेद ते ।। ६ ।।
मग काय दृश्याचे भान । दृष्टी दृष्टुत्वाचे किं प्रयोजन ।
ते  असोन आणि नसोन । सारखेचि ।। ७ ।।
उपाधि असोनि वेगळे । वा उपाधिचिया मेळे ।



आत्मसाक्षित्व जरी आले । तरी ऐक्य त्रिपुटीचे ।। ८ ।।
**एवं एकची झाली ती होती । तिन्ही गेलिया एकचि व्यक्ति ।**
**तरी तिन्ही भ्रांती । एकपण साच ।। २५ ।। (मूळ)**
एकचि झाले तीन । तीने गेलिया एकपण ।
तीन ते भ्रमण । एक साच ।। १ ।।
ज्ञेय ज्ञाता ज्ञान । ध्येय ध्याता ध्यान ।
यास त्रिपुटी म्हणती सज्ञान । परी ते समरसतेवीण घडेना ।। २ ।।
या तीनीची समरसता । या नांव ऐक्यता ।
तेथ साचची येई हाता । एरव्ही भ्रांती ।। ३ ।।
इडा पिंगला सुषुम्नाकार । तरीच घडे हे साचार ।
ना तरी विचार । करुनि काई ।। ४ ।।
तीन देह तीन अवस्था । तीन गुण दोष तत्वता ।
तीन लोक स्वभावता । तीन नाड्या ।। ५ ।।
परी याची चाले फिरती । तेणे सदा उठे भ्रांती ।
येथ जरी स्थिरता चित्ती । तरी साच कळे ।। ६ ।।
एकावाचोनि हे काही न टिके । परी एकचि झाले पारखे ।
जीवनाचिया संभ्रमी निके । हरपले साच ।। ७ ।।
एकासी होता । हे आघवेचि बुडे अवचिता ।
तेथे नुरेचि मागुति चिंता । चिंतनावीण ।। ८ ।।
**दर्पणाच्या आधी शेखी । मुख असताचि असे मुखी ।**
**माजी दर्पण अवलोकी । आन कांही होय ? ।। २६ ।। (मूळ)**
दृष्टी आरंभू शेवटी । एक स्वरुपाचि गोठी ।
अलक्ष्य परी लक्ष्य दिठी । जैसे तैसे ।। १ ।।
दर्पण हाती असता नसता । मुख हे असताचि तत्वता ।
आधी मुखदर्पण मागुता । हे सत्य की नव्हे ।। २ ।।
डोके धड तो पगडी । आपुलियावरी आयुष्याची कोडी ।
सर्व प्रचिती रोकडी । आपुल्याच ठायी ।। ३ ।।

नाही तरी काय आहे । जै आपणचि नोहे ।
आपणाकरिता सर्व हे । तयाकरिता कां आपण ? ।। ४ ।।
मग आपुल्यावाचोनि येथ काय । कांही सोय गैरसोय ।
आत्म्याचिसाठी प्रमेय । न प्रमेये आत्मा ।। ५ ।।
मग यांसी किती महत्व द्यावे । हे आपुले आपणचि ठरवावे ।
मालासी मोल नाही म्हणोनि  विकावे । कां गिऱ्हाईक ।। ६ ।।
मालाची होय किंमत । परी गिऱ्हाईकाचि न करता येत ।
हेचि ओळखावे महत्त्व । वा बाजारी दृश्याचे ।। ७ ।।
आपण तो आपुले ठायी । पहाणे कांही आहे नाही ।
आपणासाठी हे सोई । स्वानंदासी ।। ८ ।।
दर्पणी आपणा आपण पाहिले । तरी तेथ आन काय झाले ।
आत्मसमाधानावाचोनि वहिले । एकसरा ।। ९ ।।
आत्मसुखासाठी । चराचर हे त्रिपुटी ।
दृश्य देहाची मात मोठी । निराळी काई ।। १० ।।
**पुढे देखिजे तेणे बगे । देखते ऐसे गमो लागे ।**
**परी दृष्टीते वाऊगे । झकवित असे ।। २७ ।। (मूळ)**
दृष्टीचेनी योगे । देखत ऐसे गमो लागे ।
परी दृष्टीही ऊगे । ठकवीतसे ।। १ ।।
लहरी लहरीचेनि मेळे । अस्थिर ते दृश्य ऊसळे ।
परी सातत्याने झळाले । म्हणोनि पहाणे घडे ।। २ ।।
उपाधीचेनी समरसे । चैतन्य न समरसे ।
आत्मसुख सौरसे । तरी होईल कायी ।। ३ ।।
म्हणोनि दृष्टी ठकवी आपणा । नेणोनि अंतरनिष्ठाच्या खुणा ।
काय दडले आमुच्या नयना । तेची न कळे ।। ४ ।।
उपाधीचा ठसा । येई दृष्टीवरी प्रकाशा ।
तेथेचि जीवा पडे फासा । या उपाधीचा ।। ५ ।।
म्हणोनी बुडण्याची वेळ । आली नसताही जळ ।



परी सद्‌गुरूराज दयाळ । त्यानी स्थिररदृष्टी जै दाविले ।। ६ ।।
तेचि पुनःपुन्हा पाहो । तै आपण आपणाठायी आहो ।
जेथ अहंकाराचा नाहो । आनंदरुप ।। ७ ।।
**म्हणोनिर्ये दृश्याचिर्ये वेळे । दृश्य द्रष्टुत्वा वेगळे ।**
**वस्तुमात्र निहाळे । आपणासी ।। २८ ।। (मूळ)**
दृश्य दृष्टी समरसे । आपणचि आपणया पहातसे ।
ज्याचे हे बनले असे । तेचि लक्ष्य ।। १ ।।
स्फुरद्रुपी जे स्फुरले । तेचि लक्ष्य त्याचे झाले ।
दृष्टी जये वेळे । भिडे ते दृश्य ।। २ ।।
तेथे दृश्य द्रष्टुत्वा वेगळे । जे कां सदा संचले ।
स्फुरद्रुप उदेले । सर्वा घटी ।। ३ ।।
वायूपणे ये संचरले । वायूचिया डोळे ।
वायूने जे दृश्य जाले । तेथ न्याहाळे आपणासी ।। ४ ।।
**वाद्य जातेविण ध्वनी । काष्ट जातेवीण वन्ही ।**
**तैसे विशेष ग्रासुनी । स्वयेचि असे ।। २९ ।। (मूळ)**
आत्म वायू वाद्येविण ध्वनी । आत्मप्रकाश काष्टेवीण वन्ही ।
म्हणोनि त्रिपुटी नासोनि । आत्माचि असे ।। १ ।।
जे कां असे संविद । जेथ होय आत्मबोध ।
जये ठायी आत्मशोध । इये देही ।। २ ।।
नादप्रकाश । जीवनरस ।
परमाणू मिनले विशेष । तया जीवनी ।। ३ ।।
ते उपाधिभूत जीवन । भाता चाले प्राणापान ।
तेथ अनुहताचे श्रवण । जे प्रकाशमय ।। ४ ।।
प्राणवायू नासिके वहात । ते स्थिती ज्यावरी स्थित ।
तो प्राण कोण मार्गी येत । जो स्वयंनाद दुमदुमे ।। ५ ।।
जयाचे माध्यम आकाश । जई होत नाद घोष ।
आपेआप प्रकाश । जीवनाचा ।। ६ ।।

ते प्राणगती स्पंदनातुनी । धावे भ्रूमध्यस्थानी ।
जो प्राण अंगुष्ठप्रमाणी । सहस्त्रारी ।। ७ ।।
सहस्त्रार तो गर्जे अनुहाते । चैतन्यलहरी उठती जेथे ।
प्रकाश झळाळे झोते । अखंडत्वे घटामाजी ।। ८ ।।
कानी घालोनिया बोटे । नाद ऐकावे अचाट ।
नेत्र मुद्रा चेपुनी उत्कट । आत्मप्रकाश जाणावा ।। ९ ।।
हेचि स्वयंरुप विशेष । चित्तासी सहज दे उल्हास ।
जरि का जाय अशेष । बहिर्वृत्ती ।। १० ।।
**जे म्हणता नये काही । जाणो नये कैसेही ।**
**असतचि असे पाही । असणे जया ।। ३० ।। (मूळ)**
साहित्य साधने जाणता नये । जया काहीच म्हणता नये ।
अस्तित्वेचि असणे इये । जया असे ।। १ ।।
तो प्रयोगी म्हणोनी प्रयोग नसे । तो संविद म्हणुनि जाणता नये ।
तयाचे सर्व जाणता ये । मग तया कैसेनि जाणावे ।। २ ।।
ज्ञानाचा तो विषय नोव्हे । तयामुळे दृष्टी ज्ञान होये ।
दृश्य हे ज्ञानाचा विषय होये । दृश्य ते दृश्यामुळे ।। ३ ।।
द्रष्टा दृश्यत्वे द्रष्टुत्व । तेथ ज्ञानेचि जाणीव नेणीव ।
तरी तया जाणणेचा संभव । असे केवि ।। ४ ।।
ज्ञानी आत्मा कां आत्मी ज्ञान । तेथ त्याची वर्मखूण ।
ज्ञान हा आत्म्याचा विषयी जाण । तरी तो काय जाणी तया ।। ५ ।।
म्हणोनि ते अकृत्रिम । स्वसंवेद्य निरूपम ।
जेथ रूप आणि नाम । एकचि जाले ।। ६ ।।
म्हणोनि ते असतची असे । तर्का जाणीवे न गवसे ।
परी तयामुळे हे सर्व गवसे । अखिल विश्वी ।। ७ ।।
**आपुलिया बुबुळा । दृष्टि असोनि अखम डोळा ।**
**तैसा आत्मज्ञानी दुबळा । ज्ञानरुप जो ।। ३१ ।। (मूळ)**
आपुलिया बुबुळा । जेवि न देखे डोळा ।



आत्मज्ञानी बुबुळिया दुबळा । आपआपणा पहावया ।। १ ।।
आत्मदृष्टी आत्मपणे । आत्मत्वे आत्मया पहाणे ।
आत्मसुखी सुखासने । सहज ते ।। २ ।।
जयामुळे हा डोळा पहातो । जया काय हा डोळा पहातो ।
वर्म हे जो ओळखितो । तयासी कळे ।। ३ ।।
पहाता हा मासाचा डोळा । तो काय पाहील ब्रह्माचा गोळा ।
जो पाहिन म्हणे तो आंधळा । समर्थ म्हणती ।। ४ ।।
देखणा जो दृष्टीचा । तो दृष्टीसी होय गोचर कैचा ।
तरी तो अगोचरची साचा । गुरूकृपे प्रत्यया ये ।। ५ ।।
डोळे चंद्रसूर्य गती । जीवनाचे उन्मीलती ।
तरीच हे अनुभुती । आत्मतेचि ।। ६ ।।
जरी होय दृष्टीचा उलटा मारा । तरीच हे साधे चतुरा ।
परमार्थी तो पुरा । सत्यसाच ।। ७ ।।
पहाणे परतता । सहजेचि ये आत्मता ।
तेथ जे निवांतता । ते समाधान ।। ८ ।।
**जे जाणणेचि किं ठायी । नेणणे कीर नाही ।**
**परी जाणणे म्हणोनियाही । जाणणे कैचे ।। ३२ ।। (मूळ)**
जयाचेनि जाणीव । जयाचेनि नेणीव ।
तो आत्मा स्वयमेव । दोनी पैल ।। १ ।।
जेथ जाणीव नेणीव नाही । तेथ उरले ते काई ।
जे स्वयंब्रह्म सर्वही । स्वरुपाकार ।। २ ।।
पहाता सुषुप्ती । काय जाणीव नेणीव स्थिती ।
तुरीये लाधली उत्मनी निगुती । तरी काई उरे ।। ३ ।।
जेथ शब्द होय कुंठीत । आत्मप्रत्यय लाभत ।
ब्रह्मानंदी डुलत । आपण पे ।। ४ ।।
**यालागी मौनेंचि बोलिजे । काही न होनी सर्व होईजे ।**
**नव्हता लाहीजे । काहीच नाही ।। ३३ ।। (मूळ)**

मौन ब्रह्माचे बोलणे । कांही न होनी सर्व होणे ।
काही न होता लाभणे । आत्मस्थिती ।। १ ।।
मौन हे गुरुंचे व्याख्यान । शिष्यांचे संदेह छिन्नभिन्न ।
हे काव्य की मनरंजन । कां सत्य साच ।। २ ।।
जेणे हृदग्रंथीचे भेदन । संशयाचे उच्चाटन ।
नुरे कर्माचे बंधन । दृष्टी उरफाटी होतसे ।। ३ ।।
पुऱ्या पदार्थाविषयी बोलणे । हे तो पहातो अपुरे होणे ।
पूर्णतेसी आणि ऊणे । म्हणोनि मौनचि उत्तम ।। ४ ।।
मन वाचातीत जे पूर्ण । तेथ त्यास कां द्यावा शीण ।
मनवाचातीत होऊन । का न सेवावे ।। ५ ।।
जेथ चैतन्य वाचेचे स्फुरण । तेथ सहजचि घडे मौन ।
अनुहताचे श्रवण । होवोचि लागे ।। ६ ।।
पुरी तळता जंव अपुरी । तवं तवं ती चुर चुर करी ।
परी ती तळलिया पुरी । आवाज नाही ।। ७ ।।
आत्मनिनाद जो पुरा । तेथ काय बोल राहील अपुरा ।
येथ जो जाहला पूरा । तोचि पुरा परमार्थी ।। ८ ।।
येथ जे नुरोनि ठेले । ते नसोन असती वहिले ।
कां ते विश्वी असोन नव्हते भले । म्हणोनिया ।। ९ ।।
जेथ सर्वाचा निरास । तरीच उरे हे आकाश ।
तैसे काही न होनी आपणांस । भेटी आहे ।। १० ।।
तया नाम आत्मस्थिती । श्री ज्ञानराज हे बोधिती ।
संतसज्जनी प्रचिती । घेतली ज्याची ।। ११ ।।
**नाना बोधाचिया सोयरिके । सांचपण जेणे एके ।**
**नाना कल्लोळ भाळिके । पाणी जेवी ।। ३४ ।। (मूळ)**
साचपण एकाचिया । सोयरिक बोधाचिया ।
कल्लोळ माळा पाणिया । पाणीच जेवी ।। १ ।।
जसा आत्मा तसा बोध । बोध काय हो शब्द ।



कृतीरूप जे सिध्द । चित्रशुद्धीचेनी ।। २ ।।
चित्त शुध्द जरी नाही । तरी बोध करील काई ।
पाठांतर ते व्यर्थ होई । अंतरता धर्म ।। ३ ।।
पूर्णकृपे सद्‌गुरू बोलला । नाममंत्र कर्णी फुंकिला ।
श्रीसद्‌गुरू हनुमंत घोलती बोला । हे बोधस्थिती ।। ४ ।।
नळी फुंकली सोनारे । इकडून तिकडे गेले वारे ।
धारणा काय होय तेथ रे । तुकोबा सांगती कळवळुनी ।। ५ ।।
फुंकर फुंकिता । घुमे नाद अवचिता ।
चैन न पडे सर्वथा । तयावाचुनि ।। ६ ।।
घुं घुं घुं घुं डेरे घुमती । बोधस्थिती आत्मस्थिती ।
बोध तत्वरूप निगुती । म्हणोनिया ।। ७ ।।
परा पश्यंती मध्यमा । वैखरीची होता सीमा ।
जे वाचा आगम निगमा । अकळ होय ।। ८ ।।
जो केवळ स्वयंनाद । परी जो न होय शब्द ।
ऐसिया स्थिती जो बोध । तो त्रिपुटी पैल ।। ९ ।।
आपुलिया जीवनी घुमारा । रूण झुण साक्ष पैरा ।
वारिया मिनलिया वारा । दृष्टी खिळे तेथची ।। १० ।।
तो नुरे देहभान । त्रिपुटीचे होय निरसन ।
हीच एक वर्मखूण । ठायी पडे ।। ११ ।।
म्हणोनी नाम प्रज्ञाची कारण । नामे गुरू शिष्यपण ।
आमुचे मामा बोधिती वचन । कीर्तनात ।। १२ ।।
ज्या बोधाने हा साधिला सांधा । जेणे जीव येईल बोधा ।
तेथ काय देहबाधा । गुरूशिष्या ।। १३ ।।
गुरूशिष्य देहावरी नसती । तेथ पातळी एकचित्ती ।
बोधधारणा ठसे निगुती । व्यष्टीभाव उरेचिना ।। १४ ।।
कल्लोळ माळा पाणिया । तेथ काय त्या वाचोनिया ।
मग काही म्हणावे यया । एकचि गांठ ।। १५ ।।

**जे देखिजतेविण । एकले देखतेपण ।**
**हे असो आपणिया आपण । आपणचि जे ।। ३५ ।। (मूळ)**
चैतन्य ते लहरी पूर्ण । तेथ स्वयंसिध्द पहाणेपण ।
सहज स्वयंप्रकाशमान । अलक्ष्य लक्ष्य ।। १ ।।
कोण्याही अवस्थेप्रती । असे आत्मजागृती ।
हाक देता वृत्ती । भावे उठती ओ म्हणोनिया ।। २ ।।
एकाच नावाच्या व्यक्ती । जरी का असल्या सुषुप्ती ।
जया नावे हाक देती । तोचि देत हुंकार ।। ३ ।।
कळो अथवा न कळो मती । हे तरी दिसे जगती ।
परी जरी का घडे बोधस्थिती । ते आत्मस्थिती उघड ।। ४ ।।
मग तेथे पडदाचि नाही । निजतेज उमाळा येई ।
स्वस्वरुपीच डोळा राही । येर सर्व गौणची ।। ५ ।।
**जे कोणाचे नव्हतेनि असणे । जे कोणाचे नव्हता दिसणे ।**
**कोणाचे नव्हता भोगणे । केवळ जो ।। ३६ ।। (मूळ)**
कोणी नाही तरी जे आहे । आहे नाही हे होय जिये ।
दिसणे भोगणे होय । स्वसंवेद्य ।। १ ।।
असणे दिसणे भोगणे । काय घडे चैतन्याविणे ।
दृश्यातील चैतन्य उणे । तरी उरेल काई ।। २ ।।
सत्तावीसा नऊ गेले । तरी खजिन्यांत काय आले ।
नाकी नऊ आले । तरी आटपला ग्रंथ ।। ३ ।।
दृश्य देही इंद्रिय सवडी । आत्मता लपोनि राहिली रोकडी ।
तयाते नेणोनि व्यवहारती वेडी । हेचि माया ।। ४ ।।
मा म्हणजे काही नाही । यातोनि जे जाणे होई ।
तेचि माया म्हणती नवलाई । आमुचे मामा ।। ५ ।।
**तया पुत्र तूं वटेश्वराचा । रवा जैसा कापुराचा ।**
**चांगया मज तुज आपण याचा । बोल ऐके ।। ३७ ।। (मूळ)**
तूं तो पुत्र वटेश्वराचा । रवा जैसा चत्वारदेहाचा ।



जो विलास वायूचा । आत्मतत्वी ।। १ ।।
वटेश्वराचा जो अस्तिभाव । तोचि तुज अंगी सावे ।
पुत्र आत्माचि हा भाव । श्रुतिवचनाचा ।। २ ।।
चार देहाचा रवा । पंच तत्वी जाला आघवा ।
नामरुपे वायूचि बरवा । नटलासे ।। ३ ।।
हा देह कर्पुरभाव जै जाय । तै तेथ अज्ञानकाजळी न राहे ।
ठायीच समाप्ती होय । त्रिपुटीची ।। ४ ।।
चांगदेव मला आणि तुला । हा आत्मत्वाचा बोल उमटला ।
ऐकोनिया तो वहिला । सुखीया होसी ।। ५ ।।
उपाधिभूत जे जीवन । तेथ चत्वारदेहाचे निरसन ।
जेथे घडे सौम्य ज्वलन । जीवनाचे ।। ६ ।।
उपाधिचे एकत्रिकरण । तेचि होय पृथःकरण ।
जरी चित्ताचे केंद्रीकरण । घडे जीवनी ।। ७ ।।
पंचतत्वाचे पृथःकरण । ते चत्वार देहाचे जीवनी निरसन ।
शुध्द आकाशरुपजीवन । उरे मागुती ।। ८ ।।
ते उर्ध्वगामी होता । प्राणगती मिनली तत्वता ।
प्राणशक्तीची सरिता । तेथचि मिळे ।। ९ ।।
जेथ प्राणापान आटले । तेथ मनोधर्म हे निमाले ।
मुखेविण चैतन्य बोले । संघातेवीण ।। १० ।।
तयाचे श्रवण । मनन आणि निदिध्यासन ।
हेचि साक्षात्कार खूण । संतजनी ।। ११ ।।
**ज्ञानदेव म्हणे । तुज माझा बोल ऐकणे ।**
**ते तळहाता तळी मिठी देणे । जया परी ।। ३८ ।। (मूळ)**
श्रीज्ञानेश्वर बोलती । अमृतवचने । तुज माझा चिद्‌बोल ऐकणे ।
श्रवणजिव्हा वेगळेपण । दिठीच मिठी ।। १ ।।
येथ नाद तो कान । जिव्हा ते स्फुरण ।
अध्यात्म डोळा परीपूर्ण । गगनाचा ।। २ ।।

डोळा कान नाक तोंड । जरी बंद होती उघड ।
आत्मानुभुती प्रचंड । साधकासी ।। ३ ।।
श्रीगुरुलिंगजंगम वदती । ज्याची घेतली संतांनी प्रचिती ।
नादबिंदुकला ज्योती । निरंतर ।। ४ ।।
दिवा वाऱ्या घाली खेव । हा तो परमार्थी अनुभव ।
देखता दृश्य दिठी हे लाघव । मिठी जाली जीव शिवा ।। ५ ।।
येथ नासिक ते सर्वाचे नाक । त्र्यंबकेश्वरी वाहे त्र्यंबक ।
चिद्‌बोल श्रवण सम्यक । अनुहताचा ।। ६ ।।
**बोलेचि बोल ऐकिजे । स्वादेचि स्वाद चाखिजे ।**
**का उजिवडे देखिजे । उजिडा जेवी ।। ३९ ।। (मूळ)**
चैतन्य बोले आघातेवीण । जेथ संवादू शब्देवीण ।
अनुवादू दुजेपण । नसता स्वयं उजेडे ।। १ ।।
देही जरी जीवनाचा बोल । परी तो कानी न येल ।
म्हणोनि जरी कोलाहल । मनीजे जाय ।। २ ।।
निवांत ते बोलेची बोल । ऐकूं येई हे श्रवण खोल ।
नुसता बोलचि उरेल । नुरले काही ।। ३ ।।
नळकांड्यातून वारे । वाहे नुसते ते अवसरे ।
ते तेणेचि ऐकिजे सुरे । स्फूरद्रूपी ।। ४ ।।
शब्द अवाङमय । मन वाचातीत होय ।
लौकिकी शब्द म्हणता नये । परी ध्वनीरुप ।। ५ ।।
तो मी तो मी ऐसा तो शब्द । हा शब्दावीण संवाद ।
तो शब्द नव्हे परिसाद । ऐसा असे ।। ६ ।।
श्रोतया वक्त्याचे कारण । ऐसे नव्हेचि कारण ।
सापेक्ष नव्हेचि म्हणोन । आत्मानुवादू ।। ७ ।।
ऐसा दुजेविण अनुवाद । जेथे होय ब्रह्मानंद ।
निंबरगीश्वराचा निर्विषयो चिदानंद । स्वयंतेज उजेडे ।। ८ ।।
आयुष्याची वाटचाली । अंधार नसे पाऊला पाऊली ।



उजेडे उजेडा घातली । मिठीच जेथे ।। ९ ।।
**सोनीया वरकल सोने जैसा । कां मुख मुखा हो आरिसा ।**
**मज तुज संवाद तैसा । चक्रपाणी ।। ४० ।। (मूळ)**
सुवर्ण पारख सुवर्णाने । मुखावलोकन मुख दर्पणे ।
आत्म बोलणे ऐकणे । आत्माठायी ।। १ ।।
शब्दाची पारख शब्दाने । मानवाची मानवाने ।
विचार विचारेचि जाणणे । ऐसेच हे ।। २ ।।
जातीस ओळखे जाती । ऐसीच असे हे रिता ।
जड जडासी ओढे निश्चीती । चैतन्य खेची चैतन्या ।। ३ ।।
आपणा कोणी भेटता आपणा । जेवी होय आनंद मना ।
परी संवाद मनोमनी जाणा । चांगदेवा ।। ४ ।।
चक्रा चक्रातुनी । ज्याची अनुभूती जीवनी ।
तो तुम्ही तैसाचि झणी । गमसी मज ।। ५ ।।
ऐसे म्हणती श्रीज्ञानेश्वर । ही भाषाची साक्षात्कार ।
जवळीक जडे चमत्कार । घडेची लागे ।। ६ ।।
**गोडीये आपुली गोडी । घेता काय न माये तोंडी ।**
**आम्हां परस्परे आवडी । तो पाडु असे ।। ४१ ।। (मूळ)**
गोडीने गोडी घ्यावी । तरी परी हे आवड जीवी ।
आकर्षणे आधवी । चैतन्याची ।। १ ।।
परस्परा एकाचे आवड । म्हणोनि जाहली सवड ।
झाकिली कवाडे तो उघड । आत्मानंद ।। २ ।।
परी जे काणी लबाड । ते करती कुभांड ।
त्याची ऐकावी बडबड । का तो विषयोचि नव्हे ।। ३ ।।
तुम्हा आम्हा एकचि कारण । म्हणोनि हे प्रयोजन ।
ना तरी हे कोण । विचारा आणि ।। ४ ।।
**सखया तुझेनी उद्देशे । भेटावया जीव उल्हासे ।**
**कीं सिध्दभेटी विसकुसे । ऐशिया बिहे ।। ४२ ।। (मूळ)**

भेटी सिध्द तुझी माझी । नामरुपात्त्मक निजतेजी ।
चैतन्य भेदे सहजी । दोन जरी उपाधी ते ।। १ ।।
परी उपाधीने भेटो जाता । सिध्दभेटीये विस्कळता ।
सिध्दभेटी होता । उपाधी नुरे ।। २ ।।
म्हणोनि तुझेनी उद्देशे । उल्हासे वाटे भेटावे असे ।
निरुपाधी जै गवसे । तरी प्रश्न नाही ।। ३ ।।
परी का भेटली उपाधी । मला तुला होईल उपाधी ।
उपाधीस लागला उपाधी । भेटी दुरावे ।। ४ ।।
म्हणोनि वाटे भय । आता करावे ते काय ।
परी काही सोय । एथही आहे ।। ५ ।।
नासे कल्पना उपाधी । तीच साधूसी समाधी ।
निर्विकल्प भेटीमधी । निर्विकल्प आनंद ।। ६ ।।
म्हणोनि निर्विकल्पे भेटू । सविकल्पे न दाटू ।
देह बुध्दीचा घोटू । करोनिया ।। ७ ।।
निजाचे तेज की तेजाचे निज । ऐसे आहे येथिचे गुज ।
येथे भेटी तुजमज । सिध्दचि आहे ।। ८ ।।
चित्ताचे आसन न सोडता । भेटी आहे अखंडता ।
हा आनंद तत्वता । अव्दयत्वे निर्भय ।। ९ ।।
**घेवो पाहे तुझे दर्शन । तव रुपा येवो पाहे मन ।**
**तेथे दर्शना होये अवजतन । ऐसे गमो लागे ।। ४३ ।। (मूळ)**
दृष्टीव्दारे तुजशी । पहाता भेटी माझी मजसी ।
अलक्ष्य परी उपाधी लक्ष्यी । तरी ते वाया ।। १ ।।
उपाधिवरी लक्ष्य निरवळ । म्हणोनि जगी या गोंधळ ।
निरुपाधी ते विमल । आत्मस्थिती ।। २ ।।
चौकटीमुळे चित्र उठले । दुःखामुळे सुखा महत्व आले ।
वियोगेचि जाले । योगाचे कौतुक ।। ३ ।।
नामरुपाचा मेळ । तेथ उरेना गोंधळ ।



जरी त्याचा गैरमेळ । तरी जंजाळ वैषम्याचे ।। ४ ।।
**काहीं करी बोले कल्पी । कां, न करी न बोले कल्पी ।**
**ये दोनी तुझ्या स्वरुपी । न घेती उमसू ।। ४४ ।। (मूळ)**
करणे बोलणे कल्पणे । न करणे न बोलणे कल्पणे ।
आत्मठायी आत्मपणे । कोठोनि व्हावे ।। १ ।।
जेथ काही घडणे न घडणे । हे तो सहजेचि होणे ।
निःसंदेह आत्मपणे । कौतुकची ।। २ ।।
जे घडे कौतुकाचे । आत्मकाजी आयुष्य वेचे ।
तेथे बाजारी प्रवासी मालाचे । काय मोल ।। ३ ।।
कर्मा कर्माचा नुरे आग्रह । न आसक्ती न निग्रह ।
प्रतिग्रह नाही विग्रह । जेथ दिवस रातीही न कळे ।। ४ ।।
न कळे दिवसराती । अखंड लागलीसे ज्योती ।
तया अनुसरोनी घडती । सर्व चेष्टा ।। ५ ।।
तो चेष्टवी ते चेष्टे । तो वाटवी ते वाटे ।
तो भेटवी ते भेटे । सर्व जिणे तया हाती ।। ६ ।।
तयाविण हे जिणे । जे आत्मरुपी लाजिरवाणे ।
करणे का न करणे । परमात्मया हाती ।। ७ ।।
**चांगया तुझेनि नांवे । करणे न करणे न व्हावे ।**
**हे काय म्हणो परी न धरवे । मीपण हे ।। ४५ ।। (मूळ)**
चांगया तंव नांवे । करणे न करणे न संभवे ।
चैतन्य नुरेचि अस्तित्वे । निरहंकारी ।। १ ।।
नाकासी सूत लागलिया । करणे न करणे जाय विलया ।
तेथ परी अस्तित्व यया । सहजची असे ।। २ ।।
तो गेला म्हणेल कोण । तरी तो गुन्हा ठरेचि पूर्ण ।
हे निसर्ग दावी आपणा प्रमाण । परी येथे तो योगस्थिती ।। ३ ।।
केवलेचि जे अस्तित्व । आणि शरीरी म्हणोनि सावेव ।
बहीर आकर्षण स्वभाव । नसेचि परी ।। ४ ।।

कां हा अस्तित्वभावेसी मग्न । जेथ नुठीच मीपण ।
मग उगाच बोलोन । उपेगा नये ।। ५ ।।
ऐसे हे अस्तिचैतन्य नाम । अस्तित्व हेचि ज्याचे वर्म ।
जेथ नुरेचि संभ्रम । देहेंद्रियाचा ।। ६ ।।
हे तो उगमाचे पाणी । जेथ पूर केवि आणी ।
हे टिके पूर ओसरे जीवनी । दृश्यादिकीं ।। ७ ।।
**लवण पाणीयाचा थावो । माजी रिघोनि गेले पाहो ।**
**तंव तेचि नाहीमा काय घेवो । माप जळा ।। ४६ ।। (मूळ)**
पाणीया माजी मिठ गेले । ठाव घेता तेचि झाले ।
ठाव काय बोले उगले । तेचि जला ।। १ ।।
आम्हां परी लागे मीठ । येथ कोण आम्ही हे स्पष्ट ।
संकल्प विकल्प अचाट । म्हणोनिया ।। २ ।।
संकल्प विकल्प ज्यांचे गेले । त्यांचे मीठचि सरले ।
मीठ घालोनि कोणी ठेविले । देवापुढे ताट हे ।। ३ ।।
ऐसियासी देव स्पर्श । तया हाचि वाटे गोड रस ।
शुध्द भाव जै सुरस । वाढोचि लागे ।। ४ ।।
**तैसे तुज आत्मयाते पाही । देखो गेलिया मीचि नाही ।**
**तेथे तू कैचा काई । कल्पावया जोगा ।। ४७ ।। (मूळ)**
तंव आत्म्याते पाहो जाता । चांगदेव मीच नाही तत्वता ।
मीच ना तू कल्पता । येईल काई ।। १ ।।
मी तू हा विचार । कळे विवेक साचार ।
यावरी सर्व व्यवहार । परी अर्थ नये यासीच ।। २ ।।
प्रत्येक व्यष्टी भावे । स्वता मी म्हणे स्वभावे ।
आणि ते तू म्हणती आघवे । मनी दुजे आणोनी ।। ३ ।।
अ म्हणे बला तूं । आणि ब म्हणे अला तूं ।
तूं तूं काय हा हेतू । पाहण्याजोगा ।। ४ ।।
याचे गणित मांडता । छेद जो उरेल स्वतः ।



जे ठायीच एकता । आधार काय व्यवहार ।। ५ ।।
आधारांचे जै नाही । इमारत उठेल काई ।
तारांबळ सर्वांचीही । म्हणोनि कां लपले मी तू ।। ६ ।।
हे गृहीत धरोनी मी तूं । व्यवहार चालती अनंतू ।
परी ओळखलिया विश्वनाथू । परमार्थाविण न उरेची ।। ७ ।।
व्यवहार उडाळा । तो परमार्थ झाला ।
आणि पूर्णतेसी आला । पूर्ण पणे ।। ८ ।।
व्यष्टी गेली तो समष्टी । ना तरी वृथाची कष्टी ।
हिशेबाची नित्याची तुटी । गाठी नाही समाधान ।। ९ ।।
तू आणि मी एकची । ऐसी भाषा श्रीज्ञानेशमाऊलीची ।
जे परमावधी सुखाची । योगारूढ जालिया ।। १० ।।
ऐसाची हा परम योग । नातरी सर्वची वियोग ।
परी या पाहीजे म्हणती योगायोगा । तरी जमेल कैसे ।। ११ ।।
जो सर्वदाची योग । तेथे काय योगायोग ।
हे आमुचि भाषाचि सांग । प्रारब्ध भोगाची ।। १२ ।।
कोठे जासी भोगा । माझ्यापुढे उभाचि गा ।
याचे वर्म तरी सांगा । कोणीतरी ।। १३ ।।
हे सरे तरी हे उरे । समाधान खरे पुरे ।
मनमुरोनी सेविता खरे । विवंचना ।। १४ ।।
**जो जागोनि नीद देखे । तो देखणेपणा जेवी मुके ।**
**तेवि तू ते देखोनि मी ठाके । काही न होनी ।। ४८ ।। (मूळ)**
जो जागृती ये निद्रा देखे । तो देखता देखणेपणासी मुके ।
अवस्थांतरे देह दृश्य चुके । तू ते पहाता तेवीच ।। १ ।।
तू ते पाहता । मीच चेईता ।
बहर ये झंझावाता । सहस्रदळी ।। २ ।।
तूं ते पाहता मी स्फुरे । तुझे रूप नकळे साचोकारे ।
तूं ते न पाहता मी पण नुरे । मगचि वळखेरे तुझे रूप ।। ३ ।।

तूं ते न पाहता पाहो गेलो । माझा मीच विसरलो ।
तेथचि खरेखुरें ओळखिलो । आणि भेटलो एकात्मे ।। ४ ।।
**अंधाराचे ठायी । सूर्यप्रकाश तंव नाही ।**
**परी मी आहे हे कांही । नवचेचि जेवि ।। ४९ ।। (मूळ)**
प्राण धारणेचिया ठायी । चंद्रसूर्य प्रकाश नाही ।
अहंकाराची जाणीव कांही । सरेचि ना ।। १ ।।
बाल्य तारुण्य वृध्दाप्य । गाठता कांही प्राप्य अप्राप्य ।
परी तेथे आहे मी गौप्य । स्फुरे अखंडीत ।। २ ।।
जागृती स्वप्न सुषुप्ती । कर्माकर्माचिया गुंती ।
द्रारिद्र्य आणि श्रीमंती । मी आहे हे स्फूर्ती असेचि ।। ३ ।।
सर्व काही बदले । परी असणे हा धर्म असोचि प्रज्वळे ।
स्फुरद्रुपी उजळे । मी पण ।। ४ ।।
असणे हा धर्म सर्वी । असे सारखाचि प्रभावी ।
तोचि वस्तू निखळ बरवी । सर्वदाही ।। ५ ।।
**तेवि तूं ते मी गिवसी । तेथ तूं पण मीपणेसी ।**
**उखते पडे ग्रासी । भेटीचि उरे ।। ५० ।। (मूळ)**
तूं ते जै मी गिवसी । तूं पणा मीपणेसी ।
छेद जाता जावोनी लयासी । भेटी उरे अखंड ।। १ ।।
तूं म्हणता उठे मी । मी म्हणोनि तूं ही उर्मी ।
परी येता आपुलिया नेमी । हे भाषाचि सरे ।। २ ।।
जरी होय प्राणासी गांठी । तरीच नेमाचि गोठी ।
असंगाचा संग पोटी । प्राणगांठी तरीच ।। ३ ।।
सरलिया उपाधि । जे शेवटी ते आधी ।
आधी शेवटी ते मधी । अखिल विश्वी संचले ।। ४ ।।
तै भेटण्या काय आड । काय तया भेटीसी तोड ।
जीवनी जीवन उघड । उसळे आणि भेटे ।। ५ ।।



**डोळ्याचे भूमिके । डोळा चित्र होय कौतुके ।**
**आणि तेणेचि तो देखे । न डंडळिता ।। ५१ ।। (मूळ)**
दृष्टीचिया लहरी । दृश्य येई आकारी ।
दृश्य दृष्टी एकसरी । पहाणे तेचि ।। १ ।।
दृष्टी जै चित्र उमटे । तै दृश्यासि मन दाटे ।
तया भेटीनी ज्ञान उद्भटे । पहाण्याजोगे ।। २ ।।
मग ते पहाले ऐसे वाटे । दृष्टी सृष्टी वाद प्रगटे ।
छायाचित्र हे झगटे । आपणासीच ।। ३ ।।
दृश्य दृष्टीचे कौतुक । दृष्टी परीसृष्टी सम्यक ।
लहरी सातत्ये क्षणैक । वाढोचि लागे ।। ४ ।।
परी दृष्टी बाजूसी गेलिया । कीं दृश्य गेलिया विलया ।
लहरी जैं येती पूर्णतया । कीं नुठती पै ।। ५ ।।
तै पहाणे संपले । की त्याचे ज्ञानचि सरले ।
परी तेथही भेटणे जाहले । आपण या ।। ६ ।।
**तैसी उपजता गोष्टी । न फुटता दृष्टी ।**
**मी तूं वीण भेटी । माझी तुझी ।। ५२ ।। (मूळ)**
सर्व ब्रह्म ते निःशब्द । भेदाभेद चिदानंदू ।
तयापरीच संवादू । आणि भेटी ।। १ ।।
दृष्टी मिटोनी उपजली गांठी । म्हणोनि चिद्संवाद उठी ।
अद्वैतेची पडली गांठी । झाली भेटी अखंड ।। २ ।।
दृष्टी मिटोनी टाकिला किरण । तोचि झाले सम्यकज्ञान ।
दोन देह परी अभिसरण । जीवनाचे एकचि ।। ३ ।।
येथ काय उजवे डावे । भेद तया के पहावे ।
उभेद व्हावे नि रहावे । एकसरा ।। ४ ।।
दृष्टी आलिया पहाणे दृष्टी । नातरी काय असोनि दृष्टी ।
काय ना तरी सृष्टी । उत्क्रांत होई ।। ५ ।।
आपण जे पुढे जावे । अखिल विश्वचि मागे धावे ।

म्हणोनिया अनुभवे । संतश्रेष्ठ ।। ६ ।।
नुसती दृष्टी दावी सृष्टी । दृष्टी गेलिया अंधत्व उठी ।
दृष्टी न फुटलिया पहाणे दिठी । आत्मयासी ।। ७ ।।
तेथ गतीचीच दृष्टी आहे । आणि ते गतीसीच पाहे ।
तयाविण काही न राहे । विषयोचिया ।। ८ ।।
म्हणोनि ते आत्मगती । जे अखिल विश्वाची गती ।
गतीविण या जगती । काय आहे ।। ९ ।।
सर्वत्रासी आहे गती । म्हणोनी ते प्रवाही फिरती ।
गतीमुळेचि विश्वे होती । आणि भ्रमती त्या नेणोनी ।। १० ।।
परी तो गती जाणली जिये । आणि तेचि घर करोनि राहे ।
घर घर ज्याचे जीवन होये । घुर घुर नव्हे ते सद्गती ।। ११ ।।
सद्गुरुपासी दावी गती । तेचि बोलती सद्गती ।
हृदया आली जेणे गती । ते जाण गती त्याची ।। १२ ।।
येथे काय मी तूं पण । परी सदा सर्वदा दर्शन ।
पहाणेचि सुप्रसन्न । होत सर्व ।। १३ ।।
**आता मी तूं या उपाधी । ग्रासुनी भेटी नुसधी ।**
**ते भोगिली अनुवादी । घोळ घोळू ।। ५३ ।। (मूळ)**
मी तूं उपाधी सहजे सारूनी । भेटू सत्य आत्मपणी ।
अनुभव घोळ घोळुनी । तादात्म्यते ।। १ ।।
उपाधी गेलिया समाधि । जीवनाची उत्क्रांती तै अवधी ।
जे भोगिली ही या संवादी । पुनः पुन्हा ।। २ ।।
उत्क्रांतीची जे भेटी । ते अनुत्क्रांती चेष्टा मोठी ।
समपातळीचिया दृष्टी । विषमता नव्हे ।। ३ ।।
सजीव आणि निर्जीवासी । भेटी नव्हे निश्चयेसी ।
ओळखही न व्हावी ऐसी । स्थिती आहे ।। ४ ।।
ग्रासिलिया जिताची ओवरी । मी तूं पण होय दुरी ।
चमत्कारे नमस्कारी । कोणीही मग ।। ५ ।।



**रूचतियाचेनी मिसे । रूचिते जेविजे जैसे ।**
**कां दर्पण व्याजे दिसे । देखते जेवी ।। ५४ ।। (मूळ)**
पदार्थ रूची जिव्हा रूची । चारवी घेवोनि रूचि ।
पहाता पहाणे एकचि । दर्पण मिसे ।। १ ।।
जरी कां असे जिव्हेसी रूचि । तरी पदार्था येई रूचि ।
जिव्हेसी जरी अरूचि । तरी पक्वान्ने कडवड ।। २ ।।
जिव्हेसी ही असोनि रूचि । पदार्थासीही बहु रूचि ।
परी घेणाऱ्यासी असोनि अरूचि । मनस्तापे ।। ३ ।।
तोचि नाही राजी । तरी अमृतही होय कांजी ।
वाटे छायाचित्रचि घ्यावे जी । भोजन प्रसंग ।। ४ ।।
सर्व मागमागोनि जेविती । वाढणारे सढल वाढती ।
परी याचा आंबट चेहराची पुढती । दिसो लागे ।। ५ ।।
कां अतंरीच कसर । तो बाहेर होणार कसुर ।
मनाचाचि नाही सूर । काय नुसते हे पसारे ।। ६ ।।
आपुलिया वरी सारे । काय नुसते हे पसारे ।
जो हे मागे सारे । तोचि पैठा होय आत्मपदी ।। ७ ।।
यातील जे गम्य । वाटले जरी अगम्य ।
विचारे सर्वदा रम्य । मनःशांती याचेनी ।। ८ ।।
पहाता पहाणे एक जाले । ते समाधान पावले ।
ज्ञानाज्ञान हारपले । विज्ञान ते ।। ९ ।।
**तैसी अप्रमेयें प्रमेये भरली । मौनाचि अक्षरे भली ।**
**रचोनि गोष्टी केली । मेळियेची ।। ५५ ।। (मूळ)**
ज्ञाने आत्मा कीं आत्मी ज्ञान । तेवी अप्रमेये प्रमेय जाण ।
म्हणोनि चिद्क्षरे मौन । वाङमय खोटे ।। १ ।।
ही अक्षरे ज्ञानेश्वरांची । नव्हती अज्ञानेश्वराची ।
परी अज्ञानेश्वराकरीताची । चांगदेवांचे मिष केले ।। २ ।।
चैतन्याक्षरे अनुवाद । केला माऊलीने विषद ।

ते प्रेमचि अगाध । समुद्रा ऐसे ।। ३ ।।
येथ साथिला एकमेळ । म्हणोनि हे गोष्टी सखोल ।
जे सर्वदा अमोल । हृदयस्थानी रेखाटिली ।। ४ ।।
ही तो सुवर्णाक्षरे । याते एकचि स्थान खरे ।
हृदयी जे संचरे । वायुतत्व ।। ५ ।।
**इयेचे करोनी व्याज । तूं आपणांयाते बूझ ।**
**दीप दीपपणे पाहे निज । आपुले जैसे ।। ५६ ।। (मूळ)**
दीप दिसे त्याचेनि प्रकाशे । आपआपणा जाण निज सौरसे ।
सद्चिदानंद ऐसे । आत्मतत्व ।। १ ।।
दीपा दीपप्रकाशेचि दीपत्व । आत्मया अस्तित्वेचि आत्मत्व ।
ऐसा जाणोनी भाव । गिवसी आपणा ।। २ ।।
आयुलिया ठायी आपण । तेथ ठाय तोही आपण ।
तेथचि जे निमग्न । निरसोनि येर ।। ३ ।।
निरसनेचि आत्मज्ञान । आत्मज्ञानेची समाधान ।
समाधानेचि परिपूर्ण । प्रत्ययो हा ।। ४ ।।
**तैसी केलिया गोठी । तया उघडिजे दृष्टी ।**
**आपणिया आपण भेटी । आपणामाजी ।। ५७ ।। (मूळ)**
आपणीया आपण भेटी । आपणा ठायी सहज गोठी ।
उघडले आत्मदृष्टी । आत्मठायी ।। १ ।।
आत्मत्वेसी आत्मता । पहाता पहाता सहजता ।
सहजते चित्ता । चैतन्य गांठी ।। २ ।।
तेथ जो कां आनंद । तया नाम सत्चिदानंद ।
जो केवळचि आनंद । स्वतः सिध्द ।। ३ ।।
सर्वाचे जे अधिष्टान । तेचि आपुले रूप पूर्ण ।
सर्वसत्ता जेथून । प्रस्थापिली ।। ४ ।।
**जालीया प्रळयी एकार्णव । अपार पाणियाची धांव ।**
**गिळी आपुला उगव । तैसे करी ।। ५८ ।। (मूळ)**



प्रळयीचे जळ । गिळी आपुलेची मूळ ।
पाणीच पाणी निर्मळ । जीवन हे ।। १ ।।
ऐसिया संगमी । आद्यविद्या एकचि उर्मी ।
जेथ मी तू आणि तू मी । उरेचिना ।। २ ।।
नाम घेता नामी । तेथ काय उरे मी ।
मी नाही तो नामी । त्यासी ऐक्य तो तसाची ।। ३ ।।
नामी प्राणाचा लय । तैसाचिया मनोजय ।
घडे सर्वत्र विजय । परी नामी ।। ४ ।।
**ज्ञानदेव म्हणे नामरुपे । वीण तुझे साच आहे आपण पे ।**
**ते स्वानंद जीवन पे । सुखिया होई ।। ५९ ।। (मूळ)**
श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणती नामरूपे । वीण साच तुझे आत्मत्व पे ।
अस्तित्व चैतन्य ऐक्य पे । जीवनानंदू ।। १ ।।
नामरूपातीत अनंत । तेचि साच अनाद्यनंत ।
ॐ कार उदय जेथ । श्रुती नेति नेति म्हणती त्या ।। २ ।।
जेथ आपुलाचि आपणानंद । जेथ नुरे त्रिपुटी भेद ।
अभेद त्रिपुटी सिध्द । ऐक्यतेसी ।। ३ ।।
अस्तित्वी मिळता चैतन्य । होय आनंद परिपूर्ण ।
चैतन्य आनंद जै मिलन । तै अस्तिभाव ।। ४ ।।
आस्ति आनंद ऐक्यता । तै चैतन्य प्रवाहे स्वभावता ।
हे घडे स्वभावता । दिसे प्रत्यक्ष व्यवहारी ।। ५ ।।
नाकासी सूत लागले । चैतन्य न प्रवाही ते वेळे ।
तेथ काय आनंद मिळे । असोनिया अस्तित्व ।। ६ ।।
चैतन्यी आनंद मिनलिया । ये आपणचि आपुलिया ठाया ।
तेणे अस्तिरूप आत्मया । भेटी होय योगमार्गे ।। ७ ।।
नाका सूत लागलिया । उपचार वर्मी केलिया ।
जै उत्साह वाटे तया । चैतन्य धावे ।। ८ ।।
हे पहाता समीकरण । सहज आकळे वर्म खूण ।

तेथ ऐक्येचि जीवन । सुखरूप ।। ९ ।।
जेथ सुख सुखेचि सुखावे । आनंद आनंदेचि हेलावे ।
समाधानेही यावे । समाधाना ।। १० ।।
**चांगया पुढतपुढती । घरा आलिया ज्ञानसंपत्ती ।**
**वेद वेदकत्वही अतीती । पदी बैसे ।। ६० ।। (मूळ)**
घरा ज्ञानसंपत्ती आलिया । पुढत पुढती चांगया ।
वेद वेदकत्व नुरेचि राया । तत्पदी बैसे ।। १ ।।
जेणे होय ज्ञानाज्ञान । त्याचे ज्ञान तेचि ज्ञान ।
तयाचे अज्ञान ते अज्ञान । निश्चयेसी ।। २ ।।
ना तरी काय करावे ज्ञान । जेंथ अज्ञानाचे प्रदर्शन ।
आणि वाढे अभिमान । नसे शांती ।। ३ ।।
जया ज्ञाने निगुती । बाणली आत्मस्थिती ।
विनम्रता सहज चित्ती । दुणावली ।। ४ ।।
ते ज्ञान आपणाठायीच असे । परी ते गवसे ।
सद्गुरूकृपे जरी गिवसे । ज्ञानरूपची तो होय ।। ५ ।।
जेथ नसे अज्ञान काजळी । कां ते अहंताची सरली ।
उपाधि निस्तरली । म्हणोनिया ।। ६ ।।
उपाधी ज्ञान उपाधी नासे । सहजचि जे कां नासे ।
निरुपाधी न नासे । म्हणोनि ते आत्मज्ञान ।। ७ ।।
तेथची तू आता बैसे । ज्ञानमागे धावतसे ।
सूर्य जै सहजे प्रकाशे । तयापरी ।। ८ ।।
हेचि थोर संपत्ती । हेचि थोर श्रीमंती ।
धावाधाव नसे चित्ती । परी अधिकार धांवती त्यामागे ।। ९ ।।
**चांगदेवा तुझेनि व्याजे । माऊलीया श्रीनिवृत्तीराजे ।**
**स्वानुभव रसाळ खाजे । दिधले लोभे ।। ६१ ।। (मूळ)**
चांगदेव तुझेनि निमित्ते । श्रीसद्गुरूमाऊली श्रीनिवृत्तीनाथे ।
रसाळ स्वानुभाव खाऊ माते । कृपेचि दिला ।। १ ।।



निमित्त कारण चांगदेव । परी हा ज्ञानराजांचा स्वानुभाव ।
प्रगटला स्वयमेव । तो सर्वाचिसाठी ।। २ ।।
श्रीनिवृत्तीनाथांचे आज्ञेवरूनी । अक्षरी आणिला आत्मपणी ।
विश्वसंसार सुखी झणी । करोनि ठेला ।। ३ ।।
काय हा कृपालोभ । नातरी कोण उघड करी स्वयंभ ।
जेथ नसे मानदंभ । निर्दंभ सुख ।। ४ ।।
स्वानुभाव स्वानुभवेची सुरस । तोचि झाला चांगदेवा उपदेश ।
आणि अखिल विश्वकल्याणास । ग्रंथरूपे अवतरला ।। ५ ।।
**एवं ज्ञानदेव चक्रपाणी ऐसे । दोनी डोळस आरिसे ।**
**परस्पर पाहता कैसे । मुकले भेदा ।। ६२ ।। (मूळ)**
श्रीज्ञानदेव चक्रपाणी । डोळिया आरसे दोनी ।
अलक्ष लक्षाचिये पहाणी । मुकले भेदा ।। १ ।।
कैवल्यरूप श्रीज्ञानदेव । पूर्ण ज्ञान स्वयमेव ।
ज्ञान आणि स्वनुभव । एकरूप ।। २ ।।
चक्राचक्रांतूनी । अनुभूतीस येई म्हणोनि ।
जया नांव चक्रपाणी । दृष्टी भरे ।। ३ ।।
ज्ञान आणि प्रत्यय । दोन दृष्टी परी अद्वय ।
दोन दृष्टींचे पहाणे एक होय । तै अभेदता ।। ४ ।।
सुषुम्नामार्ग चक्रमार्ग । या दोनी दृष्टीचा जेथ योग ।
तेथ कै राहे वियोग । वर्मचि हे ।। ५ ।।
सुषुम्नामार्गे ज्ञानप्राप्ती । चक्रमार्गे आत्मस्थिती ।
हे दोनी डोळे एक होती । तै आत्मज्ञान ।। ६ ।।
रवि शशि दृष्टी । समकरोनी नासाग्रीने हरी ।
तोचि उघडे भ्रूमध्य दृष्टी । जेथ तळपती श्रीज्ञानेश्वर ।। ७ ।।
हे ब्रह्मचि सगुण । जै निवृत्ती कृपा पूर्ण ।
वृत्तीत पुरे हे जया साधन । तेथ भान काय देहाचे ।। ८ ।।
विजेचा झटका । जो एका तोचि सकळिका ।

चांगदेव आले सुखा । याचि कृपे ।। ९ ।।
म्हणोनी तो आरसा । जाहला उपदेशासरिसा ।
अहंकार जाऊनी पिसा । परमार्थी चांगदेव ।। १० ।।
पांचवी मुद्रा अलक्ष । लागता हरी दिसे प्रत्यक्ष ।
चांगदेव भोगिती होवोनि दक्ष । यांसी साक्ष श्रीज्ञानराज ।। ११ ।।
**तिये परी जो इया । दर्पण करील ओविया ।**
**जो आत्मा एवढिया । मिळेल सुखा ।। ६३ ।। (मूळ)**
सूत्र ओविया दर्पण । त्यापरी करी जो आपण ।
तया होय आत्मज्ञान । आत्मसुख ।। १ ।।
श्रीज्ञानेश्वर माऊलींची ओवी । जीवा जीवनसूत्रच ओवी ।
जेणे आत्मवस्तूच ठावी । पडे कैची ।। २ ।।
जी ओवी नित्य नवी । जीवा प्रपंचि कधी न गोवी ।
म्हणोनि कितीही वेळा वाचावी । का जे वाचवी अमृततत्वे ।। ३ ।।
जीणे आणि मरणे । हे दोनी जाय जेणे ।
आत्मयाठायी निमणे । हा लाभ होय पै ।। ४ ।।
**नाही तेचि काय नेणो असे । दिसे तेचि कैसे नेणो दिसे ।**
**असे तेचि नेणो आपैसे । ते की होईजे ।। ६४ ।। (मूळ)**
नाही तेचि नेणणे असे । दिसे ते कैंसे नेणो दिसे ।
अस्तित्वे असे आपैसे । तेचि हो का ।। १ ।।
नाही त्याची नेणीव । आहे त्याची जाणीव ।
आहे नाही हे भाव । जिये हाती ।। २ ।।
जे आंम्ही जाणोचि नये । ऐसेचि जे कां आहेचि आहे ।
तरी तेचि तो कां नोहे । ते होका ।। ३ ।।
जगी त्याचेच महत्व । तेचि सत्य श्रीज्ञानदेव ।
जरी आपुला शुध्दभाव । तरी प्रचित दाविती ।। ४ ।।
**निदे परौते निदैजणे । जाग्रृति गिळोनि जागणे ।**
**केले तैसे गुंफणे । ज्ञानदेवो म्हणे ।। ६५ ।। (मूळ)**



निद्रावस्थेत जागृती । जागृती गिळोनी जे स्थिती ।
चैतन्यमान निश्चिती । गुंफणे श्रीज्ञानेश्वर माऊलीची ।। १ ।।
स्वप्न पाहता मिथ्या असे । निद्रे घोररूपे आत्मा गिवसे ।
तरी तेथ हा जाग्यावरी नसे । जागृत होता कांहींच ना ।। २ ।।
म्हणोनि निद्रावस्थे जागृती । तेथ घोररूप आत्मप्रचिती ।
हे साधन हे साध्य निश्चिती । स्वप्न जागृती एकची ।। ३ ।।
एक स्वप्न एक महास्वप्न । दुतर्फी विसरे आत्मपण ।
निद्रास्थानी हा बिनघोर होऊन । आत्मस्थिती गमावे ।। ४ ।।
तेथची जो प्रगटे । म्हणोनि जाग तया तो भेटे ।
अनुसंधानी झटे । अखंडीत ।। ५ ।।
ऐसे श्रीज्ञानराजांचे गुंफणे । जेथ वाहिला जीव प्राणे ।
विरोनी गेला तनमने । आत्मज्ञान उजाडले ।। ६ ।।
ही कला पासष्ठी । म्हणोनि ही चांगदेव पासष्ठी ।
पासष्ठ वळसे देवूनि उठी । एकचि वृत्ती ।। ७ ।।
निद्रावस्थेचि निद्रा । ती झाली ज्ञानमुद्रा ।
जागृती गिळोनी जागता पुरा । अनुसंधानी ।। ८ ।।
एथ एकचि प्रमाण । जया नांव अनुसंधान ।
अवस्था तीन परी ज्ञान । एकचि ते ।। ९ ।।
जई हे साधिली गुंफणी । जयाने या अवस्था तीन्ही ।
ते स्मरण अभ्यासे झणी । वाढोची लागे ।। १० ।।
हे सूत्रचि जीवनी गुंफले । जीवनसूत्रच गोविले ।
श्रीज्ञानराजे प्रगट केले । श्रीचांगदेवाचेनि मिसे ।। ११ ।।
चांगदेव पासष्ठी गुंफणी । अंतरी प्रगटावी म्हणोनि ।
प्रार्थिले ज्ञानराजा मनी । प्रेरिले तयांनी दासरामी ।। १२ ।।
मोल नाही दातृत्वपणा । ज्ञानराजा सिध्दराणा ।
**दासराम** त्यांचे चरणा । विनटला ।। १३ ।।
धन्य भगवान सद्गुरूसमर्थ । पाठिराखे हनुमंत ।

म्हणोनी श्रीज्ञानेश्वर कृपावंत । कृपेचि बोळले ।। १४ ।।
बोलविले अबोल बोला । हाची मज अनुभव दिला ।
रेड्यामुखें वेद वदविला । जयापरी ।। १५ ।।
श्रीज्ञानेश्वरी पारायणी । पितृदेव गोविंदराया लागुनी ।
ज्ञानेश्वर दिसले नयनी । ते सहजकृपा आम्हांवरी ।। १६ ।।
श्रीहनुमंतसद्गुरू आज्ञेकरून । सांगली स्वगृही नित्यकीर्तन ।
शके १८४५ पासून । अखंडित पितयानी चालविले ।। १७ ।।
श्रीज्ञानेशभक्त गोविंद । श्रीहनुमंत गुरू आज्ञे कीर्तनी आनंद ।
अखंड कीर्तन किर्ती सुगंध । दरवळलिला ।। १८ ।।
ऐसे हे गुरूभक्त पिता । तैसीच प्रेमळ इंदिरामाता ।
लाभले म्हणोनि हनुमंता । भेटी माते ।। १९ ।।
मातापिता हनुमत्पदी निमाले । त्यांची मनेचि वंदूनी पाऊले ।
कृपाशीर्वादे भले । ज्ञानेकृपे आकळिलो ।। २० ।।
श्रीहनुमंत - गोविंदपदी बैसोन । प्रेमेचि करोनि वंदन ।
ज्ञानाईसी करी कथन । पासष्ठीकला समजावली ।। २१ ।।
तृतिय पुरूषी परमार्थ । जै त्रिपूटिचा ग्रास होत ।
प्रथम द्वीतिये व्यवहार समस्त । परी ते तृतियेचेनी ।। २२ ।।
म्हणोनि ते शक्ती अद्वितीय । तयाचे जे स्मरण राहे ।
पासष्ठी कलेचे ते हे । वर्म ऐसे ।। २३ ।।
चौदा विद्या चौसष्ठ कला । जरि का प्राप्त झाल्या सकळा ।
नसता परमार्थी पासष्ठीकला । विकलाची त्या ।। २४ ।।
व्यवहारकला चौसष्ठी । श्रीज्ञानेशांची परी पासष्ठी ।
जेणे तुष्टी आणि पुष्टी । निजांगेसी ।। २५ ।।
इडापिंगला सुषुम्नेचिया गुंफणी । हे कला वौसंडे जीवनी ।
जे वसती आत्मभुवनी । आनंदेसी ।। २६ ।।
या मिसे आपुली सेवा । घडविली आपण श्रीज्ञानदेवा ।
आपुला हा प्रसाद मेवा । आपणचि दिला आम्हांते ।। २७ ।।



येणे मना होय परमानंद । संतोषले श्रीहनुमंत गोविंद ।
सद्गुरू आणि संतसज्जन । प्रेमचि धाले ।। २८ ।।
भगवान हनुमतत्कृपे ही कला । ओवियां चमकली डोळा ।
हृदयीच ठेविली लीला । हे तो ज्ञानराज माऊलीची ।। २९ ।।
पंढरीनाथाची प्रसाद माला । आधिक श्रावणी आली फळा ।
मिळाली मामाना ते पासष्ठीकला । उकलोनि दाविली ज्ञाननाथे ।। ३० ।।
श्रीहनुमंत पदारविंद । गोविंद गोविंद गोविंद ।
हाचि वाटो आनंद । कले कले ।। ३१ ।।
सिद्धगिरी निंबरगी चिमड सांगली । उमदी निंबाळ क्षेत्रे चांगली ।
परंपरेची पीठे भली । नमन असो तयासी ।। ३२ ।।
मस्तक ठेवोनि श्रीचरणाप्रत । **दासराम** झाला निवांत ।
भाद्रपद वद्य षष्ठी शके १८८८ त । समर्पोनि प्रेमे ।। ३३ ।।
श्रीपासष्ठीकला टीकेसहित । श्रीचांगदेवपासष्ठी हा ग्रंथ ।
जाला समाप्त जी एथ । श्रीज्ञानेशकृपे ।। ३४ ।।

श्रीदासराममहाराज लेखन वही क्र.२७०

*****

# प्रकरण - २

श्रीदासराममहाराजकृत समओवी टीका व भावार्थासह

## चांगदेव पासष्टी

**प्रस्तावना :**

श्रीज्ञानदेवांनी चांगदेवांना केलेला उपदेश म्हणजे 'चांगदेव पासष्टी' होय. चांगदेव पासष्टीमधील ६५ ओव्यांवरती श्रीदासराममहाराजांनी समओवी व गद्य भावार्थ लिहिला आहे. यातील समओवी टीकेमध्ये समारोपाच्या ओवीसह एकूण ६६ ओव्या असून, त्या दासराम लेखन वही क्र.२३ मधून घेतल्या आहेत. तसेच त्याचा गद्य भावार्थ दासराम लेखन वही क्र. ८५ पा.क्र.८५ ते १०३ मध्ये आलेला आहे.

वेद व उपनिषदामधील अद्वैत तत्त्वज्ञानाचे सार असलेला हा ग्रंथ कळण्यास कठीण आहे. परंतु श्रीदासराममहाराजांनी प्रत्येक ओवीवर समओवी व गद्य भावार्थ दिल्याने, या ग्रंथामधील विषय आकलनाच्या दृष्टीने सुलभ झाला आहे. श्रीज्ञानदेवांनी या 'चांगदेव पासष्टी' या ग्रंथामधून छांदोग्य उपनिषदातील 'तत्त्वमसी' (ते ब्रह्म तू आहेस) या बोधरूप महावाक्याचा उपदेश केला असून, त्याचेच विस्तृत स्पष्टीकरण श्रीदासराममहाराजांच्या ओवीबद्ध टीका व भावार्थामधून आलेले आहे.

**स्वस्ति श्री वटेशु । जो लपोनि जगदाभासु ।**
**दावी मग ग्रासु । प्रगटला करी ।।१।। (मूळ)**

टीका - क्षेम असो चांगया वटेशु । हंसरुप लपता आभासु ।।
प्रकटलिया ग्रासु । होत असे ।।१।।

अर्थ - हे चांगदेवा तुझे कल्याण असो. परमात्मा हा लपून जगाचा भास दाखवितो. तो स्वस्वरूपी प्रगट झाला की जगाचा ग्रास करितो.

**प्रगटे तव तव न दिसे । लपे तव तव आभासे ।।**
**प्रगट ना लपाला असे । न खोमता जो ।।२।।(मूळ)**



टीका - हंसत्वेचि दृश्य नासे । लपलियाचि ते भासे ।।
उदयास्ताविण सरिसे । पूर्णचिजे ।।२।।

अर्थ - तो प्रगट झाला की दृश्य दिसत नाही व तो लुप्त झाला की दृश्य भासमान होते. तो स्वतः प्रगट वा गुप्त नसून स्वयंपूर्णच आहे.

**बहु जव जव होये । तव तव काहीच न होये ।।**
**काही न होनि आहे । अवघाची जो ।।३।। (मूळ)**

टीका - बहू होता काही नव्हे । काही न होनि आवघा आहे ।।
आविष्कृत प्रकर्षाये । सर्वचि हे ।।३।।

अर्थ - तो अनेक होऊ लागला तर त्यात खरे म्हणजे वेगळे असे काहीच घडत नाही. वास्तविक तेथे दुसरे काहीच नसून सर्व काही एक परमात्माच आहे. ।।३।।

**सोने सोनेपणा उणे । न येताचि जाले लेणे ।।**
**तेवि न वेचता जग होणे । अंगे जया ।।४।। (मूळ)**

टीका - सोन्याचे होत दागिने । सोनेपणा न येता उणे ।।
तेवीचि साचपणे । विश्व आत्मा ।।४।।

अर्थ - सोन्याचे सोनेपणास गौणत्व न येता जसे त्याचे अलंकार होतात. त्याप्रमाणे परमात्म रुपाचा नाश न होता तो आपणच जग बनतो.

**कल्लोळ कंचुक । न फेडिता उघडे उदक ।।**
**तेवी जगेसी सम्यक । स्वरुप जो ।।५।। (मूळ)**

टीका - उदकचि ते लहरी । तैसे स्वरुप विश्वाकारी ।।
दिसेचि निर्धारी । आत्मयाचे ।।५।।

अर्थ - तरंगाचे अंगडे न काढता जसे तेथे स्पष्ट पाणीच असते, त्याप्रमाणे जगद्रुपाने एक परमात्माच यथार्थत्वाने आहे.

**परमाणूंचिया मांदिया । पृथ्वीपणे न वचेचि वाया ।।**
**तेवि विश्वस्फूर्ति इया । झाकवेना जो ।।६।। (मूळ)**

टीका - पहाता अणु परपाणु । न जाये पृथ्वीपणु ।।

तैसे विश्वस्फुरणु । स्फुरद्रुप ।।६।।

अर्थ - परमाणू जरी अनंत आहेत तरी पृथ्वी ही परमाणूरुपच आहे. म्हणून पृथ्वीपणा तेथे स्पष्टच आहे. त्याप्रमाणे या विश्वस्फूर्तिने जो परमात्मा झाकला जात नाही.

**कळांचेनि पांघुरणे । चंद्रमा हरपो नेणे ।।**
**का वन्ही दीपपणे । आन नोहे ।।७।। (मूळ)**

टीका - कळांचेनि चंद्रपूर्ण । न जायेचि झाकून ।।
दीपत्वेचि अग्न । भिन्न काय ।।७।।

अर्थ - सोळा कलांनी चंद्र लुप्त होत नाही किंवा अग्नी जसा दिव्याहून निराळा असत नाही.

**म्हणोनि अविद्या निमित्ते । दृश्य द्रष्टुत्व वर्ते ।।**
**ते मी नेणे आईते । ऐसेचि असे ।।८।।**

टीका - माया पहाता नाही । दृश्यासी निमित्त होई ।।
त्रिपुटी हे सोई । आत्मयाची ।।८।।

अर्थ - म्हणून अज्ञानाने दृश्य द्रष्टेपणा प्रतीत होईल, पण त्यास अधिष्ठानभूत जो मी, त्या मला त्याची कल्पनाही नाही.

**जेवी नाममात्र लुगडे । येऱ्हवी सुतचि ते उघडे ।।**
**का माती मृद्-भांडे । जयापरी ।।९।। (मूळ)**

टीका - वस्रानाम लुगडे । आत तंतूचि उघडे ।।
मातीचिया भांडे । मातीच की ।।९।।

अर्थ - म्हणावयाचे लुगडे पण त्यात सुताशिवाय किंवा मातीचे भांड्यात मातीशिवाय किंवा मातीचे भांड्यात मातीशिवाय काय आहे ?

**तेवी द्रष्टा दृश्य दशे । अतीत दृङ्मात्र जे असे ।।**
**तेचि दृष्टा दृश्य मिसे । केवळ होय ।।१०।। (मूळ)**

टीका - त्रिपुटीचे अतीत । असे जे ज्ञान मात्र ।।
चैतन्य प्रदीप्त । तीनीमाजी ।।१०।।



अर्थ - तसे द्रष्टा दृश्यातील व्यवहाराचे काळात, द्रष्टा दृश्याहून जे अतीत आहे ते चैतन्यच, दृष्टा व दृश्य या ठिकाणी प्रचीतीला येते.

**अलंकार येणे नामे । असिजे अखिल हेमे ।।**
**नाना अवयव संभ्रमे । अवयविया जेवी ।।११।।**

टीका - भिन्न लेणे सोने एक । बहु अवयव अवयवी एक।।
दृश्य जरी अनेक । एक आत्मा ।।११।।

अर्थ - अलंकाराने जसे सोनेच असते किंवा अवयवांच्या रुपाने तेथे अवयवीच असतो.

**तेवी शिवोनि पृथ्वीवरी । भासती पदार्थाचिया परी।।**
**प्रकाशे ते एकसरी। संवित्ति हे ।।१२।। (मूळ)**

टीका - शिवापासोनि पाषाणी । पदार्थ हे भिन्नपणी ।।
ते रूपे चैतन्य खाणी । प्रकाशिजे ।।१२।।

अर्थ - त्याप्रमाणे ईश्वरापासून पाषाणापर्यंत सर्व पदार्थांची प्रचीती ज्ञानानेच येते व ते ज्ञानच पदार्थांचे रुपाने परिणत होते.

**नाही ते चित्र दाविती । परि असे केवळ भिती ।।**
**प्रकाशे ते संवित्ति । जगदाकारे ।।१३।। (मूळ)**

टीका - बहु चित्रे एक भिंती । तैं विश्वी चित्प्रचिती ।।
अंतर्बाह्य स्थिती । प्रकाशाची ।।१३।।

अर्थ - भिंतीवर नाना चित्रे दिसली जरी, जशी ती चित्रमय भिंतीचीच प्रतीती असते, त्याप्रमाणे जगद्रुपाने परमात्माच प्रतीत होतो.

**बांधियाचिया मोडी । बांधा न होनि गुळाची गोडी।।**
**तया परी जग परवडी । संवित्ती जाणा ।।१४।। (मूळ)**

टीका - गुळी गोडी कोंदली । ती ढेपाकार जाली ।।
तैं न होनि प्रकाशली । वस्तू जगी ।।१४।।

अर्थ - गुळाची ढेप झाली तरी गोडीची ढेप झाली काय? नाही. किंवा ढेप मांडली तरी गोडी मोडली नाही. तशी द्वैताची प्रचीती झाली तरी ती

परमात्म्याचीच आहे. द्वैताला अर्थच नाही.

**घडियेचेनि आकारे । प्रकाशिजे जेवी अंबरे ।।**
**तेवी विश्वस्फूर्ती स्फुरे । स्फुर्तीचि हे ।।१५।। (मूळ)**

टीका - घडीचा वस्त्र आकार । स्फुरद्रूप विश्वाकार ।।
आत्मज्ञानी सार । शोधिती गा ।।१५।।

अर्थ - घडीच्या आकाराने ज्याप्रमाणे वस्त्र प्रकाशित होते, त्याप्रमाणे परमात्माच विश्वाकाराने स्फुरतो.

**न लिंपता सुखदुःख । येणे आकारे क्षोभोनि नावेक ।।**
**होय आपणिया सन्मुख । आपणचि जो ।।१६।। (मूळ)**

टीका - त्रिपुटी होऊनी क्षण । सुखदुःखातीत आपण ।।
आपणीया आपण । आपणा पाहे ।।१६।।

अर्थ - या आकाराने क्षणभर आपल्यासमोर तो आपणच असल्याने सुखदुःखाने लिप्त होत नाही.

**तया नाव दृश्याचे होणे । संवित्ती द्रष्टुत्वा आणिजे तेणे ।।**
**बिंबा बिबत्व जालेपणे । प्रतिबिंबाचेनि ।।१७।। (मूळ)**

टीका - दृश्याचेनि द्रष्टेपण । तेणेचि घडे दर्शन ।।
प्रतिबिंबे बिंबपण । मुखाजेवी ।।१७।।

अर्थ - आरसा पाहताना प्रतिबिंबाने जसे मुखाला बिंबत्व येते, त्याप्रमाणे अविद्येने परमात्म्याचे ठिकाणी द्रष्टाभाव प्रगट होतो.

**तेवि आपणचि आपुला पोटी । आपणया दृश्य दावीत उठी ।**
**द्रष्टा दृश्य दर्शन त्रिपुटी । मांडे ते हे ।।१८।। (मूळ)**

टीका - स्फुरद्रुप स्फुरे । विश्वत्वे साचारे।।
त्रिपुटी व्यवहारे । स्वरूप स्थिती ।।१८।।

अर्थ - परमात्माच द्रष्टा, दृश्य, दर्शनात्मक त्रिपुटीचा व्यवहार करतो. कारण या तीनीचे अधिष्ठान परमात्माच असतो.



**सुताचिये गुंजे । आत बाहेर नाही दुजे ।।**
**तेवि तीनपणेविण जाणिजे । त्रिपुटी हे ।।१९।। (मूळ)**

टीका - सुताचिये गुंडी। सुताची प्रचीत रोकडी ।।
त्रिपुटी नसेचि उघडी । आत्मठायी ।।१९।।

अर्थ - सुताच्या गुंडीत सुतावाचून दुसरे काही नाही. त्याप्रमाणे द्रष्टा, दृश्य, दर्शनात्मक त्रिपुटी परमात्मा ठिकाणी दिसली तरी त्यात दुजेपणाच नसल्याने तीनीवाचूनच ती त्रिपुटी आहे.

**नुसंधे मुख जैसे । देखिजतसे दर्णण मिसे ।।**
**वायाचि देखणे ऐसे । गमो लागे ।।२०।। (मूळ)**

टीका - स्वरूप दर्पणी । देखिले कोणा कोणी ।।
तैसे ऐक्यपणी । आत्मरूप ।।२०।।

अर्थ - आरशाने जसे आपण आपल्यासच पाहतो, तसे उपाधीने दृश्य, द्रष्टा या भावाची प्रतीती येते. खरे तर परमात्मा हा त्रिपुटी वेगळाच असतो.

**तैसे न वचता भेदा । संवित्ति गमे त्रिधा ।।**
**हेचि जाणे प्रसिद्धा । उपपत्ति इया ।।२१।। (मूळ)**

टीका - ऐसी उपपत्ती । बोधिली चांगदेवा प्रती ।।
अभेद चैतन्यस्थिती । विविध जगी ।।२१।।

अर्थ - त्याप्रमाणे संवित्ति व परमात्मा यांच्यात भेद न होता उपाधीने द्रष्टा, दृश्य, दर्शन हा भेद वाटतो. खरा तो नसतोच. हीच अभेदाची उपपत्ती आहे.

**दृश्याचा जो उभारा । तेच द्रष्टत्व होय संसारा ।।**
**या दोही माजला अंतरा । दृष्टीपंगु होय ।।२२।। (मूळ)**

टीका - दृश्योद्भवे द्रष्टुत्व । हातो जसे अनुभव ।।
दृश्य द्रष्टा एकत्व । दृष्टी कैची ।।२२।।

अर्थ - उपाधीने दृष्याचा प्रादुर्भाव हेच द्रष्ट्याचे कारण असून, द्रष्टा व दृश्य यातील भेद विचारात घेतला तर विचार टिकतच नाही.

**दृश्य जेधवा नाही । तेधवा दृष्टी घेऊनी असे काई ।।**
**आणि दृश्येविण काही । द्रष्टुत्व असे ।।२३।। (मूळ)**

टीका - दृश्य जैं मावळे । तरी काय हे डोळे ।।
द्रष्टेपण आंधळे । जेथिचे गा ।।२३।।

अर्थ - जेंव्हा दृश्यच नाही, त्याला दाखविणारे ज्ञान कोणाला दाखविणार? दृश्य नाही की द्रष्टा नाही अर्थात येथे त्रिपुटी उरतच नाही.

**म्हणोनि दृश्याचे जालेपण । दृष्टी द्रष्टुत्व होणे।।**
**पुढती ते गेलिया जाणे । तैसेचि दोन्ही ।।२४।। (मूळ)**

टीका - दृश्येचि द्रष्टा दृष्टी । हारपता दोनी नुठी ।।
हेचि बोले पासष्टी । पुनः पुनः ।।२४।।

अर्थ - म्हणून दृष्यामुळे दृष्टी व द्रष्टा. विचाराने दृष्यच जर नाहिसे झाले तर दृष्टी व द्रष्टा दोनी राहात नाही.

**एवं एकचि झाली ती होती। तीन्ही गेलिया एकचि व्यक्ति।।**
**तरी तिन्ही भ्रांती । एकपण साच ।।२५।।। (मूळ)**

टीका - दृश्य द्रष्टा दर्शन । हे एकचि जरी तीन ।।
त्रिपुटी पैल आत्मापूर्ण । मुरता दृष्टी ।।२५।।

अर्थ - उपाधीभेदाने एका ठिकाणी त्रिपुटी होते. निरुपाधित्वाने ती नाहिशी होऊन परमात्माच रहातो.

**दर्पणाच्या आधी शेखी । मुख असताचि असे मुखी ।।**
**माजी दर्पण अवलोकी । आन काही होये ।।२६।। (मूळ)**

टीका - मुखीया दर्पण । धरिला नेला तेथून ।।
आधी मागुती मुख जाण । न दुजे दर्पणी ।।२६।।

अर्थ - हातात आरसा घेण्यापूर्वी किंवा तो बाजूला ठेवला तरी, मुख हे आपल्या ठिकाणी आहेच. पण जेव्हा तेव्हा ते आरशात दिसते,



त्यावेळी ते मुख काही वेगळे आहे काय?

**पुढे देखिजे तेणे बगे । देखते ऐसे गमो लागे ।।**
**परी दृष्टी ते वाऊगे । झकवीत असे ।।२७।। (मूळ)**

टीका - दृष्टी दर्पणी मुखाभास । म्हणोनि द्रष्टुत्व तयास ।।
तैसे आघवे दृष्य । अभिन्नची ।।२७।।

अर्थ - आरशात आपला चेहरा आपण पाहताना आपल्या चेहऱ्याला दृष्टेपणा आला असे होते. पण हे फसवे ज्ञान नव्हे का?

**म्हणोनि दृश्याचिये वेळे । दृश्य द्रष्टुत्वा वेगळे ।।**
**वस्तुमात्र निहाळे । आपणापाशी ।।२८।। (मूळ)**

टीका - देखता दृश्याभास । दृष्टी ग्रासुनी द्रष्टुत्वास ।।
पाहे आपणास । आपणचि ।।२८।।

अर्थ - म्हणून दृश्य द्रष्टुत्व असतानाही, त्याहून वेगळी जी परमात्म वस्तू, तीच आपण आहो हे पहा.

**वाद्यजातेविण ध्वनी । काष्ठजातेविण वन्ही ।।**
**तैसे विशेष ग्रासुनी । स्वयेचि असे ।।२९।। (मूळ)**

टीका - ध्वनिवाद्याविण । की काष्ठ नसता अग्न ।।
भासाभास ग्रासुन । वस्तूचि पैं ।।२९।।

अर्थ - वाद्ये जुळविण्यापूर्वी ध्वनी असतोच किंवा काष्ठातील अग्नी प्रदीप्त होण्यापूर्वी अग्नी असतोच, त्याचप्रमाणे दृश्य लयाला गेले तरी परमात्मवस्तू ही आहेच.

**जे म्हणता न ये काही । जाणो नये कैसेही ।।**
**असताचि असे पाही । असणे जया ।।३०।। (मूळ)**

टीका - आस्ति नास्ति नुरे भेद । जे वस्तु स्वतः सिद्ध।।
जाणीव नुरे अगाध । काय म्हणो ।।३०।।

अर्थ - ज्याला काहीच म्हणता येत नाही आणि जी वस्तू ज्ञानाचा विषय नव्हे, अशी अस्तिभावाने जी आहेच आहे.

**आपुलिया बुबुळा । दृष्टी असोनी अखम डोळा ।।**
**तैसा आत्मज्ञानी दुबळा । ज्ञानरुप जो ।।३१।। (मूळ)**

टीका - सामर्थ्य जरी दृष्टी । तरी दृष्टी का देखे दृष्टी ।
स्वयंसिद्ध वस्तु दिठी । जाणो कैसी ।।३१।।

अर्थ - डोळा सर्व काही पाहतो, पण तो स्वतःला पहाण्याला आंधळाच ठरतो. जो स्वतः पहाणेरूपच असल्याने तिथे पहाणेपणाच नाही. तसा आत्मज्ञानी ज्ञानरूपच असल्याने, ज्ञानाचा विषय आत्मा होत नाही.

**जे जाणणेचि की ठाई । नेणणे कीर नाही ।।**
**परी जाणणे म्हणोनियाही । जाणणे कैचे ।।३२।।(मूळ)**

टीका - वस्तु अज्ञान ग्रासुन । असे अधिष्ठानी आपण।।
वस्तुनेच वस्तुज्ञान । नये शब्दी ।।३२।।

अर्थ - जेथे जाणीव व नेणीवही नाही, तेथे जाणणेचा व्यवहार व्हावा कसा?

**या लागी मौनेचि बोलिजे । काही न होनी सर्व होईजे।।**
**नव्हता लाहिजे । काहीच नाही ।।३३।। (मूळ)**

टीका - मौनेचि वस्तुदर्शन । सर्व होये न होन ।।
ठायीच लाभे ठिकाण । सापडता ।।३३।।

अर्थ - मौन हेच ज्याचे व्याख्यान, काही न होताच ज्याची प्राप्ती तो जीव, जीवभावाला मुकला की सर्वांपलीकडील आत्मवस्तू, ज्याला काही म्हणता येत नाही, ती संपादन करतो.

**नाना बोधाचिये सोयरिके । साचपण जेणे एके ।।**
**नाना कल्लोळ माळिके । पाणी जेवी ।।३४।। (मूळ)**

टीका - सागरी कल्लोळ । ते पाणीच केवळ।।
पदार्थी निखळ । वस्तूचिजे ।।३४।।

अर्थ - नानाप्रकारचे कल्लोळातून जसे पाणी एकच असते, त्याप्रमाणे अनेक



प्रकारचे बोधातून एकच ज्ञान होते.

**जे देखिजतेविण । एकले देखतेपण।।**
**हे असो आपणिया आपण । आपणची जे ।।३५।। (मूळ)**

टीका - दृश्यावाचुन । जे द्रष्टेपण।।
आपुले ठायी आपण । आपणचि ।।३५।।

अर्थ - जे दृश्याशिवाय द्रष्टेपणाने एकटेच आहे, ते आपल्या ठिकाणी आत्मरुपाने आपणच आहे.

**जे कोणाचे नव्हतेनी असणे। जे कोणाचे नव्हता दिसणे ।।**
**जे कोणाचे नव्हता भोगणे । केवळ जो ।।३६।। (मूळ)**

टीका - अस्तित्व स्वयंपूर्ण । आनंद भोगी आपण ।।
नित्यप्रकाश चिद्घन । आत्मरूप ।।३६।।

अर्थ - जे कोणाचे अस्तित्वावर अवलंबून नाही, जे ज्ञानाचा विषय नसून स्वप्रकाशी आहे व स्वतःच आनंदरूप आहे.

**तया पुत्र तू वटेश्वराचा । रवा जैसा कापुराचा ।।**
**चांगल्या मज तुज आपण याचा । बोल ऐके ।।३७।।(मूळ)**

टीका - वटेश्वरी तुझा उद्भव । ऐसा तू चांगदेव ।।
कण कापुर नवलाव । काय बोलो ।।३७।।

अर्थ - कापुराच्या तुकड्यात जसा कापूरच असतो, तसा चांगदेवा, तू वटेश्वराचा पुत्र असून, आत्मरुपात व तुझ्यात जे ऐक्य आहे, तेच तुझ्यात व माझ्यात आहे.

**ज्ञानदेव म्हणे । तुज माझा बोल ऐकणे ।**
**ते तळहातातळी मिठी देणे । जयापरी ।।३८।।**

टीका - तळहाते हाता तळासी । मिठी द्यावी जैसी ।।
तुझी माझी भेटी तैसी । ज्ञानाई म्हणे ।।३८।।

अर्थ - तू माझा बोल ऐकणे म्हणजे उजव्या हाताने डाव्या हाताला मिठी द्यावी, तसा आपलाच उपदेश आपण ऐकावा असे आहे.

**बोलेचि बोल ऐकिजे । स्वादेचि स्वाद चाखिजे ।।**
**का उजिवडे देखिजे । उजिडा जेवी ।।३९।। (मूळ)**

टीका - बोलेचि बोल ऐकावा । रसेचि रस घ्यावा।।
प्रकाशे पहावा । प्रकाश जेवी ।।३९।।

अर्थ - शब्दाने शब्द ऐकावा, गोडीनेच गोडी घ्यावी किंवा प्रकाशानेच प्रकाश पहावा असे आहे.

**सोनिया वरकळ सोने जैसा । का मुख मुखा हो आरिसा।।**
**मज तुज संवाद तैसा । चक्रपाणी ।।४०।। (मूळ)**

टीका - सुवर्णी सुवर्ण कसवटी । तैसा हा संवाद उठी।।
दावी ऐक्य भेटी । ठायचिजे ।।४०।।

अर्थ - सोन्याला सोन्याचीच कसोटी असावी किंवा मुख पहावयास मुखच आरसा व्हावा, तसा चांगदेवा हा आपला संवाद आहे.

**गोडी ये आपुली गोडी । घेता काय न माये तोंडी।।**
**आम्हा परस्परे आवडी । तो पाडू असे।।४१।। (मूळ)**

टीका - गोडीने आपुली गोडी । घेता का न मावे तोंडी ।।
आम्हा तुम्हा आवडी । एकचिजे ।।४१।।

अर्थ - गोडीनेच आपली गोडी घ्यावी म्हटले तर ती काय तिच्या तोंडात मावणार नाही? तशीच आपली ही परस्परांची भेट आहे. त्याचा आस्वादच काही वेगळा आहे.

**सखया तुझेनि उद्देशे । भेटावया जीव उल्हासे ।।**
**की सिद्ध भेटी विसकुसे । ऐसीया बिहे ।।४२।। (मूळ)**

टीका - स्वयंसिद्ध अभेद । आपुले रुपा न यो बाध ।।
एकत्वेची आल्हाद । भेटी वाटे ।।४२।।

अर्थ - चांगदेवा, तुझ्या उद्देशाने तुला भेटावयास माझा जीव उल्हसित आहे. पण आत्मत्वाचे दृष्टीने ही जी भेट सिद्धच आहे, तिला उपाधीभेदाने गौणत्व येईल काय? अशी भीती वाटते.



**घेवो पाहे तुझे दर्शन । तव रुपा येवो पाहे मन ।।**
**तेथे दर्शन । होये अवजतन ऐसे गमो लागे ।।४३।। (मूळ)**

टीका - जो घ्यावे तुझे दर्शन । मना ये मनपण ।।
अद्वैत भेटी पूर्ण । उपेक्षा नसो ।।४३।।

अर्थ - अथवा तुझे दर्शन घ्यावे म्हटले तर हे मन तुझे रुपच बनते आणि दर्शन वेगळे रहातच नाही.

**काही करी बोले कल्पी । का न करी न बोले न कल्पी ।।**
**ये दोन्ही तुझ्या स्वरुपी। न घेती उमसू ।।४४।। (मूळ)**

टीका - जे बोले करी कल्पी । न बोले न करी न कल्पी।।
भावाभावातीत रुपी । ठावोचि नसे ।।४४।।

अर्थ - काही करणे, बोलणे, कल्पना करणे किंवा या सर्वांचा अभाव, हे दोन्ही व्यवहार तुझ्या मूळ स्वरूपाचे ठिकाणी घडतच नाहीत.

**चांगया तुझे नि नावे । करणे न करणे न व्हावे ।।**
**हे काय म्हणो परी न धरवे। मी पण हे ।।४५।। (मूळ)**

टीका - चांगया तुझे कारणे । करणे वा न करणे ।।
मीच ना म्हणोनि नेणे । काय सांगो ।।४५।।

अर्थ - चांगदेवा, तुझे मूळ स्वरुपाचे ठिकाणी, करणे वा न करणे हे घडतच नाही. हे मी काही सांगावे तर, तेथे मीपणाही उरत नाही.

**लवण पाणियाचा थावो । माजी रिघोनी गेले पाहो।।**
**तव तेचि नाही मा काय घेवो। माप जळा ।।४६।। (मूळ)**

टीका - मीठाची बाहुली। पाणिया ठाव पाहो गेली।।
सांगाया नाही आली। तो मापी कोण ।।४६।।

अर्थ - पाण्याची खोली पहाणे करता पाण्यात मिठाची बाहुली शिरली, ती शिल्लकच राहिली नाही. मग या पाण्याची खोली सांगावी कुणी?

**तैसे तुज आत्मयाते पाही । देखो गेलिया मीचि नाही।।**
**तेथे तू कैचा काई । कल्पावया जोगा ।।४७।। (मूळ)**

टीका - तुज आत्मया पाहता । नुरे मीचि सर्वथा ।।
तुझे ठायी तूचि वार्ता । कैची तरी ।।४७।।

अर्थ - त्याप्रमाणे तुझे आत्म्याला पाहू जाता मीच शिल्लक रहात नाही, जेथे तू तरी कोण वेगळा आहेस म्हणून त्याची कल्पना करावी ?

**जो जागोनि नीद देखे । तो देखणेपणा जेवी मुके ।।**
**तेवि तूते देखोनि मी ठाके । काही न होनि ।।४८।।(मूळ)**

टीका - जागा निद्रा पहाया धावे । देखणेपणाचि मुकला जीवे ।।
तव दर्शनी बरवे । मी चि नुरे ।।४८।।

अर्थ - जो जागा राहून निद्रा कशी येते ते पहातो, तो त्या अवस्थेत गेला की पहाणेपणाला मुकतो. त्याप्रमाणे तुझ्या स्वरुपाला पहाताना मी वेगळा रहातच नाही. त्यामुळे तेथे पाहण्याचा व्यवहार होत नाही.

**अंधाराचे ठायी । सूर्यप्रकाश तव नाही ।।**
**परी मी आहे हे काही । न वचेचि जेवी ।।४९।।(मूळ)**

टीका - अस्तित्त्वाचे भान । राही अंधारी आपण ।।
तेचि ते दर्शन । आत्मयाचे ।।४९।।

अर्थ - आपण अंधारात असलो तर सूर्यप्रकाश मुळी नाहीच. पण मी आहे, हे ज्ञान तेथे रहातेच. ते नाहीसे होत नाही.

**तेवी तू ते मी गिवसी । तेथे तू पण मीपणेसी।।**
**उखते पडे ग्रासी । भेटीचि उरे ।।५०।। (मूळ)**

टीका - तू कोण हे शोधिता । आत्मैक्यचि अखंडता।।
मी तू पण लोपता । आत्मभेटी ।।५०।।

अर्थ - त्याप्रमाणे तुला जाणत असता, तुझ्यासकट मीपणाचा ग्रास होऊन आत्म्याची सिद्ध भेटच रहाते.

**डोळ्याचे भूमिके । डोळाचिच होय कौतुके ।।**
**आणि तेणेचि तो देखे । न डंडळिता ।।५१।। (मूळ)**



टीका - आपुले ठायी असोन । लोचनीया दर्शन ।।
घ्यावे आपुले आपण । कवतिके ।।५१।।

अर्थ - डोळा बोटाने दाबला तर त्याचे अधिष्ठानावर नाना रंग दिसतात. तेथे डोळा अनेक न होता, अनेक रंग मात्र दाखवतो.

**तैसी उपजता गोष्टी । न फुटता दृष्टी।।**
**मी तू वीण भेटी । माझी तुझी ।।५२।। (मूळ)**

टीका - तैसी तुझी माझी । अखंड भेटी सहजी ।।
मी तू विण स्वयंतेजी । स्वतः सिद्ध ।।५२।।

अर्थ - त्याप्रमाणे मी तूपणावाचून अभेद दृष्टीने तुझ्या माझ्या भेटीची गोष्ट ही सिद्धच आहे.

**आता मी तू या उपाधी । ग्रासुनी भेटी नुसधी ।।**
**ते भोगिली अनुवादी । घोळघोळू ।।५३।। (मूळ)**

टीका - पुनः पुनः संवाद । भोगिला भेटीचा आनंद ।।
मी तू विण बोध । सहजेची ।।५३।।

अर्थ - मी तू या उपाधीचा ग्रास करून जी भेट अनुभवली, तेच पुनः पुन्हा विवरण करू.

**रुचतियाचेनी मिसे । रुचिते जेविजे जैसे ।**
**का दर्पण व्याज दिसे । देखते जेवी ।।५४।। (मूळ)**

टीका - आवडीचेनि योगे । रुचीनेचि जेऊ लागे।।
का दर्पणी प्रसंगे । आपणा पाहे ।।५४।।

अर्थ - पदार्थातील रुची ही जेवणाऱ्याच्या रुचिला जेवू घालते. रुचीच रुचीचा आस्वाद घेते किंवा आरशात पाहणारा आपल्यासच पहात असतो.

**जैसी अप्रमेये प्रमेये भरली । मौनाची अक्षरे भली।।**
**रचोनि गोष्टी केली । मेळियेची ।।५५।। (मूळ)**

टीका - जैसे अप्रमेय प्रमेय । दावी स्वरुपाची सोय।।
निःशब्दी ऐक्य होय । इये मेळी ।।५५।।

अर्थ - त्याप्रमाणे प्रमेयास निर्माता जो अप्रमेय परमात्मा, ज्याने प्रमेये सुटतात, पण जो प्रमेयाने सिद्ध होत नाही, त्याची वर्णने मूकत्वाने करून तुझ्या माझ्यातील एकत्वाचा मेळ या गोष्टीने साधला आहे.

**इयेचे करुनी व्याज । तू आपणायाते बूझ।।**
**दीप दीपपणे पाहे निज । आपुले जैसे ।।५६।। (मूळ)**

टीका - दीपत्वे प्रदीप । पाहे आपुले रूप ।।
पहा आत्मरूप । संवादिया ।।५६।।

अर्थ - दिवा जसा आपल्या प्रकाशाने आपलेच रुप व्यक्त करतो, त्याप्रमाणे या सिद्धांताने तू आपण आपल्याला ओळखून घे.

**तैसी केलिया गोठी । तया उघडिजे दृष्टी ।।**
**आपणिया आपण भेटी । आपणामाजी ।।५७।। (मूळ)**

टीका - आपुली तू भेटी घेई । ज्ञानावस्थे आत्मठाई ।।
स्वसुखे सुखी होई । काय सांगो ।।५७।।

अर्थ - या सिद्धांतानी ही आत्मदृष्टी उघडून आपण आपल्या ठिकाणी आपली भेट घे.

**जालीया प्रलयी एकार्णव । अपार पाणियाची धाव।।**
**गिळी आपुला उगव । तैसे करी ।।५८।। (मूळ)**

टीका - प्रलयांती पाणी सर्व । उगमासी नाही ठाव।।
अज्ञानांती अनुभव । घेई जे का ।।५८।।

अर्थ - प्रलयकाळी सर्व पाणीच पाणी झाल्याने सर्व प्रवाहांच्या उगमाला व प्रवाहाला ते पाणी नाहिसे करते, तसे तू कर. म्हणजे ही त्रिपुटी राहणारच नाही.

**ज्ञानदेव म्हणे नामरुपे । विण तुझे साच आहे आपण पें।।**
**ते स्वानंद जीवन पे । सुखिया होई ।।५९।। (मूळ)**



टीका - नामरुपावीण तुझे । सत्यत्व स्वस्वरुपी जे।।
स्वानंद सुखी होईजे । ज्ञानेश म्हणे ।।५९।।

अर्थ - श्री ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, चांगदेवा तुझे स्वरुप हे नामरुपातीत आहे. त्या स्वानंद स्वानुभवाने तू सुखरूप हो.

**चांगया पुढती पुढती । घरा आलिया ज्ञानसंपत्ती।।**
**वेद्यवेदकत्वही अतीती । पदी बैसे ।।६०।।**

टीका - वेद्यवेदकत्वा पैलाडे । आत्मस्वरुप चोखडे।।
ध्यानी आणि रोकडे । चांगदेवा ।।६०।।

अर्थ - चांगदेवा ही ज्ञानसंपत्ती ज्याला प्राप्त झाली, त्याला अभेद स्थिती प्राप्त होऊन, तो आत्मपदी आरूढ होतो हे निश्चित.

**चांगदेवा तुझेनि व्याजे । माऊलिया श्रीनिवृत्तीराजे।।**
**स्वानुभव रसाळ रवाजे । दिधले लोभे ।।६१।। (मूळ)**

टीका - चांगया तुझे नि निमित्ते । माऊली श्रीनिवृत्तीनाथे ।।
स्वानंद भोजन आइते । ज्ञानिया दिले ।।६१।।

अर्थ - चांगदेवा तुझ्या या पत्राचे निमित्ताने श्री निवृत्तीनाथ माऊलीने स्वानुभवाचा रसाळ खाऊच मला मोठ्या लोभाने दिला.

**एवं ज्ञानदेव चक्रपाणी ऐसे । दोन्ही डोळस आरिसे।।**
**परस्पर पहाता कैसे। मुकले भेदा ।।६२।। (मूळ)**

टीका - ज्ञानदेव चक्रपाणी । आत्मरुप दोनी।।
परस्पर भेटोनी । एक जाले ।।६२।।

अर्थ - याप्रमाणे श्रीज्ञानेश्वरमहाराज व चांगदेव या दोघांचे सिद्ध भेटीने ते परस्परास पहात असता, दोघेही उपाधी भेदाला मुकले.

**तियेपरी जो इया । दर्पण करील ओवीया ।।**
**तो आत्मा एवढीया । मिळेल सुखा ।।६३।। (मूळ)**

टीका - ज्ञानदृष्टी बोध । तो स्वात्मरुप शोध।।
लाधे ब्रह्मानंद । स्वात्मसुख ।।६३।।

अर्थ - त्याप्रमाणे या दृष्टीने या ओव्यांचा अभ्यास करील तो एवढ्या आत्मसुखाला प्राप्त होईल.

**नाही तेचि काय नेणो असे । दिसे तेचि कैसे नेणो दिसे ।।**
**असे तेचि नेणो आपैसे । ते की होईजे ।।६४।। (मूळ)**

टीका - नाही ते नेणावेचि ऐसे। दिसे हे नेणोनि उपेक्षे ।।
असे परि जे नेणिले असे । तेचि हो का ।।६४।।

अर्थ - जे दिसत नाही पण आहे, जे दिसते पण टिकत नाही, यामुळे जे जाणारे असे नाही आणि आहे, पण जे आपण जाणू शकत नाही, तेच जो होऊन राहतो.

**निदे परौते निदैजणे । जागृती गिळोनी जागणे ।**
**केले तैसे गुंफणे । ज्ञानदेवो म्हणे ।।६५।। (मूळ)**

टीका - निद्रेचिया निद्रा । जागृती गिळोनी पुरा।।
अनुसंधानी खरा । ज्ञानदेवो म्हणे ।।६५।।

अर्थ - निद्रेपलीकडील जी समाधीस्थिती आणि देहाला चिकटलेली जी जागृती, तिचा ग्रास करुन जी राहणारी आत्मजागृती, या दोन्हीचे ऐक्य या ग्रंथात साधले आहे, अशी ही गुंफण केली आहे, असे श्री ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात.

**ऐसी हे पासष्ट लहरी ।श्री माऊली कृपे अक्षरी ।।**
**हनुमत् गोविंद पदी अंतरी । उमटली दासरामी ।।६६।।**

**भगवान गुरुलिंगजंगम । साधुराम हनुमंत परम ।।**
**मनी गोविंदसुत राम । अर्पितसे ।।६७।।**

श्रीदासराममहाराज लेखन वही क्र.२३, ८५

*****



**प्रकरण - ३**

श्रीदासराममहाराजकृत

## अभंगरूप चांगदेव पासष्टी

**प्रस्तावना :**

चांगदेव पासष्टीमधील प्रत्येक मूळ ओवीला एक अभंग या प्रमाणे पासष्ट अभंग व समारोपाचे दोन अभंग मिळून ६७ अभंग असलेली ही चांगदेव पासष्टी चरणी अथवा अभंग चांगदेव पासष्टी श्रीदासराममहाराजांनी लिहिली आहे. यातील प्रत्येक अभंग दोन चरणांचा आहे. श्रीदासराममहाराजांनी लेखन वही क्र.९५ मध्ये हे अभंग लिहिलेले आहेत. चांगदेव पासष्टीमधील तत्त्वज्ञानाचे सर्वांना सुलभपणे आकलन व्हावे यासाठी श्रीदासराममहाराजांनी अभंग चांगदेव पासष्टीची रचना केली आहे. अभंगामध्ये माधुर्य, सहजता व सुलभता हे गुण असतात. श्रीदासराममहाराजांनी लिहिलेल्या प्रस्तुत 'अभंग चांगदेव पासष्टी' मधून आविष्कृत झालेल्या या गुणांच्यामुळे त्यातील तत्त्वज्ञान आकलन होण्यास सुलभ झाले आहे.

क्षेमरेवटेशु लपता आभासु । प्रगटता ग्रासु होत असे ।।१।।
हंसत्वे न दृश्य लपता आभास। उदयास्त सौरस नसता पूर्ण ।।२।।
होता काही नव्हे न होनी जो आहे। सर्व प्रकर्षाये आविष्कृत ।।३।।
सोन्याचे दागिने न होताचि ऊणे। तेवी साचपणे विश्व आत्मा ।।४।।
उदकाची लहरी रूप विश्वाकारी। दिसेचि निर्धारी आत्मयाचे ।।५।।
पहाता परमाणु तेची पृथ्वीपणू। विश्व हे स्फुरणु स्फुरद्रपू ।।६।।
कळे चंद्र पूर्ण न जाये झाकून। दीपपणे अग्न भिन्न नोहे ।।७।।
माया पहाता नाही निमित्तची होई। त्रिपुटी हे सोई आत्मयाची ।।८।।
वस्त्र हे लुगडे तंतूची उघडे। मातीचे जे भांडे मातीच की ।।९।।
जे का ज्ञानमात्र त्रिपुटी अतीत। चैतन्य प्रदीप्त तीनीमाजी ।।१०।।
लेणे हे सोनिया देह अवयवीया।दृश्यामाजी राया एक आत्मा ।।११।।
शिवाचेपासोनी पदार्थी पाषाणी। चैतन्याची खाणी प्रकाशिली ।।१२।।

बहू चित्रे दावी एकची ते भिंती। विश्वात प्रचीती चैतन्याची ।।१३।।
गुळाचिया ढेपे गोडी जै कोंदली। वस्तू हे भरली तैसी जगी ।।१४।।
वस्त्रासी पाहता घडीचा आकार। तैसे विश्वाकार स्फुरद्रूप ।।१५।।
सुख दुःखातीत खरेची आपण। त्रिपुटी होऊन आपणा पाहे ।।१६।।
प्रतिबिंबेमुखा आले बिंबपण। दृश्ये द्रष्टेपण दर्शन ते ।।१७।।
स्फुरद्रूप स्फुरे विश्व हे साचारे। त्रिपुटी व्यवहारे स्वरुपस्थिती ।।१८।।
सुताची प्रचीती सुताचिये गुंडी। त्रिपुटी ये उघडी आत्मवस्तू ।।१९।।
दर्पणी पहाता पाहे कोणाकोण। तैसे ऐक्यपण आत्मदृष्टी ।।२०।।
ऐसी उपपत्ती चांगदेवा प्रती। ज्ञानेश सांगती अभेदता ।।२१।।
दृश्येचि द्रष्टुत्व ऐसा अनुभव। तेथ जे एकत्व दृष्टी कैची ।।२२।।
दृश्य जे मावळे तरी काय डोळे। होय ते आंधळे द्रष्टेपण ।।२३।।
दृश्ये द्रष्टा दृष्टी ऐसेचि हे गोठी। हारपता नुठी दोनी तेथे ।।२४।।
त्रिपुटी हे एक जरी दिसे तीन। पैल आत्मा पूर्ण मुरता दृष्टी।२५।।
मुखीया दर्पण तरी का दुजेपण। धरीला तेथून नेला जरी ।।२६।।
दर्पणी होतसे पहाता मुखाभास। द्रष्टुत्व तयास अभिन्नची।।२७।।
पहाता दृश्याभास जरी दृष्टी ग्रास। पाहे आपणास आपणची।।२८।।
ध्वनी वाद्यावीण काष्ठावीण अग्न। भासा पैलपण वस्तुची पै।।२९।।
आस्तीनास्ती विटे तेथ वस्तु ऊरे । जाणीव हे सरे काय सांगो।।३०।।
दृष्टी देखे सर्व परी न देखे दृष्टी। सिद्ध वस्तू दिठी जाणो कैसी।।३१।।
अज्ञान ग्रासून वस्तुते आपण। वस्तुनेच ज्ञान नये शब्दी ।।३२।।
मौनेचि दर्शन होये नहोन। ठायीच ठिकाण वस्तुचे गा ।।३३।।
सागरी कल्लोळ पाणीच केवळ। पदार्थी निखळ वस्तुचि गा।।३४।।
दृश्याचे वाचून जे का द्रष्टेपण। आपुले ठायी कोण आपणची।।३५।।
आस्ति स्वयंपूर्ण आनंद आपण। प्रकाश चिद्घन नित्य आत्मा।।३६।।
वटेश्वरी चांगा होसी तू निर्माण। कापुरात कण जियापरी ।।३७।।
तळहाते तळासी मिठी द्यावी जैसी। दोघा भैटी तैसी ज्ञानाई म्हणे।।३८।।
नादे नाद घ्यावा रस रसे चाखावा। प्रकाशे पहावा प्रकाश गा।।३९।।
सोनियालागेनी सोन्याचि कसोटी। संवाद हा उठी तैसा दोघा।।४०।।



गोडीनेच घ्यावी आपुलीये गोडी। आम्हा तुम्हा आवडी एकची जे।४१।।
आपुले रुपासी न येताची बाध। एकत्वे आल्हाद भेटीवाटे ।।४२।।
तव घेता दर्शन मना ये मनपण। अद्वैवती तो पूर्ण होय भेटी।।४३।।
भावाभावातीत रुपी नसे ठाव। येर सर्व वाव करणे होय ।।४४।।
मीच ना म्हणोनी करणे न करणे। चांगया कारणे नेणेचि गा।।४५।।
मीठाची बाहुली पाणी पहाया गेली। सांगाया न आली मापी कोण।।४६।।
तुज आत्मयासी जरी पाहो जाता। नुरे मीची वार्ता तूची कैची।।४७।।
जागा निद्रा पहाता देखतया मुके। मीची नुरे तिथे तू ते पहाता।।४८।।
अंधाराचे ठायी प्रकाशची नाही। अस्तित्वाचे ठायी परी भान।।४९।।
तू ते गा शोधीता ऐक्य होय आता। मी तू वीण वार्ता आत्मभेटी ।५०।।
आपुलीया ठायी लोचनी दर्शन। आपुले आपण घ्यावेचि गा।।५१।।
तैसी तुझी माझी भेटी हे सहजी। आहे निजतेजी मी तू वीण।।५२।।
भोगीला आनंद भेटीचा संवाद। मी तू वीण बोध सहजेची।।५३।।
आवडीचे वेगे रुची जेऊ लागी। दर्पणाचे योगे पाहे आपणा।।५४।।
अप्रमेयप्रमेय स्वरूपाची सोय। निःशब्देचि होय ऐक्य येथे।।५५।।
दीपपणे दीप पाहे आपुले रूप। तैसे आत्मरूप संवादीया।।५६।।
आपुली तू भेटी घेई आत्मठायी। सुखे सुखी होई काय सांगो।।५७।।
उगमा न ठाव प्रलयी पाणी सर्व। घेईजे अनुभव अज्ञानांती।।५८।।
नामरुपावीण तुझेचे सत्यत्व। स्वानंदानुभव ज्ञानाई म्हणे।।५९।।
वेद्य वेद कला असे जे पैलाडे। आत्मध्यान रोकडे चांगदेवा ।।६०।।
श्रीनिवृत्तीनाथे चांगया निमित्ते। ज्ञानिया आईने खाजे दिले ।।६१।।
ज्ञानदेव आणि चक्रपाणी दोनी। स्वरूपे भेटोनी एक जाले ।।६२।।
ज्ञानदृष्टीबोध स्वात्मसुख शोध। लाभे ब्रह्मानंद स्वात्मसुख ।।६३।।
नाही ते नेणावे दिसे उपेक्षावे। असे जे नेणवे तेचि हो का ।।६४।।
निद्रेचिया निद्रा जागृती गिळोन। राही या संधानी माऊली म्हणे ।।६५।।
ज्ञानाई कृपेने पासष्टी चरणी। गोविंद चरणी स्फुरे जे का ।।६६।।
गुरुलिंग साधुराम हनुमंत। पदी गोविंद सुत अर्पितसे ।।६७।।

*****

# प्रकरण - ४

श्रीदासराममहाराजकृत

## चांगदेव पासष्टी लहरी

**प्रस्तावना :**

चांगदेव पासष्टीच्या मूळ ६५ ओव्यांवर श्रीदासराममहाराजांनी दोन प्रकारे ओवीबद्ध चांगदेव पासष्टी लहरी लिहीलेली आहे. त्यापैकी दासराम लेखन वही क्र.१०६ मध्ये समारोपाच्या ओवीसह ६६ ओव्या आहेत. तसेच दासराम लेखन वही क्र.८३ (पा.क्र.१६९ ते १८३), ८९ व १११ मध्ये ६७ ओवीबद्ध लहरी लिहिल्या आहेत.

सोऽहंमधील अवकाशाला चिदाकाश म्हणतात. त्या चिदाकाशामध्ये चैतन्यलहरी उसळत असतात. चिदाकाशामधील या चैतन्यलहरींना आलेले अक्षरबद्ध रूप म्हणजे श्रीदासराममहाराजांनी प्रकट केलेल्या या लहरी होत. हाच अर्थ व्यक्त करणाऱ्या या ओव्या श्रीदासराममहाराजांनी 'चांगदेव पासष्टी लहरी' या शीर्षकाखाली लिहिल्या आहेत.

ॐ स्वस्ति श्री वटेशु। चांगदेवा स्वयं प्रकाशू।
हंसरूप लपता विश्वाभासू। ग्रासेस कळा प्रगटलिया ।।१।।
हंस प्रगटविलिया दृश्य नासे। दुर्लक्षे लपता दृश्य आभासे।
उदयास्ताविण साक्षात असे। संपूर्ण जे निरपेक्ष ।।२।।
बहू होता काही नव्हे। काही न होनी आघवा आहे।
आविष्कारे प्रकर्षाये। सर्वचि हे ।।३।।
सोन्याचे होत दागिने। सोनेपणा न येता उणे।
राखोनिया सत्यपणे। होय आत्मा विश्वाकार ।।४।।
उदकची लहरी स्पष्ट। तैसी न होती विश्वासकट।
आत्मरूप निघोट। सर्व इही ।।५।।



उठता अणूरेणू। कोठे जाय पृथ्वीपणू।
तेवी विश्वस्फुरणु। झाकवेना स्फुरद्रुप ।।६।।
कळांचेनी चंद्र पूर्ण। म्हणोन काय जाय झाकोन।
दीपत्वेसी अग्न। भिन्न काय ।।७।।
माया वस्तुता नाही। परी दृश्या या निमित्त होई।
त्रिपुटीची जरी सोई। जैसी तैसीच आत्मता।।८।।
वस्त्राचे नाव लुगडे। आत तंतूचि उघडे।
किंवा मातीचिया भांडे। मातीच जेवी ।।९।।
दृश्य द्रष्टा दर्शनातीत। जे का असे ज्ञेप्तिमात्र।
आत्मचि एक ओतप्रोत। तीनी ठायी ।।१०।।
भिन्न दागिने सोने एक। नाना अवयव अवयवी एक।
तरी हे दिसे जरी अनेक। तरी एक आत्माचि ।।११।।
शिवापासून पाषाणावरी। भासती दृश्यता नाना परी।
तयारुपे चिद्रुपताच खरी। चिद्विलासे प्रकाशमान ।।१२।।
अनेक चित्रे एक भिंती। विश्वी एकचि चिद्वस्तू ती।
अंतर्बाह्य प्रचीती। प्रकाशचि ।।१३।।
गुळात गोडी कोंदली। ती ठेपाकार जाली।
जैसी न होनी प्रकाशली। चिद्वस्तू जगी ।।१४।।
घडीचेनि आकारे वस्त्र। तैसी वस्तू विश्वत्वे साचार।
ऐसे हे सार। शोधिती ज्ञानी ।।१५।।
दृश्य द्रष्टा क्षणैक बनून। सुखदुःखातीत आपण।
आपणा आपण समोर होऊन। एकचि एक ।।१६।।
तेचि ते दृश्य दर्शन। आणि आपुले द्रष्टेपण।
प्रतिबिंब दर्पणी प्रगटता पूर्ण। तेणे बिंबत्व मुखासी ।।१७।।
स्फुरद्रूप ठायी स्फुरे। तै जगद्रूप साचो कारे।
दृष्टा दृश्य दर्शन व्यवहारे। आत्मप्रचीती ।।१८।।
सुताच्या गुंडीत पाही। सुतावीण असे काही।

अंतर्बाह्य नाही। तैसी त्रिपुटी आत्मने ।।१९।।
आपुले स्वरूप दर्पणी। येथ देखीले कोणा कोणी।
तैसेचि एकपणी। आत्मरूप ।।२०।।
ऐसी उपपत्ती। बोधिली चांगया प्रती।
अभेद ते त्रिविध जगती। चिद्रुपता एक ।।२१।।
दृश्य उभालिया द्रष्टुत्व। हा तो तत्व अनुभव।
म्हणोनि दृश्य द्रष्टा जरी एक होये। पहाणे काय दृष्टीने ।।२२।।
मावळे जै दृश्य। तेथ उघडती काय डोळे।
मागुती द्रष्टेपण निराळे। कैचे असे ।।२३।।
दृश्येचि द्रष्टा आणि दृष्टी । हारपताते दोनी नुठी।
हेच बोले पासष्टी । पुनः पुनः ।।२४।।
दृश्य द्रष्टा दर्शन। हे तीन तरी एकपण।
लोपलिया दृष्टी भान। त्रिपुटी पैल एक आत्मा ।।२५।।
मुखापुढे दर्पण। धरीला काढीला तेथून।
आधी मागुती मुख जाण। दर्पणी न दुजे ।।२६।।
दर्पणी मुखाचा आभास। दृष्टी म्हणोन द्रष्टुत्व द्रष्ट्यास।
तैसे आघवे दृश्य। द्रष्ट्याहोनी भिन्न नसे ।।२७।।
देखता हा दृश्याभास। ग्रासुनी दृष्टी द्रष्टुत्वास।
पाहे आपणास। आपणची ।।२८।।
काष्ठ नसता अग्न। का ध्वनी वाद्यावीण।
भासाभास ग्रासून। ते वस्तू गा ।।२९।।
आस्तिनास्ति गिळोनि भेद। जे आपुली वस्तू स्वयंसिद्ध।
जाणीव नुरे ऐसी अगाध। काय म्हणो ।।३०।।
सामर्थ्य असोनि दृष्टी। दृष्टी काय देखे दृष्टी।
स्वयंसिद्ध वस्तु जे दिठी। जाणो कैसी ।।३१।।
ज्ञान वस्तू अज्ञान ग्रासून। असे अधिष्ठानी आपण।
जे का वस्तूनेच ज्ञान। ज्ञान शब्द ज्या अपुरा ।।३२।।



मौनेचि वस्तूचे वर्णन। सर्व होणे काही न होन।
ठायीच लाभे तो ठिकाण। सापडता ।।३३।।
सागरी कल्लोळ। ते पाणीच केवळ।
नाना पदार्थांचे ज्ञान निखळ। जेणे ते वस्तू ।।३४।।
देखल्यावाचून। जे का द्रष्टेपण।
जे का अभिन्न। वस्तू एक ।।३५।।
अस्तित्व जे स्वयंपूर्ण। आनंदभोगी आपुला आपण।
नित्यचि प्रकाशे चिद्‌घन। आत्मतापे ।।३६।।
तेथेचि तुझा उद्भव। ऐसा तू चांगदेव।
तू ते वस्तूचि स्वयमेव। काय सांगो ।।३७।।
तळहाती तळहातासी। मिठी द्यावी जैसी।
तैसी तुज मज। भेटी म्हणती ज्ञानदेव ।।३८।।
बोलेचि बोल ऐकावा। स्वादेचि स्वाद घ्यावा।
प्रकाशे प्रकाश पहावा। मुखच आरसा मुखासी ।।३९।।
सुवर्णी सुवर्ण घासता कसवटी। तैसा तुझा माझा संवाद उठी।
दावी ऐक्यपणे भेटी। ठायीच जे ।।४०।।
गोडीने आपुली घेतली गोडी। ती मावेना तिच्या तोंडी।
आम्ही तुम्हा एकचि सवडी। परस्परा ।।४१।।
स्वयंसिद्ध आपुले अभेद। तत्त्व तयासी नयो बाध।
अभेदपणे आल्हाद। वाटे भेटता ।।४२।।
जो घेवो पाहे तुझे दर्शन। मनासी ये मनपण।
नित्यभेट अद्वैत पूर्ण। उपेक्षा नसो ।।४३।।
जे जे बोले करी कल्पी। ना बोले न करी न कल्पी।
भावाभावातीत स्वरुपी। दोहोसीही ठाव नसे ।।४४।।
काही करावे का नाही। हे दोनीही नाही।
माझे मी पण ना तरी काई। चांगदेवा ।।४५।।

मीठाची बाहुली । पाणिया ठाव घेवो गेली ।
सांगाया नाही आली । मापावया उरे कोण ।।४६।।
तुज आत्मया पाहो जाता। मी पण नुरे सर्वथा।
तुझेही तू पण कर्ता । कैची उरे ।।४७।।
जागतोचि निद्रे पहाया धावे। देखतेपणासी मुकला स्वभावे।
तुझे दर्शन घेता बरवे। विलीन मी तेथेची ।।४८।।
आपुलीया अस्तित्वाचे भान। लोपेना अंधारी ही खूण।
तेचि ते दर्शन। आत्मयाचे ।।४९।।
तू कोण ऐसे शोधिता। आत्मैक्य स्फुरे अखंडता।
मी तू पण लुप्त होता। आत्मत्व राही एकले।।५०।।
आपुले ठायीच राहोन। लोचनी घ्यावे दर्शन।
आपुलेचि आपण। कवतिके ।।५१।।
तैसी तुझी माझी। अखंड भेटी सहजी।
मी तू रहीत स्वयंतेजी। स्वयंसिद्ध ।।५२।।
पुनः पुनः संवाद। भोगिला भेटीचा आनंद।
ऐसा सहजबोध। सहज ते आत्मयाचा ।।५३।।
भोक्त्याचा संबंध। जाणुनी रुचीने रुचीचा स्वाद।
दर्पणी स्वतः सिद्ध। आपणया आपण पहावे ।।५४।।
तैसे अप्रमेय प्रमेय। दावी स्वरुपाची सोय।
निःशब्दाक्षरे ऐक्य होय। संवादेची ।।५५।।
दीपपणेची दीप। देखे आपुलेचि रुप।
पहा होवोनि तै निर्विकल्प। आत्मरुप संवादे ।।५६।।
आपुली तू भेटी घेई। ज्ञानावस्थे आपुले ठायी।
स्वसुखेचि सुखिया होई। काय सांगो ।।५७।।
ग्रासुनी नाना प्रवाह। उगमस्थानासी नाही ठाव।
प्रलयांती पाणी सर्व। अज्ञान गिळोन वस्तू तेवी ।।५८।।



नामरुपावीण तुझे। सत्यत्व स्वस्वरुपी जे।
स्वानंद स्वानुभवे सुखी होईजे। ज्ञानदेव म्हणे ।।५९।।
वेद्य वेदकत्वा पलीकडे। आत्मपद जे चोखडे।
ध्यानेचि आणी रोकडे। होवोनि स्वामी चांगदेवा ।।६०।।
चांगया तुझेनि निमित्ते। माऊली श्रीनिवृत्तीनाथे।
स्वानंदाचे खाद्य आईते। दिले मज।।६१।।
येणेपरी ज्ञानदेव चक्रपाणी। ज्ञानरुप दोनी।
भेटो येती एकपणी। परस्पर आत्मत्वे ।।६२।।
दृष्टी घेऊनी प्रचिती बोध। स्वात्मयाचा घेता शोध।
लाधे ब्रह्मानंद। आत्मसुख।।६३।।
परमात्मा सद्चिदानंद। परीपूर्ण निःशब्द।
आपण व्हावे ते अगाध। सोहंस रूप ।।६४।।
नाही तेची नेणणे असे। दिसे ते कैसे नेणो दिसे।
असे ते नेणो अपैसे। तेचि हो का ।।६४।।
नाही ते नेणावेचि ऐसे। दिसे ते नेणोनि उपेक्षे।
असे परी जे आम्ही नेणो असे। तेंचि हो का ।।६४।।
(निद्रेमाजी जागृती। जागणे गिळोन ये सुषुप्ती।
बोलिले सर्व शब्दाअंती। म्हणती श्री ज्ञानदेव ।।६५।।)
(निद्रावस्थे जागृती। जागृती गिळोन जे स्थिती।
चैतन्यभान निश्चिती। गुंफणी श्री ज्ञानाईची।।६५।।) किंवा
निद्रावस्थेचि निद्रा। जागृती गिळोनि जागा पुरा।
अनुसंधानी खरा। ऐसी गुंफणी श्रीज्ञानाईची।।६५।।
ऐसी हे पासष्ट लहरी। श्री ज्ञानेश कृपे आली अक्षरी।
हनुमत् गोविंद पदी अंतरी। उमटली दासरामी ।।६६।।

श्रीदासराम लेखन वही क्र.८९, १०६,१११

*****

# प्रकरण - ५

श्रीदासराममहाराजकृत

## चांगदेव पासष्टीतील पहिल्या नऊ ओव्यांचे गद्य स्पष्टीकरण

**प्रस्तावना :-**

श्रीदासराममहाराजांनी चांगदेव पासष्टीमधील ६५ ओव्यांवर गद्य स्पष्टीकरण लिहिण्यास सुरुवात केली होती. त्याप्रमाणे पहिल्या ९ ओव्यांचे स्पष्टीकरण दासराम लेखन वही क्र.२१६ पान क्र.१ ते ७ मध्ये लिहिले आहे. त्यापुढील ओव्यांचे स्पष्टीकरण उपलब्ध नसल्याने, येथे पहिल्या ९ ओव्यांच्या स्पष्टीकरणाचा समावेश करण्यात आला आहे.

कोऱ्या कागदावरच अक्षरे उमटावयाची ती चिताडलेल्या कागदावर उमटणारी नाहीत. या दृष्टीने श्रीचांगदेवासारखा कोरा कागद श्रीज्ञानेश्वर महाराजांना मिळाला, म्हणूनच श्रीज्ञानेश्वरमहाराजांची ही पासष्टी तेथे उमटली हे निःसंशय.

**स्वस्तीश्री वटेशू । जो लपोनी जगदाभासू ।**
**दावी मग ग्रासू । प्रगटला करी ।।१।।**

श्रीज्ञानेश्वरमहाराज श्रीचांगदेवांना उद्देशून त्यांचे अभिष्टचिंतन करून त्यांचे मूळरुपाची ओळख करून देतात. ते म्हणतात, जगप्रलयाचे वेळी वटपत्रावर क्रीडा करणारा अंगुष्ठ चोखीत राहणारा परमात्मा जो वटेश हा लपला असताना म्हणजे आपल्या चैतन्यरुपापासून वेगळा होऊन आनंद भोगण्याकरता द्रष्टा झाला असताना, जगताचा आभास निर्माण करतो. कारण दृश्याची उत्पत्ती आत्मत्वाचा विसर होण्यातच आहे. त्यावाचून द्वैत नाही व द्वैतावाचून आपले सुख आपण भोगावे म्हटले तर रस्ताच नाही. त्याचप्रमाणे ज्या अधिष्ठानावर हा आभास निर्माण होतो तेच केवळ उरू लागले म्हणजे आत्मत्व प्रगट झाले की तेथे तेथे दृश्याचा ग्रासच होतो. जसे मीपण स्वप्नात जरी अनेक झालो तरी जागृतीत आल्याबरोबर स्वप्न दृश्या ग्रास व्हावा त्याप्रमाणे.



**प्रगटे तव तव न दिसे । लपे तव तव आभासे ।**
**प्रगट ना लपला असे। न खोमता जो ।।२।।**

प्रगट होणे आणि अदृश्य होणे या दोन स्थिती आत्म्याच्या ठिकाणी म्हणजे स्वयंसिद्ध वस्तूचे ठिकाणी नाहीत. कारण ती मूळची आहेच आहे. द्रष्टा हा पूर्ण आहे व दृश्य हे अपूर्ण आहे. म्हणूनच तेथे दर्शन संभवते. द्रष्ट्याप्रमाणे दृश्य हे पूर्ण असेल तर तेथे पहावयाचे काय? समुद्रावरची लाट पहाता येते, पण समुद्र पहाता येत नाही. जे पहाता येते ते प्रगटही होईल व नाहिसेही होईल. कारण या दोन्ही स्थिती सापेक्ष व जे सापेक्ष ते अपूर्ण असा अबाधित, तत्त्वसिद्धांत आहे. सुख व दुःखही सापेक्ष आहे. म्हणून त्यात पूर्णता व आनंदाचे निर्भेळत्व प्रतीत होत नाही. पण या लहरी ज्या अधिष्ठानावर उत्पन्न होतात. त्याचा या दोहीसही स्पर्श नसल्याने व ते स्वसंबंध परीपूर्ण असल्याने ते मात्र ओतप्रोत आनंदरुपच आहे. पूर्ण वस्तू ही त्रिपुटी रहित असल्याने ती प्रगट होणे म्हणजे आपण त्यात जाणे व आपण त्यात जाणे म्हणजे न दिसे असे होणे. आपण गाडीतून निघालो म्हणजे झाडे पळताना दिसतात. पण गाडीच पळत असते. त्याप्रमाणे आत्म्याचे प्रगट होणे म्हणजे आपण आत्म्यातच जाणे. कारण तो गुप्त व प्रगट दोन्हीही नाही. जे नाही ते प्रगट होईल व जे प्रगट होईल ते नाहीसे होईल. पण जे आहेच आहे तेथे हे दोन्ही पर्याय लागू होत नाहीत. आत्मा प्रगट झाला की दृश्याचा लय व चैतन्यात तो लपून राहिला की दृश्याचा आभास ही त्याची शक्ती आहे. तो सर्व करून अकर्ता असल्याने या दोन्ही स्थिती त्याच्या सत्तेवर होत असूनही तो त्याला स्पर्शही करीत नाही.

**बहु जव जव होये । तव तव काहीच न होये ।**
**काही न होनि आहे । अवघाचि जो ।।३।।**

दृष्टीचे अपूर्णत्व हेच बहुविध दृश्याचे कारण असल्याने बहूविध होताना त्यात काहीच न होय अशी स्थिती होते म्हणजे त्यात काही व्हावे लागते असे मुळीच नाही. शून्य म्हणजे काही नाही व त्यातूनच सर्व विश्वाची उत्पत्ती होते. केळीचा बुंधा पाहू गेले तर काहीच नाही असे दृष्टोत्पत्तीस येते. प्रत्येक

झाडाला बुंधा आहे. पण केळीला बुंधा नाही. त्याचे सर्वच्या सर्व पदर सुटतात व शेवटी काहीच रहात नाही. तसे बहुविध दृश्याचे पृथःकरण केले तर चत्वार देहाचे पडदे बाजूस होऊन शेवटी आपण काही नसलेल्या म्हणजे शून्य स्थितीतच जातो. आकाशावर प्राणाचा आघात होऊन हे सर्व विश्व उत्पन्न झाले आहे. या तत्त्वाचा जर आपण विचार केला तर या आकाशाची घडण ज्यातून झाली ते मूळ रूप असून दृष्टीचे अपूर्णत्वानेच हे सर्व झाल्याने दोन शून्यातूनच शब्दरुप व त्याचा हा तत्त्वरूप विस्तार झाला आहे, असे दिसून येईल.

**सोने सोनेपणा उणे । न येताचि जाले लेणे ।**
**तेवि न वेचता जग होणे। अंगे जया ।।४।।**

सोन्याच्या सोनेपणामध्ये काही कमतरता न येता त्यावर जसा अलंकारपणा येतो. त्याप्रमाणे परमात्मतत्त्वाचा नाश न होता जो आपल्या अंगाने म्हणजे आपणच जग बनतो. वायुरुपातच जड आणि चैतन्य हे दोन्हीही जसे संभवते. तद्वत हे सर्व जडाजड दृश्या दृश्य दोनीही तोच बनतो. परमात्मरुपाची ओळख होणे हे या करताच अगत्याचे आहे.

**कल्लोळ कंचुक । न फेडिता उघडे उदक ।**
**तेवी जगेसी सम्यक । स्वरुप जो ।।५।।**

तरंगरुपी अंगडे न टाकताही पाणी जसे उघडच स्पष्ट असते, कारण पाण्यावाचून तरंग नाहीच व त्याप्रमाणे जगाचे ठिकाणी यथार्थत्वाने जगाचे धारणेतही परमात्मा प्रतीत होतो. कारण परमात्म्यावाचून जगताची धारणाच नाही. यामुळे अंतर्बाह्य तोच असतो.

**परमाणूंचिया मांदिया । पृथ्वीपणे न वचेचि वाया ।**
**तेवी विश्वस्फूर्ति इया । झाकवेना जो ।।६।।**

अनंत परमाणू असले तरी परमाणू हे पृथ्वीरुपच असल्याकारणाने जसा पृथ्वीपणा जात नाही, तद्वत विश्वाची स्फूर्ती ही परमात्म्याहून निराळी नसल्याने, निर्हेतूक दृष्टीतून ज्या लहरी निर्माण होऊन शून्य निर्माण झाले व त्यातून प्रस्फूट गगनाशी तादात्म्यतेने आकाश व चेतन अचेतन सृष्टी निर्माण



झाली त्या विश्व स्फूर्तीने परमात्मा झाकला जात नाही.

**कळांचेनी पांघुरणे। चंद्रमा हरपो नेणे ।**
**का वन्ही दीपपणे । आन नोहे ।।७।।**

सोळा कलांच्या पांघरुणाने चंद्राची गती जशी लोपली जात नाही किंवा दीपत्वाला प्राप्त झाल्यावरही अग्नी जसा ज्योतीपेक्षा निराळा नसतो, त्याच दृष्टीने पहाताही विश्वस्फूर्तीपेक्षा परमात्मा निराळा रहात नाही.

**म्हणोनि अविद्या निमित्ते । दृश्य द्रष्टुत्व वर्ते ।**
**ते मी नेणे आइते । ऐसेचि असे ।।८।।**

वस्तुतः 'सर्वं खल्विदं ब्रह्म' अशीच स्थिती असल्याने अविद्येच्या निमित्ताने म्हणजे आत्मरुपाचा विसर पडल्याने दृश्य दृष्टत्वाचा अनुभव शुद्ध परमात्मतत्त्वाचे ठिकाणी येत असेल तर येऊदे. पण अधिष्ठानरूप परमात्म्याचे ठिकाणी त्याचा सुगावाही नाही.

**जेवी नाम मात्र लुगडे । येऱ्हवी सुतचि ते उघडे ।**
**का माती मृद भांडे । जयापरी ।।९।।**

एखाद्या वस्त्राला लुगडे या नावाने त्याचा व्यवहार केला तरी त्यात जसे सूतच आहे किंवा मातीचे भांड्यात मातीच जशी प्रचीतीला येते, त्याप्रमाणे द्रष्टा-दृश्य व्यवहारामध्येही त्या दोनीहून केवळ जे सत्चिदानंदरूप तेच प्रतीतीला येते. हेच तत्त्व पुढे पंधरा ओवीपर्यंत अनेक दृष्टांत देऊन गोविले आहे.

श्रीदासराम लेखन वही क्र. २१६

*****

## प.पू.श्रीमामामहाराजकृत

## प.पू.श्रीज्ञानेश्वरमहाराज यांच्या संजीवन समाधी सोहळ्याचे वर्णन करणारा अभंग

आले भगवान आले संतजन । नवल महिमान ज्ञानेशाचे ।।१।।

ज्ञानाई ज्ञानाई बोलताती सर्व । निवालासे गर्व सुरवरांचा ।।२।।

विठ्ठल निवृत्ती मुक्ताई सोपान । नामा संतजन आलिंगिती ।।३।।

देव बैसविती ज्ञाना धरूनी हाती । ओवाळिती आरती ऋक्मीण्यादि ।।४।।

सुरवर येती विमानांची दाटी । करिती पुष्पवृष्टी ज्ञानेशासी ।।५।।

कार्तिक वद्य त्रयोदशी माध्यान्हेसी । समाधी शेजेसी स्थिर झाले ।।६।।

ज्ञानदेवालागी देवे दिला वर । दर्शने साचार मुक्ती तुझ्या ।।७।।

प्रेमपुरामाजी बुडाले सर्वही । तेथे दास पाही कैचा उरे ।।८।।

***

## प.पू.श्रीमामामहाराज यांना श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे ज्या रुपात दर्शन झाले त्याचे वर्णन करणारा श्रीदासराममहाराजकृत श्लोक

काषायांबर पादुकाहि चरणी मंदील श्रीमस्तकी ।
कर्णी कुंडल ती गळ्यात झळके रुद्राक्षमाळा निकी ।
हातामाजी कमंडलू नि बरवा शोभे भला दंड तो । गोविंदा
पुढती प्रकाशरुप जे त्या ज्ञानिया वंदितो ।।

***

|| श्रीराम ||

# अक्षरे चैतन्याची भाग - २

# विभाग - २

-

# प्रकरण - १

श्रीदासराममहाराजकृत सानंद टीकेसह

# श्रीज्ञानदेव तेहेत्तिशी

**प्रस्तावना :**

या प्रकरणात श्रीज्ञानेश्वरमहाराज यांच्या 'ज्ञानदेव तेहेत्तिशी' या मूळ तेहेतीस ओव्यांच्या ग्रंथावर दासराममहाराज यांनी ४५० ओव्यांची विस्तृत सानंद टीका लिहिली आहे. हे प्रकरण श्रीदासराममहाराज यांनी पौष शु.७ शके १८६५ दि.२.१.१९४३ म्हणजेच वयाच्या २३ व्या वर्षी लिहिले. ही टीका लिहिण्यास कारण म्हणजे, पंत बाळेकुंद्रीकरमहाराज यांचे शिष्य प्रेमयोगी श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर यांनी श्रीदासराममहाराज यांना कोणत्यातरी ग्रंथावर टीका लिहा असे सहज सुचविले. त्याप्रमाणे श्रीदासराममहाराजांनी ही टीका लिहिली आहे.

हे प्रकरण लिहिण्यास श्रीदासराममहाराज यांनी प.पू.सद्गुरू श्रीमामामहाराज केळकर यांचे अनुज्ञा घेतली व कुलदैवत श्रीरामेश्वर सोमेश्वरादि यांचे स्मरण केले. तसेच प.पू.सद्गुरू श्रीनागाप्पाण्णामहाराज निंबरगीकर व प.पू. सद्गुरू श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांना वंदन करून टीका लिहिण्यास प्रारंभ केला. प.पू.सद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज यांच्या कृपेने ती लिहून पूर्ण झाली. तसेच या ग्रंथास प.पू.सद्गुरू श्री गुरुसिद्धाप्पामहाराज नीलवाणी यांनी आशीर्वादपर चार शब्द लिहिले. तसेच प.पू.सद्गुरू श्रीदादासाहेबमहाराज कोटणीस व श्रीमंगेश रामचंद टाकीमहाराज, मुंबई यांचे आशीर्वाद लाभले आहेत.

डॉ. के. वा. आपटे यांनी यापूर्वी ज्ञानदेव तेहेत्तिशी या ग्रंथावर थोडक्यात प्रस्तावना लिहिली होती ती खाली देत आहे.

श्रीज्ञानदेवांचा 'श्रीज्ञानदेव तेहेत्तिशी' हा ग्रंथ योगमार्गातील रहस्य उलगडून दाखविणारा आहे. यामध्ये प्रामुख्याने योगातील पश्चिममार्गाचे वर्णन

आलेले आहे. पश्चिम मार्गातील षड्‌चक्रांचा अवघड घाट ओलांडून चिदाकाशामध्ये 'खेचरी मुद्रा' कशी लागते हे सांगून, अलक्ष्य मुद्रेच्या सहाय्याने तो योगी, उन्मनीतील आत्मरूपाशी कसा एकरूप होतो याचे येथे वर्णन आलेले आहे. सोऽहं अजपाजपाच्या साधनेने, योगातील कठीण असा षड्‌चक्रांचा पश्चिममार्ग कसा ओलांडतो व त्याला सोऽहंसिद्धी कशी प्राप्त होते याचा आलेखच येथे प्रस्तुत केला आहे.

ज्ञानदेव तेहेत्तिशीतील ३३ ओव्यांवरती श्रीदासराममहाराजांनी लेखन वही क्र.७२ मधे ४५० ओव्या लिहिलेल्या आहेत. या पद्यात्मक विस्तृत टीकेला त्यांनी 'सानंद टीका' असे नाव दिलेले आहे.

**(१) पैल तूर्येचे मेरे । नयनांतुनि नयन हेरे।**
**सर्व साक्षी समरे । परब्रह्म ।।१।।**

टीका :- ज्ञानदेवा तूं माऊली । योगी जनांची साऊली । तुवां निगमसारवल्ली । प्रकट केली ।।१।। तूं तो अमरचि या भूगोलीं । व्यापक झालासी नभोमंडळी । तुझी मूर्ति प्रकाशली । श्रीहरि ऐसी ।।२।। भक्तजनासी पावली । ऐसे संत बोलिती बोली । म्हणोनी विनति चरणकमळीं । दर्शन कीजे या भक्ता ।।३।। सर्वा ठायीं तूंचि ज्ञान । तुज जाणतां समाधान । म्हणोनि होईजे प्रसन्न । श्रवणपुटाबोधोनि ।।४।। माझे कर्णी सांगिजे गुज । तव अंतरीचे जे निज । अंतरीचें काज । जाणोनिया ।।५।। धन्य सद्‌गुरु हनुमंत । जेणें बोधिला परमार्थ । तोचि राहो जागृत ज्योत । अखंड स्नेहें ।।६।। तृप्त करी माझी तान्हुली । मी आलोसे तुजजवळीं । नुरवी अज्ञानकाजळी । सानुलियाची ।।७।। तेहत्तिस ओवियांचा बोध । करोनि सांगिजे विशद । अंतरीचा अंतरीं नाद । घुमवोनि ।।८।। तूंचि कैवल्याचा पुतळा । भक्तिज्ञानाचा उमाळा । म्हणोनि तोचि स्फूर्तिजिव्हाळा। प्रगट करी ।।९।। तूं योगियांची समाधी । तोडिसी सर्वही उपाधी । तुझेनि कृपे चित्तशुद्धी परिपूर्ण ।।१०।।



अंत:करणें हांक दिली । ते अंत:करणा मिळाली। समाधान वृत्ति केली । ज्ञानाईनें ।।११।। ज्ञानाई प्रगट झाली। म्हणोनियां मिठीच दिली । दोनी भुजांनी कवळी । ज्ञानेश्वर ।।१२।। जरी कां असलो पामर । ज्ञानराजाचे डिंगर । पाठीराखा सर्वेश्वर । ज्ञानदेव ।।१३।। पुसे ज्ञानाई माऊली । काय इच्छा अंतरी धरली । अंतर्वृति ओळखिली । तत्‌क्षणीं ।।१४।। दिले पूर्ण आशीर्वचन । होवोनिया सुप्रसन्न । तेंणें मना समाधान । नवल झालें ।।१५।। अक्षर निराकारीं वाहिले । अर्थरुपे प्रगट झाले । म्हणोनियां मीया नमिले । आदिबीज ।।१६।। तेचि सांगती ज्ञानेश्वर आपण । निर्गुणचि जाले सगुण । नयनांतुनि हेरे नयन । डोळियानें ।।१७।। पैल तुर्येचे मेरे । नयनातुनी नयन हेरे । जेथ आपणया विसरे । आपणपे ।।१८।। तरी ते तुरिया कवण । ज्ञानराजे द्यावे सांगून। जया परौते पाहणे आपण । आपणिया ।।१९।। उपाधिभूत जे जीवन । त्याचे करितां पृथ:करण। स्थूल सूक्ष्म आणि कारण । वेगळे होती ।।२०।। त्रिकुटाचे करोनी भेदन । जागृति स्वप्न सुषुप्ती शून्य । उल्लंघोनि वरूतेपण कृपे जाले ।।२१।। तेथ उरला नि:शेष शब्द । जो आटता उन्मनी अभेद । श्वेत साक्षात्कार सिद्ध । जया पैल ।।२२।। तया उन्मनीचिये ताटीं । प्रस्फुटगगनाचिये दिठी । हंकार जीवित्वाची गोठी। चैतन्यीं सरली ।।२३।। उन्मनीची जेका पहा । उन्मन दावी जेका अहा। केवलाकाशाची जे रहा । जीवनाची ।।२४।। ऐसी तुरिया प्रकर्षे चाळविली । तरी वृत्ति स्थिरता पावली । वृत्ति वृत्तिच सरली । साम्यशब्दे ।।२५।। वृत्ति आत्मते रिघाली । उर्ध्वमुखी अखंड धाली । औटपीठाची साउली । पडली जेथ ।।२६।। तया तुरिये वरुतिये स्थिती । ज्ञानराजे कथिली निगुती । जेथ समाधान चित्तीं । चित्ताचिये ।।२७।। तुरीयेपैल नयनीं नयन । तेथें साक्षी भगवान । जेथ विश्वात्मा दर्पण । होवोनि ठेला ।।२८।। सहज चतुर्विध वक्त्री । बाह्य चक्षूंचिया नेत्रीं । साधक रिघती अहोरात्री । तुरीयेपैल कैसेनि ।।२९।।

पहातां तुरियेचे उपरि । ऐसी ही दृष्टी फिरे माघारी । बाह्य दृष्टीते अंतरी । रिघो न शके ।।३०।। जेथ अलक्ष दुर्गाची पहाणी । परतली भृकुटीपासोनी । तेथ लक्ष लक्षेल कोठुनी । बाह्य दृष्टी ।।३१।। म्हणोनि डोळा तो गगन । नाद तोचि झाला कान । यथा शब्दांचे स्फुरण । जिव्हारुप ।।३२।। तरी हें गगन कैसे । पहांताचि अनारिसे। समाधान ओपे सौरसे । विश्रांतीचे ।।३३।। दशविध नादाते गिळोन । जो कां शब्द राहिला आपण । पहातां तेचि ये गगन । देखे स्वये ।।३४।। चिणिति चिण् चिणिति घंटानाद । शंख तंत्री ताल छंद । वेणू मृदंग भेरी प्रसिध्द । मेघनाद अगाधचि ।।३५।। हे दशनाद विरत । तेथ साधकू तो मत्त । आकाशाचा चढोनि प्रांत । चित्त लावी गगनातें ।। ३६ ।। नादरहित जें स्फुरण । तेचि शब्दस्वरुप गगन । पहातां नादाचें अधिष्ठान । वायुचि हा ।।३७।। वारियानें नादछंद। वारियानें सारा प्रबंध । विश्व पहातां अगाध । निर्माण केले ।।३८।। पहाण्यापासोनि जाला डोळा । जो निज तेजाचा उमाळा । शब्दरूपाचा प्रगट झेला । स्फुरण गुणे ।।३९।। याचे परते आकाश। जें चंचळ परि निराभास । तेचि चक्षूरुप लक्ष । पाहो लागे ।।४०।। पहाण्यापासोनि जाला डोळा । डोळा पहाणेपणा आला । तोचि डोळा स्थिरावला। पहाणियातू ।।४१।। पहाणेपण ते दृश्य । ऐसे जाणोनि सुरस । पहातां या विश्वास । आपणचि पहाणें ।।४२।। मग सहजचि फिरणे। लक्षी लक्ष्य स्थिरावणे । आपआपणां पाहणे । समाधान ।। ४३ ।। पहाणेची जालें पहाणेंपण। यांचे कारण चंचळगुण । पहातां एकत्व अभिन्न । काय वानु ।।४४।। डोळिया डोळा मिळाला । आरशापुढें आरसा ठेविला। लोलकासी लोलक भेटला। तरी पाहील काय ।।४५।। म्हणोनि आकाशदृष्टीचें देखणें। अलक्ष्य आत्म्याचें पहाणें । मिळोनि गेले एकपणे। एकसरा ।।४६।। पहाणिया देखणें भेटलें । तेणें आत्मचक्षुसि हेरलें । जें कां शून्य उगवलें । रविबिंबाविणे ।।४७।। म्हणोनि ते शून्य



दृष्टी । केवल पहाणें ज्याची दिठी। जेणें आत्मयाची भेटी । सहज होय ।।४८।। नयनांतोनि नयन हेरला । जेथ लाधली जीवनकळा । नयन लाधला आगळा । शून्याहोनि ।।४९।। दोन शून्यांचे देखणें । जेथ राहिले आत्मपणें। म्हणोनियां सर्वात्मपणें । समचि साक्षी ।।५०।।

**(२) पैल तूर्येचे पाठारी । औटपीठाचें शेजारी ।**
**अर्धमात्रेचे महाद्वारी । निजरूप उभे दिसे ।।२।।**

टीका : तूर्येपैल औटपीठ । नाद भरलासे घनदाट । तेचि मूळ मायेचे पीठ । जाणति संत ।।१।। नाद होताती अचाट । परि जाणावी आडवाट । पाणी शिरलें जे निघोट । दोन नयनीं ।।२।। नयनातु कळिया सांठ । पाणी वाहे अवचट । कानीची मुझोनि वाट । काय सांगो ।।३।। जीवन झालें श्रवणरूप । जीवन कळिया तद्रूप । सकळ संसार संकल्प । हारपले ।।४।। लटिका होय जो व्यवहार । जो कां त्रिपुटीचा व्यापार । हरिविण येरझार । जे का जाय ।।५।। ऐशा संसार संकल्पलहरी । हारपल्या औटपीठामाझारी । अनुहताचेनी गजरी । मनचि धाले ।।६।। अर्धमात्रा शक्तिरूपिणी । जेथे उदेली प्रणवखाणी । गगनासही जेथूनी । जन्म जाला ।।७।। उष्ण शीत आभा । अरूप आकारिला नभा । शब्द स्वरुप आरंभा । जेथें जाले ।।८।। आधी पहातां स्वयंप्रकाश । जेथ जन्म शीतोष्ण कळेस । प्रकाश लहरी डोळियास । दाविता न ये ।।९।। यालाच बोलती पहाणें । जें कां आकाशाचे देखणें । जयाचेनि परावर्तगुणें । दर्शनवस्तू ।।१०।। स्वप्रकाशीं शीतोष्ण कळा । तेथेंचि जाला गगनडोळा । प्रकाश फुटोनि आकारिला । पोकळ भाग ।।११।। आकाशीं सांचली हवा । जीवनकळीं वायु बरवा । वायु तो नटला आघवा । नानागुणी ।।१२।। वायु तेज आणि आप । रूपें नटलें प्रणवरुप । वारियानें हें अपाप । दृष्य जाले ।।१३।। पृथ्वी धारणा आपें केली । आपापासोनि पृथ्वी जाली । अणुरेणुही पोकळी । व्याप्त व्याप्त

झाली ।।१४।। अर्धमात्रा तें गहन । सकळ दृश्याचें कारण । ईकार एंकार मातृका दोन । जयालागी ।।१५।। याचि अर्धमात्रेंचे द्वार । महाशून्याचा विस्तार । जेथ जाली प्रकाश लहर । अशब्दरुप ।।१६।। तेथ पहातां निजरुप । जें सगुणीं आले अपाप । नानागुणें दृश्यरुप । धारण केंलें ।।१७।। जेथ एकत्वचि सहज । तेथ काय म्हणावे निज । शुद्ध संकल्प स्वरुप ओज । आपण वस्तु ।।१८।। जेथ आपणी आपण । सर्वत्र राहिला भरोन । जेथ बुडालें चिद्घन । निजत्व काय दावावे ।।१९।। जेथ दृश्य, द्रष्टा आणि दर्शन । पहाणें लागे आपणां आपण । तेथिचे नि:शब्द समाधान । निःशब्द ते ।।२०।। नि:शब्द कैसे आले शब्दी । अस्ति भाति प्रियोपाधी । जोडिली कैसी संधी । दर्शनाची ।।२१।। आकाश वायूचीया गाठी । आत्मा सामावला हृदयपुटी । वायुप्रकाश आकाश दिठी । अरुप आत्मा ।।२२।। निजाचें तेज कीं तेजाचें निज । ऐसे आहे येथिचे गुज । आपआपणा सहज । पहाणें जेथें ।।२३।। निजापासोनि तेज जालें । तेजीं निज सामावलें । रविशशी उजाळले । मार्ग ज्याचें ।।२४।। श्रवणांतोनि नयनी आला । नयनी निजाते मिळाला । पहातां पहाणेपणा गेला । दृश्य भागू ।।२५।। पहातां पहाणे सरता साक्षी । निजी निजस्वये लक्षी । लक्ष्य जहाले अलक्षी । स्थिर कैसे ।।२६।। नयनासी मिळता नयन । तेथ पाही कवणा कोण । दोही डोळीया आपण । साक्षीरुप ।।२७।। पहाण्यापासोनि जाला डोळा । जो का पहाणेपणा आला । आतू महाशून्य गोळा । काय सांगू ।।२८।। नीलबिंदूचे आवरण । महाशून्य तें गहन । जेथ भरला साक्षी आपण । निजरुप ।।२९।। चिद्गुण वैभवाचें तेज । तेचि आपुलें स्वरुप निज । जेथ दिननिशी सहज । प्रगट झाली ।।३०।। नयनीं चिन्मयाचा मार्ग । पाहतां कैचा निजयोग । पहाणे प्रकृती सवेग। निज आत्मा ।।३१।। साक्षीपासोनि पहाणें । जें कां नटलें पहाणेपणे । पहाणेपणाचे देखणे । निजरुप ।।३२।।



**(३) पहा तूर्येचे वरुते । भ्रमरगुंफेचे खालते ।**
**समसमान सरते पुरते । चहूंकडे ।।३।।**

टीका :- पहातां तूर्येचे वरुते । भ्रमरगुंफेचे खालते । समरुप ठाकलें तें । आत्मरुप ।।१।। गगनाचा जालीया ग्रास । जाय पहाणेपण लयास । नामरुप गुणाभास । उरला कोठें ।।२।। प्रथम वायू सर्व घन । तेथ जे लहरी निर्माण । तेणें जाले पोकळपण । गगन तें ।।३।। वारिया पोटीं गगन । सगुणा दावी जे निर्गुण । ज्याचेनि तुषारु सगुण । विश्वलहरी।।४।। ऐसीया वारियाची सिद्धी । पावोनि महाभक्ता समाधी। वस्तुचिया होवोनि धुंदी । आनंदमग्न ।।५।। वारें झणकार करी । रामनाम जयजयकारी । सांडोनि वाचाया चत्वारि । समचि जाले ।।६।। हरिवाचें हरीचा गजर । पहाता चालिला अहोरात्र । यया तुरियेचे वर । समचि वस्तु ।।७।। रुप तेंचि जालें नाम । नाम तेंचि स्वरूपब्रह्म । नामीं सांचलें अनाम । नामीं कैंचे ।।८।। रामनाम सर्वागळे । न ये आकाशाही मेळे । आकाशिया पैल आतळे । साधकासी ।। ९ ।। येथोनि आतुडे ही वाट । श्रीगुरुकृपें अवचट । नामीं स्वरुप घनदाट। समचि जाले ।।१०।। रामनामीं समचि वस्तु । जेथ नुरे पाहे द्वैतु । जरी कां प्रसन्न सद्गुरुनाथू। प्रचित ये।। ११ ।। श्रोत्रवाणी चक्षु पैल । नाम पहातां सोज्वळ । जेथ उपाधी चंचळ । विलया गेली ।। १२ ।। जेथ पा नोहे विषम। ते तो अवघेचि सम । जे कां आगम निगम । दावीच ना ।। १३ ।। चहू शून्यें समचि जालीं । तेथिची विषमता निमाली । एक वस्तुचि व्यापिली । अनादि जे।। १४ ।। चारी शून्याचा विस्तार । तोचि अखिल चराचर। एकतत्त्व परात्पर । होवोनि ठेले ।। १५ ।। एक नाम ते श्रीहरि । आदिअंती पहाले कुसरी । द्वैत नाम पहातां दुरी । दुरावले ।। १६ ।। जीवशिवासी जो समा। म्हणोनि तो हरि आत्मा । जेथ सकळही विषमा । लाही जाली।।१७।।

**(४) पंचवठीचे शेवटी । उभे तूर्येचे पाठी ।**
**लखलखीत पाठीपोटी । वस्तु उभी ।।४।।**

टीका :- पंचमातृका ते पंचवठी । तयाचिया जे शेवटी । आकाशाचिये दिठी । शुद्धाकाश ।।१।। पंचमातृकें लाभें उन्मनी । तयातु पांडुरंग गगनीं । देखिला संतजनी नयनीं । आदिबीज ।।२।। आकाशीं सूर्यचंद्र लोपला । तरी तो गगनगाभा राहिला । जरि तो अग्नि निवटला । तरी गगन तैसेचि ।।३।। उरवडिले स्फुरण कोंभा । तरी तो राहिला गगनगाभा । अरुप नाम दिव्य शोभा । गगनातु ।।४।। जेथें दिव्य तेज झळाले । आदिमध्यांत नाडळे। अवकाश स्फुरणासि आले । प्रणवबीज ।।५।। जेथ पंचमातृका निमाली । तेथ नामवस्तुचि राहिली । जे कां उन्मनीसी टेकुली । स्मरणरुप ।।६।। तरी तें स्मरण कैसे । जें वस्तुरुप प्रकाशे । दृश्यपडळ जालेसे । जये ठायी ।।७।। प्रकृतात्मा जन्मे मरे । भासे विस्मरणाचे वारें । तयासि सारोनि पर जे उरे । तेंचि स्मरण ।।८।। म्हणोनि सांगती ज्ञानेश्वर समर्थू । तेचि परात्पर वस्तू । जेथ आपण होये निवांतू । गुरुकृपें ।।९।। ते तो वस्तू अव्यक्त । जेथ नुरलेंसें द्वैत। कल्पनेचा लवहेत । जळोनि गेला ।।१०।। जें दृष्टीमाजी कोंदलें । नवजे दोही हाती लोटलें । अंगसंगे स्वयें खेळे । तेचि वस्तू ।। ११।। भागिले तरी भागिता नये । पहातां एकीएकचि होये । शब्दरहित शुध्दचि स्वये । एकमेव ।। १२ ।। पाणी दोहाती लोटलें । तरी पाणी पाणीया मिसळे। तैंसे आकाश दुभागिले । नोहेचि कदा ।।१३।। शुध्दाकाश जें निघोट । स्वयंप्रकाश घनदाट । म्हणोनि त्याचें पाठपोट । दावावें काय ।।१४।। म्हणोनियां पाठीपोटी । जाला अवघा जगजेठी । संतजनांचिये गोठी । जाणती संत ।।१५।।

**(५) पश्चिमेचेनि पाठे । उन्मनीचेनी प्रेम लोठे ।**
**खोलोनि ब्रह्मरंध्र कपाटे । समाधीसुखा कारणें ।।५।।**



टीका :- अवघड त्रिकुटांचा घांट । चढोनियां नाम चोखट । मनपवन अवचट। ऊर्ध्व जाले ।।१।। आकाशाचे उपरि मार्ग । पश्चिमेची रहा चांग । अलटपलट सवेग । होवोनि ठेला ।।२।। जेथ अमृतजीवनकळा । ऊर्ध्वमुख वाहे डोळा । जेथ जडोनि गेला डोळा । भृकुटीचा ।।३।। योगिजन जे प्राशति । ते अमृतकळा अमरस्थिति । काळावरी मात करिती । निरोधुनि ।।४।। यया त्रिकुटाचे उपरि । उन्मनी प्रेमाची वाहे झरी । जे कां पातली ब्रह्मरंध्री । समाधिसुखा ।।५।। ब्रह्मकपाट गेली फोडोनी । ऐसी उन्मनीची स्मरणी । मन धाले रामकृष्णीं । हृदयातु।।६।। चैतन्याची करोनी मूस । आंत ओतिला ब्रह्मरस । भाते लाविले जयास। प्राणापान ।।७।। तेणें जठरी पेटला अग्नि । सप्तधातूसी आटवोनी। जीवनकळीचें जीवन गाळोनी। ओसंडिले हृदयातु ।।८।। मग होवोनि मनाची शुद्धि । सांधोनि झाडिली नाडीची सांधी। मनपवनाचा अवधी। एक केला ।।९।। मग जो चाले पवन । सुषुम्नेसि रोखून । सकळ द्वारांचे करोनि रोधन । सुषुम्नाकार जालासे ।।१०।। तंव ते सुषुम्ना चालली । जेथोनि प्राणकळा धावली । होवोनि गेली ते तुली । जीवनकळा ।।११।। तया रामकृष्णकळेमाझारी । मनाची जाली उन्मनपरी। अकुंठगति ते साचारी । जीवनकळा ।।१२।। ओलांडिलें गगनशून्य । पुढें लाधलें शुध्दगगन । पुढें सांडिले अ:शून्य । निरशून्या ।।१३।। ब्रह्मकपाट फोडोनि नयनीं । जीवन गेलें महाशून्यी । तेचि ब्रह्मरंध्र खोलोनि । समाधी आले ।।१४।। ब्रह्मकपाटी त्रिनेत्र । लावितां खोलिले ब्रह्मरंध्र । जें काय ब्रह्माचे द्वार । बिंदुमात्र ।।१५।। पाहतां दिसे अणुप्रमाण । परी सामावलें गगन । तेथ पातुलें जीवन । समाधिसुखा ।।१६।।

**(६) अजपजपाचेनि छंदे । अनुहताचेनि नादें ।**
**सत्रावीचें निजछंदे । स्वरुप देखावे तूर्येवेळे ।। ६ ।।**

टीका :- अखंड जप चाले देही । म्हणोनि ते अजपा होई ।

जपावेगळी परी कांही । नोहेचि जेथें ।।१।। सूर्यापाशी दिनरात । बोलणें काय हें तेथ । जन्ममरण किमर्थ । अमृतापाशी ।।२।। अखंड जालीयां तें सुख । बोलावें काय सुख:दुख । आत्मरुप जेथ एक । मी तूं काय म्हणावें ।।३।। शब्द जालीया परिपूर्ण । दाविता नये शद्बप्रमाण । बिंदु जालीया परिपूर्ण । उपाधि कोठें ।।४।। तेचि जाली येथपरी । जप चालिला अहोरात्री। म्हणोनियां कोणीतरी । अजपा नाम ठेविलें ।। ५ ।। एकविसहजारसहाशें प्रमाण । चाले दिनरातीं श्वासांचे श्वसन । तितुकें अखंड चाले स्मरण । अजपाते ।।६।। कायीं व्यर्थ जाय नाम । तयासी जपतां पूर्ण काम । अजपा जप तो उत्तम । बोलिलासे ।।७।। लुब्धालिया अजपा छंदे। रंगला अनुहताचेनि सादें । जरि कां मन नाम नादें । मेळविले ।।८।। डोळिया डोळा मिळवून । जरी कां वाणीरूप श्रवण । जाले एकचि जीवन । एकसरा ।।९।। येणें रीति नामछंद। सांधितांची हा गोविंद । प्रगट अनहुतनाद। श्रवणपुटी ।।१०।। अनुहातघंटाश्रवणीं । श्रवणाकार जीवन नयनीं । प्राणकळा गगनांतूनी । श्रवणीं आली ।।११।। नयनाकार श्रवणवाणी । प्राणकळाही जेथूनी । ओघवती निशिदिनी । नाद तेथें ।।१२।। सोहं चक्री छेडतां तंत। धारणेचा तणावा येत । सोहंतार नाद देत । मंद्रघोर ।।१३।। महाशद्ब शद्बी आला । तो नादे घुमोनि ठेला । तेथें निजछंद लागला । सत्रावीचा ।।१४।। सोळाबाराची मिळणी । रामकृष्ण ओविले मणी । तयाचिये एकपणी । सत्रावी वाहे ।।१५।। सत्रावी ते जीवनकळा । ऊर्ध्व अमृतओघ गेला । आकाशींया लागता डोळा । स्वरुप दिठी ।।१६।। रामकृष्णीं स्वरुप ठसा । पूर वोसंडे गगनासा । सारोनि सकळही दृश्या । एतुलिया ।।१७।। आता एकचि स्वरुप । जेथ आटले पुण्यपाप । गगनातु अग्निस्वरुप । पीतप्रभा।।१८।।

**(७) अंगुष्ठप्रमाण रारा यंत्र । ऊर्ध्व लक्षुनि अर्धमात्र ।**
**भेदिला मसूरप्रमाण नेत्र । चिन्मय स्वरुप पहावया ।।७।।**



टीका :- पंचमातृकांचेवर । पाहिले हे रारायंत्र । जया उपरि अर्धमात्र। चित्कला ते ।।१।। जेथ आकाशाची लावणी । जाली दृश्याची पेरणी । श्वेतश्याम कळारुपिणी । शीतऊष्ण ।।२।। अर्धमात्रेचिया अरुते । रारा यंत्र पाहिलें तें । त्याचे तेंजें अर्धमात्रेते । लक्षिले ऊर्ध्व ।।३।।ललाटाचिया तटी । ब्रह्मरंध्राचे ऐलपटी । रारायंत्र चित्कळा दिठी। अंगुष्ठमात्र ।।४।। जेंतुली पहातां हंसस्थिति । तेजोरुपात्मप्रचीति । सोहं हंसाची अनुवृत्ति । उजाळली ।।५।। प्राण पातला हंसगति । म्हणोनि चालिली अनुवृत्ति । ऐशी साक्षात्कार स्थिति । तेजोमय ।।६।। तेणें लक्षिली अर्धमात्र । साक्षी आत्मा जो स्वतंत्र । तेणें भेदिलासे नेत्र । मसूरप्रमाण ।।७।। आपणांसि पहाया आपण । भेदिलेंसें शून्यपण । जेणे आथिलेसें द्वैतपण । आत्मसुखा ।।८।। मग ते चिन्मय पडले गाठी । पाहतां शून्याचें शेवटी । नीलबिंदुमात्र दृष्टी । लक्षितांचि ।।९।। जेथ पहाणें विसावलें । गगनाचें देखणे आटलें । पहाणेंपण तें निमालें । सकळ दृश्य ।।१०।। जरि कां उदयी जाय तरंग । तरी सिंधू तो अभंग । लक्ष्य लक्षतां प्रसंग । उरेल कायी ।।११।। लक्ष्य लक्षी स्थिरावले । तरी तें अलक्ष्यचि जालें । जेणे स्वरुप देखिलें । चिन्मयाचे ।।१२।। चंद्रसूर्य शिणले नयन । जेथ गेले हारपोन । चैतन्य विश्रांतिकारण। पातलें जेथ ।।१३।। जीवनांचे करोनि मंथन ।। जे निर्गुणची जाले सगुण । सोहंतत्त्वी गगनी गहन । भरोनि ठेलें ।।१४।। नीलबिंदूचिया पोंटी । चिदाकाशाचिये दिठी । चिन्मय स्वरुपाची गोठीं । पहातां दिसे ।।१५।। जीवशिवांची मिळणी । होवोनियां सोहंगगनी । जीवन प्रगट सगुणपणी । चिन्मय ते ।।१६।। तेथ साक्षात्कार स्वरुप ।। जेणें नुरलासें संकल्प । समाधानचि अपाप । होवोनि ठेले ।।१७।। ज्ञानराजा हे दृष्टी लाधली । तेचि पाहिजे साधिली । सद्गुरुनाथें कृपा केली । तरीच घडे ।।१८।।

**(८) खोलोनि दसवेद्वारांचे कवाडपाठीं । मन उन्मन परेच्या तठीं।**
**अरूप दिसतसे जगजेठी । चहूंकडे ।।८।।**

टीका :- षडचक्राची जे फिरकी । तेथें खावोनि एक गिरकी । त्रिवेणी या ऊर्ध्वमुखी । व्हावे कारे ।।१।। त्रिगुणाचे उल्लंघन । करुनि त्रिकुटी आरोहण । करितां सद्गुरु सुप्रसन्न । कृपा करिती ।।२।। श्रीहाट गोल्हाट औटपीठ । ओलांडोनिया अवचट । मनाचे करोनि उन्मन निघोट। दशमद्वार दावियलें ।।३।। नवद्वारांचे निरोधन । करोनि साधिलिया आसन। धारणा जालीया धारण । दशमद्वार आतुडलें ।।४।। जें पहातां अतिगहन अणुहोनि सूक्ष्मप्रमाण । जेथ निवटे अहंपण । मूळीचे मूळीं ।।५।। जेथ दिसे पांडुरंग। दावी अपुलें पांडुर अंग । श्वेतकळा जे अव्यंग । गगन दिठी ।।६।। दशमद्वारातु हे स्थिती । दशमद्वारी उन्मनवृत्ति । परेपासोनियां चित्ती । स्मरण चाले ।।७।। जेथ आकाशचि निमालें । ऐसे दशमव्दार आतळे । चौशून्याचे लया गेले । बीज जेथे ।।८।। तेथ श्वेत कळेविण। काय दाखवावें आन । अरुप आत्मा जो अगुण । तोचि उरे ।।९।। विंहगम कपि मीन । मार्ग परतले जेथून ।। पिपिलीका मार्ग गहन । तोहि अरूता राहिला ।।१०।। चत्वार देहाचा निरास । होवोनि सांडितां हें दृश्य। अरूप दशमद्वारी प्रकाश। कोंदले कळें ।।११।। मग ते चहूं ठायीं जाले । तयाविण कांही नाडळे । ऐसें सत्य सत्य केलें । सद्गुरुनाथें।।१२।।

**(९) परेचिया उपरि । ऊर्ध्वगगनीं लागली खेचरी ।**
**नाटोपती आनंदलहरी । समाधिसुखाचिया ।।९।।**

टीका :- आकाशाचें पैल जावोन । देखियेलें ऊर्ध्वगगन । जें कां गगनाहोनि आन । शद्बस्फुरण न राहे ।।१।। जेथ उरलेसे अगुण । पहातां कांहीच नाही गुण । गुणासवें जावोन । मिळालोसे ।।२।। तव जालो गुणातीत । जया संत म्हणती अव्यक्त । नामरुप हे प्रकृत । उरलेना।।३।। अनंताचे अनंत नाम । ते तो बोलिले सर्वोत्तम । प्रकृत नामरुपाहोनि



परम । शद्बागळे ।।४।। गुणा आगळे नामरुप । म्हणोनि अनंत नामे अरुप । एक तत्वचि अपाप । हातीं आलें ।।५।। शब्दगुणांचे परावर्तणें। जेथ एकचि पहाणें देखणें । लक्ष भेदोनि अलक्ष्यपणें । अंग पहालें ।।६।। आत्मयाचें अंग। पारदर्शक जैसे भिंग । एक वस्तुचि अनंग । उरलीसे।।७।। प्रकृत जीवनाहोनि आगळा । चंचळू हे दावी डोळा । तोचि होवोनियां ठेला । आत्मपणें ।।८।। एवं पावोनि अगुण । ऊर्ध्व लक्षिलें गगन । जयालागी बोलती शून्य । अःशद्बाहि गिळिलासे ।।९।। तेथ तंद्री राहोनि गेली । प्रस्फुट वाचाही खादली । शीतळ वाणीही लोपली। स्फुरणापैल जे होती ।।१०।। नाम सारजिव्हा जै खादली । जीवन ओतिलें जीवनकळी। प्रस्फुटगगन दिठीं कमळीं । ऊर्ध्व जाले ।।११।। तेथोनि जीवन ऊर्ध्व चाली । गति अकुंठित जाली । म्हणोनि खेचरी लागली । पहातां पहातां।।१२।। खेचरी मुद्रेचा आनंद । कारण ते दृष्टि अभेद । जरी कां जाला सूक्ष्मभेद । चित्कळें आला ।।१३।। परी ते चित्कळा न जाणली । तरी वृत्ति भ्रमित जाली । सुख दु:खी हे पडली । गुंती कैसी ।।१४।। अभेदासी आनंदलहरी । उसळती जीवनाभीतरी । समाधिसुखाची कुसरी। वानावें काय ।।१५।। हें सुख सर्वांगळे । अभेदावाचोनि न मेळे । गुरुशिष्यहि ये वेळे । अभेद होती ।। १६ ।।

**(१०) खोलोनि दशमद्वारीच्या छिद्रा । जातां भेटी रामचंद्रा ।**
**योगिया लागली योगमुद्रा । चहूंकडे ।।१०।।**

टीका :- खोलतां दशमद्वार छिद्र । आंत भेटे श्रीरामचंद्र । आरुढ जे कां हंसावर । तेजोरुप ।।१।।अर्धमात्रेचिया अरुती । पंचमातृकेपरती। कमलमुखी हंसगती । गगनाच्या ।।२।। सोहं सोहं अनुवृत्ति । जेथ पंचप्राण विचरती । तयावरी पां निगुती । रामरुप।।३।। सूर्यचंद्र कळा सरली ।। जे गगनापाशीच थकली । पैल अनुवृत्ती जाली। रामरुप ।।४।। पीत स्वरुपाची कळा । जेथ लागला गगन डोळा । तयेवरी पा नटला ।

रामचंद्र ।।५।। अर्धमात्रेचिया पोटीं । पंचमातृकेचे पाठी । प्राणापैंल हंसा मिठी । रामचंद्र ।।६।। नवल तयाचा प्रकाश । दिसे झांकिलिया दृष्टीस। जो न ये उदयास्तास । कदाकाळीं ।।७।। जो काळा ना सावळा । ढवळा ना पिवळा। जेणें जीवाची जीवनकळा। उजाळली ।।८।। ऐसा जयाचा प्रकाश । पहातां जो अविनाश । पहाणे पहाणेपणास । जेणें आलें ।।९।। हंसावरी श्रीराम दिसत । सांगती सद्गुरु हनुमंत । तेथ दृष्टी जडली निभ्रांत । सत्य सत्य त्रिवाचा ।।१०।। हंसावरी हे जीवन । हंसावरी तगला प्राण । प्रत्यक्ष रामराय आपण । हंसावरी ।।११।। तेथ जे लागली मुद्रा । तेचि योग्याची योगमुद्रा। चहुंकडे रामचंद्रा । भेटी जाली।।१२।।

**(११) चहूं देहाची साक्षिणी । उभी असे गोल्हाटगगनीं ।**
**अवस्था ते उन्मनी। भोगिती योगी ।।११।।**

टीका :- चहूंदेहाची साक्षिणीं । उभी गोल्हाटीचें गगनी । गोल्हाट गगन गेलें भरोनि । सुषुप्तिया ।।१।। अवकाश अधिष्ठान । तेणेंचि अस्तिभाति गुण । सकळही अवस्था संपन्न । तेणेंचि योगें ।।२।। तेणेंचि प्रियाप्रिय जालें। तेणेंचि सत्य उदया आलें । नामरुप गुणे केलें। झाकोळले।।३।। तेणेंचि जाले बोलाबोल । निर्मियले दृश्यपडळ । सुषुप्ति व्यापिलें केवळ । गोल्हाट गगन ।।४।। तेथ चित्कळा साक्षिणी । चहूं देहाची स्वामिणी । सुखदु:खाची कहाणी । सांगतसे ।।५।। सुखदु:खाची जाणीव तेथ । तेचि होय परावर्त । तेणेचि सुखदु:ख भासत । इंद्रियासी।।६।। पहातां सुखी दु:खी कोणी । व्हावे कायसे म्हणोनि । भ्रांतियोगे जाणीवपणी । सुखदु:ख ।।७।। सुखदु:ख जाय जेथें । चित्कळेंपाशिया निरुते । साक्षीरुप चित्कळा तें । संवेद्य कोण ।।८।। म्हणोनि सुखदु:ख पाही । कांही उरलेचि नाही । आपआपण या ठायीं । आपणचि ।।९।। म्हणोनि या निशिदिनी । पावली अवस्था उन्मनी । मन धालें रामकृष्णी । हृदयातु ।।१०।। मनाचें हरलें मनपण ।। म्हणोनि



अवस्था उन्मन । सकळ इंद्रियें समाधान । हरिनामें ।।११।। ऐंसी उन्मन अवस्था योगी । रामकृष्णनामी भोगी । सकळ इंद्रिये असंगी । सर्व संगी ।।१२।।

**(१२) विराठाचें नाभीकमळीं । सेवटी हे सहस्त्रदळी ।**
**सोहं नादे लागली टाळी । योगिराजा ।।१२।।**

टीका :- सोहमस्मि नाद गहन । अनुवृत्तीचा वाहे पवन । गगनी जें सांठले गगन । प्रस्फुटपणें ।।१।।तया नादे जीवनकळीं । विराठाचें नाभिकमळी। महाशून्यातु झळाळी । सहस्त्रदळ ।।२।। जेथ पूर्णात्मदर्शन । जीवाचे सरलें जीवपण । तेचि जाले अनुसंधान । अखंडत्वें ।।३।। तेचि परिपूर्ण अखंड । अणुमात्र नोहेचि खंड । स्वरुप उजाळलें प्रचंड । सहस्त्रदळीं ।।४।। भाव आटले रामकृष्ण । तेचि पहाता जीवपण । आत्मस्वरुप गहन । प्रत्यया आलें ।।५।। तेथेंचि लागली टाळी । जे कां नामेंचि उटाळी । द्वयाद्वयासी जे टाळी। काय सांगो ।।६।। धन्य धन्य ऐसा योगी । आत्मस्वरुपासी जो भोगी। राहोनियां सर्व संगी । असंग जो ।।७।। उदकी जैसें कमलपत्र । तैसे मन ज्याचें विचित्र । असोनियां इच्छातंत्र । सकळापैल ।।८।। स्वयेचि स्वत: सिद्ध जाला । ऐसा योग सर्वागळा । ज्ञानाईने साध्य केला । गुरुकृपें ।।९।। धन्य धन्य ज्ञानदेव । स्वयेचि जाले देव देव । म्हणोनि नवलाव अपूर्व। देखियेला।।१०।। सांगितली अनुभवगोठी । सर्वावरी प्रेमदृष्टि । प्रेमाप्रेमाची पडतां मिठी । कळे गुज ।।११।।

**(१३) खेचरीं उंच उंच जावे । उन्मनी नयनीं स्थिरावे ।**
**समाधिसुख स्वभावें । दिसो लागे ।।१३।।**

टीका :- जे कां खेचरी लागली । टकीसी टक मिळाली । देहवृत्ति हारपली । आपणपें ।।१ ।। उंच उंच जाय जीवन । पहाणिया मिळालें

गगन । मनाचियें उन्मनपण । नयनातु स्थिरावलें ।।२।। चंचळ जाले अचळ । उरला चिदांशु केवळ । सर्वांग होवोनि शीतळ । काय धाले ।। ३ ।। मग पावली समाधिअवस्था । सहज लाधली सर्वात्मता । निजसुख स्वभावता । लाधलें की ।।४।। आपुला भाव तो स्वभाव । म्हणोनि भावापरी देव । जे का ज्ञानस्वरुप देव । निजगुज लाधलें।।५।। निजगुजा गूज जोडलें । मोहनाचे मोहन मिळालें । पहातां तटस्थचि जालें । दोनी नेत्र ।।६।। म्हणोनि तेचि पहाणें जालें । काय पहाणें आणिक उरलें । समाधिसाधन सिध्द जाले । येणेंपरी ।।७।। समाधी ते समाधान । काय बोलावे येथ आन । नवल येथिचे महिमान । जाणती संत ।।८।।

**(१४) खेचरीचेनि लागवेगें । उल्लंघोनि पश्चिममार्गे ।**
**घेतला चिन्मयाचा दुर्ग । परेहोनि परता जो ।।१४।।**

टीका :- खेचरी राहिली लागोन । ऊर्ध्व चालिलें जीवन । उलट पश्चिममार्ग गहन । ओलंडिला ।।१।। पहातां हा सूक्ष्म मार्ग । ऐल केले एकवीस स्वर्ग । स्वरातोनि गमन सांग । होवोनि ठेले ।।२।। मग चिन्मय दुर्ग अलक्ष । घेतला ज्ञानराजें प्रत्यक्ष । होवोनियां अतिदक्ष । एकसरा ।।३।। हे तो दुर्ग अति सान । पहातां दिसे अणुप्रमाण । सप्तसिंधूंचे आवरण । जयावरी ।।४।। नीर समुद्र पहातां नेत्र । सत्रावी ते क्षीरसमुद्र । नाकीं दधि खारा शरीर । रत्नाकर नामिया ।। ५ ।। माथा सिंधु तो मदन । हृदयी पहातां विस्तीर्ण मन । ऐसे दुर्ग अति कठिण । योगिया गवसे ।।६।। दुर्ग अलक्ष परेपर । खेचरी जरी कां तत्पर । लक्ष्या लक्ष मिळता सत्वर । प्रत्यय गोठी ।।७।। जया गुरुकृपें ज्ञान । ऐसा योगिराज आपण । घेई दुर्ग ते कठीण । सत्य सत्य ।।८।।

**(१५) औटपीठाचीये तळीं । भ्रमरगुंफेचिया पाठारमुळी ।**
**चिन्मय मोती झळाळी । महातेज ।।१५।।**



टीका :- औट पीठाचे शेवटी । भ्रमर गुंफेचे तळवटी । नवल प्रत्ययाची गोठी । मौक्तिकरुप ।।१।। धुताचिये मोतीं जळी । सूर्यकिरणी जेवि झळाळी । तयेपरीच हे पहाली । मुक्तवस्तु ।।२।। जें पहातां अति सतेज । निजाचेहि निजगूज । नामीं सांचलें अनाम सहज । उघड डोळीयां ।।३।। निज उघडपणां आलें । तवं ते उपाधिपैल जालें । साकारातीत होवोनि ठेलें । काय सांगो ।।४।। जेथ न पोचे नजर । जेणे फोडिले अंबर । रुप पहातां अरुवार । गगनटाकें ।।५।। बिंदुमात्र नील मोती । जे का सत्य अखंड स्थिति । अनंत ब्रह्मांडे होती जाती । जये ठायी ।।६।। हरिहरांचिया मूर्ति । जयापोटी येती जाती । ऐसीया विखुरली मोती । शून्यापाशी ।।७।। अर्धमात्रेचिया उपरि । दिसे मौक्तिक झालरी । दाही दिशेसी लहरी । मोतियाची ।।८।। पहातां हे मुक्तदशा । उरलीच ना जीवदशा । होवोनि ठेला. नव्हताचि ऐसा । अनन्यपणें।।९।। जाणीव नेणीव हें स्थिती । नोहे उच्चारणी निगुती । तेचि लक्षिलें अलक्ष मोती । पाणीदार ।।१०।। जाणनेण पैल अभ्यासू। करी तोचि विष्णुदासू । जयाची सुमति प्रकाशू । अध्यात्मिया ।।११।।

**(१६) पायातळीं तळपें ब्रह्ममणि । मकाराहोनि उंच गगनीं ।**
**आदिमध्यअवसानी। त्याचा मार्ग न सांपडे ।।१६।।**

टीका :- पायीं तळपे ब्रम्हमणि । अकारापैलाडू गगनीं । मकाराहोनि। अति उंच ।।१।। मकारीं पहातां उकार । उकारीं पहातां अकार । प्राणपण जे साचार । शद्बपणाचे ।।२।। अकार स्वर शद्बी प्राण । स्वयें बोलिले भगवान । नातरी शद्बा शद्बपण । कैंवि येई ।।३।। मकार तो नादस्थिति । उकार ते पहातां गति । अकार अधिष्ठान प्रचिति । गगनाची ।।४।। तयापैल ब्रह्ममणी । तळपें कैंचा उन्मन-गगनीं । चंद्रसूर्य हारपोनि । गेले जेथ ।।५।। जेथ जाले पा अद्वैत ।। परिपूर्णचि निभ्रांत । वर्तुळातु आदिमध्यांत । दावावें काय ।।६।। जाले एकादी अवसान ।

आदिमध्यअंत दावी कोण । निशिदिनीचें पहाणे आटोन । गेलें जेथ।।७।। जेथ आदिमध्यांत ऐलीकडे । तेथ मार्ग केंवि सांपडे । ब्रह्ममणीचिया उजेंडें । गगन लोपे ।।८।।

**(१७) स्वरुपीं भेदिलें सारे गगन । ब्रह्मी तटस्थ दोनी नयन ।**
**अखंड समाधि समान । भोगिती योगी ।।१७।।**

टीका :- सूक्ष्माहोनी सूक्ष्मपण । अणुपरमाणु गेले भरोन । तया गगनीं राहिलें शिरोन । स्वरुप हें ।।१।। आत्मरुपी चंचळपण । तेणेंचि झालें पोकळपण । दृश्याचें जें अधिष्ठान । पहाणे जालें ।।२।। पहाणेंचि जाले पहाणेपण । पहातां ते वस्तुचि आपण । तयाचिये अधिष्ठान । स्वरुपचि ।।३।। पहातां इये सर्वाठायी । स्वरुपावाचोनि कांहीच नाही। गगनी तरी भरले कायीं । तयाविण ।।४।। गगनांचें गगनपण । कोठे आहे तयांवाचून । तरंगाचे तरंगपण । पाणीच जेंवि ।।५।। म्हणोनि स्वरुपीं भेदिलें गगन । तेचि राहिलें लोचनीं भरुन । म्हणोनि तटस्थ नयन । दोनी जाले ।।६।। दोनी तटस्थ जाले नयन । गेले दृष्टीचें द्वैतपण। आतवरि एकचि पूर्ण । आत्मरुप ।।७।। म्हणोनियां समसमान। जाला श्रीहरि आपण । समाधि भोगिती गहन । अखंड योगी ।।८।।

**(१८) मनाची चंचळता । मोडोनि स्वरुपीं पडला गुंता ।**
**मिळोनि गेलें आत्मया अनंता । मन मुकले मनपणा ।।१८।।**

टीका : जेथ उरलें नाही गगन । तेथ कैंचे शब्दपण । शब्दचि ना तेथ मन । कैंचे उरे ।।१।। अवकाश अधिष्ठान । तेंथेंचि जालें सूक्ष्म मन । शुद्ध संकल्प अतिगहन । महाशून्यी ।। २ ।। रामकृष्णीं शुद्ध संकल्प । जे कां स्थिती निर्विकल्प । मन:संकल्पीं विकल्प । उदेला कां ।। ३ ।। मन:संकल्प नोहे शुद्ध । येरवी चिदानंदी बिंद । स्वरुपीं गुंतडा अगाध । जीवनाठायी ।।४।। शुद्धसंकल्प मनकमळीं । जीवन चाले जीवनकळी । तेथ आपणचि जाली । विश्रांति कीं ।।५।। स्वरुपीं गुंतलें मन । गुरुकृपेचें विज्ञान । परतले उन्मनपण । समाधान अखंड ।।६।। शुद्धसंकल्प गेला विरोन । ऐंसे रामकृष्णजीवन । श्वेतश्यामकळीं पूर्ण । आत्मया ऐसे ।।७।। म्हणोनि आत्मा तो अनंत । जीवविला साक्षी जेथ । मिळोनि गेलियाजि तेथ । कैसेनि मन ।।८।।

**(१९) स्वरुप उभें तूर्येचे मेळे । अर्धपर्नी अरुप खेळे ।**
**दसवे द्वारी ढळढळ उसळे । महातेज ।। १९ ।।**

टीका :- तूरीयेचिया साधनमेळी । साधन साधोनि ऊर्ध्व ओळी । गुरुकृपें चालिता चाली । स्वरुप दिसे ।।१।। अंगुष्ठ चोखीत श्रीहरी । वटपत्रीं क्रीडा करी । सहस्त्रदळाचिया उपरि । नवल जालें ।।२।। निर्गुणाची नवलपरी । देखियेली चिन्मयनेत्री । जीवन हे तयामाझारी । मिळोनि गेलें ।।३।। दसवें द्वारातोनि जातां । सहजानुभव देखतां । शून्य देखणें शून्या मिळतां । शून्यचि जालें ।। ४ ।।तंव ते जीवन ब्रह्मरंध्री । केवळ पहाणिया माझारी । तेथेंचि स्वरुप साक्षात्कारी । सहस्त्रदळी ।।५।। पहातां हे दशमद्वार । नवल तेजाचा प्रकार । ढळढळ महातेजसागर । उचंबळला ।।६।। महासागर दाटला । तो नयनपुटी मिळाला । नयनातोनि जीव धाला। निजसुखें ।।७।। आत्मयाची केवळ दृष्टी । त्याचें अग्र शून्य दिठी । जेथ होय उठाउठी । जीवनाची ।।८।। तेथ आपणपे पहाणें । आपआपणां भेटणें । दशमद्वारीं ऐक्यपणें । एकात्मते ।।९।। दृष्टि अग्रशून्यसार । तेचि सत्य दशमद्वार । जये ठायी मधुकर । खेळतसे ।।१०।। दशमद्वार अति सान । जेथ रिघालें गगनीं गगन । जेथ शून्यहि विलीन । होवोनि ठेलें ।।११।। बीजामाजी सकळवृक्ष। तैसेचि तेथ दृश्यादृश्य । व्यक्ताव्यक्त हे लयास । जाईजे पा ।।१२।। तरंग उदकीं निर्मिला । तो तेथेचि लया गेला । तैसा प्रत्ययो येतुला । दशमद्वारी ।।१३।। पिपिलिका मार्ग गहन । तयेपरी होवोनि

लीन । ऐल सांडिले गगनीं गगन । अवघेचि ।।१४।। ग्रासिली जीताची ओवरी । रामकृष्ण शून्यामाझारी । दोन शून्यातु साचारी । एकचि शून्य ।।१५।। रामकृष्ण हें जीवन । जहालें इये शून्यातून । गोनाम शद्ब विलीन । इये पाठीं ।। १६ ।। ऐसे दशमद्वारीचें छिद्र । यासीच बोलती ब्रह्मरंध्र। पैल सहस्त्रदळचक्र । आत्मयाचें ।।१७।। संतजनी प्रत्यय बोलिला। जो कां सहस्त्रदळी आला । दशमद्वार शद्ब योजिला । ब्रह्मरंध्रा ।।१८।। ऐसें येथिचे दशमद्वार । जेथ निर्गुण साक्षात्कार । स्वयंब्रह्म ज्ञानेश्वर । होवोनि ठेले ।।१९।। नवल येथिचे निर्गुण ।। जेथ निमाले सगुण । अरुप ते अति गहन। क्रीडा करी ।।२०।। जया विशेषरुप नाहीं । तेचि अरुप बोलिले पाही । निर्गुणाची नवलाई । काय सांगो ।।२१।।

**(२०) इडापिंगलासुषुम्नामेळीं । खेळी महातुर्येचे खेळी ।**
**मग सहजस्वरुपीं लागली टाळी । योगिराजा ।। २० ।।**

टीका :- इडापिंगलाचे मेळीं । सुषुम्ना वाहे ऊर्ध्व गोळी । महातूरीय खेळीखेळी । जीवन हे ।।१।। इडापिंगलीं जीवन । परि तयाचें पृथकपण । दोनीमाजी समसमान । सकळ पिंडी ।।२।। रामकृष्ण नामेंकरुन । होतां तयाचें मीलन । सहज होय परिपूर्ण । गिळोनी गगन या देहीं ।।३।। गगन तयाचें पृथ:करण । चिदांश पहातां अपूर्ण । तयाचिये अधिष्ठान । गतिरुप ।।४।। पहातां इथे चंचळगती । शद्बगुणांची हे स्थिती । घेतली रोकड प्रचिती । संतजनी ।।५।। इडापिंगला एक होवून । जाले पूर्ण गुणीं जीवन । ऊर्ध्वमुख करी गमन । गगनातु ।।६।। मग स्वरुपीं लागली टाळी । अद्वय नामचिये मेळी । हरिनामाचे कल्लोळी। सहजेचि ।।७।। सकार हकार जन्मा आले । तेचि सहजरुप आतुडलें । परम योगिया लाधलें । सहजपणें ।।८।। सहज लाधली चित्कळा । गवसिली योगिया कळा । तेथ जडोनि गेला डोळा । गगनाचा ।।९।।



**(२१) अजपाजपाचें आसनीं बैसावे । मन मुरडोनीं स्वरुपी लावावें।**
**गोल्हाट मंडळ भेदोनि जावे । समाधिसुखा कारणें ।।२१।।**

टीका :- जागृत स्वप्नस्थिति मारोन । घातलें अजपाजपासन । मनाचिये मुरड साधोन । स्वरुपासी लावीयले ।।१।। अजपाचा जप गहन । सुषुप्तिया केवल स्मरण । अंतरिया सावधान । जागृतपणें ।।२।। जरि कां ते पां सुषुप्ति । परिपूर्ण तेथ ही जागृति । योगी हे खूण जाणती । सत्यसत्य ।।३।। अगम्य तेथिचें साधन । जेथ बुडालें गगन । नुरले देहाचे देहभान । स्मरणमात्रें ।।४।। सूर्यचंद्राची कासया कहाणी । कईंच गेले हारपोनि । काया माया लोक तीनी । हारपले ।।५।। स्थूल सूक्ष्म आणि कारण । देह गेला महाकारण । मायेचेंहि आडरान । मावळलें ।।६।। तेथ काय त्याचे गमन । मग कैचे जन्ममरण । जेथ हारपे निशिदिन । पापपुण्य ।।७।। जेथ पापपुण्यचि नाहीं । स्वर्गपाताळ तेथ कांही । इडापिंगला सुषुम्नाहि । उरेचिना ।।८।। ऐसें चालिलें साधन। स्वरुपीं या एकपण । गोल्हाटमंडळभेदन। मग केलें ।।९।। सोहं अनुवृत्ति समाधि । लाग वेग जेणें नादी । जाली अनुसंधानसिद्धि । येथचि पा ।।१०।। चारसहा करिती ध्यान । ऐसी समाधि गहन । तेचि पावावया खूण । गोल्हाटमंडळ भेदियले ।।११।।

**(२२) देह नगरांतुनि आहे वाट । चिदाचक्राचा चढोनि घाट ।**
**सहस्त्रदळीं समाधि अचाट । भोगिती योगी ।।२२।।**

टीका :- देहनगरीं इयें वाट । त्रिकुट श्रीहाट गोल्हाट । पुढें पहातां औटपीठ । भ्रमरगुंफा ।।१।। पुढें पहातां ब्रह्मरंध्र । चिदाचक्र तयावर । घाट कठिण साचार । उल्लंघाया ।।२।। जो कराया उल्लंघन । करणे लागे प्राणार्पण । सोहं अनुवृत्ति गहन । तद्वत् प्राण ।।३।। ऐसे करोनि प्राणार्पण । हारपे जिवाचे जीवपण । रामकृष्णगति गहन । वृथा

मीपण नयेचि ।।४।। पैल सहस्त्रदळ निघोट । तेथ समाधि अचाट । घनानंद घनदाट । एकसरा ।।५।। समाधि ते समाधान । केवळ बुध्दिगम्य गहन । पहातां हें विज्ञान खूण । अरुती ठेली ।। ६ ।। बोलतां चालतां देखतां । तैसेचि श्रवणपुटी पहातां । जे पा अढळचि सर्वथा । इयें संधी।।७।। येथ जे कां अवधि । तेथ साधिली हे संधि । इया सहजसाधनसिद्धि। समाधि जोडे ।।८।। सहजसमाधि सहजासन । जयांचे सहज साधन । ऐसा योगिराज आपण । समाधि भोगी ।।९।। सहस्त्रदळी समाधि अचाट । ज्ञानराज भोगिती चोरवट । जे स्वयेचि घनदाट । स्वरुप जाले ।।१०।। शब्दगति चक्षुनाद । श्यामामाझारी अभेद । जे कां असे स्वयंसिध्द । समाधिरुपें ।।११।। तेचि समाधि साधिली । जे कां सकळा श्रेष्ठ जाली । सोहंरुपाचिये मेळी । सहस्त्रदळीं ।।१२।।

**(२३) सहस्त्रदळीचे शेवटी । पैल तूर्येचे पाठी ।**
**चिन्मय मोती दिठी । दिसताहे ।।२३।।**

टीका :- औटपीठापैल पाठी । आत्माचि भरे केवल दृष्टि । साक्षात्कार हा संपुटी । नयनाचिये ।।१।। समत्वाची जाली पुष्टी । जरि कां रामकृष्णीया दिठी । तरी सहस्त्रदळी शेवटी । चिन्मय मोती दिसताहे ।।२।। चिन्मय जे मुक्त स्थिती । तेचि बोलिले चिन्मयमोती । चिद्रूप ते पहातां गति । शून्याआतु ।।३।। शून्याआतु रामकृष्ण । तेचि चिद्रूप सगुण । तयापैल ते निर्गुण । सहस्त्रदळी ।।४।। सहस्त्रदळिया सद्रूप । चिन्मय जे निर्विकल्प । संत बोलिले मुक्तरुप । उघडपणें ।।५।। परिपूर्ण स्वत:सिध्द । नित्यत्वेकं शुद्धबुद्ध । पहातां तेजाळ अगाध । निरुपाधिक ।।६।। साक्षात्कार इये दिठी । पहातांचि पडे मिठी । दाटे आल्हाद दृष्टिपुटीं । एकसरा ।।७।। ऐसे ज्ञानराजा जालें प्रेम । प्रेमासी मिळालें । अंतरीचें अंतरी फावलें । गुरुचें गुज ।।८।।



**(२४) नवाचे माझारी । औटपीठकळसावरी ।**
**गर्जे सोहं नाद मोहरी । स्वरुपधेनु पहावया ।। २४ ।।**

टीका :- चिणिति पासोनियां भेरी । ऐशा उठती नादलहरी । नवनादाचिया उपरि । औटपीठ ।।१।। औटपीठकळसावरी । पहाता ते अतिकुसरी । नवल तेजाचिया परी । वर्णवेना ।।२।। जीवनरस स्थिरावला। ऐसा कळस पहाला । महाशून्यातु उजाला । तेजोरुप ।।३।। म्हणोनि औटपीठकळसावरी । म्हणिजे सहस्त्रदळा माझारी । गर्जे सोहं नाद भारी । सोहंस्वरुप पहावया ।।४।। त्रिपदा तेचि गायत्री । सोहं स्वरुपिणी साचारी। देखावया चिन्मयनेत्री । नेत्र कैंचा उन्मीलत ।।५।। म्हणोनि ते स्वरुपधेनु। गायनतंत्री करी गानू । सोहंनादगजर घनू । कोंदाटला ।।६।। सोहंतत्त्वी चिदाकाश । तेणेचि महानादघोष । येथ जें अधिष्ठान अवकाश । चिद्मूल ते ।।७।। सोहंतत्व जें पहाले । गुरुकृपेंचि आकळें । नामीं स्वरुप बिंबलें । प्रत्यक्षचि ।।८।। नामरुप दोनी एक । प्रत्यय हा येथ चोख । नवलाचे नवल देख । सकळाहोनि ।।९।। पहातां हे सम्यक्ज्ञान । जेथ नुरेचि विज्ञान । सगुण निर्गुण आटोन । गेले जेथ ।।१०।। ऐसे सोहंतत्त्वरुप । पूर्ण ब्रह्म निर्विकल्प । तेचि स्वतंत्रता अपाप । सद्गुरुराजे दिधलीसे ।।११।।

**(२५) अंगुष्ठप्रमाण रारायंत्र । मसुरप्रमाण शिखा पवित्र ।**
**सनद दिधली स्वतंत्र । सद्गुरुराजें ।।२५।।**

टीका :- स्वयें भगवान शुद्धबुद्ध । ज्ञानेश्वर अवतार प्रसिद्ध । सद्गुरुं जयांचे अगाध । निवृत्तिनाथ ।। १ ।। होतां गुरुकृपाबोध । जे कां जाले स्वयंसिद्ध । दिधली स्वतंत्र सनद । सद्गुरूराजे ।।२।। स्वानंद साम्राज्यी आरुढ केले । जगदोध्दारा आज्ञापिले । अंगुष्ठ रारायंत्री नेलें । नवल दाविलें स्वरुपाचे ।।३।। पवित्र ज्वाला मसूरप्रमाण । स्वरुप तेजाळ गहन । गुरुरायें दाविला आपण । तेजोबंबाळ झगटला ।।४।।

**(२६) अंगुष्ठप्रमाण राजपत्र चिठी । वारंवार लेहिली अर्धपठी ।
सहजी समाधि परेतठी । योगिया लाभे ।।२६।।**

टीका : योगियांचे योगिराज । परमसिद्ध ज्ञानराज । राजपत्र चिठी सहज । लिहित जाले ।।१।। स्वानंदसाम्राज्यचक्रवर्ती । जाले ज्ञानेश्वर निगुती । अंगुष्ठप्रमाण जयाप्रति । सनद मिळाली ।।२।। भुकेलिया भूक खादली । तहानेलिया तहानचि प्याली । अहोरात्र वारिया खेळी । ज्ञानाई ते ।।३।। म्हणोनि जाली सहजसिद्धि । टाळी लागली ब्रह्मानंदी । परेतठीं सहज समाधि । योगियाची ।।४।। अर्धपठी सनद जाली । तेणें विश्वासी केली साऊली । ऐसी ज्ञानेश्वर माऊली । विश्वाचिये ।।५।। ज्यांची सरली उपाधि । ऐसी अखंड सहज समाधि । जयाकृपें मोक्षपदीं । भक्त बैसे ।।६।। सहस्त्रदळी सोहं रुप । तयांत जें ॐ स्वरुप । तेथ अंगुष्ठमात्र प्रदीप । रारायंत्री ।।७।। पंचमातृकेचे पैल। आणि अर्धमात्रेचे ऐल । सोहंदीप अति तेजाळ । अंगुष्ठमात्र ।।८।। तेचि दिधली सनद । जेथ पूर्ण ब्रह्मानंद । ऐसे सद्गुरु अगाध । निवृत्तीनाथ ।।९।।

**(२७) त्रिवेणीचे मूळ भामी । त्रिवेणीचे महासंगमी ।
मसूरप्रमाण राऊळधार्मी । चिन्मय विठ्ठल दिसताहे ।। २७ ।।**

टीका :- त्रिवेणीचे पहातां मूळ । महाशून्याचिया पैल । श्वेतश्यामरुप केवळ । गतिमान ।।१।। वाटे तेजाचिये राशी । जीवनकळेसी प्रकाशी । रामकृष्णगति कैसी । जीवनकळी ।।२।। जेथ नाम रामकृष्ण । एकी एक जाय मिळोन । तेचि महासंगमस्थान । त्रिवेणीचे ।।३।। रामकृष्ण एकीकरण । बिंदुमात्र नीलवर्ण । स्वरुप जे अतिगहन । मसूरपरी ।।४।। तेचि जयाचें राऊळ । रविशशीहोनि तेजाळ। जेथ असंख्य तेजोगोल । लुप्त होती ।।५।। तेथ चिन्मय विठ्ठल । श्यामवर्ण घननीळ । सोहंप्रदीप केवळ । सर्वांगळा ।।६।। सोहंतत्विया अवकाश । तेचि बोलिले चिदाकाश । तन्मय जो निजप्रकाश । चिन्मय ते ।।७।। कोहं धारणा नीलप्रकाश । नुरला द्वैताद्वैत आभास । निजत्व ते अविनाश । सहस्त्रदळी ।।८।। सहस्त्रदळीं मति प्रकाशी। ज्योति चिन्मय अविनाशी । नवलपरी जाणती कैसी । संतजन ।।९।। नवल सोहं दीपज्योत । जे कां नि:शद्वा अतीत । जेथ विज्ञानासी अंत । होवोनि ठेला ।।१०।। ज्योतीचे तेज अव्यक्त । शिवस्वरुप तें निभ्रांत। जें कां पहातां अनंत । ओतप्रोत ।।११।। प्रकृति हे तेजापासोनि । उष्णशीतप्रकाशगुणी । तयांचिये यथार्थ मीलनी । जीवन तेज ।।१२।। तेचि अवस्था प्रकृत । जीवभाव तो यथार्थ । विभक्तीकरणें उपाधिभूत। सौम्यज्वलनी ।।१३।। केंद्रीकरणें प्रविष्ट । नाद प्रकाश समाविष्ट । रामकृष्ण तत्त्व निघोट । शुद्धरुप ।।१४।। तेथ जहाले पहाणें । आकाशवलय प्रभापणें । तेजोष्णता प्रकाशगुणे । दीप जाला ।।१५।। दावी दीपासी प्रकाश । दीप पहातां अविनाश । शून्य कलिके निश्चयेस। सहस्त्रदळी ।।१६।। सहस्त्रदळिया चोखट । पहातां प्रत्यय निघोट । सोहंतत्व दीप प्रगट । चिन्मय विठ्ठल दिसताहे ।।१७।। धन्य धन्य ज्ञानेश्वर । खोलोनि दाविलें अंतर । दवडीना मी पामर । म्हणोनियां।।१८।।

**(२८) अधिष्ठान ॐकार मेळी । वेधिले अष्टदळकमळीं ।
सोहंकारे लागली टाळी । चिन्मय भोंवरा ।।२८।।**

टीका :- ॐकार नादाचिये मेळीं । अधिष्ठान सहस्त्रदळीं । तेणें वेधिलें अष्टदळीं । ब्रम्हचक्रा ।।१।। टाळी लागली सोहंकारी । चिद्रपातु जे लहरी । उसळली चिदांबरी । सहस्त्रदळीं ।।२।। तेचि चिन्मयाची भोंवरी । नवलावें भोंवरा करी ।। भोंवरा फिरे सरोभरी । चंचळपणें ।।३।। ब्रह्मचक्र सिवनीपासोनि । भोंवरा चिदाकाशगगनी । चिद्‌गगनाचें अधिष्ठानी । अवकाशीं ।।४।। सिवनींपासोनि सहस्त्रदळीं। एकचि येथ जाली टाळी । टाळी नामेचि उटाळी । स्वरुपाच्या ।। ५ ।। एकत्व

अनाद्यनंत । ऐसा प्रत्यय बोलिले संत। अनुभव तोचि येथ । स्वरुपाचा ।।६।। चिद्वस्तु हे सर्व व्याप्त । तेथेचि जडोनि गेले संत । पूर्णापूर्णी सदोदित । अखंडचि ।।७।। म्हणोनि हें एकसूत्र । जोडे ब्रह्मसहस्त्रचक्र । ऐसे बोलिले ज्ञानेश्वर । गौप्य येथ ।।८।।

**(२९) त्रिकूट महाशिखरीं । भ्रमरगुंफेच्या भीतरी ।**
**गगनगुंफेचिया वरि । वस्तू कोंदाटली असें ।। २९ ।।**

टीका :- त्रिकूटगिरींचे महाशिखर । औटपीठाकाश अपार । तया गगनगुंफेचे वर । भ्रमरगुंफा ।।१।। भ्रमरगुंफेचिया पैल । एक वस्तूचि केवळ। अरुप अनाम तेजाळ । अद्वय जे ।।२।। जेथ कल्पना हे सरे । शद्बा शद्बपण हे नुरे । जेथ अ:शद्बचि उरे । चिन्मात्र ते ।।३।। तेचि वस्तू कोंदाटली । खेळी विश्वाचिये खेळी । जेथ श्रुति मौनावली। सहजपणें ।।४।। जे अंगसंगे खेळे । परि इया अंगा न मिळे । जीवनकळियां आडळे । गुरुकृपें ।।५।। आकाश जेंवि सर्वव्याप्त । असोनियां सर्वी अलिप्त । तैसी वस्तू सदोदित । सर्वत्र आहे ।।६।।

**(३०) सद्गुरुवाणी बैसे गगनगोळी । वस्तू कोठडी नयन खोली ।**
**आजपजपाचा तागडी तोली । ग्राहीक कोणी मिळेना ।।३०।।**

टीका :- पहातां गगनाचे गोळीं । बैसलीसे गुरुमाउली । सूर्यचंद्र डोळीयां खोली । निजवस्तू ।।१।। सूर्यचंद्राचिये पोटीं । पहातां गगनाची दिठी । सूर्यचंद्राचे शेवटी । अग्नि आत्मा ।।२।। सोहं अनुवृत्ति निज । जेथ जालें द्वैतबीज । कोहंधारणा सहज । उदया आली ।।३।। इंद्रिया सवडी जे निज । लपोनि ठेले वस्तूबीज । उघड डोळिया उघड सहज । दावियेले ।।४।। सकार हकार तागडी तोली ।। पाहे ग्राहीकाची वाटुली। परि ग्राहक इयेवेळी । मिळेचिना ।।५।। वैष्णवावाचोनि आवडी । कोणा नामामृताची गोडी । रामनामाची तागडी । कळेल कोणा ।।६।। जरि



उगवेल प्रारब्ध । तरीच उमजेल हा बोध । जरी आपुला भाव शुद्ध। गुरुकृपा सहजेचि ।।७।।

**(३१) अवकाश महातेजीं । अलक्ष्यमुद्रा लागली सहजी ।**
**स्वरुपीं मिळाला जीऊजी । सद्गुरुकृपें ।।३१।।**

टीका :- महातेजी अवकाश । सोहंतेजिया प्रकाश । तेथ अलक्ष अविनाश । लागली मुद्रा ।।१।। सकार हकार जन्मस्थान । जेथ जाले सोहंगगन । तेथ बाणली सहजखूण । सहस्त्रदळीं ।।२।। सहजाची अलक्षमुद्रा। तेणें दाविलें अगोचरा । दृष्टिचिया अगोचरा । पहाणें जालें।।३।। येथ केवळ चिन्मयदृष्टि । आपआपणासी भेटी । आपणिया नयनपुटी । स्वरुप धालें ।।४।। तेथ मिळालें जीवन । जाले आपणया दर्शन । परिपूर्ण समाधान । गुरुकृपें ।।५।। सगुण निर्गुणाचिये पैल । सोहमात्मस्वरुप निखिल । तेथ जीवात्मपण विमल । मिळोनि गेले।।६।। जरी कां जाली गुरुकृपा । चिन्मयाचा मार्ग सोपा । नयनीं चिन्मयाची खोपा । संती केली ।।७।। नयनीं चिन्मयाचा मार्ग । तेथेचि निजत्वाचा योग । जीवशिव एकचि अंग । होवोनि ठेले ।।८।।

**(३२) अलक्षमुद्रेचे लागतां ध्यान । हारपलें देहाचे देहभान ।**
**योगी स्वरुपीं मिळोन । स्वरुपचि होती ।।३२।।**

टीका ः- सहजाचे सहज ध्यान। घालिता सहज सहजासन । तेणें सहज समाधान । सहजचि लाभे ।।१।। ऐसे लागतां अलक्ष ध्यान। लक्षालक्षाचें मीलन । जीव शिव एकात्मपण । कोणा कोण पहालें।।२।। म्हणोनि पहाणेंचि दर्शन । केवल पहाणें आत्मपण । जयाचें पहातां अधिष्ठान। आत्माचि उरे ।।३।। जेथ जाले एकात्मपण । जैसे सागरीं लवण । किंवा इंधनी सर्पण । तैसे जाले ।।४।। येथें नासिली त्रिपुटी । आत्मपणें आत्मया भेटी । तेथ द्वैताचिये गोष्टी । बोलोचि नये ।।५।।

स्वयें आत्माराम जाला । देहभाव सर्व निमाला । अवघा परिपूर्ण जाला । विश्वाकार ।।६।। स्वरूपीं स्वरुपचि जाला । ऐसा योग पहातां आगळा । तोचि ज्ञानराजें साधिला । गुरुकृपे ।।७।। काळ ग्रासोनि अग्निसी मिळे । तेथ शुद्ध सत्व राहिलें । तेणे आत्मया व्यापिलें । सहस्त्रदळी ।।८।। प्रेमसूत्र येथ ओविलें । पंचप्राण नामीं कोंडिलें । जीवनाचिये जीवन मेळे । शिवचि जाले जीवपण ।।९।। मग तें उरलें निरंजन । आत्माराम स्वानंदघन । ज्ञानराज जाले आपण । सहजेचि ।।१०।।

**(३३) वैखरीं स्वयंभी सांपडले । परेचे पाठारी पेरिले ।**
**पश्यंती ज्ञान वाफा आले । मध्यमी पिकले ज्ञानदेवी ।।३३।।**

टीका :- निशःब्द ते शद्बा आले । ज्ञानराजें कवतुक केलें । इये ज्ञानगगनी पेरिलें । गुरुनाथें ।।१।। नाभिमाझारी वाफा आलें । तेचि हृदयीं परिपूर्ण पिकलें । समाधान गोडीया आलें । जीवनकळी ।।२।। तेचि ज्ञानराजा लाधलें । वैखरी स्वयंभ सांपडले । जगतांकारणें लुटिलें । उदारपणें ।।३।। तेथ नाहीं आनपरी । म्हणोनियां जालो भिकारी । ''सानंद'' टीका प्रगट अंतरी । दासरामी ।।४।। हनुमत्सद्गुरुकृपापूर्ण । ज्ञानेश्वरें वदविलें आपण । ''सानंद'' टीका हे गहन । आपुलिया ग्रंथावरी ।।५।। ज्ञानदेव तेहत्तिशीवर । टीका करणेचा अधिकार । माझा काय मी पामर । दासानुदास ।।६।। परि हे ज्ञानाईनें केलें । म्हणोनिच घडो आले । आपणचि वदविले । सत्यसत्य ।।७।। मति प्रकाशोनि ठेले । अंतःकरणी विवरण जालें । तेचि मुखावाटें आलें । नवलपरी ।।८।। नवलचि जालें मोठें । माझें मज आश्चर्य वाटे । ज्ञानराज ज्ञान प्रगटे । हृदयातु ।।९।। रेडियामुखें जेणे वेद । वदविला हे प्रसिद्ध । तेणें बोलविला मतिमंद । हेचि सत्य ।।१०।। ऐसी सांप्रदायिक सेवा । करोनि घेतली ज्ञानदेवा । आपुल्या घरचा प्रसादमेवा । संतजनीं वाटतो ।।११।। आतां द्यावा जी आनंद । वोरसोनि प्रेमें अगाध । बांधोनियां निजबोध । कृपा करी।।१२।।



सकळ तुम्ही संतसिद्ध । बालका द्या आशीर्वाद । दास करा जरी मी मंद। आपुलें घरीचा ।।१३।। दास म्हणवितो जगीं । परी आपण या प्रसंगी । दास म्हणोनि मज उगी । कोड पुरवा ।।१४।। संती केला दासानुदास । जाला प्रेमाचा कळस । काय त्यांच्या थोरपणास । वानावें जी ।।१५।। मोल नाही दातृत्वपणा । ज्ञानराज सिद्धराणा । म्हणोनि दासराम चरणां । लोलिंगला ।।१६।। धन्य भगवान् हनुमंत । पाठिराखे सद्गुरु समर्थ । ''सानंद'' टीका हे निभ्रांत । म्हणोनिं जाली ।।१७।। बोलविले अकळ बोला । हाचि मज अनुभव दिला । ज्ञानराज प्रेमें वोळला । पायीं जडला दासराम ।।१८।। हनुमंत सद्गुरु समर्थ । दासराम पायीं निवांत । ''सानंद'' टीका समर्पित । हृदयातु ।।१९।। श्रीज्ञानेश्वरी पारायणीं । तीर्थरूप गोविंदराया लागुनी । ज्ञानेश्वर दिसले नयनी । काय सांगो ।।२०।। श्रीहनुमत्सद्गुरु आज्ञेकरून । सांगली स्वगृही नित्य कीर्तन । शके अठराशे पंचेचाळीसापासून । अखंडित पितयांनी चालविलें ।।२१।। ऐसे हे गुरुभक्त पिता । सौभाग्यसंपन्न इंदिरा माता । लाभले म्हणोनि हनुमंता । भेटी माते ।।२२।। मातापितयांची आज्ञा घेऊन। श्री हनुमत्सद्गुरुकृपेकरून । ''सानंद'' टीका ग्रंथलेखन । अक्षरी आलें ।।२३।। गंगोदक गंगेसी अर्पावें । तयेपरीच हें जालें आघवे । नवल हे नवलावें । हनुमंते केले ।।२४।। ग्रंथरचना निश्चयेसी । पौष शुद्ध सप्तमीसी।शके अठराशे पासष्टीसी । संपूर्ण जाली ।।२५।। ''सानंद'' टीका समर्पोनि। रघुनाथचरणा लागोनि । गुरुपरंपरेसी वंदोनि । समाधानी राहिलो ।।२६।। ''सानंद'' टीकेसहीत । ज्ञानदेव तेहत्तिशी ग्रंथ । जाला समाप्त जी येथ । ज्ञानेशकृपें ।।२७।।

।। इति श्रीसटीकज्ञानदेवतेहत्तिशी संपूर्ण ।।

श्रीदासराम लेखन वही क्र.७२

*****

## प्रकरण – २

श्रीदासराममहाराजकृत

# साधनमुद्रा हृदय

**प्रस्तावना :**

श्रीज्ञानेश्वरमहाराज यांच्या 'ज्ञानदेव मुद्राक्रम /मुद्राप्रकाश' या ग्रंथावर श्रीदासराममहाराज यांनी ओवीबद्ध टीका लिहिली. या टीकेची पार्श्वभूमी म्हणून सुरवातीस साधनमुद्रा हृदय (हृदगत) किंवा साधनमुद्रा सार या शीर्षकाखाली ५२ ओव्या लिहिल्या आहेत. हे प्रकरण श्रीदासराममहाराजांनी दासराम लेखन वही क्र.११६ मध्ये लिहिले आहे.

डॉ. के. वा. आपटे यांनी यापूर्वी 'साधनमुद्रा हृदय' या प्रकरणावर थोडक्यात प्रस्तावना लिहिली होती ती खाली देत आहे.

श्रीज्ञानदेवकृत 'मुद्राप्रकाश' या प्रकरण ग्रंथावर दासराममहाराजांनी 'साधनमुद्रा हृदय' या शीर्षकाखाली पद्य टीका लिहिली आहे. एकूण ५२ ओव्या असलेली ही पद्य टीका म्हणजे 'मुद्राप्रकाश' या प्रकरण ग्रंथासाठीची प्रस्तावना होय. **"ऐसे हे साधनमुद्रा हृदय । हृदयी ठेवितो नमोनी पाय।"**

उपाधीपासून वेगळे होऊन आत्मज्ञानाची प्राप्ती कशी होते, ते 'मुद्राप्रकाश' या ग्रंथात सांगितले आहे. श्रीगोविंदराय (श्रीमामामहाराज) यांचेसारखे पितृदेव लाभल्यामुळे श्रीहनुमत्प्रभूंची कृपा झाली. त्यामुळे हा अध्यात्माचा प्रसाद प्राप्त झाला व त्यामुळे 'श्रीज्ञानदेव मुद्राप्रकाश' वरील टीका संपूर्ण झाली, असे श्रीदासराममहाराज म्हणतात.

।। श्रीगणेशायनमः ।।

माझे देहातीत गुरु । वायुरुप सोऽहंकारु । दाविती मुद्रा अपारु । दर्शनेची ।।१।। जयांचा विश्वी अवतार । आणि विश्वामाजी संचार । नाचती हर्ष निर्भर । अनुहते ।। २ ।। आम्हासी ते काहीच नोहे । काही नोहे हेचि होये । परी तेणे केली सोये । साधनमुद्रा ।। ३ ।। आम्हा जे हे मुद्रादर्शन । तेचि आमुचे साधन । साधन कठीण । दर्शन सोपे।। ४ ।। म्हणोनि त्यांचे चरण धरु। हेचि आम्हा एक थोरू । साधन असे सादरू। बडिवारे ।। ५ ।। कोणी अवघड म्हणोनि सोडिती । सवघड म्हणोनि उपेक्षिती। तया हे प्राप्ती । कैसेनि होय ।। ६ ।। ऐसे हे मुद्रादर्शन । श्रीहनुमत्प्रभूंचे (कृपेचे)महिमान । ते होवोनि दृष्टिदर्पण । अखंड असो ।। ७ ।। येथ माझे असे काय । आहे ते त्यांचेच होय। म्हणोनि धरिले पाय । अंतरीच ।। ८ ।। हे माझे म्हणोनि सांगावे । ऐसे हे काहीच नव्हे । जे का असे नित्यनवे। प्रतिजीवनी ।। ९ ।। हे ज्याचे त्याने शोधणे । आत्मसमाधाने । उपाधी निरसने । आत्मसुखा ।। १० ।। आपुलीये सुखासाठी । सेवेची आवड मोठी। तेचि श्रीगोविंदपदी गोठी । ते हे साधनमुद्रा ।। ११ ।। आत्मसुखासी जे तळमळी । त्यासी हे वाटचाली । नातरी टवाळी। आहेची गे ।। १२ ।। कोणी म्हणती हा आमुचा विषय नव्हे । परी जेणे हे निर्मिले विषये । आणि जो करी निर्विषये । विषयातेही ।। १३ ।। ऐसा जो विषय । तोचि जयाचा विषय । तयासी हा विषय । ज्ञानेशांचा ।। १४ ।। ऐसे हे मुद्रादर्शन । नये उपेक्षा कारण । हेचि माझे अंतःकरण । सांगत असे ।।१५।। जे आत्मसाधन। अक्षरी अवतरले संपूर्ण । तेणे आत्मसमाधान । होआवेजी ।।१६।। हेचि मागणे ज्ञानेशा । जयजया कैवल्यपुरुषा । श्रीगुरुलिंगा हृदय निवासा। हृदयामाजी ।।१७।। ऐसे हे साधनमुद्रा हृदय। हृदयी ठेवितो नमोनि पाय। हे जाणोनि हृदय। हृदयी विलसो ।। १८ ।। हेचि मागणे असो । आणि काही नसो । हृत्पद्मी विलसो । ज्ञानेश ग्रंथ ।। १९ ।। जरी हे निराकारी । अक्षरी आणिले साकारी । परी ते अंतरी । असोद्याजी ।। २० ।। हेचि मागणे पुनःपुनः। कर जोडोनि चरणा । गुरुकृपा जीवन खुणा । लक्ष्य असो ।। २१ ।। धन्य धन्य सिद्धगिरी । निंबरगी चिमड उमदी बरी । सांगली झळके भूवरी । गुरुपीठ ।।२२।। गोविंदजी ऐसे पिता । म्हणोनि श्रीहनुमत्कृपाकर माथा । ते सामर्थ्यची सर्वथा । आगळे असे ।।२३।। श्रीगुरुलिंगजंगमांची साऊली । म्हणोनि श्रीज्ञानेश माऊली । श्रीनागप्पाण्णांचिये बोली । दासरामी ।।२४।। हे ज्ञानेशापासोनी । ज्ञान अवतरले अवनी । दासराम लोटांगणी । स्वस्थ जाला ।।२५।। त्रैलोक्य

चिंतामणी वामन । अखंड करी साधन । बटुरुप घेऊन (विश्वव्यापी)। समाधी ये ।।२६।। आम्ही देखो ते गवाक्षामधून । हे चिंतीतसे मन । तेचि ते दर्शन । दासरामी ।।२७।। श्रीगोविंदवामन भेटती । तेथे आनंद उठे चित्ती । ते चैतन्य संगती । जाणती संत ।।२८।। संतची संता जाणती । याची अंतर्बाह्य प्रचीती। निर्गुण सगुण होती । एकरुप ।।२९।। जो सोहळा अनुपम। मुद्रासाधन संगम। आशीर्वाद परम । लाभला घरी ।।३०।। हे साधनमुद्रासार । साधकाचे माहेर । दर्शनेचि संसार । परमार्थ होय ।।३१।। श्रीहनुमत्कृपा हेचि जीवन । श्रीगुरुलिंगाचे दर्शन । श्रीगोविंदपदी हे खूण । आत्मतेची ।।३२।। तोचि सिद्धांचा आशीर्वाद। दासरामासी सुखद। श्रीगुरुसिद्दप्पांनी आनंद । तैसाचि केला ।।३३।। मराठी साहित्य । संशोधन पत्रिका केशवे आणून। मुद्राक्रम दाखवून । निवेदिले मज ।।३४।। यावरी टीका लिहावी । म्हणोनिया ग्रंथ गौरवी । मला वाटले ती पहावी । प्रकरणे ।।३५।। प्रकरणे पाहिली । तो ती भाषाचि बोलेबोली । ज्ञानराज-पंथाची खोली । वर्णिता नये ।।३६।। श्रीचांगदेवासाठी । पत्र लिहिले ते पासष्टी । श्रीमुक्ताईसी दिठी। दिली सनद ।।३७।। श्रीज्ञानेश्वरांची ही सनद। जेथ उठे आत्मबोध । तेथ मुद्रेचा संवाद । सहजी जाला ।।३८।। मुक्ताबाईंनी मांडिला विचार । मुद्रा कैची कोण प्रकार । यावरी श्रीज्ञानेश्वर । दाविती मुद्रा न बोलुनी ।।३९।। जगावरी उपकार । व्हावया मुक्ताई सत्वर । प्रार्थिती श्रीज्ञानेश्वर। अक्षरी बोला ।।४०।। तोचि हा मुद्राक्रम । परमार्थाचे गुह्य परम। कथिले जे अनुपम । अंतरीचे ।।४१।। अंतरीचे अंतरी राहिले । म्हणोनी प्रगट न झाले । श्रीमुक्ताईचे तळमळे । पुनरपि प्रगट ।।४२।। समर्थ वाग्देवता मंदिरात। जे सापडले हस्तलिखित । दोन पाठभेदासहित । ते पत्रिके दिले।।४३।। शंकर श्रीकृष्ण देव । श्रीसमर्थ चरणी दृढ भाव । त्यांनी ही जपली ठेव । मोलाचिये ।।४४।। ते मिळाले मज निधान । दोनी पाठ ताडून । पंचमुद्रेसह पाहून । विवरले ।।४५।। तो आमुचे घरी । मम पितायांची अध्यात्म शिदोरी। त्यात पहाता निर्धारी । गवसिले मुद्राप्रकरण ।।४६।। पाठभेद तीनी ग्रंथी। त्याची घेतली संगती । दोन ओव्या अधिक असती । मुद्राप्रकरणी ।।४७।। साठ वर्षापूर्वी । हा ग्रंथ प्रसिद्ध तो संग्रही । श्रीज्ञानेश भक्तीची नवाई । दिसे मज।।४८।। दोन ओव्या घेतल्या यात । मिळोनि सव्वीस ओव्यांचा मूळ ग्रंथ। मुद्राप्रकाश प्रकाशत । प्रकाशेची ।।४९।। केशवामुळे घडली सेवा । हा ज्ञानेशांचा ठेवा । अध्यात्माचा प्रसादमेवा । आनंदरूप ।। ५० ।। उपाधीपासून। आपण बाजूसी होऊन । कैचे साधे आत्मज्ञान । आत्मचक्षी ।।५१।। ते ये ग्रंथी सांगितले । तेचि साधनमुद्रे विस्तारले । **दासरामी** सहज आले । पाईकपण ।। ५२ ।।

श्रीदासराम लेखन वही क्र.११६

*****

## प्रकरण –३

श्रीदासराममहाराजकृत समओवी टीकेसह

# श्रीज्ञानदेव मुद्राप्रकाश

**प्रस्तावना :**

या प्रकरणात ज्ञानेश्वरमहाराजांच्या ज्ञानदेव मुद्राक्रम/मुद्राप्रकाश या ग्रंथावर श्रीदासराममहाराज यांनी मूळ २६ ओव्यांवर एकूण २३३ ओव्यांची ओवीबद्ध टीका लिहिली आहे.

प्रा.डॉ.के.वा.आपटे यांनी 'मराठी संशोधन पत्रिके'त मुद्रित झालेले 'मुद्राक्रम' हे प्रकरण श्रीदासराममहाराज यांच्या निदर्शनास आणून दिले व या ग्रंथावर टीका लिहिणेची विनंती केली. त्याप्रमाणे श्रीदासराममहाराजांनी टीका लिहिली आहे. सदरची टीका त्यांनी एका दिवसातच लिहून पूर्ण केली व ही टीका भाद्रपद अमावस्या शके १८८९ इ.स.१९६७ या दिवशी पूर्ण झाली. सदर प्रकरणास प.पू.सद्गुरू श्रीगुरुसिद्धप्पामहाराज नीलवाणी निंबरगीकर व प.पू.योगीराज श्री. वा.द. गुळवणीमहाराज यांचे आशीर्वाद लाभले. सदरचे प्रकरण दासराम लेखन वही क्र. ८९, १०६, ११६ व २५९ मध्ये लिहिले आहे. या ग्रंथास प्रा. डॉ. के. वा. आपटे यांनी अभ्यासपूर्ण प्रास्ताविक लिहिले असून ते या प्रकरणाच्या प्रारंभी प्रस्तुत केले आहे.

मानवी जीवनाचे ध्येय मोक्ष आहे, असे भारतीय तत्त्वज्ञ आणि संत सांगत आले आहेत. आणि या मुक्तीसाठी प्रयत्नशील असणे, हे माणसाचे कर्तव्य आहे. या निर्मोक्षाच्या संदर्भात मन महत्वाचे आहे. मनुष्याच्या ऐहिक आणि अध्यात्मिक जीवनात मनाचे स्थान अनन्य आहे. उपनिषदे घोषणा करतात की मनाअंतीच बंध - मोक्ष आहेत. बाह्य विषयात आसक्त असणारे मन बंधाला कारण होते; तर विषयातून परावृत्त होऊन निर्विषय झालेले मन मोक्षाप्रत नेते. (मन एव मनुष्याणां कारणं बंध-मोक्षयोः । बन्धाय विषयासक्तं मुक्त्यै निर्विषयं स्मृतम् ।। ब्रह्मबिंदू उपनिषद-२; सविषय मनोबन्धाय निर्विषयं



मुक्तये भवति । मण्डल ब्राह्मण उपनिषद ५.१) श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीही सांगितले आहे की, 'मनाचिया जोगे सिद्धी पावे'.

शंकराचार्यांनी म्हटल्याप्रमाणे, मन संकल्पविकल्पात्मक आहे. संकल्प विकल्पानी मन चंचल होऊन, ते विषयाकडे धाव घेते आणि बंध दृढतर होतो. (चित्ते चलति संसारः । योगशिखा उपनिषद ६.१८; संकल्पादिकं मनो बन्धहेतुः । मण्डल ब्राह्मण उपनिषद २.४) पण हेच मन निर्विषय झाले तर मोक्षप्राप्ती होते. मनाच्या निर्विषयतेने मुक्ती प्राप्त होत असल्याने, मन निर्विषय करणे आवश्यक ठरते. (यतो निर्विषयस्यास्य मनसो मुक्तिरिष्यते । तस्मान्निर्विषयं नित्यं मनःकार्य मुमुक्षणः ।। ब्रह्मबिंदू उपनिषद ३) मन निर्विषय होण्यास मनाची चंचलता नष्ट झाली पाहिजे. चांचल्यरहित मन मोक्षाप्रत पोहोचविते. (निश्चलं मोक्ष उच्चते । योगशिखा उपनिषद ६.५८; संकल्पादिकं मनो बंधहेतुः । क्तंद्वियुक्तं मनो मोक्षाय भवति । मण्डल ब्राह्मण उपनिषद २.४; यत्तु चंचलताहीनं तन्मनोऽमृतमुच्यते । तदेव च तपःशास्त्रसिद्धांते मोक्ष उच्यते ।। महोपनिषद ४.१०) श्रीज्ञानेश्वरमहाराज आपल्या ज्ञानदेव तेहेत्तिशी या ग्रंथात म्हणतात, 'मनाची चंचलता । मोडोनि स्वरुपी पडला गुंता ।।' (१८) मनाचे चंचलत्व नाहीसे होणे म्हणजे मनोलय होणे. आणि मनाचा लय झालयावर, ''जे आत्मसाक्षिक सुख मिळते तेच ब्रह्म होय'' (मानसे च विलिने तु यत्सुखं चात्मसाक्षिकं तद् ब्रह्म ..... ।। मैत्रायणि उपनिषद ६.२४); मन लयाला गेले की मागे फक्त कैवल्य उरते (मानसे विलयं याते कैवल्यमवशिष्यते । शाण्डिल्य उपनिषद १.४०) असाच प्रकार शंकराचार्यकृत लघुवाक्यवृत्तीवरील टीकेत हंसराज स्वामी सांगतात, ''परी विकल्प सर्व मोडून जावा । उगेपणा चिरकाल व्हावा । तरीच पाविजे ब्रह्मानुभवा । अखंडैकराशि ।।''

मनोलय करण्यासाठी नादानुसंधानासारख्या अनेक पद्धती भारतीय तत्त्वज्ञानात दिलेल्या आहेत. चित्तवृत्तींचा लय करण्याची योग ही एक पद्धती आहे. म्हणून 'योगश्चित्तवृत्तिनिरोधः' असे पातंजल योगसूत्र (१-१-२) सांगते. आणि योगाभ्यासाचे एक अंग म्हणून मुद्रासाधन हे हटयोग प्रदीपिकेसारखे ग्रंथ देतात.

'मुद्रा' शब्दाचे स्पष्टीकरण गोरक्षनाथकृत सिद्धसिद्धांतपद्धति (६-३० -३१) मध्ये असे आहे : मुद् मोदे तु रानन्दो (तुरीयानंदो) जीवात्मपरमात्मनोः। उभयोरैक्यं संवित्तिर्मुद्रेति परिकीर्तिता । मोदन्ते देवसंघाश्च द्रावन्तेऽसुरराशयः। मुद्रेति कथिता साक्षात् सदा भद्रार्थदायिनी । भाषाशास्त्रदृष्ट्या मुद्रा हा शब्द मुद्र धातुपासून साधलेला असून, त्याचे अर्थ पुढीलप्रमाणे आहेत. १) छाप, शिक्का, २) मोहर करण्याची अंगठी ३) परवाना ४) नाणे ५) पदक ६) चिन्ह/ खूण ७) संकोच, मिटणे ८) बोटांची निरनिराळी रचना ९) वैष्णवांचे शंखचक्रादि छाप (गीर्वाणलघुकोश, पृ.३८३) शरीराच्या अवयवांची विशिष्ट रचना, या अर्थाने मुद्रा शब्द हटयोगप्रदीपिका व काही योगावरील उपनिषदे यामध्ये वापरलेला दिसतो, आणि म्हणूनच तेथे काही विशिष्ट आसनांचाही समावेश मुद्रामध्ये केलेला दिसतो. उदा. हटयोगप्रदीपिका पुढील दहा मुद्रा सांगते :- १) महामुद्रा महाबन्धो महावेधश्च खेचरी । उड्यानं मूलवन्धश्च बन्धो जालंधराभिधः । करणि विपरीताक्या वज्रोली शाक्तीचालनं । इदं हि मुद्रा दशकं जरामरणनाशनम् ।। (३.६.७) या दहापैकी काहींचा उल्लेख योगतत्त्व उपनिषदात (२६-२७) खालीलप्रमाणे येतो :- महामुद्रा महाबन्धो महावेधश्च खेचरी । जालन्धरोड्डियाणश्च मूलबन्धस्तथैव च । दीर्घप्रणव-सन्धानं सिद्धान्तश्रवणं परम् । वज्रोली चामरोली च सहजोली त्रिधामता ।। असाच प्रकार श्रीगोरक्षनाथ रचित योगमार्तण्ड (४६) या ग्रंथात आढळतो. महामुद्रा, नभोमुद्रा ओड्याणं च जलन्धरम् । मूलबन्धं च यो वेत्ति स योगी सिद्धभाग् भवेत् ।।

इतर काही ग्रंथात सापडणारे मुद्रांचे निर्देश पुढीलप्रमाणे आहेत :- खेचरी मुद्रा (ध्यानबिन्दु उपनिषद ८०; योगतत्त्व उपनिशद ११८; गोरक्षनाथकृत योगमार्तण्ड ५५ गोरक्ष उपनिषद्); नभोमुद्रा (ध्यानबिन्दु उपनिषद् ८५; योगचुडाणि उपनिषद् ४५); षण्मुखीकरण (मण्डल ब्राह्मण उपनिषद् २.२; मुकुंदराज); महामुद्रा (गोरक्षनाथकृत अमरौघप्रबोध, ३३); योनिमुद्रा (गोरक्षनाथकृत योगमार्तण्ड, ६०); योगमुद्रा (ज्ञानदेव तेहेत्तिशी, १०; ध्यातो



तुझी राजस योगमुद्रा) समर्थ रामदासस्वामींच्या शिष्या वेणुअक्का यांच्या एका पदात ''आम्ही गुरुनाथपंथी । ज्ञानमुद्रा दिधली हाती । करणी चढली नाममुद्रा। अलक्ष अगोचरी मुद्रा ।।'' असा उल्लेख येतो. निरंजन रघुनाथ एका पदात म्हणतात, ''नयन अगोचर मुद्रा चढकर उलट मेहेल दिखाया।'' अद्वयतारक उपनिषद् शांभवीमुद्रा सांगते. हटयोग प्रदीपिकेत शांभवीमुद्रा व उन्मनीमुद्रा यांचा निर्देश येतो. तर भीमावधुत रचित योगमार्गप्रदीप (रा.श्री.जोगळेकर, जगद्धितेच्छु छापखाना, पुणे १९०६) या ग्रंथात खेचरी, भूचरी, शांभवी, षण्मुखी, चाचरी, अगोचरी, अलक्ष आणि चंचल अशा आठ मुद्रांचा उल्लेख येतो.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांची गुरुपरंपरा योगसंप्रदायाची आहे. ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायात, मुद्रा हा शब्द ६.१९२, २००,३५३ या ठिकाणी येतो. ६.३५३ मधील मुद्राशब्द ६.१९२ व २०० मधील मुद्रा शब्दाचा समानार्थी नाही. ६.१९२ मध्ये विशिष्ट आसन = मूलबंध या अर्थाने मुद्रा शब्द वापरलेला आहे. त्यालाच वज्रासन (६.१९९) म्हणतात. ६.२०० मध्येही आसन या अर्थीच मुद्रा शब्द आलेला आहे. श्रीज्ञानेश्वरकृत ज्ञानदेव तेहेत्तिशीत खेचरी (९,१३,१४) व अलक्ष्य मुद्रा (३०-३१) यांचा निर्देश येतो. (श्रीज्ञानेश्वरांचे नावावर मोडणाऱ्या मुगुटमणि या ग्रंथात चाचरी, भूचरी, खेचरी व अगोचरी या चार मुद्रांचा उल्लेख येतो. ) तसेच श्रीज्ञानेश्वरांच्या मुद्रा प्रकरणात शांभवी मुद्रेचा निर्देश आहे.

प्रस्तुतच्या श्रीज्ञानेश्वरकृत मुद्राप्रकाश या प्रकरणात, चाचरी, भूचरी, खेचरी, अगोचरी, अलक्ष्य या मुद्रांचे विवरण आहे. यापैकी खेचरी हे नाव पूर्वग्रंथात येते. भूचरी हा शब्द श्रीगोरक्षनाथकृत सिद्धसिद्धांतपद्धति (६.१.२) मध्ये येतो; पण तेथे त्याने भूचरी मुद्रा निर्दिष्ट झालेली नाही. तथापि, भगवत्गीतेसारख्या ग्रंथात नासाग्रदृष्टीचा उल्लेख येतो; अशा ठिकाणी भूचरी मुद्रा अभिप्रेत असावी. अगोचरी मुद्रेत लक्ष स्थानवर्जित असते. गोरक्षनाथकृत सिद्धसिद्धांतपद्धति २.२९ मध्ये मध्यम लक्ष्य सांगताना, 'स्थानवर्जितं मनसा

लक्षयेत्' असे म्हटले आहे; येथे अगोचरी मुद्रेचे बीज असावे. नाथसंप्रदायात अलक्ष्य हा शब्द फार प्रिय व प्रचारातला आहे. त्याला धरून अलक्ष्यमुद्रा हा शब्द बनतो. चाचरी हा शब्द श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा स्वतःचा असावा.

मुद्राभ्यासाने साक्षात्कार कसे होतात हे मुद्राप्रकाशात श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी सूत्रमय भाषेत सांगितले आहे. पण तेवढ्यानेच सर्वसाधकांचे शंकासमाधान होईल असे नाही. त्यांचा अधिक तपशील साधक- मुमुक्षूंना कळावा म्हणून, सांगलीतील अधिकारसंपन्न संत श्रीरामराय गोविंद केळकर तथा श्रीदासराममहाराज यांनी टीका रचली. ब्रह्मीभूत संत श्रीगोविंद अनंत तथा श्रीबापूरावजी केळकर यांचे श्रीदासराम हे चिरंजीव. या पितृदेवाचे पोटी जन्म झाल्याने श्रीदासरामांना वयाच्या १४ व्या दिवशी ब्रह्मीभूत श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराज यांची कृपादृष्टी झाली. श्रीनागाप्पाण्णामहाराजांचे वचनानुसार, चिमड संप्रदायाचे आद्य प्रवर्तक श्रीगुरुलिंगजंगम निंबरगीकरमहाराजांनी कृपाप्रसाद म्हणून श्रीदासरामांना कानडी भाषेत श्रुतिरुपाने श्रीगुरुलिंगगीता दिली. अशा अधिकारी श्रीदासरामांची प्रस्तुतची टीका जिज्ञासू तसेच अभ्यासू साधकांना उपयोगी पडेल.

**१) पंचमुद्रेचा विस्तारू । सांगितला नीज निर्धारु ।**
**तो परिसावा सविस्तरू । सद्गुरुमुखें ।। १ ।। (म.सं.प.)**

टीका - ॐ नमो श्रीज्ञानेश्वरा । श्रीनिवृत्तिदास दातारा । उकलोनि दावी क्रममुद्रा । साधन ते ।।१।। तव श्रीज्ञानराज प्रगटले । अक्षरेचि आकारिले। ते ओवियें ओविले । मुद्रासाधन ।।२।। श्रीगुरुलिंगसाधुराम हनुमंत । संप्रदाय स्मरणी सतत । मुद्रासाधनमाला गुंफित । श्रीगोविंदपदी दासराम ।।३।। आपुले भाव डोळे बोलती । त्यास व्यवहारीही मुद्रा म्हणती । तैसीच परमार्थी युक्ती । मुद्रासाधनाची ।।४।। बारीक दृष्टी भूमी शोधिती। काय हरवले ऐसे विचारिती । म्हणता तुम्हासी का पंचायती । बोलती मुद्राची बोले ।।५।। कावरी बावरी मुद्रा । जाणते जाणती मग अंतरा । जरी का प्रसन्न मुद्रा । तरी काम सहजेची ।।६।। डोके फिरले मुद्रा बोले । विदेही



जाले हे मुद्रे कळे । तेवी आत्मदृष्टी न्याहाळे । आत्मयासी ।।७।। आत्मा अदृश्य शोधणेसाठी । करणे लागे हे गोठी । सहजासनी सहज दृष्टी । साधावया ।।८।। जडासी सुटले चैतन्य । तेथे होणे अनन्य । कैसेनि घडे मुद्रेवीण । ते साधनमुद्रा ।।९।। जे कोणे ठायी न पाहती । कोणी ठायीच पाहती । तेथ ज्यांना गती । ते पाय धरिती ज्ञानाईचे ।।१०।। ज्ञानेश ज्ञानरुप आपण । सारे बोलती न बोलून । मुद्राचि दाविती आपण । सहज ते ।।११।। तेचि ते मुद्रासाधन । साधकासी भावपूर्ण । साध्यसाधन परिपूर्ण । सहजेची ।।१२।। पंचमुद्रेचा विस्तारु । हे मुद्रासाधनची निर्धारु । जेथ निजत्व अरुवारू । प्रकर्षा ये ।।१३।। निजाचे तेज की तेजाचे निज । ऐसे आहे येथिचे गुज । निजतेजेचियें निज । ओळखिले ।।१४।। निजापासोनी तेज । तेजी सामावले हे निज । परी त्याचे साधन बीज । मुद्राक्रम ।।१५।। श्रवणातोनि नयनी आला । नयनी निजाते मिळाला। चैतन्येचि विसावला । गुरुकृपा ।।१६।। सत्स्वरुपा दाविती गुरु । म्हणोनि ते श्रीसद्गुरु । करोनि महावाक्य-उच्चारु । दाविती मुद्रा ।।१७।। अस्तिभाव ते निज । चैतन्यरुप ते सतेज । गुरु वोळलिया नामबीज । सबीज ते ।।१८।। कर्णी चढली नाममुद्रा । जीव मीनला शिवसमुद्रा । मग तया साक्षात्कारा । काय उणे ।।१९।। आडवे दृष्टी पहाणे चाचरी ।। नासाग्री दृष्टी ते भूचरी । नेत्रांची मिळणी अगोचरी। खेचरी लक्षी आकाश ।।२०।।

## (१) चाचरी मुद्रा

(२) अथ प्रथम मुद्रा चाचरी । तिची दृष्टि पहावे हेरी ।
उंच नेत्र करोनि अंतरी । भीतरीं दृष्टि घालावी ।।२।। (मु. प्र.)

टीका :- चाचरी भूचरी खेचरी । अलक्ष्य आणि अगोचरी। पाच मुद्रा विचारी । पाहता दिसती ।।१।। चाचरी मुद्रा हा प्रथमाभ्यास । दृष्टी चेपोनी करती विशेष । मनी धरोनी हव्यास । मुद्रासाधने ।।२।। दृष्टी ठेवोनि बाहेरी । ऊर्ध्वगामी अंतराळांतरी । तेथ जे तादात्म्य होती अंतरी।

बाह्य चक्षूचेनि ।।३।।

(३) मुद्रा लहान करोनि लोचन । दोन्ही नेत्रांची पाती लावून ।
दृष्टि करोनिया लीन । अंतराळी पहावी ।।३।। (मु. प्र.)

टीका :- दोनी नेत्रपाती लाऊन । दृष्टीचे करोनि आकुंचन । मनश्चक्षू करोनी विलीन । अंतराळी अंतरा पहावे ।।१।। चर्मचक्षी जे पाहता नये । परी ज्ञानदृष्टी जे निरीक्षिता ये । अंतरा अंतर मिळता स्वये । निरंतर वस्तुदर्शन ।।२।। निरंतर म्हणजे अंतर नूरे । अंतराकाशी आत्मा उरे। तेथे तादात्म्य ते विज्ञान पुरे। अज्ञान वोसरे दृश्य पै ।।३।।

(४) तेथे अंतराळि । गगनाचि पोकळी ।
मुक्तफळाचिया वळि । तैसे दिसतसे दृष्टि ।।४।। (म.सं.प.)

टीका :- तेथ अंतराकाशी । गगनाचिया अवकाशी । मुक्त स्थिती सावकाशी । दिसतसे दृष्टी ।।१।। आकाश ते अंतर । गगन ते शब्दाकार । नादरहित वायुलहर । केवळ स्फुरण ।।२।। तेथ जे का लहर उठली । तयातू पोकळी व्यापिली । मुक्तावस्था मुक्तावली । मुक्त छंदे क्षणैक ।।३।। तितुकाचि सुटला देहादिदृश्या । बंधन नुरवी ऐसी दशा । आसक्तीचा कायसा। पाडू येथ ।।४।। स्वयंप्रकाश आत्मयाचा । वायुरुप जीवनाचा । जेथ प्राणाचा नि आकाशाचा । संघर्ष होय ।।५।। बाह्य दृष्टी आकाशी खेळे । बहि:प्राण उन्मेषे मेळे । नासाभ्यंतरी जो उजळे । दृष्टी खिळे सुक्ष्मत्वे ।।६।। या तीनी लहरी एक होती । जीव शिवा ऐक्यस्थिती । साक्षात्काराची प्रचिती । आचरोनी अनुकंपे ।।७।। अनुकंपन श्वसनाचे । ध्वनी लहरी आकाशीचे। संघातेचि या दृष्टीचे। विकसे चैतन्य प्रकर्षे ।।८।।

**(५) ते स्थिर न राहे निरंतर । जिकडे फिरे दृष्टि तीव्र ।**
**तिकडे फिरे गरगर । दृष्टि पुढे ।।५।। (म. सं. प.)**

टीका :- वायुरुप जे जीवन । पोकळपणें जाले गगन । गगनेचि दृश्यभान । वायुलहरी ठायी उठती ।।१।। सगुणासी दावी निर्गुण । व्यष्टी समष्टी भावपूर्ण । येथ शून्यासी खेची शून्य । डोळा गगन एकची ।।२।। तेथ



पहाणीरा काय प्रचीतीं । पहाणें हे किंवदन्ती । दृश्य तरी भिन्न निगुती । असे काई ।।३।। वायुरुप जीवन फिरे । तेच दृष्टी झाली साचोकारे । चक्रे उमटती चक्राकारे । पूर्ण लहरी पूर्णाची ।।४।। पूर्णातोनी निघाली वलये । तयासीही पूर्णता ये । चैतन्य वाहे प्रवाहे । संचरोनी आकाशी ।।५।। आकाश जाहले माध्यम । आत्मसोहळे अनुपम । आकाशवायूचा उत्तम । खेळ सदा ।।६।। प्रवाहीपणे जे प्रवाही । ते स्थिर कायसे होई । साक्षात्काराची ही नवाई । साक्षातची ।।७।।

**(६) जैसा कृतिकाचा दिनया गोळा । तैसा जातसे अंतराळा ।**
**तो देखणे डोळां । चांचरी मुद्रा सुलक्षण ।। ६ ।। (मु.प्र.।।)**

टीका ः- कृतिकेचा जैसा गोंधळ । तैसे येत जात आभाळ । परी हा देखे अंतराळ । गतीने जें प्रवाही ।।१।। आत्मा हा गतिरूप । चैतन्य प्रवाही स्वरुप। चिदाकाशी अपाप । पहाती योगी ।।२।। सोऽहंमध्ये अवकाश। बोलियेले चिदाकाश । अंतर्बाह्य जे साक्ष । तेजोरूप ।।३।। अंतरी ते भीतरी । पहाणे अति कुसरी । आत्मयाची नवलपरी । आकाशातू।।४।। आत्मया ठायी आकाश । जेथे जीवनाचा होवोनि प्रकर्ष। मुद्रा लावोनि अभ्यास । जीवन लहरी संघर्षे ।।५।।

## (२) भूचरी मुद्रा

**(७) आतां दुसरी मुद्रा तै भूचरी । तिचि दृष्टि पाहावि नासाग्रि ।**
**आपुले मुखावरि । भास उजेडाचा ।।१।। (म.स.प.)**

टीका ः- आत्मस्वरुप भूमन् । याचे जेथ संचलन । होय जेणे श्वसन। अनुकंपन सहजेची ।।१।। भूमन् भूमिती । जेणे होय भूचिये मिती। देह दृश्याचा भाव अस्ति । जयाचेनि ।।२।। आत्मानुभूती घेता मागोवा । नातरी प्रपंची गोवा। जीवालागी पस्तावा । बाह्याकर्षणे ।।३।। नासिकेचा प्राण ।। जो नादरूप गहन । त्याचे लागता अनुसंधान। होय ज्ञान आत्मयाचे ।।४।। तया नासाग्री जे दृष्टी । जेणे आत्मयाचि भेटी ।

तेचि भूचरीची गोठी । आत्मस्वरुप प्रकाश ।।५।।

**(८) पाति लवता करावी स्थिर । नेत्री सुटती पाझर ।**
**पाहता मुखावरी तार । पडती उजेडाचे ।।२।। (म.सं.प.)**

टीका :- जेणे दृष्टीस मर्यादा आली । म्हणोनि कवटाळिजे साऊली। चंचळ दृश्य आकळी । अस्थिर जे ।।१।। ते पाती लाविली । तो दृष्टी अमर्याद झाली । जेथ चैतन्य वस्तू कोंदली । तेथचि खिळली दृष्टी जे।।२।। जेथ चमके अलक्ष्य । तेथ हे लागले लक्ष । होवोनिया अतिदक्ष । चैतन्याचे प्रवाही ।।३।। त्यात जो चैतन्याचा रवा । तोचि सदाचा पकडावा। हाचि घेतला बरवा । ध्यास जीवे ।।४।। भूमीवरी असोनी । देहधारणा जरी धरणी । आपण होवोनि तरणी । साधिली अटक टकीने ।।५।। तया स्थिर बिंदूवर । दृष्टी केली असे स्थिर । तो नेत्री लोटला समुद्र । जीवनाचा ।।६।। स्वस्वरुपीं तारःरुप । स्वयेचि प्रकाशे अपाप । आणि कर्णी ध्वनिरूप। घुमो लागे ।।७।। आत्मरुपी उजेड । हे आत्मज्ञानची उघड । चैतन्यचि चैतन्य अखंड । अनुभवो लागे ।।८।।

**(९) ते पाहाता चांदणे । अकळ असीजे मने ।**
**ध्वनि उठति श्रवणे । नाना वाद्याच्या ।।३।। (म.सं.प.)**

टीका :- चंद्रावीण जे चांदणे । मुक्ती कल्लोळ प्रकाशणे । मना परौते नमने मने । म्हणोनी अकळ ।।१।। जेथे असे मनाची कळ । म्हणोनी मनासी अकळ । संकल्पविकल्पापैल । जीवनातू ।।२।। वायुरुप जीवन केवळ । तेथ मनाचे तरंग विशाळ । परी ते नेणती हे मूळ । जीवदशा।।३।। तेथे ध्वनी श्रवणाकार । लहरी उठती अपार । दशविध नादांचा प्रकार । स्वयंसिद्ध ।।४।। नानविध वाद्यां ऐसा । नाद होतसे आपैसा । आनंदाचा पूर्व ठसा । आनंदची ।।५।।

**(१०) ते नादी आईकता मन । होय लिन ।**
**हे भूचरी मुद्रेचे मोहन । गुरुपुत्रासि ।। ४ ।। (म.सं.प.)**



टीका :- ते नादानुसंधानीं मन । नादलहरींत होय विलीन । मनीचिया मनपण । जेथुनि उठे ।।१।। जेथुनी हे मन उठे । तेथे नाद जरी अभ्यासे प्रगटे । ते ठायी मन झगटे । नुरोनी पुनः नुठेची ।।२।। मन नाही तो इच्छा नाही । मागुती धावेल कोण काई । ऐसी पाहता नवाई । मोहन हे ।।३।। भूचरी मुद्रेचे हे मोहन । ज्याचे ऐसे आकर्षण । गुरुकृपेचिया संपन्न । गुरुपुत्र।।४।। जयावरी श्रीगुरुकृपा । तयासी हा परमार्थ सोपा । मुद्रा साधन मार्ग खेपा । चुकवी ऐसा ।।५।।

## (३) अगोचरी मुद्रा

**(११) आतां मुद्रा अगोचरी । तिचि दृष्टि पाहावि अभ्यंतरी ।**
**मन धरोनि निराकारी । जिव्हे मौन्य धरावें ।।१।। (म.सं.प.)**

टीका :- जे दृष्टी अभ्यंतरी । मिळोनी राहिली निराकारी । मौन्येची जिव्हा आवरी । अगोचरी ते ।।१।। दृष्टिचिये आंतवरी । निराकारची निराकारी । आकाशहोनी सूक्ष्म लहरी । शब्दातीत ।।२।। ज्याचे आकाशची माध्यम । नादरहित शब्द परम । बीजाक्षर अक्षर ब्रह्म । गगना पैल ।।३।। जया बोलती अनुहत । चिदाकाशी ध्वनी घुमत । तंत वितंत उमटत । सहज नाद ।।४।। जेथ सहजची मौन्य। चारी वाचा जेथ लीन । मनाचेही उन्मन । आवरे जिव्हा ।।५।। मनेची जिव्हा आवरली । तेथे भाषाची सरली। चैतन्याची उमटली । बोली जेथ ।।६।। तेथे निराकारी । दृष्टी रिघाली कुसरी । जीवनाची या सत्वरी । जीवन दृष्टी ।।७।। डोळ्याचा मारा जीवनी । तो जीवन गतींची दृष्टी होवूनी। मारा करी निशिदिनीं । निराकारी ।।८।। जिव्हेचा होता ग्रास । पहाणे आले पहाणेपणास । पाहता पाहता अनायास । लाधे अगोचर ।।९।। ते मुद्रा अगोचरी । अगोचरा गोचर करी । गोचर अगोचर जरी। सहजे तरी ।।१०।।

**(१२) आपण होऊनी अगोचर । लाऊनी नेत्र ।**
**मन करावें स्थिर । ह्रदयामाजि ।।२।। (म.सं.प.)**

टीका :- देह पाहता गोचर । देहातीत वस्तू अगोचर । तेची आपण होऊनी सत्वर । गोचर विसरे ।।१।। गोचर विसरे अगोचर । अगोचर विसरे गोचर । विपरीत ज्ञान तो विसर । आठव ज्ञान निश्चयेसी।।२।। चैतन्यविस्मृती देहस्मृती । देहविस्मृती चैतन्यस्मृती । एक विसराची मूर्ती। तो संभ्रम ।।३।। संभ्रमे उठे आकार । तोची होय देहाकार । सकळ दृश्य परिवार । तो आत्मविसरू ।।४।। यावीण अन्यथा काही । जगी पाहताच नाही । म्हणोनिया निश्चळ ठायी। चंचळ वरी ।।५।। जेथोनी आकुंचन । आणि होय प्रसरण। हरणे देणे नियमन। कार्य ज्याचे ।।६।। हृ हरणे द देणे। य तो नियमन करणे । ते ठायीच मने । स्थिर झाला ।।७।। हृदयाची धडधड । कानी आली प्रचंड । स्थिरत्वेची अखंड । स्थैर्य शोधी ।।८।। स्थिर तो आत्मा । आणि अस्थिर तो अनात्मा । नामा आणि अनामा । जोडी दुवा ।।९।। तया उपाधिभूत जीवनी । मनाची करोनी मिळणी। स्थिर सदा अंतःकरणी । अगोचर दृष्टी ।।१०।। अगोचरी लावूनी नेत्रा । जो साधी या अगोचरा । तेची अगोचर मुद्रा । जाणिजे पा ।।११।।

**(१३) दृष्टि काहि न पहावें । मन अढळ राखावें ।**
**उत्तर कवणा न द्यावें । मुद्रा मौन्य ।। ३ ।। (म.सं.प.)**

टीका :- मौन्य मुद्रा मुद्रा मौन्य । यावीण नाहीं अनन्य । अगोचरी झाला अनन्य । तेथ गोचर काय ।।१।। दृष्टि काही पाहवेना । का आतची नाहीं दृश्य धारणा । जे नाहीच आत जीवना । तो बाहेर काय ।।२।। या आत असे ते बाह्य दिसे । आत नसे ते बाहेरी नसे । परी जे बाहेरी असे । ते आत न गवसे ।।३।। आता मनासीच नाही ढळ । तेथे कायसे दृश्य सढळ। वृत्तीची ढवळा ढवळ । सरली जेथ ।।४।। म्हणोनी मन जाले अढळ । का आतची सापडले निश्चळ। जीवनाचा कल्लोळ । मावळला ।।५।। आता काय जी उत्तर । जेणे होय निरुत्तर । प्रश्नची सरल्या उत्तर। साक्षेपे गेले।।६।। जेथ निःशब्दू प्रमाण । तेथ शब्द अप्रमाण । शब्दासी आले



मौन्य । तो मौन्येची उत्तर ।।७।। आत बाहेर बोलणे सरले । तो निःशब्द निश्चळ आतळे । आकाशासह वितळे । दृश्यजात ।।८।।

**(१४) होतां मुद्रेचे मोहन । आपणया आपणा लागे ध्यान ।**
**होऊनि जाय विसर्जन । शून्यसा भाव ।। ४ ।। (म.सं.प.)**

टीका :- होता मुद्रेचे मोहन । तिसरे मुद्रेचे पहाणे । आपणया आपणे । अवलोकिले ।।१।। आजवरी जे जे गोळा । केले त्याचा झाला गोळा। तो पोटी उठला गोळा । हे नकोची जाले ।।२।। बाजूचे बाजूसी होता । आपणची उरे स्वता । स्वता ते स्वता जाणता । बाजूचे होय बाजूला ।।३।। उपाधीचे निरसन । होता आकाशाचे ज्ञान । उपाधिभूत जीवन । आटलिया आत्मा ।।४।। होता शून्य भावाचे विसर्जन । आपुलेची आपणा ध्यान । तेची ते आत्मज्ञान । निश्चळेसी ।।५।।

**(१५) मुद्रा अगोचरि । इचें स्थान अभ्यंतरि ।**
**मन राखोनि निराकारी । निश्चळ निरंतरी असिजे पै ।।५।।**

जे का मुद्रा अगोचरी । पसरली आतु बाहेरी । मन राखिले निराकारी । निर्विकारू निश्चळी ।।१।। निराकार निर्विकार । निश्चळ तो सर्वेश्वर । निशब्द तो परात्पर। सर्वा आदी ।।२।। तेथेची जे असणे । सहजासने सहज साधने । स्वयंसिद्ध अनादिपणे । एकत्वेसी ।।३।। ऐसी जीवनाची धारणा । अगोचरी मुद्रेची खुणा। ऐसिया लक्षणा । जाणितली ।।४।।

## (४) खेचरी मुद्रा

**(१६) अथा चवथी मुद्रा खेचरी । तिचे ध्यान अभ्यंतरी ।**
**भ्रमरगुंफेचिये अंतरी । लावावी दृष्टी ।।१।। (मु.प्र.)**

टीका :- मुद्रा चौथी जे खेचरी । ते दृष्टि पहावी अंतरी । भ्रमरगुंफेचिया माझारी । दृष्टीचेनी ।।१।। चिदाकाशी या जीवन । जेथ करी संचलन । जीवन लहरींचे विचरण । तेथ जे पहाणे ।।२।। जीवन गतींचे डोळे । ऊर्ध्वगामी जै सुवेळे । एक स्थिर बिंदूवरी निखळे ।

खिळोनी जाती ।।३।। इडा पिंगला सुषुम्ना । उर्ध्वत्वेसी जे गुंफण । भ्रमरगुंफीया गुंतले मन । पहाणिया वृत्ती ।।४।। मनाचे मुकले मनपण। पहाणेची गेले भुलोन । संकल्प ना विकल्प कोण । करील तेथे ।।५।।

**(१७) हें उफराटे दृष्टीचे पहाणें । तेथील एकेक देखणे । ही अनुभवाची खुण । पहावी स्वये ।।२।।**

होता अंतर्मुख दृष्टी । ते पहाणेपण गोठी । जीवनगती उफराटी । तो पहाणे ऊर्ध्व ।।१।। तेथ एकचि देखणे । जे विलसे आत्मपणे। जाले व्दैत उणे । प्रत्ययो आला ।।२।। म्हणोनि हे अनुभवाची खूण । पहावी स्वयेचि आपण । या नांव आत्मज्ञान । बोलिले संती ।।३।।

**(१८) दृष्टि थारे त्रिकुटी । लंघोनि जाय गोल्हाटी । ब्रह्मरंध्राचे सेवटी । स्थिर मन ।। ३ ।। (म.सं.प.)**

टीका :- इडा पिंगला सुषुम्ना । यांचा संगम ज्या स्थाना । ते त्रिकुट संतजना । मानवले ।।१।। तीन गुणांचे होय कूट । म्हणोनिया ते त्रिकूट । नातरी आहेची मेतकूट । प्रपंचाचे ।।२।। तीन सरले ते त्रिकूटी आले । नाही तरी संसारी भले । परी तीन गुणे गेले । वायाची जगी ।।३।। थारा धरी जै त्रिकूटी । ओलांडून जाय जीवन गोल्हाटी । ब्रह्मरंध्राचे शेवटी। स्थिरमन ।।४।। त्रिगुणापैल त्रिकूट । तयावरी श्रीहाट । जे श्वेतवर्ण स्पष्ट। साधका दिसे ।।५।। तयावरी गोल्हाट । शामवर्ण जे प्रगट। शामश्वेत ऐक्यता उत्कट । आकाश ते ।।६।। आकाशरूप जीवन । तै त्रिकूटी आरोहण । तेथुनी जे जीवन । ऊर्ध्वगामी ।।७।। तेचि प्रस्फुट गगन । गुणागुणांचे मीलन । श्रीहाट गोल्हाट पूर्ण । सौरसू दिसे ।।८।। नीलबिंदू औटपीठ । जो शून्याचा शेवट । तेचि ते निकट । ब्रह्मरंध्र ।।९।। जेथुनी हे सहस्रार। जे सहस्राराची कळची साचार । तेथची तदाकार । होऊनी ठेला।।१०।। स्थिर दृष्टी मन स्थिर । स्थिरबिंदू दृष्टि स्थिर । ऐसे हे सहस्रार। ब्रह्मरंध्र ।।११।। जे पहाता अति सूक्ष्म । जीवशिव होती परमात्म । जेऊती जीवनाचा संभ्रम । उडोनि गेला ।।१२।। तेथ मनाची कायसी गोठी । कल्पनेची जाली आटी। कल्पना सरता उठी । मध्यवर्ती जीवनसूत्र ।।१३।।

**(१९) तो पां ॐकारु । भास दिसे रक्तांबरु । जेवि उगवता दिनकरू । दिसे लाल गगन ।।४।। (म.सं.प.)**

टीका :- अकार उकार मकारू । मिळोनी तो ॐकारु । आरक्त वर्ण अरुवारु । त्रिकूटी दिसे ।।१।। गगनाचिया वरूता । त्रिकूटाचलाचा माथा । श्वेतशाम एक होता । आरक्त दिसे ।।२।। अकार प्राण उकार गती। म कार ते नादस्थिती । ऐक्यता ते ॐकार मूर्ती । प्रतीत होये ।।३।। शून्यी प्रस्फुट गगन। तेथ भूताकाश दृश्यमान । शब्दग्रासे त्रिकूटी आरोहण। साधकाचे ।।४।। आकाशाचा माथा । तो या त्रिकूटाचा पायथा। अचल चैतन्यगिरी वरूता । शुद्धाकाश जीवन ।।५।।

**(२०) हे आठवे समाधिचें । पहाणे ऊर्ध्वपंथिचे । स्थान विहंगमाचें । गुण तेथिल ।।५।। (म.सं.प.)**

टीका :- यम नियम प्राणायाम । प्रत्याहार ध्यान उत्तम । धारणा आसन मुद्रा परम । आठवे अंग समाधी ।।१।। शुद्धाकाश जीवनसत्ते । जई जाय ऊर्ध्व पंथे । चत्वार देह निरसुनी आइते । पहाणे घडे ।।२।। उपाधिभूत जीवन । तेथ चित्ताचे केंद्रीकरण । चार देहांचे पृथक्करण । सहज होये।।३।। ते स्थान विहंगमाचे । लक्ष्य आकाशमार्गीचे । शुद्धाकाशजीवन साचे । उंचावे येथे ।।४।। तीन गुणापैल गुण । जे देवाचे सूत्र पूर्ण । जे नसे प्रारब्धाधीन । गुरुकृपे आकळे ।।५।। विहंगमावलोकन। आकाशमार्गी गुप्तखूण। त्रिगुण निरासे आकळे गुण । प्रीतिसाधन सहजे ।।६।। हाची साधनाचा क्रम । ऊर्ध्वगामी गुण उत्तम । अधोगामी जीवन संभ्रम । दुरावला ।।७।। गुणेची सगुण निर्गुण । प्रचीत रुपाची निर्वाण । नाही कशाचीच वाण । संसरण शांतीये ।।८।। जे संसरणाची शांती । तेची परिपूर्ण विश्रांती । संतजनांची प्रचीती । जाणती संत ।।९।। सोळाबाराचिया मिळणी । साध्य साधन करणी । अंतःकरणी चक्रपाणी । चक्रोचक्री विराजे।।१०।।

हे समाधान समाधी । नुरलिया आधिव्याधी । सुटली जे उपाधीं । सूत्रगुणे।।११।। गुणाकार सूत्राचा । तो भागाकार देहाचा । जमाखर्च पापपुण्याचा । मुक्त संपदा जोडली ।।१२।। जीवन जे अधोगामी । अंतर्मुख ते स्थिर संगमी । भ्रुकुटी होनि ऊर्ध्वगामी । समाधी ये ।।१३।।

**(२१) हा खेचरि मुद्रेचा संवादु । जो हा जाणे बोधु । तुटे भवबंधु । क्षण येका ।।६।। (म.सं.प.)**

टीका :- शब्दग्रासे पहाणे जरी । पहाता पहाता लागे खेचरी । नवल आत्मयाची कुसरी । सहज तरी ।। १ ।। हा दुजेवीण संवादू । शब्देवीण अनुवादू । त्रिपुटीवीण भेदू । स्वयंसिद्ध ।।२।। यया नाम बोधस्थिती। द्वैताची सरली गुंती । प्रचीती ये निगुती । स्वयंरुपाची।।३।। स्वयंरुप स्वयंसिद्ध । जेथ उदेला आत्मबोध । येथील परिसता संवाद । बंध कैचा ।।४।। ख माजी जे उठे । तेथ जे मुद्रा प्रगटे । तेथ दृष्टी रविशशी नेहटे । तै जहाली खेचरी ।।५।। तेथ सहजे संवादू । मौन्येची होय विशदू। अंधत्वे साक्षात्कार अगाधू । बहिरिया ठसे अंतरी ।।६।। जो हा तो हा जाणे बोधू । तयालागी परमानंदू । आसक्तीचा बंधू । नुरेची जया ।।७।। जडाशी सुटोनी चैतन्याचा । मार्ग धरिला नित्याचा । अभ्यासेची अनित्याचा । ठाव पुसिला ।।८।।

## (५) अलक्ष्य मुद्रा

**(२२) आतां मुद्रा अलेखि । तेथिल लेखा कवण लेखी । वेदाहि नेणवे साक्षि । श्रुती नेति नेति म्हणति ।।१।। (म.सं.प.)**

**टीका** :- वेद परमात्मयाचे निश्वास । तयाहि जेथ नाही प्रवेश। म्हणोनी ज्यानी दिली साक्ष । नेणोनी नेती म्हणोनी ।।१।। ऐसे जे अलक्ष्य। तेची जाले जेथ लक्ष्य । ते अलक्ष्य मुद्रा प्रत्यक्ष । चारी पैल पाचवी ।।२।। जै लक्षी होय अलक्ष्य । तै अलक्ष्यची होय लक्ष । ऐसिया बोलण्याचा पक्ष । स्वीकारिला ।।३।। सर्व पक्षांचा जेथे पक्ष । तोची साधकाचा पक्ष । तेथ जो जाला दक्ष । त्यासी कळे ।।४।। तया आलेखाचा लेख । कोण करी काढोनी आलेख । आलेख काढ तयाचा लेख । ज्याने केला ।।५।। तया अलक्ष्यासी लेखी । कोण ऐसा आहे शेखी । नवल पाहता विशेखी। सर्वा शेखी अलक्ष्य ।।६।। म्हणोनी ते अलक्ष्य । साक्षी चैतन्य दे साक्ष । अलं अक्ष अलक्ष । बिंबले पाहिजे ।।७।। अगदी आहे अक्षी अक्ष। तया काय दृष्टीचा निकस । दृष्टीलागी पहाण्याचा कस । जयाचेनी ।।८।। डोळ्यात जे चकाकी । लकलकोनी लकाकी । दृष्टीचिया शेखी । आपणपे।।९।। जो सदाचा द्रष्टा। दृश्य नव्हेची सुभटा । तया होवोनी उफराटा । पाहील जो।।१०।। तो तेथची बुडाला । दृश्यातोनी निघाला । वृत्तीने सदा मोकळा । मुक्त छंदे ।।११।। जो तेथेची निमाला । तो सांगावया नाही आला । हाची आलेख केला । अलक्ष्य मुद्रे ।।१२।। म्हणोनी मुद्रा अलक्ष्य। परमात्मा दावी प्रत्यक्ष। जे का असे निरपेक्ष । सापेक्ष नव्हे ।।१३।।

**(२३) खुंटले वाचेचें बोलणें । राहिलें नेत्राचे पाहाणे । हें ज्याचे तोचि जाणे । येरा टकमक ।।२।। (म.सं.प.)**

टीका :- हाता तोंडाची पडता गाठी । मुखावाटे शब्द नुठी । जीवाशिवा होता भेटी । अनुभव जाला ।।१।। जेथे अनुभव प्रमाण । तेथ नाही शब्दप्रमाण। निःशब्दाचा अर्थ कोण । शब्दी करी ।।२।। चैतन्याचे जे स्फुरण । तेथ शब्द राहिला गिळोन । नाद उठें रात्रंदिन । परी तो शब्द नव्हे।।३।। शब्द जै संघाती आला । तो तेथे नाद उठला । परी जो संघातेवीण निनादला । शब्देवीण ।।४।। जेथ सरले आकाश । म्हणोनी ते भकाश । ध्वनीरूप प्रकाश । जीवनी पसरे ।।५।। तेची ते होऊन । ज्यानी साधले संधान । राहिले अनुसंधान । छंदाचेनि ।।६।। जेथ आकाशची नाही। तेथ बोलणे कै होई । बोलणे सरता कमाई । पहाणे कैचे ।।७।। आकाशावीण पहाणे । हे तो नये अनुमाने । परी त्रिपुटीविणे । पहाणे जे।।८।। सूर्यप्रकाशे सूर्या पहाणे । तैसे आत्मत्वे पाही आत्मखुणे । हेची

उमगोनी घेणे । पहाणेवीण ।।९।। ज्याचे तोची हे जाणे । येरा होय लाजिरवाणे । परमार्थ नोहे गबाळपणे । साधकावीण टकमक ।।१०।। साधन साधिती साधक । येरा उरली टकमक । शब्दाचिये धकधक । उगाची चाले ।।११।।

**(२४) जे लक्ष अपरंपार । तेचि अलक्ष मुद्रेचे घर ।**
**हे जो जाणे त्याचि चुके येरझार । यातायाति ।।३।। (म.सं.प.)**

टीका :- अगाध स्वरुप अलक्ष्य । अनंतत्व प्रत्यक्ष । हे ओळखोनी दक्ष । अलक्षी आला ।।१।। हरिवीण येरझार । तया सारी येरझार । लक्षालक्षी अलक्ष सार । शोधिता नुरे ।।२।। आकाशावरी संघात । ऐसा व्यवहार समस्त। पर्यवसान लटिके होत । म्हणोनी लटिके ।।३।। कळता हे लटिके । मग तेथे कोण टिके । कर्मकांड अशेखे । सरले ज्याचे ।।४।। पापपुण्य गेले निगुती । तया कर्मी नाही गुंती । सहजेची यातायाती । सरली त्याची ।।५।। मग कैचे जन्ममरण। जेथ अलक्ष्याचे अनुसंधान । चैतन्य योगे चैतन्य । कार्यवाही ।।६।। तेची जेथ कार्यवाही । परी न पडे कालाचे प्रवाही । दिक्काल आकाशपाही । नुरेची जेथ ।।७।। चैतन्याने चैतन्याशी। चैतन्य होय समरसी । विषमता गेली आपैसी। जंजाळ सरले।।८।।

**(२५) अलक्ष लक्षण ना रुपरेखा । शांभवी मुद्रेचें लक्षण देखा ।**
**अंतरी बाह्य दृष्टीचा आवाका । निमिष्या निमिष्य वर्जित ।।४।। (मु.प्र.)**

टीका :- आदिनाथे गौरीसी बरवी । जे मुद्रा सांगितली आघवी । तयासी बोलती शांभवी । किंवा षण्मुखी ।।१।। गौरीने केली विनंती । की तात्काळ यावी प्रचिति । न करता यातायाती । तपश्चर्या ।।२।। तो बोलिले शंकर । कानी बोटे घालूनी पहा तर । नाद होती अपार । क्षण न लागता ।।३।। बोटे ठेविता दृष्टी। तो तेथ प्रकाश उठी । नाद प्रकाशरूप दिठी । बोटे लावता भ्रूमध्यी ।।४।। ऐसी जाली षण्मुखी । आत्मप्रचिति विशेखी । विश्वासेचि होय सुखी । विश्वासापुरती ।।५।। परी हे नये



शेखी। अभ्यासे सहजेचि लक्षीं । ऐसी शांभवी निरीक्षी । आत्मचक्षूचेनि।।६।। 'सहज षण्मुखी' तै 'शांभवी' । 'अलक्ष्य' उन्मनी आघवी । स्वरूप मुद्रा एकची बरवी । दिसे पहाता ।। ७ ।। एक मुद्रेचा होता अभ्यास । जरी साक्षात्कार विशेष । तरी पांच मुद्रांचा हव्यास । कशासाठी ।।८।। एक साधिता सर्व साधिती । हेचि असे गौप्य स्थिती । तेणे प्रकर्षे अनुभूती । चैतन्याची ।।९।। ऐसी मुद्रेचिया गोठी । बंद होवोनी बाह्य दृष्टी । अंतर्मुख स्थिर दिठी। ऊर्ध्वगामी ।।१०।। मागुती होय अलक्ष । जेथ हरी दिसे प्रत्यक्ष । जरी अभ्यासी दक्ष । साधक तो ।।११।। जेतुली मुद्रा साधी । तेतुली कमी होय उपाधी। दर्शनाची संधी । अधिकाधिक ।।१२।। दृश्य उपाधिंचे वलय । अभ्यासे जै कमी होय । तितुका वाढे प्रत्यय । आत्मयाचा।।१३।। जै अनुभव येई सतत । तरीच पुरा परमार्थ । म्हणोनि हा भावार्थ। घेतला पाहिजे ।।१४।। म्हणोनि अनुक्रमे अभ्यास । सांगती श्रीज्ञानेश । अलक्ष्य दृष्टी अलक्ष्य । प्रत्यय पूर्ण ।।१५।।

**(२६) ऐसे पांचवे मुद्रेचें कथन । हे जाणति संतसज्जन ।**
**अनिर्वाच्य ज्ञान । न बोले ज्ञानदेव ।। ५ ।। (म.सं.प.)**

(चाचरि श्वेत । भूचरि नील । अगोचरि पीत । खेचरि लाल । अलेखा रुप न लेखा ।।)

टीका :- हे पांचवे मुद्रेचे लक्षण । जाणती साधू संत सज्जन । हे तो अनुभवाचे ज्ञान । अनिर्वाच्य म्हणोनी ।।१।। अनुभव तो बोलता नये। ऐसिये अनुभवाची सोये । म्हणोनीच विज्ञान हे । शाब्दिकी नये ।।२।। चारी वाचा निरसून । जेथोनी वाचेचे स्फुरण । तेची आकळिले ठिकाण। अधिष्ठानाचे ।।३।। तेथे पडले मुद्राबंधन । आस नुरे ते घातले आसन। निरोधून प्राणापान । ऊर्ध्व जाले ।।४।। तो ऐसी लाधली स्थिती। वाचाची पडली गुंती । तेथ शब्दाचिये किं वदन्ती । हे कारणची अबोल ।।५।। अबोल ते बोलावे कैसे । जे बोलता ये ते बोलले असे । अनुभवाचेनी

सौरसे। विरले शब्द ।।६।। यापरी मौन्यची लाधले। इया स्वानुभवाचेनी मेळे । ज्ञानदेव न बोले । म्हणितले हे ।।७।। एतुलेची म्हणितले । परी विज्ञान उकलोनी ठेले । मुद्रासाधन विस्तारिले । श्रीज्ञानराजे ।।८।। चाचरी श्वेत भूचरी नील । अगोचर पीत खेचरी लाल । अलेखारुप न लेखा निश्चळ । श्रीज्ञानदेवी ।।९।। हे मुद्रा लक्षण । संतजनांचे विज्ञान । परिसोनी निवती सज्जन । बोलिले निवृत्तीदास ज्ञानदेव ।।१०।। मौन हिडिदु मुद्रीवलिदु । ज्ञानज्योती वळगनलिदु । श्रीगुरुलिंगजंगमांचा बोधू । ऐसाचि असे ।।११।। माममुद्रा स्वये देत। ठेवुनि माथा वरदहस्त । ऐसेच सांगती समर्थ । श्रीहनुमंत ।।१२।। गोविंद गुरुंचा अंकित । रामनाम मुद्रांकित । माझे पितृदेव गोविंद सांगत । अनुभव आपला ।।१३।। हेची लाधली मुद्रादृष्टी । म्हणोनी ते आरक्त दृष्टी । श्रीगुरुलिंगांचे नयन संपुटी। ऐसे तेज ।।१४।। हीच अवस्था श्री भाऊसाहेबांची । तैसीच ते आमुचे वडिलांची । आरक्त वर्ण लोचनांची । साक्ष असे ।।१५।। ऐसा हा मुद्रासाधनमार्ग । जो का असे सहज योग । श्रीज्ञानदेव तेहत्तिशी ग्रंथ चांग। वर्म हेचि ।।१६।। श्रीज्ञानेश्वरीचा सहावा अध्याय । अभ्यासका कठीण होय । जाणोनी हे केली सोय । मुद्राक्रमाची ।।१७।। मुद्रांकित मुद्राक्रम। साधनाचाची उपक्रम । जो जाणोनी साधी नेम। तया सुलभ ।।१८।। कोणी म्हणती हे शंकास्पद । हेची वाटे आश्चर्यास्पद। जीवासी हे ज्ञान सुखद । म्हणोनिया जाणावे ।।१९।। उगाची करोनी प्रश्नचिन्ह । आपुलेची यात अकल्याण । वंद्य ग्रंथ ज्ञानेशांचा म्हणून । शिरी धरू ।।२०।। सूर्य हा तो प्रकाशमान । येथ शंका घेईल कोण । तैसे ज्ञानेशावाचून । सांगे कोण हे सांगेल ।।२१।। ऐसे हे मुद्रादर्शन। ज्ञानेश्वर सुप्रसन्न । आपणचि आले धावून । विचारे कळे ।।२२।। ऐसा कृपाळू कोण। जो सांगेल सुलभ साधन। मुमुक्षू ते ज्ञाननिधान । कृपेची दिले ।।२३।। हे तो शब्दची बोलती । माऊलीची हे कृती । धरली आम्ही चित्ती । विश्वासाने ।।२४।। मनाची जाणोनी तळमळ । ज्ञानराजे खाजे दिले रसाळ । ज्यांचे हे वचन प्रेमळ । सुखदची ।।२५।। केशवाचिया बोली। सहज सेवा घडो आली । चित्तवृत्ती आकळिली । मुद्राक्रमाने ।।२६।। ज्ञानेशभक्तवर श्रीगोविंद। एकनिष्ठ जे संन्निध। हनुमत्कृपे आस्वाद । परिपूर्ण ज्या परमार्थी ।।२७।। या सेवेने आनंद । ऐसे मम पिताजी गोविंद । त्यांचे वंदून पदारविंद । स्मरू गोविंद गोविंद गोविंद ।।२८।। ज्ञानेशकृपे घडली सेवा। ती अर्पिली ज्ञानदेवा । भाद्रपद अमावस्या दिन बरवा । शके १८८९ ।।२९।। ऐसे हे मुद्रासाधन । श्रीज्ञानाईकृपेची खूण । **दासरामी** समाधान । समर्पिता ।।३०।। देहावरी नाही लक्ष । तेची ते अलक्ष्य । संतांचे आयुष्यची साक्ष । याची असे।।३१।। श्रीज्ञानेश्वरांचा मुद्राक्रम । त्यावर साधनमुद्रा उपक्रम । श्रीज्ञानेश प्रसाद मनोरम । श्रीइंदिरागोविंदसुतासी ।।३२।।

श्रीदासरामकृत साधनमुद्राटीकेसह श्री ज्ञानदेव-मुद्राप्रकाश संपूर्ण

श्रीदासराम लेखन वही क्र.८२,१०६,११६,२५९

*****

# प्रकरण - ४

श्रीदासराममहाराजकृत समओवी टीकेसह

## भावार्थ नमन हृदय व नमन स्तोत्र

**प्रस्तावना :**

याप्रकरणात श्रीज्ञानेश्वरमहाराजकृत नमनस्तोत्राच्या मूळ १०८ ओव्यांवर, श्रीदासरामहाराज यांनी १२० ओव्यांची टीका, दासराम लेखन वही क्र.८२, ८५, १०५, ११४, १३० अशा पाच वह्यात लिहिली आहे. त्या टीकेच्या सुरवातीस श्रीदासराममहाराज यांनी 'भावार्थ नमन हृदय' या शीर्षकाखाली या नमनस्तोत्राचे हृदगत् ३४ ओव्यात लिहिले असून, ते वरील पाच वह्यांमध्ये लिहिले आहे. या प्रकरणास प.पू.स्वामी स्वरूपानंद यांचे आशीर्वाद लाभले आहेत.

डॉ. के. वा. आपटे यांनी पूर्वी भावार्थनमन हृदय व नमनस्तोत्र या प्रकरणांना लिहिलेल्या प्रस्तावना खाली देत आहे.

भावार्थ नमन हृदय - श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या नमनस्तोत्रावर ''भावार्थ नमन'' या नावाची ओवीबद्ध टीका श्रीदासराममहाराजांनी लिहिली. या टीकेला 'भावार्थ नमन हृदय' हा उपोद्घात आहे. भावार्थ नमन हृदय या उपोद्घातामध्ये आपले पितृदेव श्रीमामामहाराज व आपला स्वतःचा श्रीज्ञानेश्वरमहाराजांशी असलेला संबंध श्रीदासराममहाराज यांनी सांगितला आहे.

नमन स्तोत्र - श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा ज्ञानेश्वरी हा ग्रंथ सुप्रसिद्ध आहे. त्यांचे अमृतानुभवासारखे इतरही काही ग्रंथ आहेत. खेरीज त्यांचे म्हणून गणले जाणारे आणखी थोडे ग्रंथ आहेत, त्यामध्ये 'नमन' या छोट्या प्रकरणग्रंथाचा समावेश होतो.

नमनस्तोत्र, नमनस्तुती व नमन या नावाची तीन हस्तलिखिते धुळे येथील समर्थ वाग्देवता मंदिरात आहेत. ती तीन्ही म्हणजे एकच ग्रंथ असावा (म्हणजे एकाच ग्रंथाची तीन नावे असावीत) असे प्रा. प्रियोळकर सांगतात.



''दिव्य नमन'' म्हणून १०८ ओव्यांची एक विष्णुनामावली ज्ञानेश्वरांनी रचली, या ग्रंथास कोणी प्राकृत विष्णुसहस्रनाम म्हणतात, अशी माहिती भारद्वाज देतात. सांगली येथील संत श्रीबापूरावजी केळकर यांच्या घरच्या ग्रंथसंग्रहालयात असणाऱ्या एका सचित्र शीळाछाप पोथीत 'विष्णुसहस्रनाम' आहे. त्याचे समाप्तीसूचक पुढीलप्रमाणे आहे :- इति श्रीज्ञानेश्वरकृत श्रीविष्णुसहस्रनामस्तोत्रं संपूर्णम् । वारकरी संजीवन (पहिली आवृत्ती १९४९, पंढरपूर) या ग्रंथातही नमनस्तोत्र दिलेले आहे. शके १८४७ मध्ये चित्रशाळेने छापतेल्या नामदेवमहाराजांच्या गाथ्यात नमन येते. संतवाङ्मय प्रकाशन मंदिराने १९६७ साली मुद्रित केलेल्या सकलसंतगाथा भाग १, आवृत्ती २ री या ग्रंथात आलेल्या नामदेवांच्या गाथ्यात, 'नमन' या शीर्षकाखाली पृष्ठ १७०-१७३ वर हे नमन आढळते. (नामदेवकृत समाधीप्रकरणात समाविष्ट असलेल्या नमनस्तुतीचा उल्लेख महिपतींच्या संतलीलामृतात (६-४५-४६, ९-९३) येतो) यावरून असे दिसते की नमन, दिव्यनमन, नमनस्तुती, नमनस्तोत्र, प्राकृत विष्णुसहस्रनाम, विष्णुसहस्रनाम व विष्णुसहस्रनामस्तोत्र ही अनेक नावे एकाच 'नमन' या ग्रंथाची दिसतात. समाधी घेण्यापूर्वी ज्ञानेश्वरमहाराजांनी हे नमन म्हटले, अशी आख्यायिका आहे.

ज्ञानेश्वरमहाराजांनी समाधी घेतेवेळी, 'स्वात्मपत्र' नावाचे प्रकरण रचले, त्यात १०८ ओव्या असून, त्यातील ७६-८३ ओव्यात ज्ञानेश्वरांची गुरूपरंपरा येते, अशी माहिती मिळते. (ज्ञानेश्वरमहाराज यांचा कालनिर्णय व चरित्र, पृष्ठ ५४-५५). पण अशी गुरूपरंपरा मुद्रित उपलब्ध नमनात आढळत नाही. तेव्हा ज्ञानेश्वरांनी समाधी घेणेपूर्वी रचलेले नमन आणि स्वात्मपत्र ही दोन वेगवेगळी प्रकरणे दिसतात.

सकलसंतगाथा भाग १ मधील नामदेवांच्या गाथ्यात, 'श्रीज्ञानेश्वरसमाधीमहिमा' या शीर्षकाखाली काही अभंग आहेत. त्यात श्रीज्ञानेश्वरांच्या समाधी प्रसंगाचे वर्णन आहे. तेथे अभंग १०१५ मध्ये नामदेवमहाराज सांगतात, पांडुरंग ज्ञानेश्वरमहाराजांना म्हणतो की, आत्तापर्यंत तू काही ग्रंथ रचलेस, याप्रसंगी ''तरी तू आता एक वेळ । माझी स्तुती करी

निर्मळ । जेणे करूनि तरती सकळ । वक्ते श्रोते ग्रंथकार ।।९।।'' देवाच्या या इच्छेप्रमाणे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी पांडुरंगाची - परमेश्वराची - विष्णुची स्तुती केली, ती म्हणजेच नमन किंवा नमनस्तुती होय. 'नमो काल कौतूहल' येथपासून ते 'बाप रखुमादेवीवरू । समाधि देऊनिया स्थिरू । वरी ठेऊनिया अभयकरू। वर देऊनि राहिला ।।१०८।।' येथपर्यंतच्या १०८ ओव्यात हे नमन आहे. हे नमन झाल्यावर पुढील १०१८ व्या अभंगात नामदेव सांगतात, 'ऐसी स्तुती नमनाची । केली तया भगवंताची । ऐकता झाली रूची। म्हणे धन्य धन्य ज्ञानेश्वरा ।।१।।' वर दिलेली १०८ वी ओवी श्रीबापूरावजींच्या संग्रहातील शिळाछाप विष्णुसहस्रनाम पोथीत १०७ वी आहे, त्यानंतर त्यापोथीत पुढील दोन ओव्या अधिक आहेत, त्या अशा :- ''संसार हा भवसागर । मानवा नुलंघवे साचार । म्हणोनि देवे नामनौका थोर । निर्मिली भक्तांकारणे ।।१०८।। या नामनौकेत भाविकजन । बैसोनि चला परतीरा लागून । न करा कोणी अनुमान । विनवी संतां ज्ञानदेवो ।।१०९।।'' नामाचे महत्व सांगणाऱ्या या शेवटच्या दोन ओव्या नंतर कुणीतरी या नमनाला जोडून दिल्या असाव्या असे वाटते.

नमन या ग्रंथाला जी अनेक नावे आहेत, त्यात विष्णुसहस्रनाम असे एक आहे. पण विष्णुची हजार नामे देणे, हा या नमनाचा उद्देश दिसत नाही. विष्णुचे नाव किंवा वर्णन देऊन नमस्कार असो असे सांगणाऱ्या फक्त ६१ आहेत. या ओव्यात कधीकधी एकाच नावाची द्विरुक्तीही आढळते. हे लक्षात घेऊनही या ओव्यात फारतर विष्णुची २५० पर्यंत नावे होतील, हजार नावे तर मुळीच होत नाहीत, तेव्हा या प्रकरणग्रंथाला प्राकृत विष्णुसहस्रनाम अथवा विष्णुसहस्रनामस्तोत्र ही नावे योग्य ठरत नाहीत. नामदेवांचे शब्द लक्षात घेतले तर त्या ग्रंथाचे नमनस्तुती हे नाम बरे दिसते. पण या ग्रंथाच्या सर्व नामांमध्ये केवळ 'नमन' हेच नाम ग्राह्य मानण्यासारखे दिसते.

हे 'नमन' ज्ञानेश्वरमहाराजकृत असावे काय, असा एक प्रश्न येथे उपस्थित होईल. त्या प्रश्नाचे उत्तर असे दिसते :- भगवान कृष्णांनी कुरुक्षेत्रावर अर्जुनाला भगवत्गीता सांगितली, ती ग्रथित करून लेखनबद्ध करण्याचे काम



व्यासमहर्षींनी केले. त्याचप्रमाणे समाधी घेण्यापूर्वी ज्ञानेश्वरमहाराजांनी हे नमन रचले, ते ग्रथित करून लेखनप्रविष्ट करण्याचे काम नामदेवमहाराजांनी केले, म्हणूनच भावार्थ नमन टीकेच्या उपसंहारात श्रीदासराममहाराज म्हणतात, ''ते संजीवन समाधी । जेथ नुरली उपाधी । स्तोत्र कोरिले अंतरामधी । श्रीज्ञानेशकृत श्रीनामदेवे ।।१११।। श्रीनामदेवांचे उपकार । जगावरी झाले थोर । तेणे ज्ञानेशकृत नमनस्तोत्र । निधान लाधले आम्हासी ।।११२।।''

ईश्वराची स्तुती हा जरी नमनाचा मुख्य उद्देश म्हटला असला तरी, त्यात काही विषयही आलेले आहेत. यातील १०८ ओव्यांचे विषयाच्यादृष्टीने वर्गीकरण पुढीलप्रमाणे सुचविता येणे शक्य आहे :- १) नमस्कार असो (नमो) असे सांगणाऱ्या ओव्या (१-६०, ८६) यात पुढील उपविभाग पाडता येतात :- ईश्वराचे नाव घेऊन नमस्कार (१-८), ईश्वराचे नांव व ईश्वराचे वर्णन करून नमस्कार (९-३८, ४५-५४, ८६), ईश्वराचे वर्णन, प्रार्थना, क्षमापन व नमस्कार (३९-४४), ईश्वराचे वर्णन करून नमस्कार (५५-६०). २) संकीर्ण विषय (६१-८५) उदा. प्रार्थना (६१-६२, ७१-७५, ७७, ७९), अर्पण (६३-६६, ६८), ईश्वराचे वर्णन (६७, ७८), किरकोळ विषय (६९-७०, ७६, ८०-८५) ३) नमनाचे महत्व (८७-९८) ४) विष्णुचे वर्णन (९९-१०६) ५) समारोप (१०७-१०८).

ज्ञानेश्वरमहाराजांच्या या नमनावर 'भावार्थ नमन' या नावाची ओवीबद्ध टीका श्रीदासराममहाराजांनी लिहिली. या टीकेला 'भावार्थ नमनहृदय' हा उपोद्घात आहे व टीका संपल्यावर ६ ओव्यांचा उपसंहार आहे. भावार्थ नमन हृदयात आपल्या पिताजींचा व आपला स्वतःचा श्रीज्ञानेश्वरमहाराजांशी असणारा संबंध श्रीदासराममहाराजांनी सांगितला आहे. श्रीदासराममहाराज हे श्रीबापूरावजी केळकर यांचे परमाधिकारसंपन्न चिरंजीव. श्रीबापूरावजींच्या जीवनात श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे स्थान अनन्य होते. श्रीबापूरावजींचे चिरंजीवांनी - श्रीरामराय यांनी - दासराममहाराजांनी ग्रंथद्वारा आपला संबंध श्रीज्ञानेश्वरमाऊलींशी प्रस्थापित केला. श्रीनिंबरगीकरमहाराज आणि श्रीतात्यासाहेबमहाराज यांच्याकृपेने लाभलेले आत्मानुभवाचे सार त्यांनी

आपल्या अभंग, पदे इत्यादित जसे प्रकट केले तसेच ते श्रीज्ञानेश्वरांच्या ग्रंथांवर टीका लिहून व्यक्त केले. आत्तापर्यंत श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या पुढील ग्रंथांवर लिखाण केले आहे :-

१) चांगदेवपासष्टीवर ओवीबद्ध पासष्टी कला टीका, २) अमृतानुभवावर ओवीबद्ध टीका, ३) हरीपाठाचा गद्य तात्पर्यार्थ. याखेरीज श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या तादृश्य अप्रसिद्ध असणाऱ्या पुढील ग्रंथांवर त्यांनी लिहिले आहे - १) ज्ञानदेवतेहेत्तिशीवर ओवीबद्ध सानंद टीका, २) मुद्राप्रकाश ग्रंथावर ओवीबद्ध साधनमुद्रा टीका, ३) ज्ञानेश्वरांच्या सनदेचा गद्यार्थ, ४) ज्ञानेश्वरांच्या गाथ्यातील काही अभंगांचा गद्यार्थ, ५) प्रणव या प्रदीर्घ अभंगाचा गद्यार्थ, ६) ज्ञानेश्वरांच्या आज्ञापत्रावर ओवीबद्ध आज्ञापत्र भावार्थ टीका, ७) त्यांनी नमनावर लिहिलेली भावार्थ नमन टीका आता प्रकाशित होत आहे. मुळातील ओवीला एक ओवी अशा संक्षिप्त पद्धतीची ही टीका आहे.

जरी श्रीदासरामांची भावार्थनमन ही टीका संक्षिप्त आहे, तरी तिची दोन मुख्य वैशिष्ट्ये आहेत. नमनातील शब्दांचे जे अर्थ आपणास वरवर भासतात, त्यापेक्षा त्यांचे अर्थ अध्यात्मिकदृष्ट्या कसे होतात हे सांगितले आहे. उदा. चक्रचालक गोपाळ - १. चतुर्दश चाळवी गोपाळ, तमहर्ता (१०) जीवनांधकारहर्ता, चिदाकाशव्याप्ता (३७) सोऽहं अवकाशव्याप्ता, ज्योतिर्मयरुप (५१) सोऽहंज्योतीनिरूप, चहु ग्रंथीचा (६१) चत्वार देहांचा, चतुर्भुज (१०२) चतुर्गाति, इत्यादि. २) संपूर्ण ओव्यांचे अर्थही याच दृष्टीने लक्षणीय आहेत. उदा. ओवी क्र.८, ९, १२, १४, १७, २५, ५५, ५९, ७२, ८६ व १०२.

या नमनातच श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी नमनाचे पारमार्थिक महत्व सांगितले आहे. अर्थात या नमनाचे तत्त्व गुरूकृपेने जाणून घ्यावयाचे आहे, अशी सूचनाही त्यांनी लगेच देऊन ठेवली आहे. श्रीएकनाथमहाराज सांगतात, ''एका जनार्दनी नमन । मन केले त्या अधीन ।।'' 'न मन' म्हणजे नमन, असे काही संत सांगतात. मन हे संकल्पविकल्पात्मक आहे. न मन होणे, मन संकल्पविकल्परहित होणे. संकल्पयुक्त मन चंचळ होते व ते बंधाला कारणीभूत



होते. संकल्पविकल्परहित मन मोक्षाप्रत नेते. (संकल्पादिकं मनो बंधहेतु । तद्वियुक्तं मनो मोक्षाय भवति ।। मण्डल ब्राह्मणोपनिषद् २.४; यत्तुचञ्चलनाहीनं तन्मनोऽमृतमुच्यते । तदेव च तपः शास्त्रसिद्धान्ते मोक्ष उच्चते । महोपनिषद् ४.१०) न मन म्हणजे मनाचा लय आणि 'मानसे विलयं याते कैवल्यमवशिष्यते' (शांडिल्योपनिषद् १.४०) अशाप्रकारे या न मनाचे महत्व आहे.

## भावार्थ नमन हृदय

श्रीज्ञानराज माऊली । तू संतजना विश्रांती साऊली ।
तुवा निगमसार वल्ली । प्रगट केली ।।१।।
शिवपीठ हे जुनाट । तू तो तेथें मुगुट ।
भागवत धर्माचे मूळ पीठ । कळस नाथपंथाचा ।।२।।
सर्वांठांयी ज्ञान । तेचि ज्ञानाई तू आपण ।
तू ते सेविती संतजन । प्रेमभरे ।।३।।
तुवा मम तीर्थरुपा दर्शन । देऊनी दिले आशिर्वचन ।
प्रपंच परमार्थ पूर्ण । गुरुकृपे होतील ।।४।।
ते सत्य साच झाले । श्रीहनुमत्कृपे घडो आले ।
पूर्ण समाधान पावले । पाहोनिया ।।५।।
आपुले नाम नित्य वदनी । डोळ्याचें ना खळे पाणी ।
ऐसे मामा समरस जीवनीं । आपुलिया ।।६।।
ज्ञानेश्वरी पारायणी । काल सारिला चिंतनी ।
माऊलींचे भजनी । नुरे भान ।।७।।
जयांचे गोविंद हे नांव । लोक म्हणती बापूराव ।
केळकर उपनाव । शोभविले ।।८।।
आपुले दर्शन जे झाले । ते छायाचित्रचि ज्यांनी रेखाटिले ।
स्वगृही स्थापिले । सांगली ग्रामी ।।९।।
म्हणोनि परमपावन । आम्हां सकळां घडे नित्य दर्शन ।

वडिलांची पुण्याई म्हणून । आम्ही भाग्यवान ।।१०।।
मामांनी श्रीज्ञानदेव तेहत्तीशी । वरी लिही हे सांगता मजसी ।
मी अर्भक आलो आपणापाशी । आणि निवेदिले ।।११।।
ज्ञानदेव तेहत्तीशी समजाविली । ती अक्षरी आकारली ।
मामांनी पाठ थोपटिली । आणि कुरवाळिले कराने ।।१२।।
आम्ही मागावे लडीवाळी । आपण पुरवावी आळी ।
कां आता आपणची माऊली । आणि पिता ।।१३।।
पिताजी त्वद्रूप जाले । आता आम्ही जावे कोठे भले ।
म्हणोनि लाड पुरविले । पाहिजेत की ।।१४।।
मामांचे कीर्तन समाधी सन्निधी । आपण करविले आळंदी ।
हे विसरेल कां कधी । सांगा आधी मजलागी ।।१५।।
तेथें कोणाचेही कीर्तन । नाही झाले अजून ।
हे सांगती सकळ जन । काय ही कृपा ।।१६।।
पुढें समाधी मागे नंदी । त्यामध्येंच ही कीर्तनाची संधी ।
जेथ सकळिका समाधी । जवळिके लाधली ।।१७।।
म्हणोनि प्रार्थीतो करा कृपा । आणि या लेकराते जपा ।
आम्हां काय होय तपा । कांहीच नव्हे ।।१८।।
भगवंताचे स्तोत्र नमन । जे कां केले आपण ।
ते द्यावे समजावून । मजलागी ।।१९।।
मामांचे परी आता कोण । ही इच्छा करील पूर्ण ।
म्हणोनि आशिर्वचन देऊन । द्या समाधान झडकरी ।।२०।।
संत साधू भक्तवर । ज्यांनी हा ग्रंथ थोर ।
विवरला आदर । धरोनिया ।।२१।।
तयांचा श्रेष्ठचि अधिकार । तेथ काय हा पामर ।
परि संतुष्ट साचार । आपुले कृपे ।।२२।।



हा अर्भकाचा अंतर्भाव जाणून । दिले ज्ञानराजे आशिर्वचन ।
होवोनिया सुप्रसन्न । नवल जाले ।।२३।।
समजाविती स्तोत्र नमन । आपणचि जे गहन ।
त्याचे करुं मनन । घेऊ दर्शन माऊलीचे ।।२४।।
मंगलाचरणीं ज्ञानेश दर्शन । श्रीहनुमत्कृपे पूर्ण ।
जेणें मना समाधान । करितो वंदन सद्भावे ।।२५।।
श्रीरामेश्वर सोमेश्वर कुलदैवत । रेवण मरुळ काडनाथ ।
गुरुलिंग साधुराम हनुमंत । माता पितया वंदितो ।।२६।।
आता जे घडे श्रवण । ते भावार्थ नमन ।
करिताचि मनन । साक्षात्कार ।।२७।।
गणेश विष्णु दर्शन । ऐसे याचें महिमान ।
स्वानुभवे मामांनी चित्रण । जैसे केले ।।२८।।
हे घडो ही विनंती । श्रीमाऊलींचे चरणांप्रती ।
भावार्थ नमन चित्ती । ठसावे जी ।।२९।।
श्रीनिरंजन माधव । करिती ज्ञानेश कृत नमन गौरव ।
जे नमन स्तोत्र अपूर्व । उपासना ।।३०।।
तया नमनाची संगती । माऊली जे दाविती ।
आपुलिये मती । साठवू ते ।।३१।।
ज्ञानेश्वर ज्ञानेश्वर । करुया प्रेमे गजर ।
अंतरी हर्ष निर्भर । होवोनिया ।।३२।।
यया लेखना आशीर्वाद । देती स्वामी स्वरुपानंद ।
तो मम हृदयीचा आनंद । वर्णिता नये ।।३३।।
सिद्धगिरी निंबरगी चिमड सांगली । परंपरेची पीठे भली ।
**दासराम** सदा भाळी नमीतसे ।।३४।।

## नमनस्तोत्र

**नमो कालकौतुहल । नमो चक्रचालक गोपाळ ।**
**नमो विश्वप्रतिपाळ । प्रभंजन ।।१।।**
ॐ नमो श्रीगुरुलिंगसदानंदा । साधुराम हनुमंत गोविंदा ।
श्रीज्ञानेशकृत नमन स्वानंदा । अंतर्यामी ।।१।।
जेथ गगन दिक् मंडळ । नमो तत् कालकौतुक केवळ ।
चतुर्दशचाळवी गोपाळ । विश्वरक्षक प्रभंजना ।।२।।
**नमो शिव शिवेशा । नमो शिवादिविश्वेशा ।**
**नमो रुपाअष्टदिशा । व्यापक नारायणा ।।२।।**
नमोशद्बरुपातीता । शिवशिवेशा समर्था ।
शिवरुपारंभ अव्यक्ता । दिक्व्यापी श्रीनारायणा ।।२।।
**नमो सकळ गर्भोद्भवा । नमो चित्तचालक भावा ।**
**नमो विष्णुमूर्ति देवाधिदेवा । श्री विठ्ठला ।।३।।**
सकारकळी गर्भोद्भवा । नमोचित्तचलन भावा ।
विश्वी प्रविष्ठदेवा । जाणिवजेणे ।।३।।
**नमो भजनशीळ व्यापका । नमो ज्योतिर्लिंगदीपका ।**
**नमो तुज एका । आत्मव्यापका जगद्गुरु ।।४।।**
समाधानशील व्यापका । अनिर्वाच्चलिंगादीपका ।
नमो सोहंज्योति एका । आत्मव्यापी विश्वप्रभु ।।४।।
**नमो श्रीये श्रीनिवासा । नमो आगमपरेशा ।**
**नमो ज्ञानगम्याधींशा । प्रतिकुळा ।।५।।**
नमो मंगल मंगलवासा । श्रेष्ठ ऊर्ध्वगामीईशा ।
ज्ञानवर्म आधीशा । प्रतिकुळा नमोजी ।।५।।
**नमो स्वलीलाविनटा । नमोस्तुतिवैकुंठपीठा ।**
**नमो रुपादिश्रेष्ठा । वैकुंठीचिया ।।६।।**
नमो स्वरुपलीला एकवटा । वयकुंठीत जै पीठा ।
आदिरुपश्रेष्ठा । वैकुंठस्थानी ।।६।।



**नमो दर्शन स्पर्शना । नमो उपरति निधाना ।**
**नमो तितिक्षा दारुणा । कमलालया ।।७।।**
नमो अलक्षानुभवस्पर्शा । नमो उपरमसुरसा ।
स्वधर्मानुष्ठानरसा । जीवनरुपा ।।७।।
**नमो त्रिगठीअदटा । नमो त्रिगुणा तू उद्भटा ।**
**नमो सत्वरुपा सदटा । ब्रह्मनामा ।।८।।**
जेथ तीनीची गाठी । नमो त्रिगुणातू परेतटी ।
सत्त्वरुप सुदृढदृष्टी । ब्रह्मनाम उद्भटा ।।८।।
**नमो रजेश्वराहरी । नमो विगळित संहारी ।**
**नमो वाचावक्ता करी । वाचाळ वाक्पुष्पी ।।९।।**
जीवनरज:कणीसत्ता । वेगळेपणी संहरी निरुता ।
वाचाळपणे वाक्पुष्पी वक्ता । वाचा हरि करी तया नमो ।।९।।
**नमो तमहर्ताकर्ता । नमो सकळसंहर्ता ।**
**नमो काळकौळु दाता । रक्षिता हरिभक्ता ।।१०।।**
जीवनांध:कार हर्ता । नमो कर्ता सकळ हर्ता ।
कळीकाळा काळदाता । हरिभक्ता रक्षी जो ।।१०।।
**तुज नमो हरहरेश्वरा । नमो न देखो दुसरा ।**
**नमो वेदांत सागरा । सर्वेश्वरा तुज नमो ।।११।।**
नमो हराहरेश्वरा । तुज ऐसा न दुसरा ।
वेदांत समुद्रा अपारा । सर्वश्रेष्ठा ।।११।।
**श्रुती निरामय नमो । नमो ज्ञानरुप नमो ।**
**नमो द्वैतनिरसन नमो । करी तू निजकरे ।।१२।।**
निरामय निरंजन । नमोनमो स्वरुपज्ञान ।
एक एक मिळुनि दोन । निरसन करी जो ।।१२।।
**नमो व्यक्ताव्यक्त हरी । नमो मायासंहार केसरी ।**
**नमो सर्वांच्या माजी घरी । नांदसी तू आत्मारामा ।। १३ ।।**
व्यक्ताव्यक्त दोनी हरी । जो का मायेचा संहारकरी ।

सर्वांचे जीवनी माजघरी । वससी आत्मा तुज नमो ।।१३।।

**जीवशिव नमो तुज । नमो सर्व जीव बीज ।**
**नमो तुचि सहज । श्रीविठ्ठला ।।१४।।**

रामकृष्णवाचा जीव । तयाचे जे पूर्णत्त्व ।
तोच शिवबीज भाव । श्रीविठ्ठला नमोजी ।।१४।।

**लीलेस्तव नटारंभ । नमो जगदादि अखिल स्तंभ ।**
**उभा राहोनि प्रतिभ । भीमातीरी पंढरिये ।।१५।।**

आरंभीचा नट लीले । आधारस्तंभ जगदादिखिले ।
प्रतिभास्वरुप उभे खेळे । पंढरिये भीमेसी ।।१५।।

**नमो ऐशिया रुपेशा । नमो त्रैलोक्य विस्तार ठसा ।**
**नमो आदिपरेशा । जगदादिशा युगादि ।।१६।।**

नमो यापरी रुपश्रेष्ठा । त्रैलोक्यविस्तार ठसा वरिष्ठा ।
नमो आदिपरमात्मेष्ठा । जुगादि समर्था ।।१६।।

**नमो पुरुषोत्तम परेशा । नमो सकळही उदासा ।**
**करुनि जीवरुप ठसा । नांदसी तू चराचरी ।।१७।।**

नमो परेश पुरुष उत्तम । सर्वी उदास परम ।
ठसले जीवरुप वर्म । चराचरी ।।१७।।

**मधुसूदना तुज नमो । मधुमाधवाहृदयनमो ।**
**नमो मधुर गीत नमो । माजी घरी आत्माचिये ।।१८।।**

तुज नमो मधुसूदन । हृदयामाजी तू रममाण ।
मधुमाधव मधुरगान । आत्मया घरी ।।१८।।

**त्रिविध तिमिर नाशा । परम परमानंद उल्हासा ।**
**नमो पुरविसी आशा । हरिभक्ताची श्रीहरी ।।१९।।**

त्रिधातिमिर करिसी नाश । परमश्रेष्ठ आनंदोल्हास ।
स्वरुपे पुरवी भक्तांची आस । तया तुज नमो ।। १९ ।।

**नमो वासनाचक्र चाळी । नमो तुंडवितुंड गेली ।**
**नमो सर्वही हरिली । प्रपंच रचना ।। २० ।।**

वासनाचक्र चाळवी । तंडवितंड गाथा न ठावी ।



सर्व प्रपंच रचना हरवी । तया नमो ।।२०।।

**नमो श्रीधर श्रीकर । नमो सर्वसंगी विकार ।**
**नमो विकृती विकार । हरिसी नामे एके ।।२१।।**

नमो श्रीयेसी आधार । मस्तकी ठेवी श्रीकर ।
सर्वसंगी विकृती विकार । एक नामे हरि जो ।।२१।।

**नमो शांतिदयाक्षमा । नमो कृपाकर पुरुषोत्तमा ।**
**नमो कासवदृष्टीसमा । निष्कलंक नाथा ।।२२।।**

नमो दयाक्षमाशांति । पुरुषोत्तम कृपाहस्त माथी ।
कासवीदृष्टीसम चित्ती । निसंग नाथा ।।२२।।

**नमोब्धी विश्वाद्य छेदका । नमो एकार्णवपावका ।**
**नमो द्वादश अर्का । सुभाषका वेदवक्ता ।।२३।।**

नमो आद्यविश्व सिंधू छेदका । एकार्णव वायू जो का ।
नमो द्वादशा दिव्य देखा । वेदवक्त्या परम जो ।।२३।।

**नमो चित्तचकोर हर्त्यां । सर्वकारण कार्यकर्त्या ।**
**नमो तुज वाचोनि सत्या । विवेक प्रत्ययापै नये ।।२४।।**

नमो चित्तचकोर हरण । सर्व कार्यकर्त्या कारण ।
सत्यत् तुजविण । विवेकानुभव नयेचि ।।२४।।

**नमो अद्वैतअनंता । नमो निर्द्वंद्व भोक्ता ।**
**नित्यानित्य सरता । तुज नमो नमो ।।२५।।**

नित्यानित्य सरले । तेथ द्वैत नुरले ।
भोगी अद्वयानंत उगले । नमो तया ।।२५।।

**नमो दुर्गती हरणा । नमो सर्व हरणभरणा ।**
**नमो सर्वदृष्टनिवारणा । भयहरणा जगदीशा ।।२६।।**

जो का दुर्गती हरी । सर्व हरोनि मरण करी ।
भय नासोनि दृश्य वारी । जगदिशा तुज नमो ।।२६।।

**नमो शिवशक्ति समलिंगा । नमो भक्षक काळवेगा ।**
**रुद्रादित्यावसुपैगा । समसर्वांगा परमेशा ।।२७।।**

शिवलिंग समता शक्ती । काळवेग भक्षक गती ।
रुद्रादित्यवसुलिंगाकृती । सर्वांग ईशा नमोजी ।।२७।।
**नमो कृत्रिम दहना । नमो कृशकरण हरणा ।**
**नमो प्रतिपाद्यकरणा । नारायण तुज नमो ।।२८।।**
नमो कृत्रिमनाशका । नमो नमो सूक्ष्मकारका ।
नमोजी प्रतिपालका । नारायणा गुरुलिंगा ।।२८।।
**नमो इंद्र्येनियंत्या । नमो प्रपंच अकृत्या ।**
**नमो दीनादित्या । सकल बुद्धी तूचि ।।२९।।**
नमो इंद्रियस्वामी । प्रपंच तव अकृत्य उर्मी ।
दीन स्वरुपादित्य नामी । बुद्धीची कळ तूचि ।।२९।।
**नमो अवधूत दत्ता । नमो अपरमित मिता ।**
**नमो सर्वांवरिष्ठ सत्ता । तू चाळिता हृषिकेशी ।।३०।।**
नमो निरुपाधी दाता । नमो प्रमाण दत्ता ।
नमो सर्वश्रेष्ठ सत्ता । तू चालक इंद्रिया ।।३०।।
**नमो दृष्ट दर्पादर्पा । नमो चमत्कार गंगासर्पा ।**
**नमो मनोहरण पापा । नमो स्वल्पा रामकृष्णा ।।३१।।**
नमो दृश्य दर्पा अदर्पा । नमो चमत्कृती गंगारुपा ।
हरिसी मनोवृत्ति पापा । नमो सुक्ष्म रामकृष्णा ।।३१।।
**नमो चतुर्वेद दीप्ता । नमो हरणकरण सुप्ता ।**
**जागृति स्वप्नगुप्ता । सत्यसुप्ता महाविष्णु ।।३२।।**
नमो चतुर निःश्वास प्रकाशा । हरण करण परि अकळसा ।
जागृतस्वप्नी गुप्त कसा । अगम्य सत्य महाविष्णू ।।३२।।
**नमो देवेश्वरे सुक्ता । महामोहा महाहर्ता ।**
**मंदमंद नियंता । नमो नारायणा ।।३३।।**
देवेश्वर जो बोलिला । महामोह जेणे हरिला ।
मंदत्वे करी नियमनाला । नमस्कार श्रीनारायणा ।।३३।।
**क्षीरनीर निर्झरा । नमो विदग्ध अनुकारा ।**



**नमो विवेक सागरा । महा नादा ।।३४।।**
स्थिरजल निर्झर झरा । नमो विद्‌गद अंतरा ।
अनुकरणीय विवेक सागरा । नाद रुपा ।।३४।।
**नमो मुखदंत सदना । नमो भक्षक भुवना ।**
**भोक्तावरा शुक्लवर्णा । दयाघना गुणनिधी ।।३५।।**
नमो मुखदंतधामा । नमो भुवन भक्षक प्रेमा ।
शुक्लांबर भोक्ता आत्मारामा । दयाघन समुद्रा ।।३५।।
**मृतामृता नमो नमो । नमो श्रुतिशास्त्र नमो ।**
**नमो महागर्व नमो । पद्मगर्भानंता अनंता ।।३६।।**
नमो नमो मृता अमृता । नमो श्रुतिशास्त्र संमता ।
गर्व सीमा जेथ सत्ता । पद्मगर्भा श्रीअनंता ।।३६।।
**नमो चिदाकाश व्याप्ता । चित्सत्ता चळणसत्ता।**
**चित्त्स्वरुपा आदिरुपा । भुवनदीपा महामूर्ति ।।३७।।**
नमो सोहंअवकाश व्याप्ता । चैतन्यसत्ता क्रियासत्ता।
स्वरुप चैतन्य आदिरुपता । भुवन प्रकाश अपार मूर्ति ।।३७।।
**नमो एक एकार्णव । नमो कल्पादि गुणवैभव ।**
**नमो सकळ हे दैव । हे भाव पै तुझे ।।३८।।**
नमो एकत्त्व एकसागर । कल्पारंभी गुण अपार ।
सकळ वैभव हे दैव थोर । भाव सारे तुझेचि ।।३८।।
**गोगोपाळ नमो नमो । गोविंद गुण विष्णु धर्मो ।**
**नमो चित्त चिंतनी रमो । सर्वकाळ तुझ्या चरणीं ।।३९।।**
गोनाम इंद्रिय पालका । गोविंदगुण विष्णु रक्षका ।
चित्त चिंतनी चैतन्य सुखा । नमन सदा तव चरणीं ।।३९।।
**ध्वजा वज्रांकुशा । ध्वज नीळ विकाशा ।**
**ध्वजांबरा अष्ट दिशा । निलिमा भासती शामांकिता ।।४०।।**
ध्वज वज्रांकुश ठसा । नीळध्वज चिदाकाशा ।
तेणें आकाश अष्टदिशा । नीलवर्णा ।।४०।।

**सुषुप्तीचे जे सत्य । ते नमो तुज कृत्य ।**
**असोस जे अमित्य । ते ते क्षमा करी स्वामी ।।४१।।**
सुषुप्तीमाजी खरे । जे अकृत्रिम पसरे ।
असो जसे पैल अपारे । क्षमारुप नमोजी ।।४१।।
**नमो निर्धार नियंता । नमो सुखरुपदाता ।**
**नमो आलिया पदार्था । क्षमा करी स्वामी ।।४२।।**
निर्धारी धृती नियंता । नमो आनंददाता ।
नमो आलिया दृश्यता । क्षमा कीजे ।।४२।।
**नमो चित्त विभ्रमो । नमोधार्य धैर्य नमो ।**
**नमो पुराण पुरुषोत्तमो । पाहे पा कासवदृष्टी ।।४३।।**
नमो चित्त भ्रमणा । नमो धृती धैर्य धारणा ।
नमो पुरुषोत्तम पुराणा । कूर्मत्वे विलोकी ।।४३।।
**पसायदाना नमो । परमपरेशा नमो ।**
**ध्यानांतर नमो । तुझ्या चरणीं केशवा ।।४४।।**
नमोजी प्रसाददाना । परमपरेश करुणाघना ।
ध्यानाचिये अंत:करणा । आत्मया ते ।।४४।।
**आग्रह निहंत्या नमो । सुग्रह परी नमो ।**
**अनंत नित्य धर्मो । वैकुंठग्राम नमोनमस्ते ।।४५।।**
निराग्रह तुज नमो । उत्तम ग्रह परी नमो ।
अनाद्यंता सत्य धर्मो । वय कुंठित ग्रामी या ।।४५।।
**अनादृश्य दृश्यमान । दृश्यादृश्य नित्य घन ।**
**सुखरुप जगज्जीवन । तुज नमो स्वामी ।।४६।।**
अदृश्यापैल दृश्यमान । द्रष्टा दृश्य अखंड घन ।
सुखरुप जगीं प्राण । तुज नमो ।।४६।।
**दीप्ता दीप्ता अदृश्य । जीवन दिसती सादृश्य**
**जीवमय हे भास । तुज नमो स्वामी ।।४७।।**
प्रदीप्ता दीप्ता अलक्ष । जीवन दोही सदृश्य ।



जीवरुप तेथ भास । तुज नमो स्वामीया ।।४७।।
**परम परब्रह्मा । आदिब्रह्मा तू रामा ।**
**भक्तालागी तू साऊमा । तुज नमो ।।४८।।**
परमश्रेष्ठ सोहं ब्रह्मा । आरंभीचिया श्रीरामा ।
भक्तासी तू सगुणोत्तमा । तुज नमो ।।४८।।
**नमो नमो एक तत्वां । बाह्यमुद्रा शुद्ध सत्वा ।**
**योगारुढ परम तत्वा । सबाह्य पावसी तुज नमो ।।४९।।**
नमो एक नाम तत्त्वा । प्रसन्न मुद्रा शुद्ध सत्त्वा ।
योगस्थित श्रेष्ठ भावा । सबाह्य स्थिती तुज नमो ।।४९।।
**वेदादि परम वक्ता । वेदादि तूचि कर्ता ।**
**तुज वाचोनि सर्व सत्ता । नमो भोक्ता न देखो ।।५०।।**
नि:श्वास निर्मी वक्ता । मूळ जाणीवरुप कर्ता ।
तुजविण न शक्ति सत्ता । नमो भोक्ता सकळही ।।५०।।
**ज्योतिर्मय रुप तुझे । सर्व तत्वा तूचि बीज ।**
**नमो तूचि सहज । पुढती पुढती नमो नमो ।।५१।।**
सोहंज्योतीरुप तुझे । तूचि मूळ प्रणव बीज ।
सकार हकार जेथ सहज । पुढती पुढती नमोजी ।।५१।।
**परमब्रह्म परात्पर । परमतत्व परम सार ।**
**परम गुह्य परम विचार । तुज नमो नारायणा ।।५२।।**
श्रेष्ठ सोहं परात्पर । श्रेष्ठ तत्त्व श्रेष्ठ सार ।
श्रेष्ठ गौप्य श्रेष्ठ विचार । नमोजी श्रीनारायणा ।।५२।।
**दिघड विघड सुघड । जाडा जड अवघड ।**
**द्वैताद्वैत जोडाजोड । कर्ता कार्यता तुज नमो ।।५३।।**
आदि विज्ञान चांग घडण । श्रेष्ठ जड सूक्ष्म चैतन्य ।
हे द्वय जोडगण । कर्ता कार्या नमोजी ।।५३।।
**संख्यारहित जीवना । असंख्या जीव पाळणा ।**
**नमो तुज संजीवना । पुंडलिकघना पांडुरंगा ।।५४।।**

संख्ये पैल शून्य जीवना । असंख्य जीव तारणा ।
नमो तुज समजीवना । पुंडलिक ठेव पांडुरअंगा ।।५४।।
**निर्गुण सगुण रुपा । देवा देव तू सोपा ।**
**तुझी झालिया कृपा । नमन बापा तुझिया चरणी ।।५५।।**
गुणा पैल जे सगुण । सकार गुणाचे जेथ मीलन ।
सोहंमाजी स्वयंपूर्ण । आकळे त्या मुळा नमो ।।५५।।
**नमो नमो तारका । तू ब्रह्म नाम विशेखा ।**
**नमो तुजवाचोनि सखा । योगीयासी पै नाही ।।५६।।**
नमो तारकरुप तारणा । सोहं नाम विशेषणा ।
तुजवीण सखा जीवना । न योगियाही ।।५६।।
**युगादि युगत्रय । युगजोग योगमय ।**
**हे तुज पासाव होय । ऐसिया नमो ।।५७।।**
आदि सत्‌चिदानंदमय । एकत्त्वें जुगे योगमय ।
एकत्त्व जेणें होय । तया नमो ।।५७।।
**नमो नमो नम । नाहीं नाहीं तुजसी सम ।**
**ऐसा परा पश्यंन्ती नेम । वदलिया चारी ।।५८।।**
नमो नमो नम । जगीं नाहीं तुजसम ।
स्फुरद्रुपी दर्शन नेम । अभ्यासी चौ वाणी ।।५८।।
**चहुमुक्ती परतत्त्वा । पंचमु जो शुद्ध सत्त्वा ।**
**षड्मार्ग गुण सत्वां । ग्रास न करिसी तुज नमो ।।५९।।**
सलोकतादि चारी मुक्ती । पैल पांचवी शुद्ध स्थिती ।
षट्‌चक्रावरी प्रचिती । शुद्ध सत्त्वा तुज नमो ।।५९।।
**विद्वदचिद्‌विलासा । भानुबिंबा प्रति प्रकाशा ।**
**नमो तेज तेजसा । आदि सूर्या ।।६०।।**
चिद्‌गद चैतन्य प्रकाशा । प्रकाशवी सूर्या ऐसा ।
नमो तेजाचे तेजसा । आत्मसूर्या ।।६०।।
**ऐसा चहुग्रंथीचा क्लेशु । वाऊगाचि वाहे सोसु ।।**



**तिमिर त्रिगुण असोसु । तो सत्वांशु तोडी माझा ।।६१।।**
चत्वार देहांचा शीण । वाऊगा सोसे आपण ।
न सोसे अज्ञान त्रिगुण । सत्वांशुची मुक्त करी ।।६१।।
**साहीनाडी चक्र भ्रमे । वाहतां इंद्रियांची ग्रामे ।**
**ते आडखळोनि साऊमे । नये ऐसे करी नमो ।।६२।।**
षटचक्र नाडी भ्रमे । जीवन वाहता इंद्रिय ग्रामे ।
सोहंकारी रिघोनि नेमे । नयो परती तया नमो ।।६२।।
**बाध्य बाधा कर्मांची । सर्वं सत्ता या भ्रमाची ।**
**नमने करुनि तुमची । तुम्हांसी अर्पिली स्वामी ।।६३।।**
बाधक बाधा क्रियेसी । सत्ता जीवन भ्रमणाची ।
नमनेचिया तुमची । समर्पिली ।।६३।।
**यया धर्माचिया सत्ता । कर्मधर्माचिया पंथा ।**
**कर्म-धर्म विधाता । ऐशिया नेमिता तुज अर्पिला ।।६४।।**
यम नियमचिया सत्ता । कर्म धर्म आचरिता ।
परि तया जो नियंता । तया नेमी देह अर्पी ।।६४।।
**दम शम साधन । इडा पिंगला सुषम्न ।**
**साही चक्रे दरुपण । तुझी तुज अर्पिली ।।६५।।**
इंद्रिय मनोनिग्रहण । इडा पिंगला जे सुषुम्न ।
षटचक्री आत्मदर्शन । ते कृती तुज अर्पी ।।६५।।
**मन पावन योग धारण । तू यासी पै कारण ।**
**समतुके अवघे गुण । तुझ्या चरणीं नि:क्षेपिले ।।६६।।**
मन पवनासह धारण । ऐसा पावन योग कारण ।
समधात जै गुण । ते तुज अर्पिले ।।६६।।
**हे भूत भौतिक प्रचंड । जन्म उत्पत्तिचे अंड ।**
**जन्मयुगादि ब्रह्मांड । खंड विखंड तू जाणता ।।६७।।**
होऊनि ठेले भौतिक चंड । जे उत्पत्तिचें अंड ।
जुगारंभी जे ब्रह्मांड । खंड विशेष ज्ञान तुवा ।।६७।।
**प्रचुर चर्या चित्ताची । धावन वलन आकोंचनाची ।**

**सूचना जे चमत्काराची । तेही अर्पण तुज सदा ।।६८।।**

चित्त स्वस्थ मुद्रा प्रसन्न । चलन वलन आकुंचन ।

अविष्करें प्रकर्ष गुंफण ।जे घडे ते अर्पी ।। ६८ ।।

**निर्वासना वासना मुक्त । गुंतले राहिले जेथें चित्त ।**

**तेथे तू धावोनि अनंत । सोडविसी वासनामय ।। ६९ ।।**

निरिच्छ इच्छायुक्त । गुंतोनि संसरणी चित्त ।

झाले उपाधीभूत । तू अनंत सोडवी ।।६९।।

**सूक्ष्म अविचारा बोला । बोलि नातुडे व्यर्थ गेला ।**

**तो म्या बुझावोनि संबोखिला । मग लाविला तुझ्या पंथी ।।७०।।**

सूक्ष्म निर्विचार बोले । बोले न कळे व्यर्थ झाले ।

ते भेणे उपदेशिले । आयुष्य दिले तुझ्या पंथे ।।७०।।

**नित्य धर्माचिया वोळी । चळल्या चुकल्या कोण चाळी ।**

**त्यासी वेद तुझा पाळी । त्या तूं सांभाळी परब्रह्मा ।।७१।।**

धारणेचिया ओळी । चिदे चलन चंचळी ।

तया निश्वास प्रतिपाळी । ते सांभाळी स्वरुपा ।।७१।।

**श्रृतिस्मृतिंची वचनें । त्याची आंग मार्ग स्थाने ।**

**कीर्तने गुणवर्णने । हेही नारायणे अंगीकारावी ।।७२।।**

श्रवणे स्मरणी उठति वचनें । ते अनुहत मर्मस्थाने ।

नटनाच कीर्तन सोहंगाने । श्री नारायणे ऐकावी ।।७२।।

**उदंड विदंड वितंड । देह द्वयाचें अभंड ।**

**जे जे दिसे भ्रंश अंडांड । ते शुभ्रचंड-सांभाळी ।।७३।।**

उदंड प्रचंड विज्ञान दंड । स्थूल सूक्ष्माचे घमंड ।

क्षरोनि प्रगट अंडांड । सौम्यज्वलनि सांभाळी ।।७३।।

**देह भरणाची ममता । देह पोखिती जे सत्ता ।**

**त्याही वरील सूक्ष्मता । ते कृपावंता सांभाळी ।।७४।।**

देहभरण जे ममता । देह पोषी जे सत्ता ।

तया निरसने सूक्ष्मता । कृपा योगे सांभाळी ।।७४।।



**तिमिर त्रिगुण अवघे । जे जे आले असेल वोघे ।**

**ते तू सकळ वेगे । सांभाळी ।।७५।।**

अज्ञान सत्व रज तम अवघे । जे आले जीवनीं ओघे ।

कालप्रवाही वेगे । सांभाळी सकळ ।।७५।।

**योनीचिया कष्टा । वरी वासना होती भ्रष्टा ।**

**त्या त्या करुनि प्रविष्ठा । रतलो तुझ्या चरणी ।।७६।।**

योनीसी होती कष्ट । तै वासनाचि होय भ्रष्ट ।

ते करोनि अंतरनिष्ठ । विलीनची तव चरणीं ।।७६।।

**विद्या वयसा कुळ । ब्रह्मकर्म आचारशीळ ।**

**गेले आले विव्हळ । ते तू दयाळ सांभाळी ।।७७।।**

ज्ञान वय आणि कुळ । ब्रह्म कर्म क्रियाशीळ ।

गेले आले अहं ते विव्हळ । सांभाळी गा दयाळा ।।७७।।

**नाना जन्म अवतार । नाना शाखांचे निर्धार ।**

**नाना गोत्र उच्चार । तुझा विचार तुं जाणसी ।।७८।।**

नाना परी देहां येणे । नाना शाखा निर्धारणें ।

नाना गोत्र उच्चारणें । हा विचार तुझाचि ।।७८।।

**पाठ वेदादी वचने । शास्त्रदृष्टी अवलोकने ।**

**कीर्तन गुणवर्णने । हीही नारायणे अंगिकारावी ।।७९।।**

चारी वेदांची वचने । साही शास्त्रांची परीक्षणे ।

गोविंद कीर्तनी लीला वर्णनें । परिसावी नारायणें ।।७९।।

**सर्वमय सर्व सपाट । त्यावरि करुनि चालिलो वाट ।**

**चंद्र सूर्य नक्षत्रे घनदाट । करुनि एकवट पायरी ।।८०।।**

सर्व रुप ते एकवट । करुनि चोखाळिली गगनी वाट ।

चंद्र सूर्य नक्षत्रे अफाट । मूळावस्था ।।८०।।

**सर्व अंडाचे ब्रह्मांड । मी न म्हणे अंडाअंड ।**

**खंडे करुनिया निखंड । प्रचंड मी तुजसी बोले ।।८१।।**

सर्व अंडाकृति ब्रह्मांड । म्हणोनि न म्हणे अंडाअंड ।

खंडे जाहली अखंड । तू मी एकचि गूज हे ।।८१।।

**रोमरंध्री ब्रह्मांडे । सकळ विराटमय खंडे ।**
**ऐसी महत् ब्रह्मे प्रचंडे । तुझ्या अंगी दातारा ।।८२।।**

तव रोमरंध्री ब्रह्मांडे । अनंत विराटरुप खंडे ।
महत्‌भूतेच ती प्रचंडे । तव ठायी दातया ।।८२।।

**तूं विश्वरुपाची घडी । तारक ब्रह्मची उघडी ।**
**मिया निज दृष्टीने चोखडी । तुझी मूर्ती न्याहाळीन ।।८३।।**

तू विश्वपटाची घडी । निरुपाधि स्वरुप उघडी ।
तारक निज दृष्टी ये सवडी । निरिक्षे मूर्ती शुद्ध पै ।।८३।।

**ते न सुटे निज कळे । ये-ह्वी हे ना कळे ।**
**तुझिया कृपा गुणे आकळे । तुझिया दासा निजभक्ता ।।८४।।**

अस्तित्व जे तेणे कळे । ते कळेना तरी न कळे ।
कळे न सुटे आकळे । कृपागुणे भक्तासी ।।८४।।

अनंत या नामाचा संकेत । मन मुराले जेथें निर्धुत ।

**तूं पणे परमाद्भुत । परमानंदा ।।८५।।**
**अनंतत्व नाम संकेत । सहज मन मुरे जेथ ।**

तूपणे श्रेष्ठ अद्भूत । निरहंकार स्वानंदा ।।८५।।

**गुणग्र गोसावी राम । गुणसमुद्र गुणग्राम।**
**सर्व भूतांचा विश्राम । तुज नमो ।।८६।।**

जीवन सुत्राचें जे अग्र । इंद्रिया स्वामित्व अपार ।
तो गुणग्राम गुण समुद्र । आराम राम तया नमो ।।८६।।

**नमन केलिया विभुती । चित्त रमलें झाले विश्रांती ।**
**तुज देखिलिया श्रीपती । न राहे चित्ती तळमळ ।।८७।।**

नमन केलिया विशेष भूती । चित्त रंगले विश्रांती ।
तुज देखिल्या रमापती । चित्ती नुरे तळमळ ।।८७।।

**नमन हेची थोर दिसे । ए-ह्वी तरंगाकार भासे ।**
**देखिलें तितुके नासे । नैश्वर्य ऐसी श्रुति बोले ।।८८।।**



नमन मनाविण थोर दिसे । मनत्वे नातरी तरंग भासे ।
जे जे दिसे ते ते नासे । नश्वर हे श्रुति सांगे ।।८८।।

**नमन हेचि परम । नमन हे सुवर्म ।**
**नमन हेचि आत्माराम । करुनि घाली ।।८९।।**

नमन हे वरिष्ठ । नमन हे वर्म चोखट ।
नमन आत्माराम निघोट । मनाविण ।।८९।।

**नमन हाचि अनुभव । नमन हाचि मुख्य भाव ।**
**नमन हाचि पै देव । देवाधिदेव तूं पावसी ।।९०।।**

मनेविण अनुभव । म्हणोनि नमन थोर भाव ।
नव्हे नव्हे तोचि देव । देव देव तू पाव गा ।।९०।।

**नमन हेचि श्रेष्ठ पीठा । नेतसे तुझिया वाटा ।**
**तुज ऐसा श्रेष्ठा । मग या वाटा काय कराव्या ।।९१।।**

नमनावस्था श्रेष्ठ पीठ । तवपदी जे पोहचे वाट ।
तुज ऐसा भेटे वरिष्ठ । चाल कैची ।।९१।।

**नमन हेचि तारक । नमन हाचि विवेक ।**
**नमनेवीण त्रैलोक्य । आडमार्गे रिघताती ।।९२।।**

नि:संकल्प तारक । नि:संकल्प विवेक ।
तयाविण त्रिलोक । आडरानी जाताती ।।९२।।

**नमनलटिके नव्हे नव्हे । नमन भलतियासि न साहे ।**
**जैसा साह्य सखा होय । श्रीनिवृत्ति ।।९३।।**

मनेवीण ते लटिके नव्हे । दुजियासी ते न लाहे ।
जै पाठीराखा होये । श्रीसद्‌गुरु श्रीनिवृत्ति ।।९३।।

**नमना एवढा मंत्र । नाहीं नाही धुंडिता शास्त्र ।**
**विचार लक्षण पात्र । तेचि जाणे येथिचे ।।९४।।**

नमन हे मनतर । तया वाचुनि न शास्त्र ।
शोधिता विचारे लक्षण पात्र । वर्म जाणे येथिचे ।।९४।।

**नमन करी ब्रह्मा श्रेष्ठा । नाभिकमळी धरी वैकुंठा ।**

**नमन करी नीळकंठा । तीर्थे मस्तकी वंदिती ।।९५।।**

नमितसे ब्रह्मा वरिष्ठा । नाभी धरी जो वैकुंठा ।
नमितसे आदिपीठा । वंद्य तीर्था ।।९५।।

**इंद्र चंद्र महेंद्र थोर । नमनेवीण नैश्वर ।**
**अंडामध्ये चराचर । नमनेवीण न तरती ।।९६।।**

इंद्र चंद्र सारे थोर । परी नमनेवीण नश्वर ।
अंडामाजी चराचर । नमनेवीण तरती कै ।।९६।।

**श्रीगुरुकृपा जै होय । तै नमनाची ऐसी सोय ।**
**पाऊनि सुगम उपाय । नमोनमस्ते तुज ।।९७।।**

श्रीगुरुकृपा जरी होय । तरीच नमन सोय ।
लाभे सोपाचि उपाय । नमोनमो ।।९७।।

**नमस्ते नमस्ते नमस्ते । पुढती पुढती नमस्ते ।**
**समाधि सुख आस्ते । नमो नम: करिता ।।९८।।**

नमो नमो ऐसे करिता । प्राप्त होय नमनावस्था ।
मन येई उन्मनी प्रांता । समाधिसुखा ।।९८।।

**नमो नमो आदिपीठा । शिवादि गुण वरिष्ठा ।**
**येथे येऊनि वैकुंठा । समाधि शेज घातली ।।९९।।**

नमो नमो मूळ पीठा । आदिनाथादि गुणश्रेष्ठा ।
येवोनि देहीच वैकुंठा । समाधी ते पातली ।।९९।।

**महाविष्णु तू योगरुपा । महारुपाचिया स्वरुपा ।**
**महादित्या अमूपा । कोटि रुद्र तेजसा ।।१००।।**

योगावस्था योगरुपा । महाविष्णु तू स्वरुपा ।
अनंत सूर्य अमूपा । अमित तेज ।।१००।।

**शंख चक्राने मंडित । कर कमळ तुझे मिरवत ।**
**पदक ह्रदयावरी शोभत । आणि श्रीवत्सलांच्छन ।।१०१।।**

शंख चक्र चिन्हांकित । हस्त कमळ भारी शोभत ।
पदक ह्रदयी झळकत । भृगुपद ।।१०१।।

**अनंत बाहुंचा मेळ । तो तू चतुर्भुज गोपाळ ।**



**मुगुट विराजीत तेजाळ । कोटिसूर्याहुनि प्रभा ।।१०२।।**

असंख्य गतींचा एक मेळ । तो तू चतुरगती गोपाळ ।
मुगुट शोभे तेजाळ । निरुपम ।।१०२।।

**पितांबर माळ कंठी । सर्वांगी चंदनाची उटी ।**
**हिरे माणके कटीतटी । अनेक किळा फाकती ।।१०३।।**

पीतप्रभा ज्याचें वसन । कंठी माळ सर्वांगी चंदन ।
जीवनकला प्रकाशमान । कटी प्रदेशी ।।१०३।।

**क्षूद्र घंटिकांच्या वोळी । घणघणाट तयातळी ।**
**देहुडा पाऊली निश्चळी । वेणु वाजविसी सुस्वरे ।।१०४।।**

सूक्ष्म घंटिकांची ओळी । घटघणाट सदाकाळी ।
वाकुलें चरणी अचळी । अनुहत उमटे पै ।।१०४।।

**रुणुझुणु रुणुझुणु । ऐसा वाजविसी वेणु ।**
**सुंदर तू शामतनु । अलंकापुरी उभा असशी ।।१०५।।**

रुणुझुणु रुणुझुणु । अनुहात वाजवी वेणु ।
नाद श्रवण शाम वर्णू । साक्षात्कार आळंदीसी ।।१०५।।

**सभोवते गोपाळ तुझे । ते अंतरंग सखे माझे ।**
**पुंडरिक तरी सहजे । प्राणसखा पै माझा ।।१०६।।**

गोनाम इंद्रिय वृत्ति । अंतरंग सखे शोभती ।
भाव पुंडरिक वसती । प्राणप्रिय जो माझा ।।१०६।।

**ऐसा ज्ञान उद्बोध बोले । ज्ञानाज्ञान निरसले ।**
**विज्ञानहि हरविले । दृश्यद्रष्टे नसी ।।१०७।।**

ज्ञान प्रकर्ष बोले । जेथ ज्ञानाज्ञान सरले ।
विज्ञानही नुरले । त्रिपुटीविण ।।१०७।।

**बापरखुमादेविवरु । समाधि देऊनिया स्थिरु ।**
**वरी ठेऊनिया अभय करु । वर देऊनि राहिला ।।१०८।।**

भगवान परमेश्वरु । बापरखुमादेविवरु ।
समाधि देवुनि स्थिरु । वरदचि ठेला ।।१०८।।

**ऐसे श्रीज्ञानराजे नमन । केले तो संतुष्ट भगवान ।**

**तीन दिवस हरि कीर्तन । झाले कान्होपाठकांचे ।।१०९।।**
**मागुती नमने मनचि नुरले । मनाचे उन्मन होवोनि ठेले ।**
**संजीवन होवोनि राहिले । श्रीज्ञानेश्वर समाधीये ।।११०।।**
**ते संजीवन समाधी । जेथ नुरली उपाधी ।**
**स्तोत्र कोरिले अंतरामधी । श्रीज्ञानेशकृत श्रीनामदेवे ।।१११।।**
**श्रीनामदेवांचे उपकार । जगावरी झाले थोर ।**
**तेणें ज्ञानेशकृत नमन स्तोत्रा । निधान लाधले आम्हासी ।।११२।।**
**माऊलीनें जी केली स्तुती । तेचि घेतली संगती ।**
**इंदिरा गोविंदतनय चित्ती । चरण धरी ज्ञानाईचे ।।११३।।**
**मम गोविंदपितया आपण । ज्ञानराजे प्रत्यक्ष दर्शन ।**
**ज्ञानेश्वरीचे पारायण । होताची दिले ।।११४।।**
**श्रीज्ञानराजांची समाधी । आणि तयापुढे नंदी ।**
**मध्ये कीर्तनाची संधी । पर्वणी हे ।।११५।।**
**समाधी संजीवन । हाचि विषय परिसून ।**
**पंच होती तल्लीन । नारळ प्रसाद दिलासे ।।११६।।**
**ज्ञानाईचे भजन । करिता नुरे देहभान ।**
**ऐसी जवळीक म्हणून । आम्हा ठेव लाधली ।।११७।।**
**माऊलीने स्फुरविले । तें त्यांचे पदी अर्पिले ।**
***दासराम* पदकमळें । शिरी धरी ।।११८।।**
**निंबरगी चिमड सांगली । मम परंपरा पीठे भली ।**
**दासराम सदा भारी । नमीतसे ।।११९।।**
**श्रीहनुमंत कृपा लाघव । अंतरी उमटला भाव ।**
**ते भावार्थनमन ठेव । श्रीगोविंदपदी दासरामी ।।१२०।।**

श्रीदासराम लेखन वही क्र.८२,८५,१०५,११४,१३०

*****



## प्रकरण - ५

श्रीदासराममहाराजकृत भावार्थासह

## प्रणव (ॐकार अक्षर)

**प्रस्तावना :**

या प्रकरणात श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या 'प्रणव' या शीर्षकाखाली असणाऱ्या १२६ चरणांच्या अभंगावर श्रीदासराममहाराज यांनी गद्य भावार्थ लिहिला आहे. हे प्रकरण दासराम लेखन वही क्र.८२, १३४अ, १५६, १५७ या चार वह्यांमध्ये लिहिले आहे. हे प्रकरण रविवार, चैत्र शु.१, शके १८९० दि.१४.०४.१९६८ रोजी म्हणजेच वयाच्या ४८ व्या वर्षी लिहिले आहे.

डॉ. के. वा. आपटे यांनी यापूर्वी 'प्रणव' या प्रकरणावर थोडक्यात प्रस्तावना लिहिली होती ती खाली देत आहे.

प्रणव म्हणजे 'ॐ कार अक्षर'. हा अभंग त्र्यं. ह. आवटे यांनी शके १८३० मध्ये प्रकाशित केलेल्या 'अभंगगाथा' या ग्रंथातील ७५२वा आहे. हा अभंग प्रदीर्घ म्हणजे १२६ चरणांचा आहे. या अभंगात अनेक संख्यांच्याद्वारा, अनेक संख्यांचा निर्देश करून तत्त्वज्ञान मांडले आहे. हा अभंग अत्यंत क्लिष्ट आहे. त्याचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी श्रीदासराममहाराजांनी त्याचा गद्यार्थ लिहिला असून त्याला ''सार्थ प्रणव'' असे शीर्षक दिले आहे.

**ॐ कार अक्षर बीज रे । अमित्य भुवनी प्रकाशुनि गेले रे ।**
**ते मकाराचे पोटी आहे रे ।।१।।**

अ म्हणजे नाही, क्षर म्हणजे नाश ज्याला, अशा अक्षराचे बीज हा ओंकार असून, ज्याला मिती म्हणजे प्रमाण नाही, जे कोणत्याही प्रमाणाने आपणांस भौतिक दृष्टीने दाखविता येणार नाही, अशा आकाशापेक्षाही सूक्ष्म भुवनांमध्ये प्रकाशून गेले आहे, ते मकाराचे म्हणजे सूक्ष्मतम ध्वनीचे पोटात आहे (१).

**उकाराचा शेंडा पाही रे । एकविसा मंदराचळा भेदूनि गेले रे ।**
**मा वेदबीज वेगळे परात्पर पाहे रे ।।२।।**

ते बीजतत्व उकारात्मक गतीचा शेंडा पहात असून, अचल अशा जीवनाचे मंद्र स्वराला एकवीस टप्प्याने भेद करून आरपार गेले आहे. परंतु परमात्म्याचे निःश्वासाचे परात्पर बीजतत्व वेगळेच असून, सर्वातून वेगळे होऊनच तू ते पाहा (२).

**मागे बोलिलो ते ज्ञान रे । चोविसा अक्षरी संध्यावळी सोंग रे ।**
**परि त्या अक्षराचे अमित्य आहे रे ।।३।।**

मागे जे बोललो ते ज्ञान असून, चोविस अक्षरी चोविस नामाची संध्यावळी हे त्याचे बाह्य कवच आहे. परंतु त्या अक्षरबीज तत्वाचे प्रमाणे हे प्रमाणांचे पलीकडील अप्रमाणच आहे (३).

**चारी म्हणो तरी नव्हे रे । साही म्हणो तरी भुलली बापुडी ।**
**मा अठरांची दशा ते काई रे ।।४।।**

चार वेद म्हणावेत तर तेही नव्हे. सहा शास्त्रे म्हणावी तर ती बापुडी त्या ठिकाणी भुलून गेली. मग त्या अठरा पुराणांची कथा काय? (४)

**दाहा श्रुती शिऊ बोले रे । अठरा श्रुति विष्णूचे वचन ।**
**परी कल्पांती अक्षर न सरे रे ।।५।।**

चार वेद, सहा शास्त्रे हे शंकर सांगतात. अठरा पुराणे हे विष्णूचे बोलणे आहे. परंतू कल्पनेचा अंत जेथे होतो, तेथे कल्पांतीही या अक्षराचे अक्षरत्व टिकून राहते (५).

**पूर्णापूर्ण ऐसे ब्रम्ह बोलती रे । तेथे पूर्ण अपूर्ण दोन्ही नाही माते ।**
**काही बाह्य अक्षरी रे । तया रूप ना रेखा आहे रे ।।६।।**

पूर्ण आणि अपूर्ण असे सर्व ब्रह्म आहे, असे बोलतात. परंतु तेथे पूर्णापूर्ण हे सापेक्ष उरतच नाही. असे ते माझे काही बाही अक्षर आहे, त्याला रूपरेखा काहीच नाही (६).



**तेथे त्रिकाळ जति गति नाही रे । नाही इंद्र चंद्र आकाश भूमि रे ।**
**नाही आप तेज वायो तेथे रे ।।७।।**

त्याठिकाणी त्रिकाळ तीन अवस्थेत तीन प्रकारची होणारी जाति गति नाही. इंद्र, चंद्र, आकाश, भूमि, आप, तेज, वायु हे काही नाही (७).

**तरी वेद अक्षर गिवसावे ते कैसे रे । न गणित गुण गेले रे । सिद्धी ना साधक मंत्र ना तंत्र । मा तेथे जटा पद क्रम कैचे रे ।।८।।**

तरी हे वेदप्रणीत अक्षर वेदाचे सारभूत ते कसे सापडावे? ज्याचे गणितही करता येणार नाही. असे गुण ज्यात समाविष्ट आहेत, ज्याची सिध्दि नाही, साधन करुन साधावे असे साधण्याजोगे साधक नाही. मनाचे पलीकडील अवस्था तशीच तनूचे पलीकडील स्थिती, हे मंत्र, तंत्रही जात नाहीत, मग त्या ठिकाणी जटा, क्रम, पद कोठचे? (८)

**स्थूल न सूक्ष्म नव्हे रे । धातु नव्हे मातु नव्हे रे ।**
**मा काही नव्हे ते अक्षर होये रे ।।९।।**

ते स्थूल नाही किंवा सूक्ष्म नाही, धातु नाही किंवा सर्वांवर मात करावी अशीही गोष्ट नाही. मग जे काहीच नाही तेच ते अक्षर आहे (९).

**पर नव्हे परतर नव्हे रे । जाति नव्हे अजाति नव्हे ।**
**मा काही नहोनिया एक होय रे ।।१०।।**

पलीकडचे नव्हे, पलीकडच्या पलीकडचे नव्हे, ते जातीत जमा होणारे अगर अजातीही नव्हे. पण ते काही न होऊन एकत्र होत आहे, असे ते आहे (१०).

**बुद्धी नव्हे शुद्धी नव्हे रे । वाट नव्हे घाट नव्हे मा घाटाटीत नव्हे ।**
**मवाळा मवाळ नव्हे नव्हे रे ।।११।।**

ते बुध्दि नव्हे, शुध्दि नव्हे, घाट नव्हे, घट किंवा घटातीतही नव्हे. मवाळाहून मवाळ नव्हे (११).

**साच ना दृश्य नव्हे रे । दृश्य नव्हे मा अदृश्य नव्हे रे ।**
**वेदी बोलिले ते होय रे ।।१२।।**

ते खरोखरीच दृश्य नव्हे. दृश्य नव्हे आणि अदृश्यही पण नव्हे. वेदांनी जसे सर्वापलीकडचे म्हणून सांगितले तसेच ते आहे (१२).

**सप्त पाताळा तळ नव्हे रे । एकवीस स्वर्गाहोनी आगळेची आहे रे।**
**बाविसाहूनी परते पाही रे ।।१३।।**

सप्त पाताळांचा जे तळही नव्हे, एकवीस स्वर्गाहून ते निराळेच आहे. स्वरगामी जीवनाची गति त्या स्वरातून गमन हा स्वर्ग असून त्याचे एकवीस टप्पे आहेत आणि ही झेप जेथून घेतली जाते, त्यास पाताळ म्हणतात. अर्थात हे तत्त्व एकवीस स्वर्गाचे पलीकडे जे आत्मतत्त्व आहे, त्याही वर आहे (१३).

**तेथे नाद बिंदू नाही रे । नाही चक्षू पाद नाही कर देह रे ।**
**देहादिक चतुर नाही रे ।।१४।।**

तेथे नाद, बिंदू नाहीत. चक्षू, पाय, हात, देह, हे काही नाही. चत्वार देहाचा जेथे निरासच झालेला आहे अशी ती स्थिती आहे (१४).

**भ्रमू नाही भूली नाही रे । ते सतराव्याचे कडे प्रकाशले रे ।**
**परी तेथे मन होये ठायी रे ।।१५।।**

भ्रम म्हणजे सातत्याने जीवनाचे होणारे परिभ्रमण तेथे नसून, त्याचे आकर्षणही तेथे नाही. ते सतराव्या जीवनकळेने प्रकाशले असून, त्याच परीने मन तेथे ठाय घेऊनच रहाते असे होते (१५).

**आता सातवे पाचवे बोले ज्ञान रे । तेथे पाचही नाही मा सातही नाही ।**
**मा ते अक्षर शतसहस्त्रावेगळे आहे रे ।।१६।।**

षट्शास्त्रापलीकडील सातवे व चार वेदापलीकडील पाचवे ज्ञान तेथे ध्वनित होत असून, तेथे मा म्हणजे ज्या अधिष्ठानावर हे ध्वनित होते तेथे पाचही नाही व सातही नाही का? त्यात ते लयच पावते. मग ते अक्षर शतसहस्त्रदळाचे वेगळेच आहे (१६).

**मागे चौदा बोलियली साच रे । ज्ञानासी विज्ञान जाहले ।**
**मा शेखी बुडाला तो वाया रे ।।१७।।**



खरोखरीच चौदा विद्या मागे मुखोद्गत केल्या, पण जेथे ज्ञानास अनुभवाचे रूप आहे, त्या दृष्टीने नुसती पोपटपंची करून शेवट तो फुकट बुडाला, असेच होणार का? अनुभवात शब्दज्ञान हे टिकत नाही (१७).

**मागे अक्षरे बोलिली बहुत रे । पिंड ब्रम्हांड जयापासून जाहाले ।**
**परगुणी व्यापिले ज्ञान सुख रे ।।१८।।**

मागे पुष्कळ अक्षरे बोलली, पण पिंड, ब्रह्मांड ज्यापासून झाले आणि श्रेष्ठ गुणाने ज्ञानसुख व्यापून टाकले (१८).

**सुखादी सुख ते म्हणो रे । तरी अमित्य वेदाची वाणी खुंटली।**
**मा परी लक्षा लक्ष नये परिमाणा रे ।।१९।।**

त्या सुखाचेही सुख ते अक्षर असे आम्ही म्हणू. तेथे तरी अपरिमित वेदाचीही वाचा कुंठित झाली. मग लक्षालक्ष परीने ते तत्व परिमाणास येणार कसे? (१९)

**त्रिदशा त्रिदश पंचदश नेणती रे । ते शतसहस्त्रांचे शेवटी आहे नाही ।**
**ऐसे दिसे रे ।।२०।।**

तीन अवस्था ज्यांना आहेत किंवा पाची अवस्था भोगणारे जे त्रिदश किंवा पंचदश जीव आहेत, ते जेथे नेणते होतात, त्यांना ज्याचा पत्ता लागत नाही का? तेथे जाणीवच मुळी राहत नाही (२०).

**आत्मा परमात्मा दोन्ही सखे रे । ऐसे चतुरी बोलता लोक भुलविले रे ।**
**परी अनुमाना नये वेगळा आहे रे ।।२१।।**

आत्मा, परमात्मा हे दोन्ही सखे आहेत असे जन/लोक बोलतात. पण अशा चतुरांना ज्याने भुलविले आहे, अनुमानाचे परीने जो जाणताच येत नाही, असा तो प्रणव वेगळाच आहे (२१).

**पासष्टीपुढे अद्वैत नेमू रे । द्वैत ना अद्वैत भेद ना अभेद**
**अक्षर झेपकू तोचि भला रे ।।२२।।**

चौसष्टांच्या पलीकडे जी पासष्टावी कला आहे, ज्या कलेत कलावान झाले तर

पुढे अद्वैताचा नेम आहे, जेथे द्वैताद्वैत, भेदाभेद उरतच नाही, अशा अक्षरांची झेप घेण्याचे काम चालू आहे, तेथपर्यंत ज्या जीवनाने उंच उडी मारुन, असे जीवन ज्यांनी आणले, उंचावले आहे तो भला (२२).

**बुझो गेला पाहो गेला रे । तेथे दुस नाव ना तयासी जाहले ।**
**त्या ठका ठक मौन्यामौन्य पडिले रे ।।२३।।**

जो त्याला पाहो गेला तो बुझो गेला असे होते, तेथे पहाणेच सरते. तेथे दुसरे नावच नाही. त्यालाच हे सिद्ध झाले असे होते. त्याठिकाणी ठकाला ठकविणाऱ्या मौन्यालाही मौन्य पडले (२३).

**तेथे जाणोनि नेणे पै जाहाले रे । मन इंद्रिया लयो जाहाला ।**
**आमित्य तेज ध्वनि उमटले रे ।।२४।।**

तेथे जाणोन तरी पुढे काय? का द्वैतच नाही म्हणून नेणे अशी अवस्था झाली. मन आणि इंद्रिये यांचा लयच झाला. यामुळे अपरिमीत तेज आणि नाद उमटले(२४).

**गगनापरते अक्षर दिसे रे । दिसोन न दिसे ते वेदांचे देखणे ।**
**तेथे सहासी शुद्ध बुद्ध परते रे ।।२५।।**

आकाशाचा ग्रास झाला की ते अक्षर दिसते. ते दृष्टीत भरले की दिसोन न दिसे असे होते. ते वेदांचे देखणे आहे. यामुळेच वेदालाही न इति न इति म्हणावे लागले. शुध्द, बुध्द, षट्शास्त्रेही जेथून परततात (२५).

**नव्या नऊ नव्यासी शून्य रे । ऐसे राधाजंत्र भेदावे कवणे ।**
**ते कृष्णावतारी भेदियले पुरुषोत्तमे रे ।।२६।।**

अष्टधेच्या पलीकडील जो नऊवा, त्या नव्व्या जीवत्वालाही जेथे शून्यावस्था प्राप्त होते असे तेजोयंत्र कोणी लक्षावे? त्याचे भेदन कृष्णावतारी पुरुषोत्तमाने केले. पुरी म्हणजे देह त्यात जो आहे तो पुरुष, व त्यातही जो उत्तम आहे तो पुरुषोत्तम होय (२६).

**आता नव्यानऊ भाग करी रे । ते अर्जुनामुखी घालता भागला ।**
**ते अक्षर निराक्षर । अकार उकार मकार माते वळले रे ।।२७।।**



नवाने नवाचा भागाकार करुन, एकत्वामधे आणून, अर्जुनाचे मुखात हे तत्त्व प्रतीत करता तो पुरुषोत्तमही भागला. ते अक्षर हे निराक्षर असून, अकार, उकार, मकार रुपाने मातृभावाने अर्जुनाचे ठायी वळले (२७).

**सात बेचाळीस घाली रे । पंचविसावे तेथे गुणकारी आटले ।**
**निरालंब ना पावले घटाघटी रे ।।२८।।**

सात आणि बेचाळीस घालून, त्या गुणाशी ऐक्य होऊन, पंचवीस तत्त्वांची आटणी झाली. जेथे आलंब व निरालंब नाही, त्याची प्राप्ती घटाघटात झाली. सप्तविध धातु पंचविसात सतरावी मिसळल्याने तदाकार झाले (२८).

**ते व्योमाकार रुप नव्हे रे । तेज नव्हे त्रिकूट नव्हे रे ।**
**मा गोल्हाट नव्हे मंडळामंडळी मंडळापरते रे ।।२९।।**

ते व्योमाकार रुप नसून तेज नव्हे, त्रिकुट नव्हे. गोल्हाट, औटपीठ, भ्रमरगुंफा आणि सहस्त्रदळ याचे परते आहे (२९).

**अमित भुवने चाके त्यासी रे । निरालंब अंख घालूनिया बैसे ।**
**ते तुरंगेविण अक्षर कैसे चाले रे ।।३०।।**

अमित भुवने ही त्याचीच चक्रे असून, निरालंब अंकावर ते अधिष्ठान मांडून बसले आहे. आणि रथ नाही पण ते गतिमान असे अक्षर आहे (३०).

**ते नित्य नव्हे अनित्य नव्हे रे । आकारा खूण गुढारु गुढारिले ।**
**परी त्या विवरी न दिसे अक्षर रे ।।३१।।**

ते नित्य नव्हे आणि अनित्यही नव्हे. ते खुणेने आकारले असून, त्याने गूढालाही गूढ केले आहे. परंतु त्या शून्यावस्थेत अक्षर हे न दिसणारे आहे (३१).

**बारावे भेदूनिया जाये रे । तेराव्याचे अग्राअग्री दिसे ।**
**ते परेहूनी परते आहे रे ।।३२।।**

ते भ्रमर गुंफा भेदून जाते. ब्रह्मरंध्राचे जे अग्र म्हणजे विषय जे सहस्त्रदळ त्याचे अग्राला म्हणजे टोकाला ते दिसते. त्यांचे मूळ अधिष्ठान परेचे पलीकडे अनिर्वाच्य वाचेमधे आहे (३२).

**आठ कोटी लक्षी पाही रे । मुक्त नव्हे रे अमुक्त नव्हे ।**
**मा अक्षरही नव्हे सिद्ध आहे रे ।।३३।।**

यम, नियमादि आठ प्रकाराने लक्ष देऊन ते पहावे लागते. ते मुक्तामुक्त दोन्ही नसून, लौकिकाक्षरही नव्हे. ते सिद्धच आहे (३३).

**पिवळे नव्हे पांढरे नव्हे काळे नव्हे रे । रंग रंगाकार नव्हे अनंत ध्वनी नव्हे ।**
**अक्षर निःशब्द निरंजन नव्हे रे ।।३४।।**

ते पिवळे, पांढरे, काळे नसून, रंग नव्हे, रंगाकार नव्हे, अनंत ध्वनि नव्हे. अक्षर निरंजन निःशब्द हे सापेक्षता नसल्यामुळे काही नव्हे (३४).

**षष्ठ नव्हे सप्त नव्हे रे । मन नव्हे पर नव्हे रे ।**
**ते बुडाले बुडोनी नव्हे रे ।।३५।।**

षड्विकार नव्हे, सप्त धातु नव्हे, मन नव्हे, त्याचे पलिकडे जे आहे ते नव्हे ते बुडाले किंवा बुडून राहिले हेही नव्हे (३५).

**सत्ताविसे एकतिसे दाटूनि पाहे रे । छत्तिसांचा चौभागी भागो तरी**
**अप्रमिता । अप्रमीत जाहाले रे ।।३६।।**

पंचवीस तत्त्वांत दोन बीजाक्षरे मिसळून त्यात चत्त्वार देहात जे दाटून पहात आहेत. छत्तीस तत्त्वांचा मूळ श्रीहरी चारी भागी भागाकाराने जाणला तर ते अप्रतिमात अप्रतिम आहे (३६).

**सहस्त्र शून्य सहस्त्रा ठायी रे । बावन्न अक्षरी गुण निवडती ।**
**ते कूटस्थ कुटाकुटी नाही रे ।।३७।।**

सहस्त्रदळात सहस्त्राची शून्यभूत स्थिती, त्या ठायी हे तत्त्व आहे. ज्या गुणांची निवड बावन्न अक्षरांनी होते, ते कूटस्थ तत्त्व असून, नुसता काथ्याकूट करून, कुटीकुटी त्रिकूटी श्रीहाटी सापडणारे नाही (३७).

**मागे बोलिलासी भुःभुकारु रे । स्वर ना भेद सत्य ना वेद रूप**
**बोलियले तू आपणतया नेणता । नेणोनि म्हणाविसी ब्रम्ह रे।।३८।।**

मागे भुभु:कारच बोलला असून त्यात स्वर नाही. त्याचा भेद होत नाही.



आपल्याला न जाणता सत्य निःश्वासच हे रुप बोलले, व ते नेणून तेथे जाणीव न राहिल्याने उरले ते ब्रह्मच (३८).

**विकासले व्योमाकार रे । तीनी देव नीती वेद जाहाले ।**
**मा तरी खूण चुकोनिया माघारी मागूति मुरडले रे ।।३९।।**

व्योमाकाराने ते विकसित झाले असून, तीन्ही प्रकाशरूप देवच निःश्वसित वेद झाले, आणि अनुभवाची खूण चुकल्याने, अंतर्मुख होऊन, माघारेच मुरडले. तेथे वृत्तीची मुरड साधली (३९).

**हा अनुवाद नको बोलो रे । नष्टा हाती निजपद दिधले ।**
**ब्रम्ह अन्वये सोडू नको बोलो रे ।।४०।।**

हा अनुवाद बोलू नको. का? बोलण्याने प्राप्ती नाही. आपले अस्तित्व ठेवले नाही. त्याच्या हाती ते निजपदच दिले आहे. अन्वय आणि व्यतिरेक जाणून, तू हे ब्रह्म सोडू नको (४०).

**वाडापरीस वाड आहे रे । एकुणसावे अक्षरी मंत्रा साधु गेलासी ।**
**परि ते काही नाही ऐसे जाहाले रे ।।४१।।**

ते मोठ्यापेक्षाही मोठे आहे. जीवभावाने मंत्र साधु गेलास, पण जीवभावाला त्याची प्राप्ती होत नसल्याने, ते काही नाही असे झाले (४१).

**रकारी बोध बोलसी रे । तेथे घटीते रे विघटीते के न पडेची ।**
**त्या मंडळामंडळी गुंतलासी रे ।।४२।।**

रकार तेजोरूपाला बोध म्हणतात. तेथे घटी व घटी पूर्ण होण्याची आधीची अवस्था विघटी म्हणजे घटकोघटकी न पडता तेथे तादात्म्य न होता वलयाकार दृश्यांतच गुंतून राहिलास रे (४२).

**नकारू रूप शून्य रे । सहस्त्राचिये वाटे एक फाकले ।**
**माते अक्षरासी भेदु नाही रे ।।४३।।**

वलयात्मक शून्यावस्था हे नकाराचे रूप आहे. त्याला खरे अस्तित्व नाही. ते सातत्याने दिसते इतकेच. सहस्त्रदळाचे वाटेत फाळणी ज्याने केली असे जे माझे अक्षर तेथे मात्र भेद नाही (४३).

**यम नेम काय करिसी रे । गुरुमुखे सांगता वाया भ्रमले ।**
**आपणपा नाही शुद्धि रे ।।४४।।**

यमनियमाची तरी काय जरूरी आहे? किंवा गुरुमुखाने ज्ञान झाले असताना जे भ्रमले, ते वायाच नव्हेत का? कारण भ्रमंती सुरुच आहे. गुरुमुखाचे सांगणे हे स्थिरतेकरिता आहे. आत्मशुद्धीच जर स्थिरतेचे अभावी झाली नाही, तर उपयोग काय? (४४)

**भांबविले मन बुडवि रे । मार्गु ठावा न पडता उगले ।**
**मध्येचि बुडोनि गेले रे ।।४५।।**

या अवस्थेत जे मन भांबावले, तो मनाचे मनत्वच नाहीसे झाले. उगेपणात आल्याने, मार्ग ठावा पडणेची जरूरीच राहिली नाही ते जीवनाचे मध्य धारेत बुडून मूळ ठिकाणी आले (४५).

**गति मति वेदु बोले रे । सातवी मातृका सहस्री वाटियेली ।**
**तेथे गुण-लयो जाहाला रे ।।४६।।**

परमात्म निःश्वासाने जीवनाची गति व बुध्दि ही ध्वनित केली आहे. पंचमातृकेवर ज्या दोन मातृका आहेत, त्यात तो सोहंमधला मकार आहे, ती ध्वनियुक्त मात्रा सहस्त्रदळात वाटणीस आली. त्या ठिकाणी जीवनसूत्राचा लयच झाला (४६).

**दिधले मन पाचा ठायी रे । पाचे पाच भागु विभागु जाहला ।**
**तेथे ब्रह्मरस रसी मुराला रे ।।४७।।**

पंच मातृकेत मनाचे तादात्म्य झाले. त्यात पंचप्राण मिसळल्याने पंच तत्वांचा भागाकार झाला. तेथे जीवनरसात ब्रह्मरस मिसळून राहिला (४७).

**वासुकीमणी मंथन केले रे । तिही देव तेथे संध्यावळी ठायी बुडाले ।**
**मा तरी सहस्त्रमुखी लेखा कायसा रे ।।४८।।**

कुंडलिनीचे तोंडातला त्रिकुटीत जाणारा लाल आरक्त वर्ण मणी त्याचे मंथन करता संधिकालात त्रिगुणात्मक तिन्ही देवांचा लय झाला. मग सहस्त्रमुखी शेष



तरी याचा काय लेख करणार? (४८)

**साहाव्याची गोठी वळोन पाहे रे । अगाध ब्रह्माच्या गोष्टी करिती ।**
**सत्य ब्रह्म त्याच्या पोटी रे ।।४९।।**

पंचतत्वापलीकडचा जो सहावा परमात्मा, त्याच्या गोष्टी अंतर्मुख होऊनच पाहिल्या पाहिजेत. अगाध अशा ब्रह्माच्या गोष्टीतच अस्तिरूप ब्रह्म सद्‌रूपाने त्याचे पोटी अनुभवास येते (४९).

**ध्याना कल्पिता न पविजे रे । आपुला आत्मा शुद्ध चैतन्य देखिल्या तेचि ते । ब्रह्म ब्रह्माकार होय रे ।।५०।।**

ध्यानाची कल्पना करून त्याची प्राप्ती होणारी नाही. कल्पनेचे ध्यान तेथे प्राप्तिही कल्पनेचीच. आपला आत्मा निखळ शुद्ध चैतन्यच आहे, हे जाणताच ब्रह्म हे ब्रह्माकारच होत आहे (५०).

**मधुर मधुर अनुभव रसु रे । तेथे संवादु ना गोडी तिखट ।**
**ना पैत्य ते अंबर अंबराकार रे ।।५१।।**

मधुरालाही मधुर वाटावा असा हा रस आहे. त्या ठिकाणी संवादाचा गोडवा तिखटपणा नाही. हा दृश्यापलीकडे आकाशाचे ठिकाणी आकाशरूप जीवनरस आहे (५१).

**हीर म्हणिजे ठकार शून्य रे । पांचवे पुढे बिंदुले दिधले ।**
**ते नववे पुसूनी जाये रे ।।५२।।**

ठकारात्मक शून्य हेच हीर असून, हे बिंदुले पंचमातृकेपुढे दिले. ते जीव पुसून जाते (५२).

**विधी म्हणसी ध्याना अगोचर रे । एक्याण्णऊ मातृका भेदिल्या ।**
**ते त्रिपुटा फुटोनी जाय रे ।।५३।।**

बुद्धीला ध्यान करणेस ते अगोचर आहे असे म्हणतात. जीवाचे एकाशी तादात्म्य होणाऱ्या मातृकांचे भेदन करून ते त्रिपुटी निरसनाने जात आहे (५३).

**योगी मंत्र येकू साधू रे । आटी जनी तेथे उभे राहूनिया ।**
**अकराव्याचे तोंड मारी रे ।।५४।।**

योग्यांचा एक मंत्र असून, तो साधावा असा आहे. मोठ्या कट्टाने तेथे जीवनाची ऊर्ध्वगामी धारणा स्थिर करून, मनाचे तोंड मारून, मनाचे मनत्व नाहीसे करावे असे आहे (५४).

**येणे जाणे परी नाही रे । सिद्ध साकार भाविसी काय?**
**मा अयोगायोगु ते नव्हे रे ।।५५।।**

या ठिकाणी येणे-जाणे हा प्रकारच नाही. सिद्ध सकाराने युक्तच असे ते साकार आहे. त्याला वेगळे काय भावावे? जेथे सहजच योग आहे तेथे आयोग योग किंवा योगायोग म्हणावे कशाला? (५५)

**नाठ्ठा भाविसी काय रे । नकारशब्दे नामात्मक नाही ।**
**ते न होनी जाय रे ।।५६।।**

सर्व दृश्यास नाट लावणारे, त्यास काय भावावे? बरे ते नकार शब्दाने नामात्मकही नाही, अशा स्थितीत ते काही न होताच जात आहे. गतिमान आहे (५६).

**पराहूनी परता आहे रे । अमित व्योममंडळे भेदूनि ते ।**
**मातृकेचे नाव काय रे ।।५७।।**

जे परेच्या पलीकडे आहे आणि अमित आकाशमंडळांचा ग्रास करून, जे चालले आहे, त्या मातृकेचे नाव काय? (५७)

**चेवू आलिया निजसुदा नव्हे रे । नीज चेतविले जागे निजविले ।**
**दमदर्गा फुटी घाली रे ।।५८।।**

चैतन्यास आल्यावर जे निद्रिस्त नव्हे, ज्या ठिकाणी निजत्व चेतविले असून, जागृतावस्थेत जे निजत्वाला आले आहे, ते व्यवहारात जीवन व्यतीत करीत आहेत म्हणजे तेथे जीवनाचाच व्यवहार चाललेला आहे (५८).

**तेथे बावन्न त्रेपन्न सक म्हणतले रे ।**
**त्यासी लावावया मा आणिक बंधु नाही रे ।।५९।।**



तेथे बावन्न किंवा हे जेथून निर्माण झाले ते धरून त्रेपन्न मातृका आहेत, असे सगळे म्हणतील. पण जे त्रेपन्नावे वर्म आहे, त्याला या जगात दुसरी तोड नाही(५९).

**यासी उपावो नाही अपावो नाही रे । नाही नाही तेथे काही ते**
**घेवून राही रे ।।६०।।**

त्याला उपाय व अपाय हे दोन्ही नाहीत. 'नाही' हे जेथे 'नाही होते', तेथे जे काही आहे ते घेऊन राहावे (६०).

**तत्त्वातत्वा भेदू नाही रे । महातत्त्वाचे सामर्थ्य जाशील ।**
**तेथे आपण नाही काही रे ।।६१।।**

तत्त्वातत्त्वांत काही भेद नसून, महातत्त्वाचे सामर्थ्याने तेथे जाता येईल की जेथे आपण आपले अस्तित्व ठेऊन राहू शकणार नाही (६१).

**मा तत्त्वा भेदू नाही रे । एका शेंडा येका डिरी रे । एकतत्त्व महत्तत्त्वे**
**तळातळ भेदियले । वोंकारे भेदियेले परापर ।।६२।।**

एकेका मुळास एकेक शेंडा आहे. एक तत्त्वाने जे महत्तत्व आहे म्हणजे जे महत् असून एकच आहे, त्याने तळातळ पाताळाचेही भेदन केले आहे. ओंकाराने आमूलाग्र भेदन केले असून, ते अखंड, अनुस्यूत, सर्व व्यापी आहे (६२).

**सत्य व्योमा शून्य देई रे । चौदावे बुडवुनि घालूनि पाहे ।**
**मा पुढे वेदबीज सांगेन रे ।।६३।।**

सत्य व्योमरूप ब्रम्हाचे ठिकाणी शून्यरूप गाढ अवस्था विलीन झाली पाहिजे. चौदा चक्रांचे पलीकडे पहाता वेद बीज सांगता येईल (६३).

**जटि ब्रम्हऋषि बोलती रे । पदपदार्थ कर्म खंडी विखंड ।**
**मा त्यासी न कळे त्या अक्षराचे पारू रे ।।६४।।**

ब्रम्हऋषींनी जटा सांगितली, खंडखंडात पदपदार्थ, कर्म विस्तारले तरी त्यास अक्षराचा अंत लागला नाही (६४).

**कर्मकांडी एक बीज आहे रे । संकल्पी विकल्पी एको विष्णु बोले ।**
**परी ब्रम्हार्पण नाही ठायी रे ।।६५।।**

कर्मकांडात एक बीज आहे, संकल्पात किंवा ज्या ठिकाणी कर्माचे संकल्पात काही विकल्प असतो, त्यास एको विष्णु म्हणतात. परंतू ते कर्म ब्रम्हार्पणच कसे करावे हे ठाऊक नाही (६५).

**एकु पदार्थ बोले रे । ते चोविसाक्षरी संध्यावळी बीज मिरविले ।**
**एकु आपो नारायण म्हणे रे ।।६६।।**

खरा एकच पदार्थ बोलला जातो. ते चोवीस नामांचे संध्यावळीचे बीज प्रसिद्ध आहे. ते एक तत्त्व आपो नारायणच आहे. श्रीनारायण हेच आपले जीवन आहे(६६).

**एक ध्रुव ध्रुव म्हणती यजुरि रे । यजन याजन अध्ययन अध्यापन ।**
**दान प्रतिग्रहो नाही रे ।।६७।।**

यज्ञाचे वेळी एक ध्रुव ध्रुव म्हणतात, अढळपद स्वर्गाची इच्छा करतात. यजन, याजन, अध्ययन, अध्यापन, दान, प्रतिग्रह याची मात्र दखल नाही, मग काय?(६७)

**रुकारु म्हणती मूळ रे । आ ब्रम्ह म्हणती परतल्या दृष्टी ।**
**मा साम मागती फळ रे ।।६८।।**

रुकार हे मूळ म्हणतात. हे तेजोरुप आहे. आब्रह्मस्तंबपर्यंत हे म्हणणारी श्रुतींची दृष्टि परतली. परंतु सामगान करून फळाची इच्छा आहेच (६८).

**सत्यलोकी विरिंचि विचरे रे । शंकरे विश्वाची प्राहुति केली ।**
**हरिकरी ठेवाठेवी रे ।।६९।।**

सत्य लोकात ब्रह्मदेव राहतो. शंकराने विश्वाचा संहार केला, तो संहार करणारा आहे, हरी हा संरक्षण करणारा, हातात आत्मसुखाचा ठेवा ठेवतो असा आहे(६९).



**बोध्य म्हणती निजरूप जाणे रे । गण म्हणती सिद्धू पातलिया ।**
**शक्तु म्हणे शक्तिपोटी रे ।।७०।।**

बोध करणारे निजरूप जाणावे असे म्हणतात. सिद्धाचे दर्शन झाले की शक्तीची शक्ती पोटी सामावते, असे गण म्हणतात (७०).

**कमळे हाती घेऊन उभे रे । उदयो अस्तु नमस्कारू करिती ।**
**माते असक्यासी न पडे अक्षर ठावे रे ।।७१।।**

कमळे हातात घेऊन भक्तजन उभे राहतात. 'उदय असो' म्हणून नमस्कार करतात. तरी असल्यांनाही अक्षराची ओळख होत नाही (७१).

**एक शैव म्हणती ज्योतिर्लिंग पाहो रे । भगता भगवता न पडेची ठायी ।**
**माते पावले निवृत्तीचे पाय प्रसादिले ।।७२।।**

एक शैव ज्योतिर्लिंग पहावे असे म्हणतात. या भक्ताला व भागवतांनाही हे आकलन होत नाही. मला मात्र ते श्रीनिवृत्तीनाथांच्या पायाच्या प्रसादाने प्राप्त झाले (७२).

**निवृत्ती म्हणे सोपाना भला रे । अक्षराचे वर्म अवघे पूर्ण पक्ष जाहाले ।**
**ते अक्षर तुम्हासी भेदले रे ।।७३।।**

सोपानदेव हा परमार्थाचा सोपान म्हणजे जिनाच आहे. हे अक्षराचे वर्म म्हणजे पूर्ण पक्षी ते पूर्णच झाले. त्यानेच तुम्हा सर्वांना भेदले आहे. सर्व ठिकाणी ते प्रविष्ट आहे (७३).

**मूळ सांडी शेंडा सांडी रे । न घडता घटन घटाघटी केली ।**
**तरी ब्रह्म ब्रह्मी चोखाळले रे ।।७४।।**

याचे मूळ आणि शेंडा सोडा, पण याने न घडताच, प्रत्येक घटाघटात आपले स्वरूपाची घडण केली आहे. आणि ते मुळांपासून शेंड्यापर्यंत देहातून आत बाहेर आणि बाहेरून आत देहापर्यंत आणि त्याचेही आत देह पूर्वस्थितीत व देहपातानंतरही हे ब्रह्मच ब्रह्मामधे मिसळून राहिले आहे (७४).

**अचिंतन चिंतन प्याली रे । ज्ञान सोपानाचा निवृत्ती चोढळी ।**
**ते अक्षर त्रिपन्नी तिन्ही मोडले रे ।।७५।।**

अचिंत्य स्वरूपाचे चिंतन करून, या रसाचा चित्तवृत्तीने जो आस्वाद घेतला, तो ती तृप्त झाली. ज्ञान आणि सोपान यांना निवृत्तीने चोखाळले. श्रीनिवृत्तीनाथांचे कृपेने ते श्रीज्ञानेश्वरमहाराज व सोपानदेव यांना ते अक्षर प्राप्त झाले. ते बावन्न असे त्रिपन्नी होऊन त्रिपन्न झाले. तिनीस म्हणजे त्रिपुटीस ते व्यापून राहिले. आणि त्यानेच ते सर्व व्याप्त असल्याने त्रिपुटीचा निरास केला, त्रिपुटी मोडली(७५).

**ब्रह्म समुद्र घोटिला रे । तृषेक्षुधेविण पंचप्राण पै खादले रे ।**
**तिसाव्यासी मारीले तुमी रे ।।७६।।**

या अक्षराने ब्रह्म समुद्राचाही घोट घेतला असून तहान आणि भूक यांचेशिवाय पंचप्राणांचाही ग्रास केला. पंचविसात पंचमातृकात्मक असणारे हे तिसावे अक्षर याचीच तुम्हास विस्मृति झाली आहे (७६).

**धगधगीत ब्रह्म शस्त्र आहे रे । अमित ब्रह्माचे तेज प्रकाशीत ।**
**तेज तेजा ठायी विरे रे ।।७७।।**

हे अक्षर म्हणजे धगधगीत ब्रह्मशस्त्रच आहे. अपरिमित ब्रह्माचे तेज प्रकाशित झाले असून, हे जीवनाचे तेज त्या ब्रह्मतेजात विलीन होऊन जाते, असे आहे (७७).

**एक रोम कुणी उगवला रे । त्याचे अनंत गुण मा अनंत पार मा ।**
**तो विष्णू भला भला भला रे ।।७८।।**

एक सूत्र जीवनामध्ये उदयाला आले असून, त्याचे गुणही अनंत व त्याचा पार कळणे हेही अनंतच आहे. असा तो प्रत्येकाचे हृदयात प्रविष्ट होऊन राहणारा विष्णूच श्रेष्ठ आहे (७८).

**ते दोघे कर्म धर्म साधक भले रे । ते अमित्य भुवने धांडोळिता भागले ।**
**परी ते निर्गुण अक्षराची न लगे सोय रे ।।७९।।**

हे शिव, विष्णु कर्म धर्म साधक श्रेष्ठ आहेत. ते अप्रमाण भुवने धुंडून दमले. परंतु या निर्गुण अक्षराची सोय त्यांनाही लागली नाही (७९).



**आदि देवी माया झाली रे । एक वैष्णवी म्हणती अद्भुती म्हणती ।**
**चौथी तिघासी खाय रे ।।८०।।**

आदिशक्ती हीच माया झाली. कोणी हिला वैष्णवी किंवा अद्भुत म्हणतात. अशी ही तुर्यावस्था तीन अवस्थांचा ग्रास करीत आहे (८०).

**निरंजनी एकी उभी रे । सिद्ध साधक मा वेदांत बोलिजे ।**
**ते रंजना संध्यावळी माया रे ।।८१।।**

हालत नाही, बोलत नाही, चालत नाही अशा निरंजनाचे ठिकाणी ही एकत्वाने उभी असून, सिद्ध साधक असा वेदांत ध्वनित करणारी व जीवांना रंजवणारी, संधिकाळी साधता येणारी संध्यावळी अशी ही माया आहे (८१).

**आठरा वर्ष आठरा जाति रे । चहूंची वेदी सांगितली संमति ।**
**ते निरालंबी नाही स्थिती रे ।।८२।।**

अठरा वर्ण, अठरा जाति यांची वेदांनी संगति सांगितली आहे. तथापि ती स्थिती या निरालंब स्थानात नाही (८२).

**सुईच्या अग्री दाभण ठेवावे रे । अमित्य ब्रह्मांडे तयावरी जाली ।**
**ऐसी निज ब्रह्माक्षरीची न कळे माया रे ।।८३।।**

सुईच्या अग्रावर दाभण ठेवावे, तशी अनंत ब्रह्मांडे ज्यावर झाली ती निज ब्रह्माक्षरीची माया ही न कळणारी आहे (८३).

**माया कोश आड जाले रे । ते तेजी तेज फोडूनी गेले ।**
**सानेते सस्वरूप अक्षर कवणे ठायी रे ।।८४।।**

हे मायाकोशात्मक दृश्य आड आहे. पण त्यालाच आडवे ओढून, हे तेज त्या तेजात कोश फोडून समाविष्ट झाले. असे ते सांगाती असणारे स्वस्वरूप अक्षर कोण-स्थानातच आहे. या अखिल विश्वाचा कोन ज्या एका बिंदूत आहे, जेथून वर्तुळाकार विश्व वर्तुळाकार फिरत आहे. तेच या अक्षराचे स्थान आहे (८४).

**चौदा चारि चौदा घाली रे । चौदा चौके चौदा वाटूनि गेले ।**
**मा ते ब्रह्माची वाट कोण रे ।।८५।।**

चौदा विद्या, चौदा चक्रे, चौदा लोक हे चौदा चार देहांत वाटून गेले. मग ब्रह्माडांत जाण्याची वाट कोणती? पिंडाचा भेद जो कोणस्थानात साधतात, तो कोणच ब्रह्मांडस्थानात जाण्याची वाट होय (८५).

**अक्षरामागे अक्षर सहस्त्र जाले रे । लक्षलक्षाची क्रोडीक्रोडीची अनंत**
**वाटाघाटी। निघंटी पाहिल्या रे ।।८६।।**

अक्षरामागेच सहस्रदळस्थानात घुमणारे अक्षर झाले. लक्षालक्षाचे प्रकाराने ती परी साधनेची वाटाघाटी ही अनंत आहे. नादानुसंधानापलीकडे पाहिल्यावरच हे आकलन होणारे आहे (८६).

**चतुर बुद्धी सांगवले रे । चतुराननु चौमुखी खोचावला।**
**पंचमुख सहस्रमुख खुंटावले रे ।।८७।।**

चारीतून बाजूला होणारी जी चतुरबुध्दी तिलाच हे सांगता येईल असे आहे. म्हणून सांगता आले. एरवी चार तोंडाचा ब्रह्मादेखील हे बोलताना चूपचाप झाला; त्याला ते सांगता येईना. पंचमुखी शंकराची तीच अवस्था. अनिर्वाच्य वाचेलाही ज्याचा पत्ता नाही, तेथे सहस्रमुख शेषाची काय कथा? तो तर कुंठितच झाला(८७).

**तळवा घोटी जानु नाभी वक्षस्थळी कंठ शेंडे गेले रे। शेंडीच्या अग्री**
**चौदा भुवने मावळली । ते विराट लया लक्ष गेला रे।।८८।।**

तळवा, घोटा, जानु, नाभि आणि वक्ष:स्थळ, कंठ येथपर्यंत ज्याची व्याप्ति आहे, ज्याचे शेंड्याचे नुसत्या टोकावर चौदा लोक गडप झाले, असे ते अमित अक्षर जेथे विराट रुपाचे लक्षही लयाला गेले (८८).

**अटत घाटत घाटिली रे। तेथे नादू नाही स्पर्श नाही।**
**काही नाही ते अवघी लया पाही हे।।८९।।**

चौदा भुवने, चौदा विद्या, चौदा चक्रे अटत घटत घटली. तेथे नादही नाही



आणि स्पर्शही नाही. काही नाही अशी शून्यावस्थाही जेथे नाही, सर्वांचाच लय झाला(८९).

**ऐसा उत्पत्ति गोळकू। पिंड ब्रह्मांड गोळकू सांगितला रे।**
**ठाऊक नव्हे म्हणोनी बुडाले त्या अवताराचा काय ठावो रे।।९०।।**

असा उत्पत्ति विचार आणि पिंड ब्रह्मांड विचार आपण सांगितला, ठाऊकच नाही म्हणून पत्ता नाही. जे सर्वात असून बेपत्ता आहे, त्या अवताराचा ठाव-ठिकाणा लागावा तरी कसा? (९०)

**देवऋषि मुनि शुकादिक रे। साही अंगे बोलोनि गेले।**
**मा त्या चहूंचा गड संदेह पडला रे।।९१।।**

देवऋषि, मुनि, शुकादिक षट्शास्त्रे बोलून गेले. फार काय पर्वतप्राय चार वेद जेथे संदेहातच पडले (९१).

**तेथे सत्तावन्ने सहस्र धातु रे । एक ज्यापासुनी मोविता भागले।**
**अमिता मुखी वर्णिता गेले रे।।९२।।**

ज्या एकापासून मोजताना आणि अमित मुखाने वर्णन करु गेले असता, जे बावन्न मातृकेसह धातु ऊर्ध्वगामी करुनही, विचार करता, सहस्रदळी भागले (९२).

**शून्य वोढिले निरशून्य भेदिले पाहा रे। देवा देवो दैवते बोलती**
**ते ब्रह्मज्ञान । सोपाना कर्णपुटी पेरियेले ब्रह्म रे।।९३।।**

शून्याची खेज घेऊन, निरशून्याचे आरपार जे गेले, सर्व देव आणि दैवते ज्याचे वर्णन करतात, ते ब्रह्मज्ञानात्मक ब्रह्म सोपानाचे कर्णपुटातच पेरले (९३).

**श्रवणेविण ऐकले रे । मनेविन मन बुडाले रे।**
**मागे गिवसिता गिवसिता स्वस्वरुपी आहे रे ।।९४।।**

ज्या नादाचे श्रवण बाह्य कर्णाशिवाय अंत:करणाने घडले. संकल्प विकल्पाशिवाय असणारे मन जेथे बुडून गेले, ज्याने नादानुसंधानात बुडीच

दिली, ते परतीच्या पावलाने गिवसिता गिवसिता, स्वस्वरुपाच्या ठिकाणी आहे, असे दिसून आले(९४).

**निवृत्ती म्हणे ज्ञान सोपाना दोनी भागी राहे। संध्यावळी अजपा मंत्रु साधनु । त्याने उपदेशे ते ते ब्रह्म पाहे रे।।९५।।**

वृत्ती जेथे निवृत्त होती अशी निवृत्ति, या वृत्तीने ज्ञान आणि सोपान यांना जीवनाचे दोनी भागात रहाण्यास सांगितले. ज्ञान आणि सोपान हे जीवनाचे दोन भागच आहेत. यास अनुसरुन संधिकाळी संध्यावळी अजपा मंत्राचे सहज सिध्द साधन आहे. तेणे करुन होणारा जो उपदेश त्याने सर्वापलीकडे जे तत्‌ने निर्दिष्ट आहे, ते साक्षात्काराला आले की ते ते ब्रह्मच आहे (९५).

**म्हणसी मनासी नयन आहे रे। ते मनची नाही मा अवघे ब्रह्मची पाहे। मा माझा हस्तास्तळी उभे राही रे ।।९६।।**

मन:चक्षु आहे म्हणतो पण जेथे मनच नाही, तेथे ब्रह्मावाचून उरले काय? सर्व काही ब्रह्मच आहे. माझे जे काही आहे ते माझे साधन हस्तक्रियेतच प्रत्ययास येणारे आहे (९६).

**अचिंतन चिंतू नये । संध्या रागु मंत्र पंचकरणे मथिला। त्या अक्षरासी नाही भेदू रे।।९७।।**

ज्याचे चिंतन करता येणार नाही, असे अचिंत्य संधिकाळी साधन प्रेमाने पंच प्राणाने मनाचे अतीत होऊन, ज्याचे मंथन करुन अनुभूति घेतली, त्या अक्षराला भेदच नाही (९७).

**ते ब्रह्माबह्य सार रे। त्रिकुटाने गळे गोल्हाटा वेगळे। न चुकत चुकले पाही रे ।।९८।।**

ते ब्रह्माबह्य सार असून, त्रिकूट गोल्हाटा वेगळे जे चुकले होते किंवा ज्याला आपण चुकलो होतो ते न चुकता अचूक पाहिले (९८).

**रवि सोम माथी माथा बैसले। ते आधारेविण उदरेविण सामावले आहे रे ।।९९।।**



माथ्याचे माथ्यावर सूर्य, चंद्र सहस्रदळी अधिष्ठित असून, ते आधाराशिवाय व पोटाशिवाय त्या कलेमध्ये समाविष्ट आहे (९९).

**चिद प्रचिद तेजा तेज नव्हे रे । अमित भुवने जयाचेनि आहारळली । तेथुनि निःशब्दापासुनी वेद जाहाले रे ।।१००।।**

चैतन्य तेजाची प्रचिती हे लौकिक तेजापैकी नसून, ज्याच्या योगाने अमितभुवने अनुभवास आली, तेथून निःशब्दातून परतात्म-निःश्वास प्रगट झाले, त्यालाच वेद म्हणतात (१००).

**ब्रह्मवृक्ष व्योमी फुलला रे । त्यासी शाखा ना मूळ । मा बीज ना अंकुर । ते अक्षर फळेविण फळ देखा रे ।।१०१।।**

ब्रह्मवृक्ष हा आकाशाने फुलून गेला असून, त्याला शाखा, मूळ, बीज, अंकूर हे काही नाहीत. ते अक्षरच फळाविण फलद्रूप झाले आहे. का ते स्वयंसिद्ध आहे, ते पहा रे (१०१).

**सहस्र खांडियाचे एक झाड रे । जयाची विश्वपत्रे विश्वशाखा । मा त्याचे अंगकूपी एक ब्रह्म फळ रे ।।१०२।।**

हजार फांद्या असलेले एक झाड आहे. ज्याची विश्वपत्रे व विश्वशाखा आहेत, त्याचे अंगभूतच एक ब्रह्म फळ आहे (१०२).

**यजुरी ऐशा ऐशी शाखा जाहल्या रे । रुगी सप्त शाखा जाण बोलियेले । ते अथर्वण राहे शाम फळ रे ।।१०३।।**

मग यजुर्वेदासारख्या ऐंशी शाखा झाल्या. ऋग्वेदाच्या सात शाखा बोलल्या असून, त्या ठिकाणी अथर्वण शाम फळाने प्रचिती देत आहे (१०३).

**ऐसे बोलता अनंत फळ रे । परी त्या अक्षरासी न लगे फूल फळ ज्याची ते निष्कामी निष्कर्मी फळेविण कैसे फळ रे ।।१०४।।**

याप्रमाणे हा विचार आपण नुसता बोललो तरी त्याचे फळ अनंत आहे. परंतू त्या अक्षराला फूलही नाही आणि फळही नाही, ज्याची बुद्धि निष्काम आणि निष्कर्मी आहे, तेथे ते फलाशेविण फलद्रूप होते (१०४).

**आणिक एक सांगेन गूढ रे । त्यासी सोळा ना बारा ।**
**नवासी शून्य देता दहा अकराही शून्य मिळे रे ।।१०५।।**

आणि एक गूढ रहस्य सांगतो, त्याठिकाणी सोळा बारा या चंद्रसूर्यकलाही नाहीत. जीवभावास शून्यत्व देताच दहा इंद्रिये आणि अकरावे मन हे शून्यभूतच होतात (१०५).

**ऐसे छत्तिसा गुणांचे बत्तिसावे वाटा रे । मिळाले पंचीकरणी मिळाले संध्यावळी। परी त्या न कळे अक्षराचा भेदू रे ।।१०६।।**

अशाप्रकारे ते छत्तीस गुणांचे पंचवीस आणि दहा यांचे पलीकडचे, सोळा अधिक बारा अधिक चार चित्तचतुष्टय असे मिळून बत्तिसावे ठिकाणी वाट्यास येते. ते पंचीकरणात व संधिकालात मिळाले. हे जरी आहे तरी त्या अक्षराचे ठिकाणी प्रविष्ट होणे हे कठिण आहे. त्याचा भेद कसा करावा व त्यात कसे शिरावे हे कळतच नाही (१०६).

**एक्कावन्ने बावन्ने मिळाले सत्तावन्ने रे । परी ते अक्षर निरंजन निराकार निर्गुण। ऐसे गुणिती पै ते शहाणे रे ।।१०७।।**

एक्कावन्न किंवा बावन्नही मातृका, त्यात पंचामातृका मिळवून सत्तावन्न मातृकात अंतर्भूत झाल्या. परंतु ते अक्षर मात्र निरंजन, निराकार, निर्गुण सूत्राने जे गुणिती म्हणजे या गुणाने ओळखतात, त्या सूत्राचे ठिकाणी आपल्या जीवनसूत्राचा गुणाकार करतात, ते खरे शहाणे (१०७).

**अडतीस पंचविशी पाच मारी रे। निरशून्याकार भृंगा भेदून गेले रे। मा परी नि:शब्दाची परा वाटा पाहे रे ।।१०८।।**

छत्तीस तत्त्वात जर रकार-मकारात्मक दोन मातृका मिसळल्या, तर पंचवीस आणि पंचप्राण उरतच नाहीत. पंचवीस तत्त्वे, पंचप्राण आणि अष्टधा प्रकृती पंच मातृकांत उरतच नाहीत. निरशून्याकार भृंगाचे भेदन करुन, ते अक्षरच सर्वापार गेले आहे. असे असूनही नि:शब्दात जाणेस, त्या नि:शब्दाचे ठिकाणी परेचे ठिकाणी स्फुरद्रूप जे स्फुरत आहे, त्याचे पलीकडेच ती वाट आहे (१०८).



**धगधगीत एक सूरी होती रे । ते व्योमाचे पोटी फोडूनी भेदिली ते अक्षरासी वाहे वाट रे।।१०९।।**

सूराचे ठिकाणी एक वृत्ति धगधगीत अशी प्रखर आहे. ती आकाशाचे पोट फाडून त्याचा भेद करुन गेली आहे. ती वाट अक्षरापलीकडे गेली असून, त्या वाटेने हा जीवनाचा स्वर प्रवाही आहे (१०९).

**एक आप एक पर रे। पिंड ब्रह्मांडाचे अक्षरी निवडले। सातवे गोल्हाट भेदिले रे ।।११०।।**

एक जीवन असून त्यापलीकडेच असे श्रेष्ठ आहे. या योगाने पिंडब्रह्मांडाची निवड अक्षराने दाखविली आहे. त्याचे ज्ञान झाले की आज्ञाचक्र ओलांडून, त्रिकूट-श्रीहाटापलीकडील गोल्हाटाचा भेद झालाच म्हणून समजावे. याठिकाणी शाम वर्णाचा साक्षात्कार होऊन, साधक त्याचे परता होतो (११०).

**तेथे विजया एकी राणी रे। काळाते खाऊनी महाकाळ गिळिला। ब्रह्म वोवरी तिचे नाव रे ।।१११।।**

तेथे विजयपताका फडकवणारी विजया बुद्धि आहे. शामवर्णाचा ग्रास करुन, हा शामवर्ण ज्यायोगे प्रतीत झाला असा जो शामवर्ण, त्याचा ग्रास अभ्यासाने झाला. ही एक ब्रह्माची ओवरी आहे. हिला शून्यावस्था म्हणतात (१११).

**तेथे एक होता अक्षर सिद्धावळी रे । अंत:काळ तप्तमुख झाला शब्द न देखे फिरोनी आला रे ।।११२।।**

तेथे एक होताच अक्षर सिध्दकालात प्रचीतीला येते. त्या ठिकाणी जीवनाचा अंतकाळ असून, सर्व चैतन्य एकवटल्याने, साधकाचे मुख म्हणजे स्फुरण प्रकाशरुप होते, स्फुरद्रूप प्रकाशमान होते. याठिकाणी नुसते स्फुरण आहे असे असून, ते प्रकाशमान आहे हे प्रतीत होते. शब्दाचा ग्रास होऊन, त्याठिकाणी मूलस्थानात अभ्यासक आला असे होते (११२).

**आता एक सांगेन अमित व्योमावरी फुलले रे । त्या अक्षरा बांधुनी बंदेविण धरले रे । ज्ञान सोपानासी म्या दिधले रे ।।११३।।**

अपरिमित आकाशावर हे फुलले आहे. त्या अक्षराला बांधून बंधन साधता

धरले. हे ज्ञान सोपानदेवांना मीच दिले (११३).

**ज्ञान ज्ञाने भला म्हणवी रे । सोपान सिध्दिनिधी ब्रह्म पावला रे । तेणे ज्ञाना ब्रह्मबोध जाला रे ।।११४।।**

ज्ञानाचेही ज्ञान, त्या ज्ञानाने सोपानदेव स्वत:लाच भला म्हणवीत. सोपान हा परमार्थाचा जिनाच आहे अर्थात तो भलाच आहे. या सोपानाने सिध्दीचा ठेवा जो ब्रह्म याचा साक्षात्कार झाला. या योगाने ज्ञान हे ब्रह्मबोध स्थितीत आले (११४).

**अद्वैत पंथ कैसा रे । ऐक्यवादू वेद बोल बोलती वचने ते मिळणी बह्मीचे सांगेन त्रिसंध्याकाळी रे ।।११५।।**

अद्वैताचा पंथ कसण्याने कळणारा आहे. हा जो ऐक्यवाद आहे याची वचने वेदबोल बोलत आहेत, ती ब्रह्मस्वरुपाची मिळणी, ती त्रिकाळ संधिकाळी साधावयाची असते. हेच साधन होय असेच मी सांगेन (११५).

**ते वर्ण कवणाने घेपवे रे । अनुभविया अटक कुटले। मग ते ज्ञानी म्हणती वाया रे।।११६।।**

ते कोणासही वर्णाभिमानाने घेण्यासारखे नाही. अनुभवी जे आहेत, ते घटक साधून एकरुपच झाले. मग त्यांचा व्यावहारिक दृष्टीने काही उपयोग नाही. मग या दृष्टीने जे शब्दज्ञानी आहेत, ते यांना वायाच म्हणतात (११६).

**जेथे मौन्यामौन्य साध्य नव्हे रे । पाच माळनी सस्वरुप होते। मा तेचि ते अनुभवाची खुण रे ।।११७।।**

जेथे ते मौन्यामौन्यालाही साध्य नाही, जे पंचप्राण मावळल्यावरच स्वस्वरुप प्रचीती येते, मग तीच खरी अनुभवाची खूण आहे, तेथे व्यवहार राहणार कसा? (११७)

**मनी शंका धरु नको काही रे। चतुर देहा सहित मन मावळी। मा तरी ब्रह्मबीज तूचि होशी रे ।।११८।।**

मनात काही शंका धरु नकोस. चत्वार देहासह मन विलीन झाले तर ब्रह्मबीज



तूच होत आहेस (११८).

**सा सा सा चौदावरी ठेवी रे । हा भेदू कोणी जाणितला म्हणती तरी त्यासी मानू मी देईन म्हणती निवृत्ति रे ।।११९।।**

स: स: स: हीच धारणा चौदा चक्रावर ठेवावी. हे वर्म कोणी जाणले म्हणतील त्यास मी मान देईन, असे निवृत्तिनाथ म्हणतात (११९).

**आता एक गुह्य परम गुह्य रे । ते अक्षराशेवटी दाही दिशे नाही। ते सहस्र लक्षी गुणी ते आहे रे।।१२०।।**

आता एक गौप्यातीलही श्रेष्ठ गौप्य आहे. त्या अक्षराचे शेवटी दहा दिशा नाहीत. दिक्, काल आणि आकाश याच्याही अतीत आहे. सहस्रदळाचे ठिकाणी लक्ष व्हावे अशा गुणात ते आहे आणि त्याचे गुणही अनंत आहेत (१२०).

**हे गुपिता शास्त्र जाले ज्योतिषी रे । ते वेदाच्या पोटी धांडोळीत आहाती । त्या अक्षराचा न कळे अंती अंतु रे आता ।।१२१।।**

हे ज्योतिष्यांचे गुणाकाराचे शास्त्र झाले. ते तरी वेदाचा अभ्यास करुन त्या पोटीच शोधीत आहेत. पण त्या अक्षराचा शोधणाराचा अंत झाला तरी अंत लागत नाही. त्यास आदि, अंत दोन्ही नाही (१२१).

**भडभिंग भडभिंग भयानक जाले रे । परी त्यासी सहस्र सिध्दी सहस्रमुखी बुध्दी । मा बावन्न अक्षरावेगळे ते वाटे रे ।।१२२।।**

भडभिंग भडभिंग असे ध्वनि त्या ठिकाणी भयानक झाले. परंतु तेथे सहस्रदळाचे ठिकाणी ज्याची सिध्दी आहे आणि जी बुध्दि सहस्रमुखी आहे, ते मग बावन्न अक्षरापेक्षाही वेगळे आहे असे वाटते (१२२).

**ऐसे अमित्य भुवनाचे सारे मावळले रे । चंडाहूनि प्रचंड थोटावले ते अक्षराचे न कळे पारु रे ।।१२३।।**

मग असे अपरिमित भुवनांचे साठे जेथे मावळले, प्रचंडाहूनी प्रचंड पण तेही तोकडे ठरले. त्या अक्षराचा पारच लागत नाही, ते कळत नाही (१२३).

**जे नि:शब्द अंकुर फुटे रे। वायूसी मोवणी आपासी भिजवणी व्योमाची ठेवणी कवण ठेवी रे।।१२४।।**

जे वेळी नि:शब्दाचे अंकुर फुटतात, तेथे वायूचा खेळ पाहाण्याचे आर्द्रत्व आकाशाची ठेव कोण ठेवत आहे? (१२४)

**मनासी नाही मारणी रे । तेजासी नाही धरणी। धरु गेला तो वायाविण श्रमला रे ।।१२५।।**

जेथे मनाचा मारा करता येत नाही, तेजाला जे धरता येत नाही, धरु गेला तो फुकट नव्हे पण दमलाच (१२५).

**परी एक निर्वाण सांगेन रे। आम्ही तिघी मा जेथूनि तुषाकारलो । ते जीवनी जीवन जेसे मिळोनी गेले । मा तैसी परी जाली आम्हा तुम्हा रे ।।१२६।।**

आता एक शेवटचे वर्म सांगतो. (आम्ही तिघी) इडा-पिंगला-सुषुम्नात्मक जेथून उदित झाली ते पाण्यात पाणी जसे मिळून गेले तशीच अवस्था झाली, ज्यामुळे ही अवस्था आमची तुमची झाली आहे, तेच ते प्रणव बीज आहे (१२६).

प्रेरणा माऊलीची, सत्ता महाराजांची, कृपा श्रीतात्यासाहेबमहाराजांची, प्रेम वात्सल्य कै.प.पू.पितृदेवांचे, ज्यामुळे त्यांनी या अर्भकाकरवी हा भावार्थ आपल्या कृपेने लिहून घेतला, त्यांचे अनन्यभावे स्मरण करून व गुरूपरंपरेला व गुरूपीठांना प्रणाम करून हा भावार्थ श्रीज्ञानराजमाऊलींचे चरणी समर्पण करीत आहे.

लेखन वही क्र. ८२,१३४अ, १५६,१५७

*****



# प्रकरण - ६

श्रीदासराममहाराजकृत पद्य टीकेसह

## दत्तस्तुती व दत्तस्तुतीप्रसाद

**प्रस्तावना :**

श्रीज्ञानेश्वरमहाराज यांच्या 'पैल मेरूचे शिखरी' या दत्तस्तुतीवर श्रीदासराममहाराज यांनी 'दत्तस्तुतीप्रसाद' या शीर्षकाखाली ६५ ओव्यांची टीका दासराम लेखन वही क्र.८२ मध्ये पा.क्र.१०१ ते १०६ या पानांवर लिहिली आहे.

डॉ. के. वा. आपटे यांनी यापूर्वी 'दत्तस्तुती व दत्तस्तुती प्रसाद' या प्रकरणावर थोडक्यात प्रस्तावना लिहिली होती ती खाली देत आहे.

श्रीदत्ताचे वर्णन करणारा श्रीज्ञानदेवांचा एक अभंग आहे. या अभंगालाच श्रीदासराममहाराजांनी 'श्रीज्ञानदेवकृत दत्तस्तुती' हे नामाभिधान दिले आहे. त्या अभंगाचे स्पष्टीकरण करणारी 'श्रीदत्तस्तुतीप्रसाद' ही टीका श्रीदासराममहाराजांनी रचली. यामध्ये योगी अशा दत्ताचे स्वरूप विस्तृतपणे प्रकट केले आहे. तुर्या ही ज्ञानावस्था आहे, तर उन्मनी ही अखंड ज्ञानावस्था आहे. निविर्षयानंद म्हणजे ब्रह्मानंद किंवा 'सर्व देती म्हणून दत्त' असे हे स्पष्टीकरण लक्षणीय आहे. तसेच खेचरी मुद्रा व प्राणायाम यांचेही स्पष्टीकरण केले आहे. ज्ञानेश्वरमहारजांच्या एका अभंगावरती ६५ ओव्यांचे स्पष्टीकरण श्रीदासराममहाराजांनी केलेले आहे.

**पैल मेरुच्या शिखरी । एक योगी निराकारी । मुद्रा लावुनी खेचरी। प्राणायामी बैसला ।।१।। तेणे सांडियेली माया । त्यजियेली कंथा काया। मन गेले विलया । ब्रह्मानंदामाझारी ।।२।। अनुहात ध्वनी नाद । तो पावला परमपद । उन्मनी तुर्या विनोदे । छंदे छंदे डोलतसे ।।३।। ज्ञान गोदावरीच्या तीरी । स्नान केले पांचाळेश्वरी । ज्ञानदेवाच्या अंतरी दत्तात्रेय योगिया।।४।।**

## श्रीदत्तस्तुति प्रसाद

ॐ नमोजी श्रीगुरुलिंगा । रघुनाथप्रिय अंतरंगा । श्रीराम हनुमंत् कृपागंगा । गोविंद पितया नमोजी ।।१।। भागवतधर्माचा पाया । रचिला श्रीज्ञानराजे अभया । केली जगावरी छाया । आपुलिया कृपेची ।।२।। त्यांनी केली श्रीदत्तस्तुती । ते पवाडेल काय मती । जे का तयांची अंतरस्थिती। जे निगुती चित्सुख ।।३।। आपुली कृपा जरी । घडो येईल हे तरी । कृपा प्रकाश लहरी । अंतरी या लहरता ।।४।। विश्वरचना अपार । तेथ नाना परीचे डोंगर। दगड मातीचे बहुतर । हिमालय आपाचा ।।५।। ज्वालामुखी तेजाचा । वावटळी तो वायूचा । जड घन हवेचा । परी चैतन्याचा निजदेही ।।६।। ज्या मेरुपैल एक व्योम । तेजःपुंज अरूप अनाम । चत्वार देहातीत अनुपम । पुंज नव्हे तेजोमय ।।७।। अंतर्मुख जीवन जरी । सर्वाश्रेष्ठ दिसे तरी। गर्जे गगन नवल परी । अनाहत ।।८।। पिंडीची षट्चक्रे उल्लंघून । गाठलीया ब्रह्मांड स्थान । आज्ञाचक्री आज्ञा साधून । नेम साधने अनुभवु ।।९।। जेथ ते आपेआप । प्रकाशले निर्विकल्प । स्वयंसिध्द स्वयंरूप । केवलानंद ।।१०।। त्रिकुटी ज्याचा पायथा । सहस्त्रदळ ज्याचा माथा । चैतन्याची सत्ता । चावळे जेथ ।।११।। देह जेथे विकल । इंद्रिये होती शिथिल । ताणाताणी नाही सैल। पंचप्राण ।।१२।। षट्चक्राची माळ ढिली। चैतन्याची उलाढाली । म्हणोनि वाहिली लाखोली । सहस्त्रनामाची ।।१३।। येथ चंद्रु नसे परी चांदणे । मुक्तावस्था लये जेणे । प्राप्त करोनि घेतली तेणे। सुखरुप ।।१४।। जेथे स्थीर होती मन पवन । जिंकीयले पंचप्राण । मदनाचाही गेला जिरून । मद जेथ।।१५।। रजतम सत्व गुण । यांचे झाले उल्लंघन । मनोहर त्रिकुट स्थान । पावन जे सर्वस्वे ।।१६।। काय ते तेथींची शोभा । लावण्याचा जो गाभा । पसरली आत्मप्रभा । आत्मत्वेसी ।।१७।। सरले अधोगामी जीवन । अंतर्मुख स्थिर पूर्ण । ऊर्ध्व लागले जेथून । ऊर्ध्वदृष्टी ।।१८।। मग ते होय ऊर्ध्वमुख। श्वेत साक्षात्कार सम्यक । शामल रुपडे सुरेख । अनुभवितु ।।१९।। आरक्त श्वेत शाम पैल । गुंफा अनुपम । नागमोडी परम । जीवन वाहे ।।२०।। सहस्त्रदळ औटपीठ। नाद भरला घनदाट । मूळ मायेचे जे पीठ । जाणती



संत।।२१।।ऐशा चैतन्य मेरूचे शिखरी । निरंजनी निराकारी । मुद्रा लावुनी खेंचरी । योगी बैसला प्राणायामी ।।२२।। आकाशाचा शब्दगुण । आटला ऐंसें निरंजन । जे का नसे आकारून । ठराविक ।।२३।। हालत नाही । बोलत नाही। चालत नाही । ते निरंजन ।।२४।। तेथे एक योगी । बैसला ध्यानस्थ विरागी। स्वस्थ चित्त अनुरागी । आत्मरुपी ।।२५।। एक म्हणजे नव्हे दोन। हे श्रुती वाक्यची प्रमाण । एकामाजी एक मिळवून । दोन दिसे ।। २६ ।। मग का तया म्हणावे दोन । जे का सर्वत्र एकची पूर्ण । सर्वामाजी साधारण । अनन्य जे ।।२७।। तयालागी कोण । म्हणेल साधारण । तरी ते असाधारण । साधारण असोनि ।।२८।। काय असेल हा योगी । जो का नव्हेची वियोगी । जीवपणा उगी । सरला जेथ ।।२९।। जीवपणाचा वियोग । तोची स्वरुपाचा योग । जीवपणाचा योग । तरी काय ? ।।३०।। एक योग एक वियोग । एक असे योगायोग । आत्मयोग सुखभोग । त्या वियोगे दुखःची ।।३१।। आत्मसुख ते देहदुःख । देहदुःख ते आत्मसुख । हे समीकरण चोख । वर्माचे गा ।।३२।। चत्वार देहाचा निरास । तेथे खेचरी मुद्राप्रकाश । प्राणायाम सावकाश । सहजेचि ।।३३।। आकाशमार्गी गमन करी । ऊर्ध्वगामी लक्ष तरी। केंद्रित स्थिर बिंदुवरी । खेचरी ते ।।३४।। नासीकेचा प्राण । अनहत ध्वनी गर्जून । येतसे तो मार्ग कवण । तेथ लक्ष्य।।३५।। जेथ चित्त जडता परम । सहज इंद्रिय मन संयम । सहज शांती उपरम । अखंडीत ।।३६।। प्रपंच वृत्तीचा रेचक । अहंब्रह्मवृत्ती पूरक । तेथ नैश्चल्य स्थीरता कुंभक । सुखासनी ।।३७।। आस नुरे ते आसन । अजस्त्र ब्रह्माचे चिंतन । अकृत्रीम नसे अधीन । साधनांच्या ।।३८।। येथ वासना निमाली । कल्पनाही ओसरली । वृत्ती स्थानापन्न झाली । पद्मासनी ।।३९।। जेथ होय शब्दाचा ग्रास । पहाता पहाणे होउनि निरास । आत्मत्वेची आपणास । अवलोकी ।।४०।। पाहता पाहता लागली खेचरी । योगी झाला साक्षात्कारी । सेवुनि राहे निरंतरी । सत्राविसी।।४१।। काही नाही परी चालीले । ते मायाजाळ तेथ नातळे । चौदेहाचे सुटले । गुंताडेगा ।।४२।। उपाधीभूत जीवन । तेथ चित्ताचे केंद्रीकरण। शुध्द आकाशरूप जीवन । ऊर्ध्वपंथी ।।४३।। तेथ देहभाव विलीन । मग

काय करील मन । मनाचे सरले जीवन । तो ते तगे कै ।।४४।। निर्विषय जो आनंद। म्हणोनितो ब्रह्मानंद । जेथे योगी सदा धुंद । नाद लुब्ध ।। ४५ ।। कंठ आणि उर । तेथ वाहे जीवनस्वर । ध्वनी तार मंद्र घोर । घोर नुरवी ।।४६।। येथ परतले मन । चाले अखंड चिंतन । आधारीचे जीवन । सहस्त्रारी मिळाले ।।४७।। तेथ जीवन निवांत । सदा शांत शांत शांत । प्रगटला हृदयस्थ । परमात्मा।।४८।। अनुहत ध्वनी । तेणे परमपद निर्वाणी । रामकृष्णनामी उन्मनी । ज्ञानावस्था अखंड ।।४९।। शब्द झाला कुंठीत । वस्तु लाभली साक्षात । जया लक्षीता प्रचीत। वेडावली ।।५०।। प्रगट ना गुप्त । जे का असेची साक्षात । तेची योगीया होत । साक्षात्कारे ।।५१।। दिनू तैसी रजनी। होता अवस्था ये झणी । ताटी चैतन्याची उघडुनी । पावली तुर्या ।।५२।। तुर्या ते ज्ञानावस्था । जेथ चैतन्याची आस्था । पावे अखंड स्वस्थता । मनोन्मन ।।५३।। येथ अवस्थात्मक देह । देहावस्था नुरोनि विदेह । मनोन्मन समारोह । मुक्तरुप ।।५४।। हेतु हा मावळला । शब्द नि:शब्द जहाला । स्वरुपी तटस्थ राहीला । निजत्वेनी ।।५५।। अनुकंपने अनुवृत्ती । अनुवृत्तीचे छंद होती । छंदे छंदे डोल होती । देहातीत वस्तूचे ।।५६।। कलीमाजी स्वयंभ । श्रीपाद वल्लभ। जैसे का हे नभ । दिगंबर ।।५७।। ज्ञानावस्था जीवनपरी । षडचक्राचे उपरी । त्रिकुटा भीतरी । गोदागंगा ।।५८।। तया गोदेच्या तीरी। पंचमातृका पांचाळेश्वरी । स्नान करीती निरंतरी । संतसिध्द ।।५९।। सर्वा देती म्हणूनी दत्त । जे का आले सर्वस्व देत । म्हणोनी दत्तगुरु होत । जगद्गुरु ।।६०।। ऐसे हे योगीराज । योगाग्रणी महाराज । होती अंतरी विराज । ज्ञानेशांचे ।।६१।। जेथ बाणली ज्ञानावस्था । तया ज्ञानिया होय देता । देता देता नसे घेता । घ्यावया ते नुरेची ।।६२।। जेथ नासिली त्रिपुटी । प्राणायामाचे संपुटी । चित्त चैतन्या पडे मिठी । नेत्रपुटी ।।६३।। श्रीज्ञानेश्वरे दत्तस्तुती । केली ते त्यांची अनुभूती । जे का कळस नाथपंथी। म्हणोनिया ।।६४।। ते ठसावली चित्ती । वोळली ज्ञानाई कृपामूर्ती । कैवल्य वैभवी लाधली संगती । समाधान *दासरामी* ।।६५।।

*****



## प्रकरण -७

श्रीदासराममहाराजकृत गद्य भावार्थासह

# श्रीज्ञानेश्वरमहाराजांची सनद

**प्रस्तावना :**

श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचे 'सनद' या शीर्षकाखाली १८ अभंग आहेत. श्रीदासराममहाराज यांनी या १८ अभंगांचा गद्य भावार्थ दासराम लेखन वही क्र.१०६ मध्ये लिहिला आहे. तो या प्रकरणात प्रस्तुत केला आहे.

डॉ. के. वा. आपटे यांनी यापूर्वी 'श्रीज्ञानेश्वरमहाराजांची सनद (श्रीदासरामकृत गद्य भावार्थासह)' या प्रकरणावर थोडक्यात प्रस्तावना लिहिली होती ती खाली देत आहे.

सगुण-निर्गुण म्हणजे काय? मायेची उत्पत्ती कशी झाली ? सोऽहंशी ऐक्य कसे व्हावे? असे परमार्थातील गूढ प्रश्न मुक्ताबाईंनी श्रीज्ञानदेवांना येथे विचारले आहेत. या सर्व प्रश्नांची उत्तरे ज्ञानदेवांनी दिली असून, साधन करून सद्गुरूकृपा झाली असता, निरुपाधिक समाधीचे सुख मिळते असे श्रीज्ञानदेव सांगतात. सनद म्हणजे मूळ पत्र/ अधिकारपत्र. हे १८ अभंग म्हणजे सोऽहंसिद्धीची सनद होय. ही सनद ज्ञानदेवांच्याकृपेने प्राप्त झाली असे मुक्ताबाई सांगतात.

**(१)**

**आदिनाथ शंकर गौरी मनोहर । खूण ही साचार मच्छिंद्रनाथ ।।१।।**
**मच्छिंद्रे गोरक्षा सांगितले गूज । ते गैनीनाथे गूज उपदेशिले ।।२।।**
**तेथुनी तारक निवृत्ती आम्हासी । जाणा त्रिवर्गासीउद्धरिले ।।३।।**

अर्थ :- मनाचे हरण करणारे श्रीगौरीशंकर आदिनाथ असून तीच शिवशक्तीची खूण मच्छिंद्रनाथांना खरोखरी प्राप्त झाली ।।१।। श्रीमच्छिंद्रनाथांनी श्रीगोरक्षनाथ यांना हे गौप्य सांगितले असून ते श्रीगैनीनाथ यांनी माझे श्रीनिवृत्तीनाथ यांना उपदेशिले ।।२।। तेथून आलेले श्रीनिवृत्तीनाथ आम्हाला

तारक असून त्यांनी आम्हा तिघांचा (श्रीज्ञानेश्वर, सोपानदेव व मुक्ताबाई यांचा) उद्धार केला. ।।३।।

**(२)**

**ते नयनाचे अग्री पहावे आपण । उजळिल्या जाण दाही दिशा ।।१।।**
**ब्रम्हांडाएवढे ओतीव सगळे । मन बुद्धी कळे ऐसे नाही ।।२।।**
**निवृत्तीप्रसादे ज्ञानदेव लाधला । सुखाचा पै झाला तेणे सुख ।।३।।**

अर्थ :- आपले दोन्ही डोळे सहज जेथे पडतात, त्याठिकाणी डोळ्यांच्या पापण्या अर्ध्या मिटवून ते अग्र पाहिले असता, आपण कोण हे ज्ञान होऊन दाही दिशा चैतन्याने उजळल्या जातात. ।।१।। हे एवढे जे ब्रम्हांड आहे ते सगळे ओतीव रूपच असून मनबुद्धीला कळणेसारखे नाही. ।।२।। श्रीनिवृत्तीनाथांचे कृपाप्रसादाने हा अनुभव श्रीज्ञानेश्वरमहाराज यांना आला असून, ते सुखाचेच झाल्याने त्यांचे योगेच कोणासही सुख व्हावे, अशी स्थिति झाली. सुखाचे योगानेच सुखाला सुख झाले. का? तर हे आत्मविज्ञान आहे म्हणून. ।।३।।

**(३)**

**सत्य ज्ञानानंत गगनाचे प्रावर्ण । नाही रूप वर्ण गुण जेथे ।।१।।**
**तो हा गे श्रीहरी पाहिला डोळेभरी । पहाता पहाणे दुरी सारोनिया।।२।।**
**वाचेचा उच्चार नवल हे साचार । स्वरुप निर्विकार कोंदाटले ।।३।।**
**ज्ञानदेव म्हणे ज्योतीची निजज्योती । ते हे उभी मूर्ती विटेवरी ।।४।।**

अर्थ :- सच्चिदानंद स्वरूप हे आकाशाचेही पांघरूण असून त्याला रूप,वर्ण, गुण हे काही नाही. ।।१।। बुद्धी व डोळे भरून असलेला तो हा मायेचे हरण करणारा श्रीहरी डोळेभर पाहिला. तेथे पाहणारा आणि पहाणे हे राहिलेच नाही, त्रिपुटीचा निरास झाला. ।।२।। वाचेने होणारा उच्चार आणि वाचेचाच उच्चार यात अंतर आहे. संघाताशिवाय नाद जेथे होतो, हा जो उच्चार ज्या सहजतेत प्रतीत होतो, ती जीवाचा त्या अनिर्वाच्य वाचेचा हा जो सहज होणारा उच्चार हे खरोखरीच मोठे नवल असून त्या ठिकाणी निर्विकार परमात्मा कोंदून राहिला आहे. ।।३।। श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, ही जी जीवज्योतीच्या निजत्वाची ज्योती आहे तीच ही मूर्त रुपात, जेथे सर्वांचा वीट यावा अशा विटेवर उभी आहे. वृत्तीची धारणाच जर अशी झाली तर तेथे ही प्रचीती आहे. ।।४।।

**(४)**

**विटेवरी मूर्ती दिसते सगुण । सगुण का निर्गुण म्हणू दादा ।।१।।**
**सगुण जर म्हणू दिसते निर्गुण । वाचेचे भिन्न पडले दादा ।।२।।**
**वचन बुडाले स्तब्ध झाले मन । सगुण निर्गुण दोनी नाही ।।३।।**
**म्हणे मुक्ताबाई सांगा ज्ञानदेवा । विचार हा बरवा करोनिया ।।४।।**

अर्थ :- चौशून्यात्मक विटेवर सकाराचे गुणानेयुक्त (सगुण) अशी दिसणारी मूर्ती, हिला सगुण म्हणू का निर्गुण, एवढेच दादा मला सांगा, असे श्री मुक्ताबाई श्रीज्ञानेश्वरमहाराज यांना विचारतात. ।।१।। सकारगुणाने पहाता पहाता, तो सकारही विलीन झाला. अशा वृत्तिमौन्य स्थितीत निर्गुणरूप बिंबलेले प्रतीत होते. जी वाचा अहर्निश उठते, त्यायोगे फक्त शब्दाचाच भेद होतो. ।।२।। हे जे सहज वचन सकार हकारात उमटते, ते बुडाले असे होताच मन स्तब्ध झाले, तो सगुण व निर्गुण हे दोन्ही उरले नाही. ।।३।। तरी याचा चांगला विचार करून मला याचे वर्म सांगा असे श्रीमुक्ताबाई श्री ज्ञानेश्वरमहाराज यांना म्हणतात. ।।४।।

**(५)**

**ज्ञानदेव म्हणे ऐक मुक्ताबाई । सांगेन तू पाही गुरुमुखे ।।१।।**
**निर्गुणाचा बुंद सगुणी उतरला । कर्दम तो झाला एकाएकी ।।२।।**
**स्थापिलासे गोळा सगुणाचा सार । तयाचा आधार एक आहे ।।३।।**
**मुळद्वारी मुळी स्थापिला गणपती । तयापाशी वसती निर्गुणाची ।।४।।**
**निर्गुण म्हणजे काय रेणू ते अक्षर । म्हणे ज्ञानेश्वर मुक्ताबाई ।।५।।**

अर्थ :- मी (माझ्या मुखाने न सांगता) गुरुमुखाने सांगीन, ते तू गुरुमुखाने श्रवण करून त्याचा विचार कर, असे श्रीज्ञानेश्वरमहाराज मुक्ताबाईंना

म्हणतात. ।।१।। निर्गुणाचा बिंदू सकाराचे गुणात जो उतरला, तो एकाच तत्वाशी ऐक्य होऊन त्याचा कालाच झाला. ।।२।। त्या योगाने हा सगुणाच्या सारतत्त्वाचा गोळा झाला. ते सगुण असून त्याला एकतत्त्वच आधारभूत आहे ।।३।। आधारचक्राचे ठिकाणी श्रीगणपतीची स्थापना असून तेथेच निर्गुणाची वसती आहे. सगुणाचा शेवट व निर्गुणाचा आरंभ असा तो आहे. ।।४।। ज्याला नाश नाही असे अक्षररूप तो रेणू आहे, असे श्रीज्ञानेश्वरमहाराज श्रीमुक्ताबाईंना सांगतात. ।।५।।

**(६)**

**मूळ द्वारी दादा स्थापिला गणपती । माया ही उत्पत्ती कैशी झाली ।।१।।**
**मायेचा बंबाळ जाय एकसरा । इच्याही आधारा सांगा दादा ।।२।।**
**ब्रम्हांड व्यापिले आकाश कवळिले । सर्व काही व्यापिले मायेने ची ।।३।।**
**माया कैशी दादा सांगता निर्गुण । मुक्ताबाई म्हणे भिन्न फोडा ।।४।।**

अर्थ :- दादा मूळव्दारात जर गणपती स्थापन केला, तर मग मायेची उत्पत्ती कशी झाली हा प्रश्न श्रीमुक्ताबाईंनी श्रीज्ञानेश्वरमहाराजांना केला. ।।१।। मायेचा प्रवाहझोत सारखा जात आहे. हिचा आधार काय? ।।२।। हिने ब्रह्मांड व्यापले असून आकाशही कवटाळले आहे.फार काय सर्व काही मायेनेच व्यापले असून तीच दृश्य आहे. ।।३।। आपण तर निर्गुणाचे वर्णन करता, मग माया कोठे आली? हे जे भिन्नत्व एवढे मला फोड करून सांगा, असे श्रीमुक्ताबाई सांगतात. ।।४।।

**(७)**

**रेणू ते निरंजन अणू तेची माया । माया वचनी देह निपजला ।।१।।**
**नाही अक्षराचा आधार मेरुशी। हे तो नाभीपाशी स्थापियेले ।।२।।**
**देहिमधोनिया निघाले वचन । वेदांचे जन्मस्थान तेची बाई ।।३।।**
**दहा पवनांचा एक झाला मेळा । रेणूचा जिव्हाळा सर्वासी हा ।।४।।**
**सर्वातून वेगळा रेणू तो अचळ । म्हणे ज्ञानेश्वर मुक्ताबाई ।।५।।**

अर्थ :- अक्षररूप रेणू हा निरंजन असून क्षररूप अणू ही माया आहे. रेणू



निःशब्द असून अणू शब्दरूप आहे. यामुळे हे जे मायेचे शब्दरूप (वचन) या ठिकाणीच हा देह निर्माण झाला. ।।१।। आकाशातच हे दृश्यभूत झाले. मेरूदंडासी अक्षराचा आधार असून, याची स्थापना नाभिकमलाचे ठिकाणी आहे. ।।२।। हे अक्षरतत्त्व आणि नाभीपाशी ज्याची स्थापना आहे असा तो मेरू, यातून स्फुरण (वचन) सहज निघाले असून, वेदांचे तेज जन्मस्थान आहे. ।।३।। येथे पंचप्राण व पंच उपप्राण यांचा एकमेळ असून, सर्वालाच या रेणूचा जिव्हाळा आहे. ।।४।। या सर्वातून वेगळा असणारा रेणू हा अचळ आहे, स्थिर आहे, असे श्रीज्ञानेश्वरमहाराज श्रीमुक्ताबाईंना सांगतात. ।।५।।

**(८)**

**सर्वातोनी वेगळा हाती कैसा येई । म्हणे मुक्ताबाई सांगा दादा ।।१।।**
**दहा पवनांचा खेळ योगी खेळती । ओढोनिया नेती ब्रम्हांडात ।।२।।**
**कुंडलिनी निवटोनी करिती आकर्षण । रेणूचे दर्शन झाले की नाही।।३।।**
**म्हणे मुक्ताबाई सांगा ज्ञानेश्वरा । चुके येरझारा चौऱ्यांशीचा ।।४।।**

अर्थ :- सर्वातून वेगळा असणारा हा रेणू, हा हाती कसा येतो येवढे सांगा, असे श्रीमुक्ताबाई श्रीज्ञानेश्वरमहाराज यांना विचारतात. ।।१।। दहा पवनांचा खेळ योगी खेळून, प्राणापान वर खेचून ब्रह्मांडात नेतात. ।।२।। कुंडलिनीचा ग्रास करून, ऊर्ध्वगामी जीवनाचे आकर्षण करतात. त्यांना रेणूचे दर्शन झाले की नाही? का तर झाले म्हटले की नाही होते. (झोप लागली का, असे झोपलेल्याला विचारले तो म्हणाला, 'लागली' याचा अर्थ नाही असेच हे अवस्थात्मक ज्ञान आहे.) ।।३।। ज्या योगे हा चौऱ्यांऐशीचा फेरा चुकेल असे काही सांगा, असे श्रीमुक्ताबाई श्रीज्ञानेश्वरांना म्हणतात. ।।४।।

**(९)**

**कुंडलिनी निवटोनी कोंडिति पवन । त्यां रेणूचे दर्शन घडले नाही ।।१।।**
**नलगे आसन कोंडिति पवन । करावे साधन गुरुकृपे ।।२।।**
**गुरुकृपेविण नये तो हातासी । पाहता रेणूसी अंत नाही ।।३।।**

**ब्रह्मांडी रेणू नांदे सदोदित । सोहं त्याचा अंत ज्यात असे ।।४।।**
**दहा पवनावेगळा सोहं तो अचल । रेणू त्याचा खेळ सदोदित ।।५।।**
**ज्ञानदेव म्हणे ऐक मुक्ताबाई । गुरुकृपे सोई कळो येई ।।६।।**

अर्थ :- कुंडलिनीचा ग्रास करून जे वायुनिरोधन करतात, त्यांना रेणूचे दर्शन घडलेच नाही. ।।१।। आसनाची अगर वायूची कोंडी करण्याची आवश्यकता नाही. गुरुकृपेने साधनाचा अभ्यास करावा. ।।२।। ज्या रेणूचा अंत नाही, तो गुरुकृपेशिवाय हाती येत नाही. ।।३।। सोहंभाव जेथे विलीन होतो, असा तो रेणू सदोदित ब्रह्मांडस्थानात असतो. ।।४।। दहा पवनाहून निराळा सोहं हा अचल असून, स्थिरत्वाने होणारा खेळ सदोदित रेणूचा आहे. ।।५।। गुरुकृपेने हे कळेल, असे श्रीज्ञानेश्वरमहाराज श्रीमुक्ताबाईंना सांगतात. ।।६।।

## (१०)

**गुरुकृपा झाली प्रत्ययासी आली । कैसी ती कळली सांग दादा ।।१।।**
**लेखा नाही आला साधन करिता । तो कैसा येईल हाता सांग दादा ।।२।।**
**व्यास जे वाल्मीक वर्णिती अपार । तयासी हा पार कळला नाही ।।३।।**
**वेदासी नाकळे श्रुती वेडावले । तो कैसेनी हाता येईल सांग दादा ।।४।।**
**इंद्रियावेगळा मनबुद्धी निराळा । सर्वात व्यापिला कळे कैसा ।।५।।**
**मुक्ताबाई म्हणे कैसे ज्ञानराजा । संदेह हा माझा फेडोनिया ।।६।।**

अर्थ :- श्रीगुरुकृपा झाली व ती अनुभवाला आली, हे कळले कसे सांगा तरी. ।।१।। जो अलेखा आहे, ज्याने सर्वांचा लेख केला, लेख करणारांचा लेख केला, तो साधन करूनही लेखा येत नाही, तो हाती कसा येईल? ।।२।। व्यास वाल्मीकींना, वर्णन करुनही ज्याचा पार कळला नाही, ज्याचा वेदांना पत्ता नाही, श्रुती वेडावल्या, तो हाती कसा येईल? ।।३-४।। इंद्रियाहून वेगळा व मनबुद्धीहून निराळा, तो सर्वात व्यापला हे कळते कसे? ।।५।। हे ज्ञानराज, हा संशय फेडून मला काही सांगा, असे मुक्ताबाई म्हणतात. ।।६।।



## (११)

**गुरुकृपा कैशी सांगतो तुजला । पूर्ण दिवशी झाला चंद्र गुप्त ।।१।।**
**तैसा प्राणी होता मायेमाजी भ्रांत । बीजेचा अवचित उदयो झाला ।।२।।**
**दिवसेंदिवस कळा चढे त्या चंद्राला । पूर्णतेसी आला पोर्णिमेला ।।३।।**
**तैसा प्राणी होता मायेमाजी भ्रांत । भेटला अवचित गुरुराज ।।४।।**
**केली त्यानी दया हरपली माया । मुळीचिया ठाया बैसविले ।।५।।**
**म्हणे ज्ञानदेव ऐक मुक्ताबाई । गुरुकृपा बाई ऐसी आहे ।।६।।**

अर्थ :- गुरुकृपा कशी असते ती तुला सांगतो ऐक, अमावस्येला म्हणजे पूर्ण दिवशी चंद्र गुप्त होतो आणि द्वितीयेला अचानक शोभू लागतो, त्याप्रमाणे मायेमध्ये भ्रांत झालेल्या प्राण्याला अकस्मात गुरुराज भेटल्याबरोबर त्याची चित्शक्ती चमकू लागते आणि दिवसेंदिवस चंद्राची कला वाढत जाते, त्याप्रमाणे त्या चित्शक्तीचा पोर्णिमेप्रमाणे विकास होत जातो. ।।१-४।। गुरुराजानी दया केली, तो माया नाहीशी झाली. मूळ ठिकाणावरच त्यांनी बसविले. ।।५।। अशी गुरुकृपा आहे, असे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी श्रीमुक्ताबाईंना सांगितले. ।।६।।

## (१२)

**पौर्णिमेचा दिवशी चंद्र झाला अस्त । देहाची ही गत तैशी होई ।।१।।**
**कर्ण बंद होती नेत्र आच्छादती । मग कैशी गती होय दादा ।।२।।**
**देह झाला विकळ जिव्हा ते खुंटली । दहा पवना झाली हडबडदादा ।।३।।**
**तेथे कोण कळा सद्गुरुने दिली । देहासी कैसी झाली मोक्षगती ।।४।।**
**म्हणे मुक्ताबाई फेडावे हे भिन्न । कोणते साधन करू दादा ।।५।।**

अर्थ :- पौर्णिमेचे दिवशी चंद्रास्त व्हावा, तशी या देहाची गती होते. ।।१।। कर्ण बंद होऊन, नेत्रावर पडदा पडला, मग कशी गती होते ते सांगा. ।।२।। देह विकल झाला, जिव्हेचा ग्रास झाला, चारी वाचेंचा लय झाला, तेव्हा दहा पवनांची हडबड झाली, ते गडबडले. ।।३।। सद्गुरुंनी तेथे कोणती कळा दिली की ज्यायोगे जीव देहापासून अलिप्त झाला म्हणजे जीवाचा देहभाव नष्ट झाला. ।।४।। हे भिन्नत्व फेडून, कोणते

साधन करू ते सांगा, असे श्रीमुक्ताबाई म्हणतात. ।।५।।

**(१३)**

**देहा मोक्ष होय साधन ते ऐक । मायेसी संकल्प करी बाई ।।१।।**
**बाळे वज्रासन करोनिया मनन । करावे हे ध्यान सद्‌गुरुचे ।।२।।**
**ॐ तोची गुरू सोहं तोचि शिव । या दोहीचा लाघव करी बाई ।।३।।**
**नासाग्री दृष्टी मोह मासी गोष्टी । रेणू पाठी पोटी भरला बाई ।।४।।**
**सत्‌चिदानंद भरला झाले महाशून्य । तयामाजी लीन होणे बाई ।।५।।**
**लीन म्हणजे नाही आपपर । म्हणे ज्ञानेश्वर पूर्ण कृपा ।।६।।**

अर्थ :- माया ही संकल्परुप आहे, हे ओळखताच जीव देहातून अलिप्त होऊन देहभावातून मुक्त होतो, असे हे साधन तू ऐक. ।।१।। वज्रासारखे न डळमळणारे, अंतरात आशा उरणार नाही (आस न), असे आसन घालून, मनाचे मनत्व नाहीसे करून (मन न), सद्‌गुरुंच्या चैतन्य स्वरूपाचे ध्यान करावे. ।।२।। ॐ हा गुरु व सोहं हा शिव, या दोन्हीचे ऐक्य झाले पाहिजे. ।।३।। नासाग्रदृष्टीचे सोहंशी ऐक्य होणेची गोष्ट असून, त्याचे पाठी-पोटी रेणूच भरला आहे. ।।४।। सत्‌चिदानंद जो नासाग्रदृष्टीत भरला, तोच दृश्य नाहीसे होऊन दृष्टीत महाशून्याची (चैतन्याच्या लहरींची) प्रचीती आली, तेथे लीन होणेच महत्त्वाचे आहे. ।।५।। त्यात लीन झाले की हे माझे व हे परके असे रहात नाही, हीच कृपा, असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात. ।।६।।

**(१४)**

**कृपा झाली आता आले प्रत्ययासी । कैसे या मनासी करु दादा ।।१।।**
**कैसे वज्रासन कैसे ते मनन । इंद्रियासी दमन कैसे करू ।।२।।**
**कैसे करू दादा सोहमासी गोष्टी । नासाग्री ही दृष्टी कैशी ठेवू ।।३।।**
**रेणूमध्ये मिळू कैसे ज्ञानेश्वरा । सांगा या विचारा कृपा करुनी ।।४।।**
**धाकुले भावंडे घेतलीसे आळ । मुक्ताई लडिवाळ तुमची दादा ।।५।।**

अर्थ :- कृपा झाली, तो प्रत्ययच आला. मनाने व्यवहारच करता येईना. ।।१।। मग वज्रासन, मनन, इंद्रियदमन कसे करावे? ।।२।। सोहंशी ऐक्य कसे व्हावे? नासाग्री दृष्टी कशी ठेवावी? ।।३।। रेणूत कसे मिळावे? हा विचार कृपा करुन सांगा. ।।४।। धाकट्या भावंडाने हा हट्ट घेतला आहे. कां तर मुक्ताई तुमची लडिवाळे आहे दादा, म्हणून. ।।५।।

**(१५)**

**ज्ञानदेव म्हणे ऐक मुक्ताबाई । सद्‌गुरुचे पायी मन ठेवी ।।१।।**
**करी निदिध्यास सोहमाचा बाई । इंद्रियासी नाही रीघ तेथे ।।२।।**
**सात हे आत आठव्याच्या पोटी । नवव्या संगे गोष्टी करी बाई ।।३।।**
**मग दहावा सहज नवव्यासी भेटला । अकराव्यासी सांगू लागला गुजगोष्टी ।।४।।**
**करुनी उपोषण मूळ द्वार बुझवोन । लिंगस्थानी चरण ठेवी बाई ।।५।।**
**ब्रह्मांडाहूनी ओढावा सोहम । त्रिवेणी आसन घाली बाई ।।६।।**
**ॐ तोची गुरु सोहं तोची शिव । दोहीचा लाघव करी वो बाई ।।७।।**
**ऐक्य झाल्यावरही उठेल बंबाळा । कोटी सूर्यकळा प्रकाशल्या ।।८।।**
**खेचरी हे मुद्रा नासाग्री दृष्टी । स्वयंभू पाठी भरला बाई ।।९।।**
**ज्ञानदेव म्हणे ऐक मुक्ताबाई । यापरता नाही उपदेश आता ।।१०।।**

अर्थ - हे मुक्ताबाई, तू सद्‌गुरुंचे पायी मन ठेव, असे श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात. ।।१।। जेथे इंद्रियाना प्रवेश नाही, अशा सोहंगतीचा ध्यास कर. ।।२।। सप्तविध धातु अष्टधा प्रकृतीत आहेत. नऊद्धारातून हिंडणाऱ्या चैतन्य-रुप जीवाबरोबर (नवव्यासंगे) चैतन्याचा व्यवहार घडू दे. ।।३।। शिवात्मा (दहावा) जीवात्म्याला भेटला, तो परमात्म्याबरोबर (अकराव्यासी) गुजगोष्टी सांगू लागला. ।।४।। आत्म्यासंनिध वास्तव्य (उपोषण) करुन मूळद्वार बुझवून, लिंगस्थानी एक पाय लावून ठेव. ।।५।। ब्रह्मांडस्थानातून सोहं ओढून, त्रिकूटावर त्रिवेणी संगमावर जीवनाचे तीन ओघ जेथे मिळतात, तेथेच वृत्तीचे आसन घाल ।।६।। ॐ तोच गुरु असून, सोहं तोच शिव आहे. यांचे ऐक्य कर. ।।७।। कोटि सूर्यकळा प्रकाशित व्हाव्यात अशा तेजाचे प्रकाशाचा झोत ऐक्य होताच उठेल. ।।८।। नासाग्र म्हणजे भ्रूमध्य,

तेथे दृष्टी, ही खेचरी मुद्रा असून, भ्रूमध्याचे पाठीपोटी तो स्वयंभू आत्माच भरला आहे. ।।९।। यापेक्षा उपदेश नाही, हे तू ऐक, असे श्रीज्ञानेश्वरमहाराज श्रीमुक्ताबाईंना सांगतात. ।।१०।।

## (१६)

**सहज समाधी लागली निर्गुणी । खुंटलीसे वाणी न चले पुढे ।।१।।**
**खुंटला हा शब्द राहिला व्यवहार । झाला साक्षात्कार सदोदित ।।२।।**
**गळाली इंद्रिये राहिलेसे मन । झाले महाशून्य एकाएकी ।।३।।**
**विरालीसे शक्ती झालीसे निवृत्ती । झाली ब्रह्मप्राप्ती मुक्ताबाई ।।४।।**

अर्थ - निर्गुण स्थितीत सहज समाधी लाभली, तो चारी वाचेंचा ग्रास झाला. ।।१।। शब्द खुंटला, तो व्यवहार राहिला असा जो परमार्थ, त्यात अहंकार गळल्याने सदोदित साक्षात्कार झाला. ।।२।। कुठला तरी एक 'कार' (अहंकार किंवा साक्षात्कार यातला शेवटचा शब्द कार) रहातो, हे वर्म इंद्रिये गळाली, तो मनाची धारणा संपली. एकाशी ऐक्य होताच महाशून्य झाले. ।।३।। शक्ती विरुन गेली, तो वृत्ती निवृत्त झाली. या प्रमाणे हे मुक्ताबाई, ब्रह्माची प्राप्ती झाली. ।।४।।

## (१७)

**म्हणे ज्ञानदेव ऐक मुक्ताबाई । उघडी समाधी घेई जगामाजी ।।१।।**
**आठवे समाधीचे अंग जाले तुज । आता नाही काज आणि काही ।।२।।**
**हेच गुह्य ज्ञान पार्वतीसी दिले । मच्छिंद्रा लाधले हेची ज्ञान ।।३।।**
**मच्छिंद्रांनी दिले गोरक्षाचे हाती । तेची चौरंगीप्रती उपदेशिले ।।४।।**
**चौरंगीने दिले भर्तरीचे हाती । तेणे गैनीप्रती उपदेशिले ।।५।।**
**बापरखुमादेवी निवृत्ती दयाळ । त्यानी आपणासी उध्दरिले ।।६।।**
**ज्ञानदेव म्हणे ऐक मुक्ताबाई । निवृत्तीचे पायी सर्व सुख ।।७।।**

अर्थ - या जगात जिवंतपणी निरुपाधिक समाधी घे, असे श्री ज्ञानेश्वरमहाराज श्रीमुक्ताबाईंना सांगतात. ।।१।। आठवे अंग समाधी तुला प्राप्त झाल्याने, आता आणि कशाचे कारण नाही. ।।२।। हेच गुह्यज्ञान आदिनाथांनी पार्वतीला दिले, तेच



मच्छिंद्रना प्राप्त झाले. ।।३।। मच्छिंद्रांनी गोरक्षांना, त्यांनी चौरंगीना, चौरंगीनी भर्तरींना व त्यांनी गैनीनाथांना हा उपदेश केला. ।।४-५।। बापरखुमादेवीवरांचे पुत्र दयाळू श्रीनिवृत्तिनाथ यांना गैनीनाथांचा उपदेश असून, त्यांनी आपल्याला उध्दरिले. ।।६।। अशा निवृत्तीनाथांचे पायीच सर्व सुख आहे, हे तू ऐक, असे श्रीज्ञानेश्वरमहाराज श्रीमुक्ताबाईंना म्हणतात. ।।७।।

## (१८)

**हेची गुह्य ज्ञान नामदेवा लाधले । कबीराने कथिले चार युगी ।।१।।**
**तेची गुह्य गोष्टी सांगितली तुज । विश्वासाचे बीज विटेवरी ।।२।।**
**गुरुपुत्र जाणती योगी सदा ध्याती । शिवादिक जपती हेची ध्यान ।।३।।**
**अठरा अभंगांची करोनी सनद । ठेवावी निबंध आपणापाशी ।।४।।**
**याचेपुढे ज्ञान सांगती पारवाड । जळो बाई तोंड काळे त्यांचे ।।५।।**
**अंतकाळसमयी तीन दिवस उपोषण । सायुज्यता जाण मुक्ती होय ।।६।।**
**आता हेची गोष्टी न करी प्रगट । ठेवावी हे गुप्त आपणापाशी ।।७।।**
**प्रगट करिता होय मात्रा गमन । ज्ञानदेव म्हणे आण निवृत्तीची ।।८।।**

अर्थ - हेच गौप्य नामदेवांना लाधले असून, कबीरांनी चार युगात सांगितले. ।।१।। तेच गुज तुला सांगितले असून, हा जो विश्वास त्याचे बीज विटेवर उभे आहे. ।।२।। गुरुपुत्र हे जाणतात, योगी याचेच (विटेवरच्या रुपाचेच) ध्यान करतात, शंकरादी याचेच ध्यान करतात, जप करतात. ।।३।। अठरा अभंगाची ही तुला दिलेली सनद, याचे स्पष्टीकरण करुन आपणाजवळ ठेवावी. ।।४।। यापेक्षा कोणी ज्ञान सांगत असेल, तर तो पाखांड आहे. तसे सांगणाराचे काळे तोंड जळून जाऊ दे. ।।५।। अंतकाळी तीन दिवस उपोषण झाले तर सायुज्यता-जी मूळची अवस्था आहे, ती प्राप्त होते. ।।६।। पण हे प्रगट न करता आपल्या जवळच गुप्त ठेव. ।।७।। प्रगट केल्यास मात्रागमनाचे पाप लागेल, अशी श्रीनिवृत्तिनाथांची शपथ घालून सांगतो, असे श्रीज्ञानेश्वरमहाराज श्रीमुक्ताबाईंना म्हणतात. ।।८।।

*****

# प्रकरण – ८

श्रीदासराममहाराज कृत

## श्रीज्ञानेश्वर स्तोत्र

**प्रस्तावना :**

श्रीदासराममहाराज यांनी श्रीज्ञानेश्वरमहाराजांची स्तुती वर्णन करणारे ४६ ओव्यांचे 'श्रीज्ञानेश्वरस्तोत्र' दासराम लेखन वही क्र.५० व ७८ पान क्र.८३-८८ मध्ये लिहिले आहे.

प्रथम दासराममहाराज यांनी हे स्तोत्र ४२ ओव्यात गुंफले होते. पण पुढे असे घडले की, हे ४२ ओव्यांचे स्तोत्र लिहून झाले आणि ज्ञानाईने नवल करून, अप्पाचेवाडीहून भीमाशंकर आले व त्यांनी श्रीदासराममहाराज यांना प्रसाद भंडारा दिला. श्रीदासराममहाराजांना खूप आनंद झाला व त्यांना रेवणसिद्धादि परंपरेचे स्मरण झाले. याचे सारे वर्णन श्रीदासराममहाराज यांनी पुढे ४३ ते ४६ ओव्यात केले आहे. व त्यामुळे हे श्रीज्ञानेश्वरस्तोत्र ४६ ओव्यांचे झाले. ते या प्रकरणात प्रस्तुत केले आहे. हे स्तोत्र श्रीज्ञानेश्वरमहाराज जन्मसप्तशताब्दी वर्षात लिहून झाले. डॉ. के. वा. आपटे यांनी यापूर्वी 'श्रीज्ञानेश्वरस्तोत्र' या प्रकरणावर थोडक्यात प्रस्तावना लिहिली होती ती खाली देत आहे. श्रीज्ञानेश्वर जन्मसप्तशताब्दीनिमित्त श्रीज्ञानेश्वरमहाराजांची सेवा म्हणून श्रीदासराममहाराजांनी 'श्रीज्ञानेश्वरस्तोत्र' रचले आहे. या स्तोत्रात निरनिराळ्या प्रकारांनी श्रीज्ञानदेवांचे महत्व, त्यांचे मोठेपण व्यक्त केले आहे. दासराममहाराज म्हणतात, ''श्रीज्ञानदेव हे उदार, करुणाकर, विश्वोद्धारक, आत्मज्ञानाचा सागर आणि अनाथांचे नाथ असून, ते संकटकाळी भक्तजनांचे रक्षण करतात.'' ''पांडुरंगाचा अवतार| सखा एक ज्ञानेश्वर । का ज्ञानियाचा अवतार । पांडुरंग ।|'' या ओवीमध्ये त्यांचे सर्वश्रेष्ठत्व प्रगट झाले आहे. दासराममहाराज या स्तोत्रपठणाची फलश्रुती सांगतात ती अशी आहे, ''ऐसे श्रीज्ञानेश्वर स्तोत्र । जो नित्य वाची तो पवित्र । आणि इह परत्र । सुख पावे।।''



## श्रीज्ञानेश्वर स्तोत्र

ॐ नमो श्री ज्ञानेश्वरा । करूणाकरा उदारा । दृश्यपार अपारा । दयार्णवा।।१।। जय जयाजी मनोहरा । विश्वदीपक विश्वोद्धारा । त्रिभुवन सुंदरा । परिपूर्णा ।।२।। संजीवन समाधि । निर्विकल्प सिद्धि । निर्विकार आत्मबुद्धि । सहज सिद्ध ।।३।। सिद्धराज सिद्धेश्वरा । दया क्षमा शांतिपरा । आत्मज्ञान सागरा। आत्मरुपा ।।४।। कळस नाथपंथाचा । पाया भागवत धर्माचा । मुगुट शिवपीठाचा । अनादि जो ।।५।। सर्व आनंदलहरी । प्रगटली अलंकापुरी। विलसली चराचरी । श्रीमूर्ति हे ।।६।। संसार सुखाचा करीन । हे प्रतिज्ञा-वचन । प्रगट ते गुह्य करून । गुह्य प्रगटे ।।७।। देवा तू सच्चिद्घन । सर्वव्यापी जे ज्ञान । काय ज्ञाना म्हणून । गौरविती ।।८।। विश्वतारक ज्ञानी । आत्मज्ञानू खाणी । धन्यचि ज्ञानाग्रणी । ज्ञानराज ।।९।। कैवल्याचा पुतळा। हा विष्णूचि आगळा । श्रेष्ठ अवतार लीळा । सगुण ब्रह्म ।।१०।। बाप रखुमा देवीवरा । सर्व जीवांचा आसरा । निवृत्ति सोयरा । सद्गुरु ज्या ।।११।। घाली मुक्तीची गवादी । मेळवी वैष्णव मांदी । साधुसंत पदी । सेविती ज्या।।१२।। अनाथांच्या नाथा । धन्य धन्य ज्ञाननाथा । आपदी रक्षिता । भक्तजना।।१३।। आत्मा श्रीविठ्ठलाचा । देह विठ्ठल जयाचा । प्राणसखा ब्रह्माचा । गौरवु हा।।१४।। देव भेटाया उल्लासे । तेहत्तीस कोटी जळी मासे । उच्छिष्टासी पिसे । देवादिक ।।१५।। साधकांचा शिरोमणी । पूज्य जगा वंद्य स्थानी । सत् चिंतनी चिंतामणी । कल्पतरू ।।१६।। चैतन्याचा जिव्हाळा । चैतन्य दावी लीळा । काय वानू गोपाळा । गोविंदासी ।।१७।। सुवर्ण पिंपळ भारी । सदैव डोले जे दूवारी । तयालागी सरी । कोणती ते ।।१८।। रेडा बोले भिंत चाले । ज्ञानदेवे नवल केले । चांगयासी केले । चांगयाची ।।१९।। खेचरी मुद्रा देऊन । खेचर करी जो आपण । सत् चिदानंदा प्राण । जेणे दिला ।।२०।। निवृत्ति अपार । ज्ञानामृत सरोवर । सोपानेचि सुरवर । सेवित मुक्ती ।।२१।। स्तविला नाही ज्ञानदेव । ऐसा नाही महानुभाव । स्वयं ब्रह्म देवदेव । ज्ञानराजे ।।२२।। ज्ञानियांचा सम्राट । उभे केले वैकुंठपीठ । जगा दावी हरिपाठ । स्वयं कृती।।२३।। भागवत धर्म । तोचि एक विश्वधर्म । दृश्य मनोरम । दावियेले ।।२४।। नाही

जात नाही गोत । नाही मत नाही पंथ । जगा देई हात । माऊली जे ।।२५।। सुरवर गर्जत । ज्ञानाई ज्ञानाई म्हणत । नामदेव एकनाथ । तुकाराम गौरविती।।२६।। कृष्ण विष्णु हरि गोविंद । या नामाचे प्रबंध । माजी आत्मचर्चा विशद । केली जेणे ।।२७।। ऐसी श्रेष्ठ ज्ञानदेवी । ज्ञानेश्वरी गुज दावी । भावार्थदीपिका ठावी । जया कृपे ।।२८।। गीताकार भाष्यकार । भाष्यकार गीताकार । कोण कुणाचा अवतार । सांगा तरी ।।२९।। पांडुरंगाचा अवतार। सखा एक ज्ञानेश्वर । का ज्ञानियाचा अवतार । पांडुरंग ।।३०।। कैवल्यसुखाची रासी । संतजनांची मिरासी । विश्रांती जीवासी । जीवन जे ।।३१।। विज्ञान-खूण । ऐसे जे गुण। जयाचे दर्शन । महालाभ ।।३२।। कृष्ण विष्णू हरि गोपाळ। वैकुंठीचा मार्ग प्रांजळ । उभविला सोज्वळ । मंत्रमय ।।३३।। ऐसे श्री ज्ञानेश्वर स्तोत्र । जो नित्य वाची तो पवित्र । आणि इह परत्र । सुख पावे।।३४।। संशयात्मा विनश्यति । ही तो भगवंताची उक्ती । संत सज्जन मात्र घेती । प्रचीत हे ।।३५।। श्री ज्ञानेश कृपाहस्त । जयां लाधे तो कृतार्थ। मनी जे ईप्सित । पुरे त्यांचे ।।३६।। ज्ञानराजा ऐसा सखा । जया होय पाठीराखा। तयासी लौकिका । काय चाड ।।३७।। ज्ञानेश्वर नाम गोड । पुरे भक्तांचे कोड। जेणे उकले गूढ । विश्वाचेही ।।३८।। ज्ञानेश्वर ज्ञानेश्वर । माऊली श्री ज्ञानेश्वर । ऐसा करू गजर । पुनःपुनः ।।३९।। श्रीज्ञानेश्वर माऊली । नमन तियेचे पाऊली । दीन जनांची साऊली । धावे भक्ता।।४०।। गोविंदा जे पावली । म्हणोनि ते आम्हाजवळी । प्रेमे भजनी गाइली । नित्य नेमे ।।४१।। हे स्तोत्र लिहून झाले । तो ज्ञानाईने नवल केले । आप्पाचे वाडीहून आले । भीमाशंकर ।।४२।। त्यांनी हाती भंडारा दिला । मला आनंद जाहला । रेवणसिद्ध वोळला । इये मनी ।।४३।। आदिनाथ मच्छिंद्रनाथ । गोरक्ष गहिनी निवृत्तिनाथ । श्री ज्ञाननाथ स्मरणी संथ । वृत्ती कैसी ।।४४।। भगवान् श्रीगुरुलिंगजंगम । साधु राम हनुमंत परम । स्मरोनिया दासराम । निवांत ठेला ।।४५।। ज्ञानेशजन्मसप्तशताब्दि । स्मरण चाले कृपानिधी । गोविंदसुत राम वंदी । अखंडित ।।४६।।

*****



## प्रकरण - ९

श्रीदासराममहाराजकृत समओवी टीकेसह

# श्री सद्‌गुरूस्तवन

**प्रस्तावना :**

श्रीज्ञानदेवकृत 'अनुभवामृत' या ग्रंथात दहा प्रकरणे आहेत. त्यातील दुसरे प्रकरण 'श्रीगुरुस्तवन कथन' असून त्यात मूळ ओव्या ८० व त्यास श्रीदासराममहाराजकृत समओवी टीका आहे. परंतु दासराम लेखनवही क्र.११४ मध्ये 'श्रीसद्‌गुरुस्तवन' या शीर्षकाखाली वरील ८० ओव्यांपैकी निवडक १५ ओव्या घेऊन, त्यावर समओवी टीका लिहिली आहे. यातील टीकेच्या ओव्या अनुभवामृत ग्रंथातील टीकेच्या ओव्यांपेक्षा भिन्न आहेत. त्यामुळे याचा समावेश प्रस्तुत ग्रंथात केला आहे.

प्रारंभीच श्रीज्ञानदेवांनी आपले सद्गुरु श्रीनिवृत्तीनाथ यांना वंदन केले आहे व पुढील ओव्यांमधून त्यांचे स्तवन केले आहे. स्वयंप्रकाश, निरुपाधिक आणि शब्द, अनुमान अशा कोणत्याही प्रमाणाने श्रीसद्गुरूंचे वर्णन होऊ शकत नाही. सद्गुरुंचे स्वरूप वर्णनातीत आहे. त्यांच्याचकृपेने गुरुस्थानी गेले असता मोक्ष जीवनाची प्राप्ती होते. अशा अनेकप्रकारांनी या ओव्यांमधून सद्गुरुस्तवन केले आहे.

**आता उपाय वनवसंतु। जो आज्ञेचा आहेव तंतु।**
**अमूर्तचि परिमूर्तु । कारूण्याचा ।।१।। (मूळ)**

टीका - आत्मवनी वसंतु । ब्रह्मविद्ये शोभिवंतु ।
निराकार करूणे होतु । सगुण जो ।।१।।

**मोडौनि माया कुंजरू । मुक्त मोतीयाचा वोगरू।**
**जेवविता सद्‌गुरू । निवृत्तिवंदू ।।२।। (मूळ)**

टीका - नासोनि माया हत्ती गंडस्थळीचे मोती ।
निवृत्तीनाथ भोजन देती । तया नमन ।।२।।

**जयाचेनि अपांग पाते । बंधमोक्षपणी आते।**
**भेटे जाणतया जाणते । जयापाशी ।।३।। (मूळ)**

टीका - जया अर्धोन्मिलीत नयनी । बंधची मोक्षजीवनी ।
जाणतया गुरुस्थानी । प्राप्त होय।।३।।

**कैवल्य कनकाचिया दाना । जो न कडसी थोरसाना।**
**द्रृष्ट्याचिया दर्शना । पाढाऊ जो ।।४।। (मूळ)**

टीका - मोक्ष सुवर्णदान । तेथ ना थोर सान ।
सद्गुरू नुरवी दर्शन । द्रष्टेपण ।।४।।

**सामर्थ्याचेनि विके। जो शिवाचेही गुरुत्व जिंके ।**
**आत्मा आत्मसुख देखे । आरिसा येथे ।।५।। (मूळ)**

टीका - ऐसीया शक्तीवरी । जो जिंके शिवाची थोरी ।
स्वरूप पहाया तरी । दर्पणगुरू ।।५।।

**बोध चंद्राचिया कळा । विखुरलिया येकवळा ।**
**कृपा पुनवी लीला । करी जयाची ।।६।। (मूळ)**

पूर्ण बोध चंद्रकला । प्रसृत ज्या सकळा ।
गुरुकृपे सोज्वळा । एक होती ।।६।।

**जो भेटलियाची सवे । पुरती उपायांचे धावे ।**
**प्रवृत्तिगंगा स्थिरावे । सागरी येथे ।।७।। (मूळ)**

टीका - होता गुरूदर्शन । उपाय नुरे आपण ।
जेथ प्रवृत्ती साधन । स्थिर होये ।।७।।

**जयाचेनि कृपा सलिले। जीऊ हा ठाववरी पाखाळे।**
**जे शिवपणही नोविळे। अंगी तलवी ।।८।। (मूळ)**

टीका - गुरुकृपा उदके । जीव शुद्ध निके ।
शीवत्व जै आपेक्षे । न लगे अंगा ।।८।।

**एकपण नव्हे सुसास । म्हणोनि गुरुशिष्याचे करूनि मिस।**
**पाहणेचि आपली वास। पहातसे ।।९।। (मूळ)**

टीका - एकत्वी न सुख । तरी गुरुशिष्य मिरव ।
दो ठायी सम्यक । पहाती जे ।।९।।

**जो उघडकी न दिसे । प्रकाश की न प्रकाशे ।**
**असतेपणीच नसे। कव्हणीकडे ।।१०।। (मूळ)**

टीका - सद्गुरू निरुपाधी न दिसे । स्वयंप्रकाश परि न भासे ।
सर्वाठायी वसे । परि न कोठे ।।१०।।

**आता जो तो इहि शब्दी। के मिळवू अनुमानाचि मांदी।**
**हा प्रमाणाही वो नेदी । कोण्हाही या ।।११।। (मूळ)**

टीका - शब्दाचा विषय । न होती गुरुराय ।
तेथे अनुमान काय। सांगा मज ।।११।।

**जेथ शब्दाची लिही पुसे । तेणेसी चावळो बैसे।**
**दुजयाच्या रागी रुसे । एकपणा जो ।।१२।। (मूळ)**

टीका - जै शब्द मावळे । तरी चैतन्य खेळे ।
दुचियांचेनि निखळे । एकत्व न चले ।।१२।।

**प्रमाणांची परीसरे । तै प्रमेयचि अविष्कारे ।**
**नवल मेचु मे धुरे । नाहीपणाची ।।१३।। (मूळ)**

टीका - प्रमाणांची संपे परी । प्रमेय गुरू अविष्कारी।
नाहीपणाची थोरी । नवल हे ।।१।।

**तेथ नमने का बोले । केऊती सूये पाऊले ।**
**आंगी लाऊनी नाडिले । नावचि येणे।।१४।। (मूळ)**

टीका - सद्गुरू तरी अंगी । नावही न घेती जगी।
न मने पाऊल उगी । केवी घालू ।।१४।।

**दर्पणेवीण डोळा । आपुले भेटीचा सोहळा।**
**भोगिता तरी लीळा । सांगतो हे ।।१५।। (मूळ)**

टीका - लोचनावाचून । कैचे ते दर्शन ।
भोगीतया आपण । सांगतसे ।।१५।।

श्रीदासराममहाराज ले.व.क्र.११४

*****

# प्रकरण –१०

श्रीदासराममहाराजकृत

## श्री ज्ञानदेव–आज्ञापत्र व भावार्थ

**प्रस्तावना :**

श्रीचांगदेवमहाराजांच्या कोऱ्या पत्रास उत्तर म्हणून श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी 'चांगदेवपासष्टी' हा ग्रंथ रचना अशी प्रसिद्धी आहे. त्याचप्रमाणे पुनर्जीवित केलेल्या सच्चिदानंदबाबांकडून ज्ञानेश्वरी लिहून घेण्यास एक पत्र लिहिले अशी आख्यायिका आहे. हे पत्र म्हणजेच 'श्रीज्ञानदेव आज्ञापत्र' होय. या आज्ञापत्रातील भावार्थ असा आहे :- सद्गुरु श्रीनिवृत्तीनाथांच्या कृपेने श्रीज्ञानेश्वरमहाराजांना सच्चिदानंदब्रह्माचा साक्षात्कार झाला. श्रीज्ञानदेवांच्या ज्ञानेश्वरीमध्ये चिदाक्षरच शब्दरुपाने प्रगट झाले आहे. अशी ही ज्ञानेश्वरी लिहून घेण्यास ज्ञानेश्वरमहाराजांनी सच्चिदानंदबाबांना आज्ञा केली. ''भावार्थ दीपिका शुद्ध । आवृत्ती करी ।।'' या ज्ञानदेव आज्ञापत्राचा भावार्थ सोप्या भाषेत श्रीदासराममहाराजांनी प्रगट केला आहे आणि मग सच्चिदानंदबाबांचे लेखन पाहून, 'संतोषले श्रीज्ञानराज' असा समारोप श्रीदासराममहाराजांनी केला आहे.

नातरी सच्चिदानंदु । इये पदे ती अभेदु ।जई ठायी भेदु । नोहेचि की ।।१।। विरिंचिया जे आस्पद । ते जालेगा स्पृहास्पद । तऱ्ही तेथेचिया शंकास्पद । होतुसी की ।।२।। हे आघवे चराचरू । कोंदुनि ठेले क्षराक्षरू । जीव शिव परात्परू । परब्रह्मी ।।३।। चिदचिद् इया ग्रंथी । भेदिली जैं हृदयी युक्ती । तेचि ते पावती । ऐसिया पदी ।।४।। रहाटे जी पवनु । उपाधी आतु आत्मपणु। ते ठायी लाविलिया पणु । चित्तैक्येचि ।।५।। हा चिदक्षरेचि घेयावा । म्हणौनि काढितु मागोवा । नातरी उपरी पस्तावा । आथीच की ।।६।। चिदक्षरे अक्षरासी । मिळणी होतु जीवासी । जीवभावे शिवा आपैसी । देहांती गाठी ।।७।। चिदक्षरे जोडिले अक्षरु । तो हाथी अमृतसारु । जेणे होय परपारु । भवाब्धिये ।।८।। श्री सद्गुरु निवृत्तीनाथु । मस्तकी पद्मकर जैं ठातु। चौदेहा पैलाडु निवांतु । होआवे जी ।।९।। तेथ करोनि पैठा । आणिले जगाचिया पेठा । तेणे केला दिवटा । उजिडाविया ।।१०।। जे असे चिदक्षरी । तेचि आले सोहंकारी । भावार्थ दीपिका अंतरी । ओतिली शब्दे ।।११।। ते तुवा आणिले साकारी । लेखनसाहित्य संभारी । इये गुढी उभारी । विश्वशांति।।१२।। तैंच तू सच्चिदानंद । पावसी झणी ते पद । भावार्थदीपिका शुद्ध । आवृत्ती करी ।।१३।। चिद्‌विलासु लहरी । उमटलिया आतवरी । तेचि हृदयी पा कोरी । लिहौनि भक्ती ।।१४।। ऐसा सच्चिदानंदु भावो । साकार होवोनि सावेवो । भावार्थदीपिका नवलावो । प्रगट कीजे ।।१५।। प्रत्यक्षोचि अभिप्रावो । साक्षात उदेला भावो । जेणे योगे ज्ञानदेवो । सुखिया झाला।।१६।।
।।इति श्री ज्ञानदेव - आज्ञापत्र संपूर्ण ।।

**श्रीदासराममहाराज कृत श्रीज्ञानदेव - आज्ञापत्र - भावार्थ**

अस्तित्व चंचळ आनंद । ही तीन पदे प्रसिद्ध । ऐसा परमात्मा अभेद । आहेच जो ।।१।। ब्रह्मादिकांनी इच्छा करावी । तेचि इच्छा झाली जीवी । तेथ शंका का यावी । तुझ्या नामे ।।२।।

हे सारे दृश्यादृश्य । भरले विनाश अविनाश । जीव शिव तरंग प्रत्यक्ष । परब्रह्मी ।।३।। जडाजडाची गाठी । सोडविली हृदयी दिठी । तेचि ते संपुटी । पदिया येती ।।४।। अंतरी वारा जो वाहे । शरीरात आत्मत्वे प्रवाहे । देहनिरासे ये ठाये । निश्चयेसी चित्ताने ।।५।। हा स्फुरद्रूप जाणावा । यासाठी माग घ्यावा । नाही तरी गोवा । पुढे आहे ।।६।। तया स्फुरद्रूप नादासी । जीव मिळोनी जाय परियेसी । जीवभावे शिवासी । देह विसरे गाठी ते ।।७।। स्फुरद्रूपे अविनाश । हाती अमृत ये सुरस । भवाब्धीचे परतीरास । येसी जेणे।।८।। श्रीसद्गुरु श्रीनिवृत्ति । मस्तकावरी हात ठेविती । चार देहाआत विश्रांति । प्राप्त होये ।।९।। तये ठायी बसवोनि । जगाचे बाजारी आणिले त्यांनी । प्रगटला दिनमणि । दावावया वाट ते ।।१०।। स्फुरद्रूप सोहंकार । तेचि भावार्थदीपिका सुंदर । शब्दामाजी अंतर । व्यक्त केले ।।११।। ते तू साकार करी । लेखनसाहित्य घेवोनि करी । झेंडा भक्तीचा उभारी ।

शांतिसुखा।।१२।। जो तू नावाचा सच्चिदानंद । ते तू खरेचि पावसी पद । भावार्थदीपिका मुळीच शुद्ध । करी आवृत्ति तयाची ।।१३।। जग हे चैतन्याच्या लहरी । उमटती आत बाहेरी । तेंचि हृदयी कोरी । आणि लिही भक्तीने ।।१४।। मग तो सच्चिदानंदभाव । झाला पुन: सावयव । भावार्थदीपिका हा नवलाव । प्रगटवी म्हणती श्रीज्ञानेश्वर ।।१५।। प्रत्यक्षास काय अनमान । साक्षात जो भावपूर्ण । पहाताचि सुंदर लेखन । संतोषले श्री ज्ञानराज ।।१६।।
।। इति श्रीदासराममहाराज कृत श्री ज्ञानदेव - आज्ञापत्र-भावार्थ संपूर्ण ।।

दासराममहाराज लेखन वही क्र.१५१

*****



## प्रकरण -११

श्रीदासराममहाराजकृत भावार्थासह

# श्रीमुक्ताबाईंचे ताटीचे अभंग

**प्रस्तावना :**

या प्रकरणात श्रीदासराममहाराज यांनी मुक्ताबाई यांच्या ताटीच्या ११ अभंगांचा गद्य भावार्थ, दासराम लेखनवही क्र.८५ पान क्र.४७ ते ५५ व वही क्र.१२४ मध्ये लिहिला आहे.

डॉ. के. वा. आपटे यांनी यापूर्वी 'मुक्ताबाईकृत ताटीचे अभंग' या प्रकरणावर थोडक्यात प्रस्तावना लिहिली होती ती खाली देत आहे.

एकदा श्रीज्ञानदेव जनपीडेने उद्विग्न होऊन रुसून एका खोलीत दार लाऊन बसले. अशावेळी श्रीज्ञानदेवांनी दार उघडावे, अशा अर्थाचे काही अभंग मुक्ताबाईने रचले. ते अभंग 'ताटीचे अभंग' म्हणून प्रसिद्ध आहेत. श्रीदासराममहाराजांनी या मूळ ११ अभंगांचा गद्य भावार्थ लिहिला आहे. आत्तापर्यंत अप्रकाशित असलेला हा गद्य भावार्थ येथे दिलेला आहे. मुक्ताबाईंचे ताटीचे अभंग हे श्रीज्ञानेश्वरमहाराजांशी निगडीत असल्याने, या ज्ञानदेवांच्या प्रकरणग्रंथामध्ये त्याचा समावेश केला आहे.

**(१)**

**योगी पावन मनाचा ।। साही अपराध जनांचा ।।१।।**
**विश्व जहालीया वन्ही ।। संत मुखे व्हावे पाणी ।।२।।**
**शब्दशस्त्रे झाले क्लेश ।। संती मानावा उपदेश ।।३।।**
**विश्व परब्रह्म दोरा ।। ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।४।।**

**अर्थ :** पवित्र मनाचा तोच योगी असून जो जगाचे अन्याय सहन करतो।।१।। सारे विश्व जरी वडवानळ झाले तरी तेथे संतानी आपल्या मुखाने पाणीच व्हावे आणि ती आग विझवून टाकावी ।।२।। दुर्जनांचे शब्दशस्त्राने जरी

व्यथा झाली तरी संतानी तो उपदेशच मानावा ।।३।। विश्वरूपी वस्त्रात ब्रम्हाचाच दोरा आहे म्हणून हे ज्ञानेश्वरा, तुम्ही दरवाजा उघडा ।।४।।

**(२)**

**सुखसागरी वास केला ।। ऊंच नीच नाही त्याला ।।१।।**
**आपण जैसे व्हावे ।। देवे तैसेची करावे ।।२।।**
**ऐसा नटनाट्य खेळ ।। स्थिर नाही एक वेळ ।।३।।**
**एकापासुनी अनेक झाले ।। त्यासी पाहिजे सांभाळिले ।।४।।**
**शुन्य साक्षित्वे समजावे ।। वेद ओंकाराच्या नावे ।।५।।**
**एके आपण केले ।। एक अभिमाने गेले ।।६।।**
**इतुके टाकुनि शांती धरा ।। ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।७।।**

**अर्थ :** सुखाचे सागरातच ज्याने आपले वास्तव्य केले आहे, त्याला उंच नीच हे काही रहातच नाही ।।१।। आपण जसे व्हावे तसेच देव करतो ।।२।। नटनाम परमात्म्याचे नाटकाचा हा असाच प्रयोग असून तो एकवेळही स्थीर नाही ।।३।। एकापासून हे अनेक झाले असून त्यालाच आधी सांभाळले पाहिजे ।।४।। ज्या शुन्यातून ही दुनिया झाली, ते साक्षीभूत असून एक ओंकारातच हे वेद समाविष्ट झालेले आहेत. ।।५।। एकाला वाटते हे सर्व आपणच केले आहे, तर एक नुसते अभिमानातच जातात ।।६।। या दृष्टीने या जगातील या सर्व गोष्टी सोडून आपण शांती धरा व हे ज्ञानेश्वरा दरवाजा उघडा. ।।७।।

**(३)**

**वरी भगवा झाला नामे ।। अंतरी वश केला कामे ।।१।।**
**त्याला म्हणू नये साधू ।। जगी विटंबना बाधू ।।२।।**
**आप आपणा शोधूनि घ्यावे ।। विवेक नांदे त्याच्या सवे ।।३।।**
**आशा दंभ अवघे सारा ।। ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।४।।**

**अर्थ :** वर नुसता पोशाखाने वेषाने भगवा झाला, पण आत मात्र नाना प्रकारच्या इच्छा राहिल्या आहेत, तेथे तो गुंतून राहिला. ।।१।। तर त्याला



साधू म्हणूच नये कारण या गोष्टी तेथे बाधक असून त्याची जगात विटंबना होते. ।।२।। आपण आपल्याला शोधून पाहिले तर त्या बरोबरच विवेक दृष्टी निर्माण होते. ।।३।। म्हणून हे सारे जगातील आशा, दंभ, वाद बाजुला ठेवून, हे ज्ञानेश्वरा, हा दरवाजा उघडा. ।।४।।

**(४)**

**संत तोचि जाणा जगी ।। दया क्षमा ज्याचे आंगी ।।१।।**
**लोभ अहंता नये मना ।। जगी विरक्त तो जाणा ।।२।।**
**इह परलोक सुखी ।। शुद्ध ज्ञान ज्याचे मुखी ।।३।।**
**मिथ्या कल्पना मागे सारा ।। ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।४।।**

**अर्थ :** ज्याचे ठिकाणी दया क्षमा हे गूण आहेत तोच या जगात संत म्हणवून घेण्यास पात्र आहे ।।१।। ज्याचे मनात लोभ आणि अहंकार नाही, तोच या जगात खरा विरक्त आहे. ।।२।। ज्याचे मुखात शुद्ध ज्ञान आहे तोच इह परत्र सुखी होतो ।।३।। म्हणून उगीच जगाबद्दल काही कल्पना न करता, हे ज्ञानेश्वरा, तुम्ही दरवाजा उघडा. ।।४।।

**(५)**

**एक आपण साधु झाले ।। येर कोण वाया गेले ।।१।।**
**उठे विकार नाही मुळ ।। अवघे मायेचे गा बाळ ।।२।।**
**माया नुरे जेव्हा ।। विश्व ब्रम्ह होईल तेव्हा ।।३।।**
**ऐसा उमज आदी अंती ।। मग सुखी व्हावे संती ।।४।।**
**चिंता क्रोध मागे सारा ।। ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।५।।**

**अर्थ :** एक मात्र साधू झाले व दुसरे कोण काय वाया गेले ।।१।। जेथे विकार नाही तेथेच मूळ असून, विकारलेले हे सारे मायेपोटीच जन्माला आलेले बाळ आहे. ।।२।। ही माया जेव्हा उरत नाही तेव्हाच हे विश्व ब्रह्म होईल. ।।३।। हा अनुभव जे आदी अंती घेतात तेच संत सुखी होतात. ।।४।। म्हणून चिंता आणि राग यांनी युक्त अशा या जगास मागे सारून, हे ज्ञानेश्वरा, दरवाजा उघडा. ।।५।।

**(६)**

**ब्रह्म जैसे तैशा परी ।। आम्हा वडील भूते सारी ।।१।।**
**हात आपुला आपणा लागे ।। त्याचा करू नये खेद ।।२।।**
**जीभ दातानी चाविली ।। कोणे बत्तीशी पाडिली ।।३।।**
**थोर दुखावले मन ।। पुढे उदंड शहाणे ।।४।।**
**चणे खावे लोखंडाचे ।। मग ब्रह्म पदी नाचे ।।५।।**
**मन मारुनी उन्मन करा ।। ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।६।।**

**अर्थ** : ब्रह्म हे जसे तसेच असून ही सर्व भूतसृष्टी आम्हाला पितृस्थानीच आहे.।।१।।आपलाच हात आपल्याला लागला तर त्याचा खेद तो कसला? ।।२।। आपल्या दातांनी आपली जीभ चावली गेली, तर कोण हे बत्तीस दातच पाडेल काय? ।।३।। मन हे फार मोठे दुखावले गेले तर त्यातूनच मनुष्य पुढे ज्ञानी होतो. ।।४।। लोखंडाचे चणे खावे तेव्हाच जीव ब्रह्मपदी नाचतो ।।५।। मन हे लयाला गेले तर त्याचे उन्मन होते, म्हणून श्रीज्ञानराज तुम्ही दरवाजा उघडा ।।६।।

**(७)**

**सुखसागर आपण व्हावे ।। जग बोधे निववावे ।।१।।**
**बोधा करू नये अंतर ।। साधू नाही आपपर ।।२।।**
**जीव शिवासी पै द्यावा ।। मग करु नये हेवा ।।३।।**
**तरूणोपाय चित्ती धरा ।। ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।४।।**

**अर्थ** : आपणच सुखसागर होऊन जग हे आपल्या बोधानेच शांत करावे. ।।१।। साधुजवळ आपपर भाव नसल्याने बोधामध्ये अंतर पाडू नये. ।।२।। जीव हा शिवालाच देऊन जो शिवरूप झाल्याने मग कोणाचा हेवा करणेचे प्रयोजनच नाही. ।।३।। सर्व जीवांचा तरणोपाय चित्तात घेऊन, हे ज्ञानेश्वरा, दरवाजा उघडा. ।।४।।

**(८)**

**क्रोध यावा कोठे ।। अवघे ब्रह्मची निघोट ।।१।।**
**ऐसे कळले उत्तम ।। जनी तोची जनार्दन ।।२।।**
**ब्रीद बांधील चरणी ।। नवे दाविता करणी ।।३।।**
**वेल क्रोधाचा उगवला ।। अवघा योग फोल झाला ।।४।।**
**ऐसी थोर दृष्टी धरा ।। ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।५।।**

**अर्थ** : सर्वच जर शुद्ध ब्रह्म आहे तर रागावणे तरी कुणावर? तो यावा असे स्थान तरी कुठे आहे? ।।१।। जनामध्ये तो जनार्दनच भरला आहे, हे कळले हे उत्तमच झाले. ।।२।। जगाला काही नवीन दाखवले तर काही केले असे होईल आणि एक मोठे ब्रीद आपण सांभाळले असे होईल. ।।३।। रागाचीच जर वेळ आली तर हा योगही मग फुकटच गेला ।।४।। या थोर दृष्टीने हे ज्ञानेश्वरा, हा दरवाजा उघडा. ।।५।।

**(९)**

**सांडी कल्पना उपाधी ।। तीच साधूला समाधी ।।१।।**
**वाद घालावा कवणाला ।। अवघा द्वैताचा हो घाला ।।२।।**
**पुढे उमजेना काय ।। उडत्याचे खाली पाय ।।३।।**
**एक मन चेष्टा करी ।। भूते बापडी शेजारी ।।४।।**
**अवघी ईश्वराची करणी ।। काय नेले केले कुणी ।।५।।**
**पुनः शुद्ध मार्ग धरा ।। ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।६।।**

**अर्थ** : कल्पनेची उपाधी जर लयाला गेली तर तीच साधूची समाधी आहे. ।।१।। सारेच जर द्वैत माजले आहे तर वाद तरी कोणाबरोबर करावा? ।।२।। वर उडणाऱ्याचे पाय खाली असल्याने पुढे काय आहे हे समजत नाही. ।।३।। सभोवती सारी जर सृष्टीच आहे, आणि हालचाल काय, ती एक मनाचीच आहे. ।।४।। सर्व काही ईश्वराची सत्ता असून हे केले तरी कुणी आणि नेणारे तरी कोण? ।।५।। म्हणून हा पुनःविचार केला तर जो शुद्ध मार्ग आहे तोच जगाला दाखवून, हे ज्ञानेश्वरा, दरवाजा उघडा. ।।६।।

**(१०)**

**गिरी गव्हारे कशासाठी ।। रागे पुरविला पाठी ।।१।।**
**ऐसा नसावा संन्याशी ।। परमार्थाचा जो का द्वेषी ।।२।।**
**घर बांधिले डोंगरी ।। विषया हिंडे दारोदारी ।।३।।**

**काय केला योग धर्म ।। नाही अंतरी निष्काम ।।४।।**
**गंगाजळ हृदय करा ।। ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।५।।**

**अर्थ :** रागानेच जर पाठपुरावा केला तर गिरी गव्हारे तरी कशासाठी? ।।१।। परमार्थाचा द्वेष करणारा संन्याशी तरी काय करावयाचा? ।।२।। डोंगरात घर बांधून विषया करता दारोदार हिंडण्यात तरी काय प्रयोजन आहे? ।।३।। आत जर निरिच्छता नसेल तर या योग धर्माचे तरी कारण काय? ।।४।। म्हणून आपण प्राणीमात्रांचे हृदय हे गंगाजळ करून, महाराज, आपण दरवाजा उघडा ।।५।।

**(११)**

**शुद्ध ज्याचा भाव झाला ।। देव दुरी नाही त्याला ।।१।।**
**अवघे साधने हातवटी ।। मोले मिळत नाही हाटी ।।२।।**
**आपण तैसे व्हावे ।। अवघे अनुमानुनी घ्यावे ।।३।।**
**ऐसे केले सद्गुरुनाथे ।। बापरखुमादेवीकांते ।।४।।**
**तेथे कोणी शिकवावे ।। सार साधुनिया घ्यावे ।।५।।**
**लडिवाळ मुक्ताबाई ।। बीज मुद्दल ठायी ठायी ।।६।।**
**तुम्ही तरोनि विश्व तारा ।। ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।७।।**

**अर्थ :** ज्याचा भाव शुद्ध आहे त्याला देव दूर नाही. ।।१।। अवघ्या कृतीची हातोटी बाजारातून मोल देवून विकत आणता येत नाही. ।।२।। आपणच तसे होऊन जगातील सर्व गोष्टींचा विचार तारतम्याने घ्यावयाचा आहे. ।।३।। बापरखुमादेवीवर श्री सद्गुरु श्रीज्ञानेश्वरमहाराज यांनीच ही अशी अवस्था मला प्राप्त करून दिली आहे. ।।४।। तेथे आता कोणी कोणाला सांगावे हा प्रश्नच आहे, यात जे ग्राह्य असलेले आपण जगाचे दृष्टीने विचारात घ्यावे ।।५।। ही मुक्ताबाई तुमची लाडकी असून, ब्रह्मबीज हेच भांडवल प्रत्येक ठिकाणी आहे. ।।६।। आपण आपल्यासकट सर्व जगालाच तारा अशी प्रार्थना आहे, म्हणून हे दादा श्रीज्ञानेश्वरा. हा दरवाजा उघडा. ।।७।।



प्रकरण १३ - अमृतानुभव - मंगलाचरणातील सहाव्या संस्कृत श्लोकावरील श्रीदासराममहाराजांची पद्य टीका.

श्रीदासराममहाराज यांनी मंगलाचरणाच्या श्लोकांवर 'अनुभवामृत' या प्रकाशित ग्रंथामध्ये परिशिष्ट या शीर्षकाखाली मंगलाचरणांच्या ६ श्लोकांवर विस्तृत ओवीबद्ध टीका लिहिली आहे. यापैकी - ''दिवि भूमौ तथाकाशे.....।।'' या सहाव्या श्लोकावर श्रीदासराममहाराज यांनी ६७ ओव्यांची टीका लिहिली आहे.

श्री. भैय्याकाका किबे कृत ज्योत्स्ना टीकेसह अनुभवामृत हा ग्रंथ, ह.भ.प.मामासाहेब दांडेकर यांच्या कृपेने, श्री.केंद्रे, प्रोफेसर, कोल्हापूर यांच्याकडून हा ग्रंथ श्रीदासराममहाराजांना प्राप्त झाला. या ग्रंथात / पोथीत ग्रंथारंभी षट्सूत्री दिली आहे. त्यातील वर दिलेला हा सहावा श्लोक आहे. या श्लोकावर श्रीदासराममहाराज यांनी दासराम लेखन वही क्र. १२४ मध्ये वर नमूद केलेल्या ६७ ओव्यांच्या टीकेपेक्षा वेगळ्यापद्धतीने ३६ ओव्यांची टीका लिहिली आहे. ती यापूर्वी अप्रकाशित असल्यामुळे येथे प्रस्तुत केली आहे.

डॉ. के. वा. आपटे यांनी यापूर्वी 'अमृतानुभव - मंगलाचरणातील सहाव्या संस्कृत श्लोकावरील श्रीदासराममहाराजांची पद्य टीका' या प्रकरणावर थोडक्यात प्रस्तावना लिहिली होती ती खाली देत आहे.

श्रीज्ञानदेवांच्या अमृतानुभवाच्या प्रारंभीच्या मंगलाचरणामध्ये पाच संस्कृत श्लोक आहेत. श्रीज्ञानेश्वरभक्त श्री. किबे यांच्याकडे असलेल्या अमृतानुभवाच्या प्रतीत, मंगलाचरणामध्ये पाच ऐवजी सहा श्लोक आहेत. हा सहावा श्लोक कोल्हापूर येथील प्रा. श्री.केंद्रे यांच्याकडून श्रीदासरामांना प्राप्त झाला. तो सहावा श्लोक असा आहे - ''दिवि भूमौ तथाकाशे बहिरनाश्चये विभुः। या विभात्यव भासात्मा तस्मै भानात्मने नमः।।'' आत्मा हा सर्वव्यापक आहे, हा या श्लोकाचा भावार्थ आहे. या श्लोकावरती श्रीदासराममहाराजांनी ३६ ओव्या लिहिल्या आहेत. त्या अप्रकाशित ओव्या खालीलप्रमाणे आहेत.

# प्रकरण - १२

## श्रीज्ञानेश्वरमहाराजकृत अमृतानुभव या ग्रंथातील ६व्या संस्कृत श्लोकावरील

### श्रीदासराममहाराजकृत पद्य टीका

**प्रस्तावना :**

श्रीदासराममहाराज यांनी मंगलाचरणाच्या श्लोकांवर 'अनुभवामृत' या प्रकाशित ग्रंथामध्ये परिशिष्ट या शीर्षकाखाली मंगलाचरणांच्या ६ श्लोकांवर विस्तृत ओवीबद्ध टीका लिहिली आहे. यापैकी - ''दिवि भूमौ तथाकाशे.....।।'' या सहाव्या श्लोकावर श्रीदासराममहाराज यांनी ६७ ओव्यांची टीका लिहिली आहे.

श्री. भैय्याकाका किबे कृत ज्योत्स्ना टीकेसह अनुभवामृत हा ग्रंथ, ह.भ.प.मामासाहेब दांडेकर यांच्या कृपेने, श्री.केंद्रे, प्रोफेसर, कोल्हापूर यांच्याकडून हा ग्रंथ श्रीदासराममहाराजांना प्राप्त झाला. या ग्रंथात / पोथीत ग्रंथारंभी षट्सूत्री दिली आहे. त्यातील वर दिलेला हा सहावा श्लोक आहे. या श्लोकावर श्रीदासराममहाराज यांनी दासराम लेखन वही क्र. १२४ मध्ये वर नमूद केलेल्या ६७ ओव्यांच्या टीकेपेक्षा वेगळ्यापद्धतीने ३६ ओव्यांची टीका लिहिली आहे. ती यापूर्वी अप्रकाशित असल्यामुळे येथे प्रस्तुत केली आहे.

डॉ. के. वा. आपटे यांनी यापूर्वी 'अमृतानुभव - मंगलाचरणातील सहाव्या संस्कृत श्लोकावरील श्रीदासराममहाराजांची पद्य टीका' या प्रकरणावर थोडक्यात प्रस्तावना लिहिली होती ती खाली देत आहे.

श्रीज्ञानदेवांच्या अमृतानुभवाच्या प्रारंभीच्या मंगलाचरणामध्ये पाच संस्कृत श्लोक आहेत. श्रीज्ञानेश्वरभक्त श्री. किबे यांच्याकडे असलेल्या अमृतानुभवाच्या प्रतीत, मंगलाचरणामध्ये पाच ऐवजी सहा श्लोक आहेत. हा सहावा श्लोक कोल्हापूर येथील प्रा. श्री.केंद्रे यांच्याकडून श्रीदासरामांना प्राप्त झाला. तो सहावा श्लोक असा आहे - ''दिवि भूमौ तथाकाशे बहिरनाश्रये विभुः। या विभात्यव भासात्मा तस्मै भानात्मने नमः।।'' आत्मा हा सर्वव्यापक आहे, हा या श्लोकाचा भावार्थ आहे. या श्लोकावरती श्रीदासराममहाराजांनी ३६ ओव्या लिहिल्या आहेत. त्या अप्रकाशित ओव्या खालीलप्रमाणे आहेत.

श्रीज्ञानेश्वरांच्या अमृतानुभवाच्या प्रारंभीच्या मंगलाचरणामध्ये पाच संस्कृत श्लोक आहेत. श्रीज्ञानेश्वरभक्त श्री. किबे यांच्याकडे असलेल्या अमृतानुभवाच्या प्रतीत, मंगलाचरणामध्ये पाच ऐवजी सहा श्लोक आहेत. हा श्लोक कोल्हापूर येथील प्राध्यापक श्री. केंद्रे, यांचेकडून श्रीदासरामांना प्राप्त झाला. तो सहावा श्लोक असा आहे.

**दिवी भूमौ तथाकाशे बहिरनाश्रमे विभुः ।**
**या विभात्यव भासात्मा तस्मै भानात्मने नमः ।।१।।**

आत्मा हा सर्वव्यापक आहे, हा या श्लोकाचा भावार्थ आहे. या श्लोकावरती श्रीदासराममहाराजांनी ३६ ओव्या लिहिलेल्या आहेत. त्या अप्रकाशित ओव्या खालीलप्रमाणे आहेत. सन २०१० मध्ये प्रकाशित झालेल्या ''अनुभवामृत समश्लोकी टीकेसह'' या ग्रंथाच्या परिशिष्टामध्ये, मंगलाचरणाच्या सहा श्लोकांवरती पद्य टीका लिहिलेली आहे. त्यातील सहाव्या श्लोकावरील टीकेमध्ये वरील छत्तीस ओव्यांपैकी काही ओव्या आलेल्या आहेत. परंतु तेथे असलेल्या अनेक वेगळ्या ओव्या वरील छत्तीस ओव्यांमध्ये अंतर्भूत आहेत. तसेच अखेरीस 'दासराम' ही मुद्रिका वापरली आहे. म्हणून छत्तीस ओव्यांची ही पद्यटीका येथे दिलेली आहे.

**दिवी भूमौ तथाकाशे बहिरनाश्रमे विभुः ।**
**या विभात्यव भासात्मा तस्मै भानात्मने नमः ।।१।।**

अमृतानुभव- भय्याकाका किबेकृत ज्योत्स्ना टीकेसह- ह.भ.प. मामासाहेब दांडेकर यांच्या कृपेने ही पोथी श्री. केंद्रे प्रोफेसर, कोल्हापूर यांना मिळाली. या पोथीत ग्रंथारंभी षट्सूत्री दिली आहे. त्यातील हा ६ वा श्लोक आहे. यावरील टीका -

भूमीपासोनी आकाशावरी । अंतर्बाह्य प्रकाशभारी । आत्मा भासे प्रकाश लहरी । सूक्ष्मरूप ।।१।। मीपणे भू होणे । स्फुरद्रुपी गगन जेणे ।। लहरीचिया पोकळपणे । शब्दरूप ।।२।। आत्मयाची केवल दृष्टी । जिया बिंदू पडे गाठी।। तया लहरी संपुटी । शुन्य होय ।।३।। ते जे शून्य लहरी। शीत उष्ण तेज कुसरी।। तया गर्भा माझारी । पोकळपण।।४।। नादरहित शब्दस्थिती । तेचि गगन ये निगुती ।। तया स्पंदनी निश्चिती। वायु उठे ।।५। वायू यास्तव तेज झळाले । तेजी आप सामावले ।। आपेचिया वहिले । पृथ्वीतत्त्व ।।६।। आत्मयाचा प्रकाश । पहाता दिसे सावकाश ।। येणे होय उल्हास । सकारी गा।।७।। आत्मस्वरूप भू मन। भू लागी सलग्न मन ।। स्फुरद्रुप स्फुरे पूर्ण । संकल्पेसी ।।८।। तेणे केली भूमिती । भू ची दावियेली मिती ।। संकल्पी या गूढ स्थिती । स्थापकता ।।९।। मने आकारीले स्वप्न । स्वप्नी विचरे मन । भू भीतरी मीपण । व्यष्टीभावे ।।१०।। मेंदुपरीस मन । ऐसे हे आन ।। येतसे कळून । सूक्ष्मदृष्टी ।।११।। सहस्रदळ स्थान । जे बुद्धीचे विकसन ।। वनस्पती ते कोठून । राखवावे ।।१२।। परी तेथ ही भावना । स्पष्ट दिसे मेंदुविना ।। हा संकल्प मनोमना । ठाव दावी ।।१३।। ऐसे जे मन । भावरूप आपण ।। दावी वनस्पती खूण । पृथ्वीपोटी ।।१४।। तरी इये भूमन । भूमी भीतरी गहन ।। गाळीव गगन । सूक्ष्मतर ।।१५।। गगनी इया सूक्ष्म लहरी । नवल प्रकाशाची परी ।। चंद्रसूर्य अग्नी सरी । पवती ना ।।१६।। इडा पिंगला ओघ सैरा । वरी आत्मप्रकाश उबारा ।। हा अध्यात्म गाभारा । तेजोरूप ।।१७।। प्राणैवआत्मा हे श्रुती । बोलीयेली स्पष्टोक्ती ।। जाणितले साधुसंती । एकमेव ।।१८।। जेथ काही निर्वात। तेथ काही असे वात ।। गगनीचा स्पंद जेथ । स्थूळ होय।।१९।। सूक्ष्म वायुप्रकाश । अंतर्बाह्य दृष्टीसम ।।दिसे तेज सौरस । जीवनरूप ।।२०।। जव या वायुचा प्रकाशु । तव या भांडियाचा विश्वासु ।। तयावीण उदासू। ज्ञानाई म्हणे ।।२१।। इये प्रकाशे भासात्मा । जया बोलती जीवात्मा ।। जेणे भासाचा महिमा । वाढविला ।।२२।। जेतुले मनासी भासे । आणि दृष्टी दिसे।। तेतुलेचि नासे । भासापरी ।।२३।। तरी भासे ते नासे । न भासे ते न



नासे ।। हा भास जै प्रकाशे । चिरंतन विभू ।।२४।। प्रकाश तो आत्मा । जेणे भासात्मा भास महिमा ।। भासापैल निरूपमा । तोचि विभु ।।२५।। निराकारी आकार । आकारी निराकार ।। आकार लोपे निराकार। जैसे तैसे ।।२६।। जे आत्मत्वे भान । ऐसे जे निरंजन ।। निश्चळ परीपूर्ण । सदोदीत ।।२७।। निश्चळाच्या अंगावरी । उठती चंचळाच्या लहरी ।। सूत्र हे अंतरी । वर्म दावी।।२८।। ऐसे निवृत्तीनाथ आपण । त्यांचे माऊली करी स्तवन ।। करुनि मंगलाचरण । नमन केले।।२९।। मनाचे मनत्व नुरे । तेचि नमन खरे ।। पिताजी गोविंद सांगती आधारे । कीर्तनामाजी ।।३०।। जया ज्ञानेश दर्शन । आळंदी क्षेत्री प्रकाशमान ।। कृपेचि केले चित्रण । म्हणोनि भेटी आम्हासी।।३१।। ज्ञानेश माऊली भजन । विसरोनी देहभान ।। जयांचे तद्रुप जीवन । अखंडित ।।३२।। अमृतानुभवी षट्सूत्री । लिहिली जे ज्ञानेश्वरी ।। त्यातील पंचश्लोकावरी । अमृत टीका नाथांची ।।३३।। त्यातील हे नमन सार। किबेकृत ग्रंथी थोर ।। मामासाहेब दांडेकर । संग्रही असे।।३४।। त्याचा अर्थ शोधिता गहन । म्हणोनि प्रार्थिला ज्ञानघन ।। तोचि बोललिया पूर्ण । स्फुरला अर्थ ।।३५।। म्हणोनिया ज्ञानदेवा । केली अल्पशी सेवा ।। आपुला नमन प्रसाद मेवा । अर्पी आपणा दासराम ।।३६।।

श्रीदासराम लेखन वही क्र. १२४

*****

## प्रकरण - १३

श्रीदासराममहाराजकृत

## अभंग अमृतानुभव

**प्रस्तावना :-**

या प्रकरणात श्रीज्ञानेश्वरमहाराजकृत अमृतानुभव या ग्रंथातील प्रकरण पहिले - 'शिवशक्ती समावेशन मूळ' यातील पहिल्या दोन मूळ ओव्यांवर श्रीदासराममहाराज यांनी टीकेचे दोन अभंग, दासराम लेखन वही क्र. २५९ पान क्र.७३३ वर लिहिले आहेत. हे दोनच अभंग उपलब्ध असल्याने ते येथे प्रस्तुत केले आहेत.

**मूळ ओवी**

**ऐसी ही निरुपाधिके । जगाची जिये जनके ।।**
**तिये वंदिती मिया मुळीके । देवोदेवो ।।१।।**

**अभंग क्रमांक १**

जगालागी जन्म देवुनी मातापिता । निरुपाधी तत्त्वता मूळरूप ।।१।।
तेचि शिवशक्ती जो का मुळारंभ । अनादि स्वयंभ परमात्मा ।।२।।
शब्दरुपातीत शिव तो अव्यक्त । शक्ती ते अनंत शब्दाकाश ।।३।।
तयाते वंदन शब्दाचे उपरी । प्रणवाची कुसरी दासरामी ।।४।।

**मूळ ओवी**

**जो प्रियूचि प्राणेश्वरी । उलथे आवडीचे सरोभरी ।।**
**चारुस्थळी येका हारी । एकांगाचा ।।२।।**

**अभंग क्रमांक २**

प्राण तोचि भर्ता प्राणेश्वरी शक्ती । नटली अव्यक्ती प्रणवरूप ।।१।।
आवडीचे योगे होतसे आलट । आलटपालट एकत्वेसी ।।२।।
चार खाणी चार वाणी स्थळांतरी । एक अंगेसरी वर्तताती ।।३।।
एकपणे दोघे एकांगे वर्तती । दासरामी आर्ती अद्वैताची ।।४।।

*****



## श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प सूची

| पुष्प क्रमांक | ग्रंथाचे नांव | सन |
|---|---|---|
| १ | चिमड संप्रदाय | २००५ |
| २ | श्रीरामदासस्वामी चरित्र | २००६ |
| ३ | श्रीदासराममहाराजप्रणित भजन तरंग | २००६ |
| ४ | श्रीदासराममहाराज कथित हरिपाठ संकीर्तन | २००७ |
| ५ | श्रीदासराममहाराज नित्यपाठ चरित्र | २००७ |
| ६ | दासबोधातील तत्त्वज्ञान | २००७ |
| ७ | श्रीदासराममहाराजांचा वचन संग्रह | २००८ |
| ८ | श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज चरित्र | २००९ |
| ९ | साधन संध्या | २००९ |
| १० | अनंत अमृत स्मरण | २००९ |
| ११ | श्रीगुरुमहिमा | २००९ |
| १२ | श्रीज्ञानेश्वरी प्रसाद (श्रीज्ञानेश्वरीतील निवडक ओव्या अर्थासह) | २००९ |
| १३ | श्रीदासरामगाथा पुरवणी | २००९ |
| १४ | श्रीदासराममहाराज आत्मचरित्र | २०१० |
| १५ | श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर चरित्र | २०१० |
| १६ | श्रीदासराममहाराज श्लोकरचना | २०१० |
| १७ | श्रीज्ञानदेवकृत अमृतानुभव(समओवी टीकेसह) | २०१० |
| १८ | श्रीदासराममहाराज सहस्रनामस्तोत्र | २०१० |
| १९ | समर्थ रामदास स्वामी कृत आत्माराम (श्रीदासराममहाराजकृत गद्यार्थासह) | २०१० |
| २० | श्रीगुरुलिंगगीता (कानडी लिपीत) | २०१० |
| २१ | श्रीगुरुलिंगगीता (मराठी) | २०१० |

| पुष्प क्रमांक | ग्रंथाचे नांव | सन |
|---|---|---|
| २२ | **श्रीरामनिकेतन (माहिती पुस्तिका)** | २०११ |
| २३ | **श्रीरामनिकेतनमधील आराधना** | २०११ |
| २४ | **ग्रंथत्रयी** (आत्मबोधप्रत्ययामृत, श्रीदासरामविंशिका, श्रीदासरामपंचविशी) | २०११ |
| २५ | **श्रीज्ञानदेवकृत उत्तरगीता** (श्रीदासरामकृत गद्यार्थासह) | २०११ |
| २६ | **अभंगदरबार (आवृत्ती १)** | २०११ |
| २७ | **सद्बोध दशक** | २०११ |
| २८ | **श्रीदासराममहाराज नित्यपाठचरित्र** | २०११ |
| २९ | **श्रीगुरुराजकथित ज्ञान आणि बोध** | २०११ |
| ३० | **प.पू.श्रीमाईसाहेबमहाराज यरगट्टीकर चरित्र** | २०११ |
| ३१ | **पाठांतर सुलभ भगवत्गीता** | २०११ |
| ३२ | **श्रीदासराममहाराज लिखित लघु चरित्रे** | २०११ |
| ३३ | **श्रीतात्यासाहेबमहाराजकृत मनोबोध** (निवडक अभंग विवरणासह) | २०११ |
| ३४ | **प.पू.श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर चरित्र** | २०११ |
| ३५ | **महायोगिनी श्रीलक्ष्मीबाईअक्का चरित्र** | २०११ |
| ३६ | **तो हा दासबोध** (श्रीमद्‌दासबोधातील सारभूत ओव्या अर्थासह) | २०११ |
| ३७ | **श्रीदासराममहाराज चरितामृत** | २०११ |
| ३८ | **श्रीनिंबरगीकरमहाराज चरित्र** | २०११ |
| ३९ | **श्रीदाजीसाहेबमहाराज यरगट्टीकर चरित्र** | २०११ |
| ४० | **श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस चरित्र** | २०११ |
| ४१ | **श्रीदासराममहाराज यांची आत्मलहरी** | २०११ |
| ४२ | **श्रीदासराममहाराजकृत हरिनामसंकीर्तन** | २०१२ |



| पुष्प क्रमांक | ग्रंथाचे नांव | सन |
|---|---|---|
| ४३ | **श्रीदासराममहाराज यांची प्रवचने** | २०१२ |
| ४४ | **प.पू.श्रीमामामहाराज केळकर चरित्र** | २०१२ |
| ४५ | **श्रीदासरामगीतम्** (श्रीदासराममहाराज यांचे संस्कृत चरित्र व संस्कृत रचना) | २०१२ |
| ४६ | **श्रीदासराममहाराज वचनसंग्रह** | २०१२ |
| ४७ | **चैतन्यब्रह्म** | २०१३ |
| ४८ | **श्रीदासराममहाराज विरचित वायुलहरी**(विवरण) | २०१३ |
| ४९ | **श्रीदासराममहाराजकृत सात करुणाष्टके**(विवरणासह) | २०१३ |
| ५० | **श्रीगुरुलिंगगीता (६६ पदे व अर्थ)** | २०१३ |
| ५१ | **श्रीरामचंद्रावजीमहाराज, चिमड कृत चिमड संप्रदायातील पंचपदी** | २०१३ |
| ५२ | **गुरुलिंगगीतेचे अंतरंग भाग -१** | २०१४ |
| ५३ | **श्रीदासराममहाराजकृत रामदासबोध**(विवरणासह) | २०१४ |
| ५४ | **श्रीदासरामायण** (श्रीदासराममहाराजांचे गीतचरित्र) | २०१४ |
| ५५ | **श्रीदासराममहाराज केळकर नामसाधना मंदिर वास्तुशांत** | २०१४ |
| ५६ | **श्रीदासराममहाराजकृत रेवणसिद्धपाठ**(विवरणासह) | २०१४ |
| ५७ | **गुरुलिंगगीतेचे अंतरंग भाग-२** | २०१५ |
| ५८ | **अभंग दरबार** (आवृत्ती २ री) | २०१५ |
| ५९ | **श्रीदासरामचरित्र** | २०१५ |
| ६० | **आत्मारामपाठ** (श्रीदासरामगाथेमधील २० निवडक अभंगांचा समुह) | २०१५ |
| ६१ | **ज्ञानेश्वरीमधील ६वा अध्याय** (श्रीदासराममहाराजकृत गद्यार्थासह) | २०१५ |

| पुष्प क्रमांक | ग्रंथाचे नांव | सन |
|---|---|---|
| ६२ | **श्रीमद् दासबोधातील प्रपंचयोग** | २०१५ |
| ६३ | **अभंग दरबार भाग - २** | २०१५ |
| ६४ | **श्रीज्ञानदेवांचे निवडक अभंग (श्रीदासराममहाराजकृत अर्थासह)** | २०१६ |
| ६५ | **श्रीएकनाथमहाराज प्रणित आनंदानुभव** (श्रीदासराममहाराजकृत आनंदविलास टीकेसह) | २०१६ |
| ६६ | **नासदीयसूक्त विवरण** | २०१६ |
| ६७ | **श्रीज्ञानदेवतेहेत्तिशी भावार्थ विवरण** | २०१७ |
| ६८ | **पाठांतर सुलभ भगवद्गीता आवृत्ती दुसरी** | २०१९ |
| ६९ | **दासबोधातील परमार्थ योग** | २०१९ |
| ७० | **चांगदेवपासष्टी एक नामकळा (विवरणासह)** | २०१९ |
| ७१ | **परमार्थ प्रश्नोत्तरी** (पुनर्मुद्रण) | २०१९ |
| ७२ | **चिन्मयबोध** (गुरुपरंपरेतील सिद्धपुरुषांची पदे अर्थासह) | २०१९ |
| ७३ | **श्रीदासराम चिंतनिका** (लेख संग्रह) | २०१९ |
| ७४ | **श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ** (१६ अभंग) | २०१९ |
| ७५ | **अक्षरे चैतन्याची भाग - १** | २०२० |